**( अध्यक्षस्थानी माननीय तालिका सभाध्यक्ष डॉ. सतीश पाटील )**

**पृ. शी.** : कोकणातील रासायनिक कंपन्यांमधून सोडण्यात येणाऱ्या प्रदूषित सांडपाण्यामुळे सागरी संपत्तीचे, जैवविविधतेचे होत असलेले नुकसान

**मु. शी.** : कोकणातील रासायनिक कंपन्यांमधून सोडण्यात येणाऱ्या प्रदूषित सांडपाण्यामुळे सागरी संपत्तीचे, जैवविविधतेचे होत असलेले नुकसान, यासंबंधी श्री. सुभाष पाटील, वि.स.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा

श्री. सुभाष पाटील ( अलिबाग ) : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो :-

"***शासनाने*** नुकतेच कोकण विभाग हा केमिकल झोन होणार असल्याचे जाहीर करण्यात येणे, कोकणातील खोपोली, रोहा, महाड, परशुराम यासारख्या केमिकल कंपन्यामुळे त्या भागातील पर्यावरणाचे झालेले नुकसान, पाताळगंगा, कुंडलिका, सावित्री, जगबुडी, दाभोळ खाडयांमधील दुषित पाण्यामुळे मासे मृत्यु पावणे, शेतीचे नुकसान तसेच नागरिकांचे आरोग्यासह पर्यावरणावरही त्याचा होत असलेला परिणाम, कोकण किनारा म्हणजे सागरी संपत्तीची खाण समजली जाणे, आंबा, फणस, नारळ, सुपारी, काजू, कोकम यासारख्या विविध फळांनी नटलेले कोकण उत्पादना बरोबरच एक मोठे पर्यटन केंद्रही असणे, किनारपट्टीवरील रासायनिक कंपन्यामधून सोडण्यात येणाऱ्या प्रदुषित सांडपाण्यामुळे सागरी संपत्तीचे, जैवविविधतेचे नुकसान होत असल्याने याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

अध्यक्ष महोदय, राज्य शासनाने कोकणाला केमिकल झोन म्हणून डिक्लिअर केलेले आहे. केंद्र शासनाने PCPIR अशा प्रकारचे नवीन धोरण जाहीर केलेले आहे. PCPIR मार्फत पश्चिम बंगालपासून ते गुजरातपर्यंतचा भाग आरक्षित करुन खाजगी उद्योजकांना त्या ठिकाणी केमिकल कंपन्या उभारण्यासाठी परवानगी दिलेली आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. सुभाष पाटील.......

अध्यक्ष महोदय, मी अर्धा-तास चर्चेच्या माध्यमातून मंत्री महोदयांना एक ते दोन प्रश्न विचारणार आहे.

अध्यक्ष महोदय, कोकणामध्ये ऑलरेडी धाटाव, महाड, लोटे परशुराम येथे केमिकल कारखाने आहेत. त्यामुळे प्रदूषाची एक मोठी गंभीर समस्या होऊन बसलेली आहे. खाजगी उद्योजकांना परवानगी देण्यासाठी नव्याने कायदा केला तर कोकणातील जनजीवन विस्कळीत होणार आहे. उद्योगाला चालना मिळाली पाहिजे. परंतु, याचबरोबर कोकणातील जनता देखील जगली पाहिजे, अशी राज्य शासनाने भूमिका घेण्याची गरज आहे. पूर्वी सरकारने केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठविलेला होता.

अध्यक्ष महोदय, मुख्यमंत्री महोदयांनी कोकणाशी संबंधित उपस्थित केलेल्या प्रस्तावासंबंधी सभागृहात चांगले आणि विस्तृतपणे उत्तर देऊन कोकाणातील जनतेला न्याय देण्याचा प्रयत्न केलेला आहे. केंद्र शासनाने केमिकल झोन डिक्लिअर केलेला असून, तो राज्य शासनाने रद्द करण्यासाठी योग्य ती कार्यवाही करण्याची गरज आहे.

अध्यक्ष महोदय, रोहा, धाटाव येथे कंपनी आहे. या कंपनीतील रसायनमिश्रीत पाण्यावर कोणती ही प्रक्रिया न करता कुंडलिका नदीत सोडले जाते. त्यामुळे नदीतील मासे मरतात. त्या ठिकाणचा ट्रीटमेंट प्लॅन्ट बंद झालेला आहे. धाटाव कंपनीच्या परिसरात केमिकल कंपन्यांची एक सोसायटी आहे. अशा कंपन्या त्याकडे दुर्लक्ष करीत आहेत. मी यासंदर्भात तहसीलदार आणि प्रांत अधिकाऱ्यांना पत्रे दिलेली आहेत. खाडीलगत कोळी बांधवाची उपजीविका मत्स्यमारीवर अवलंबून आहे. परंतु, खाडीतील मासे वारंवार मरत असल्यामुळे त्यांच्या उपजीविकेचा प्रश्न निर्माण झालेला आहे. केमिकल कंपन्यातील रसायनयुक्त मिश्रीत पाणी खाडीत किंवा नदीत सोडल्यामुळे मासे मरत आहेत. त्यामुळे संबंधित कोळी बांधवांना शासनाने नुकसानभरपाई देण्याची गरज आहे.

अध्यक्ष महोदय, धाटाव कंपनीची ड्रेनेज पाईपलाईनसाठी 100 कोटी रुपयांची आवश्यकता आहे. सदर पाईपलाईनसाठी 100 कोटी रुपयांचा निधी द्यावा, अशी माझी मंत्री महोदयांकडे मागणी आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

13-04-2016 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A-3

SGS/ MMP/ AKN 10:00

श्री. सुभाष देसाई ( उद्योग मंत्री ) : अध्यक्ष महोदय, कोकण किनारपट्टीच्या परिसरात मागील काळात रासायनीक कारखाने उभारले असून, ती खरी गोष्ट आहे. रसायनमिश्रीत सांडपाणी पिण्याच्या पाण्यात आणि शेतामध्ये सोडल्यामुळे नुकसान होऊ नये यासाठी उद्योग विभागाने आवश्यक ते प्रयत्न केलेले आहेत. सांडपाण्यावर प्रक्रिया करणारी केंद्र उभारण्यात आलेली आहेत. यासाठी केंद्र शासन, राज्य शासन आणि स्थानिक उद्योजकांकडून निधी मिळत असतो. त्यानुसार सांडपाण्यावर प्रक्रिया करणारी केंद्र उभारली जातात. त्यानंतर प्रक्रिया केंद्र चालविण्याची जबाबदारी उद्योगांच्या संघटनेवर असते. त्यांनी एक समिती स्थापित करुन परिचलन करण्यासाठी दिले जाते. ही त्यांची जबाबदारी आहे. कारखान्यातील सांडपाणी शुध्द करुन नदीत किंवा खाडीत सोडायचे असते. दुषित पाणी सोडायचे नाही, अशी त्यांच्यावर बंधने असतात.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी रोहा, धाटावमधील प्रक्रिया केंद्र व्यवस्थित चालत नसल्याची तक्रार केलेली आहे. सदर केंद्र सुस्थितीत आणण्यासाठी योग्य ते लक्ष देऊन प्रयत्न केला जाणार आहे. सदर केंद्र सुस्थितीत चालविणे हे संबंधित उद्योजकांवर बंधनकारक केले जाणार आहे. कोणत्याही प्रकारे दुषित पाणी पिण्याच्या पाण्यात किंवा शेतीमध्ये सोडले जाणार नाही, याबाबत योग्य ती खबरदारी घेतली जात आहे.

श्री. सुभाष पाटील : अध्यक्ष महोदय, केमिकल कंपन्यातील रसायनयुक्त मिश्रीत पाणी खाडीत किंवा नदीत सोडल्यामुळे मासे मरत आहेत. यासंदर्भातील अहवाल तहसीलदार आणि प्रांत अधिकाऱ्यांनी शासनाकडे पाठविलेला आहे. यापूर्वी एमआयडीसीमधील सोसायटीने नुकसानग्रस्त कोळी बांधवांना आर्थिक मदत दिलेली आहे. पर्यावरण विभागाचे त्यावर नियंत्रण असते. पण आज कुंपणच शेत खात आहे, अशी परिस्थिती आहे. पर्यावरण विभागाकडून योग्य प्रकारे मॉनेटरिंग केले जात नाही. पर्यावरण विभागाने योग्य पध्दतीने मॉनेटरिंग केले तर असे प्रकार वारंवार घडणार नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

अध्यक्ष महोदय, केमिकल कंपन्यातील रसायनयुक्त मिश्रीत पाणी खाडीत किंवा नदीत सोडल्यामुळे मासे मरत आहेत. त्यामुळे संबंधित कोळी बांधवांना शासनाने नुकसानभरपाई देण्याची गरज आहे.

.....4....



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. सुभाष देसाई : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी कोळी बांधवांना आर्थिक मदत देण्याची मागणी केलेली आहे. यासंदर्भात उद्योजक, संबंधित कोळी बांधव यांची संयुक्तपणे बैठक घेऊन त्यांना कोणत्या प्रकारे मदत करता येईल याबाबत प्रयत्न केला जाणार आहे. कोळी बांधवांना आर्थिक मदत देण्याबाबत शासन सकारात्मक आहे. सन्माननीय सदस्यांना सदर बैठकीसंदर्भातील माहिती दिली जाईल.

**तालिका सभाध्यक्ष** : माननीय मंत्री संबंधितांबरोबर किती दिवसांमध्ये बैठक आयोजित करणार आहेत ?

श्री. सुभाष पाटील : अध्यक्ष महोदय, सन 2016 चे अर्थसंकल्पीय अधिवेशन संपल्यानंतर लवकरात लवकर संबंधितांबरोबर बैठक घेतली जाणार आहे.

श्रीमती मनिषा चौधरी : अध्यक्ष महोदय, कोकणात केमिकल झोन आहे. एमआयडीसीमधील दूषित पाणी समुद्रात किंवा नदीत सोडले तर प्रदूषण नियंत्रण मंडळ त्यांच्यावर कारवाई करते. संबंधित कंपन्या बोअरींगचे पाणी वापरल्यानंतर दूषित पाणी डायरेक्ट खाडीमध्ये सोडतात. पाणेरी येथील तारापूर एमआयडीसी बोअरींगचे पाणी वापरल्यानंतर दूषित पाणी समुद्रात सोडतात. पाणेरी येथील जनतेचे नव्हे तर तेथील अनेक शेतकऱ्यांचे जनजीवन धोक्यात आलेले आहे. अनेकांना त्वचारोग झालेले आहेत. बोअरींगच्या पाण्यावर कोणतीही प्रक्रिया न करता दूषित पाणी समुद्रात सोडल्यामुळे प्रजनासाठी येणारे मासे मरतात. बोअरींगच्या पाण्यावर प्रक्रिया करून ते समुद्रात सोडण्याबाबत मंत्री महोदय आदेश देतील काय ?

श्री. सुभाष देसाई : अध्यक्ष महोदय, हा प्रश्न विभागासमोर आलेला होता. काही उद्योजक दूषित पाण्यावर कोणतीही प्रक्रिया न करता परस्पर नदीत किंवा समुद्रात सोडत असतील तर त्यांच्यावर कारवाई करण्याची प्रक्रिया सुरु झालेली आहे. तारापूरमधील प्रकरणात पोलीस स्टेशमध्ये एफआयआर दाखल केलेला आहे. तेथील सीईटीपी प्लॅन्टमध्ये आवश्यक त्या सुधारणा

करुन काही कि.मी.दूर अंतरापर्यंत खोल समुद्रात रिसायकल केलेले पाणी सोडण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे.

अध्यक्ष महोदय, महाडमध्ये देखील प्रक्रिया केंद्र असून, त्यामध्ये अधिक सुधारणा करण्याचे काम सुरु केलेले आह. ज्या ज्या ठिकाणी रायायनिक कारखाने आहेत, अशा ठिकाणी हे काम सुरु आहे.

.....5....



**पृ.शी.** : मोताळा (जि.बुलडाणा) येथे प्रशासकीय इमारत उभारणेबाबत

**मु.शी.** : मोताळा (जि.बुलडाणा) येथे प्रशासकीय इमारत उभारणेबाबत या विषयावर तारांकित प्रश्न क्रमांक 49238 ला दिनांक 28 मार्च, 2016 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात श्री. हर्षवर्धन सपकाळ वि.स.स. यांनी उपस्थित लेली अर्धा-तास चर्चा.

श्री.हर्षवर्धन सपकाळ ( बुलडाणा ) : अध्यक्ष महाराज, मोताळा (जि.बुलडाणा) येथे प्रशासकीय इमारत उभारणेबाबत या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 49238 ला दिनांक 28 मार्च, 2016 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये ही अर्धा-तास चर्चा उपस्थित करीत आहे.

अध्यक्ष महोदय, तारांकित प्रश्न क्रमांक 49238 ला दिनांक 28 मार्च, 2016 रोजी मोताळा (जि.बुलडाणा) येथे प्रशासकीय इमारत उभारणेबाबत मंत्री महोदयांनी भविष्यात आर्थिक तरतूद केल्यानंतर प्रशासकीय भवन मंजूर केले जाईल असे सकारात्मक उत्तर लेखी स्वरुपात दिले होते.

अध्यक्ष महोदय, प्रत्यक्षात 7 कार्यालये नसून काही कार्यालये तहसील, पंचायत समितीमध्ये आहेत. मोताळा लगत असणारी बोराखेडी गावालगत काही कार्यालये आहेत. अशा प्रकारे 20 शासकीय कार्यालये इतरत्र आहेत. मोताळा, जिल्हा बुलडाणा येथे नवीन वास्तू नसल्यामुळे दहा बाय दहाच्या जागेत कृषी कार्यालयाचे काम सुरु आहे. भूमि अभिलेख कार्यालय देखील कमी जागेत सुरु आहे. तालुक्यातील नागरिकांना कार्यालय कोठे आहे, हे त्यांना सापडत नाही, अशी वाईट परिस्थिती आहे. परिणामी प्रशासकीय कामाचा खेळखंडोबा होत आहे. त्यामुळे इतरत्र असलेली सर्व शासकीय कार्यालये एका ठिकाणी आणणे ही काळाची गरज होऊन बसलेली आहे. एखादी बैठक आयोजित करावयाची म्हटली तर त्यासाठी सभागृह नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

अध्यक्ष महोदय, मी वास्तव काय आहे ते सांगण्याचा प्रयत्न करीत आहे. मला पीठासीन अधिकाऱ्यांनी दोन ते तीन प्रश्न विचारण्याची संधी द्यावी, अशी मी विनंती करीत आहे.

B-1.......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हर्षवर्धन सपकाळ...

शासनाने मोताळा येथे प्रशासकीय इमारत बांधण्याचे कबूल केलेले आहे. या अनुषंगाने माझा मंत्रिमहोदयांना प्रश्न आहे की, मोताळा तालुक्यातील प्रशासकीय इमारत कधी उभी होईल आणि त्यासाठी शासन आर्थिक तरतूद उपलब्ध करुन देणार आहे काय?

श्री.चंद्रकांत पाटील ( सार्वजनिक बांधकाम मंत्री ): अध्यक्ष महाराज, प्रत्येक जिल्ह्यात तसेच तालुक्यातील केंद्रामध्ये सर्व प्रशासकीय कार्यालय एकाच ठिकाणी यावीत असा प्रयत्न झाला, तो पूर्ण यशस्वी झाली. 258 तालुक्यांपैकी 84 ठिकाणी अशा प्रकारची इमारत पूर्ण करण्यात शासन यशस्वी झाले. ज्या ठिकाणी शासकीय कार्यालय एकत्रित आहेत अशी 84 सोडून उर्वरित 188 ठिकाणी प्रशासकीय इमारत नाही. सर्व कार्यालये अशी एकत्रित आलेली नाही याचे कारण असे की, निधीची कमतरता आहे. यावर्षी 304 कोटी रूपये मागितले त्यातील फक्त 73 कोटी रूपये मिळाले. अशी कार्यालये एकत्रित आली पाहिजेत, ही गोष्ट मला मान्य आहे. मोताळा तालुक्यात जागा आयडेंटीफॉय झालेली असून तेथिल प्रशासकीय कार्यालयासाठी दहा कोटी रूपये लागतील. यासंदर्भात सन्माननीय सदस्यांसमवेत बैठक घेऊन प्रशासकीय इमारतीला टाईम बाऊंड मंजुरी तसेच दोन टप्प्यामध्ये निधी देऊन प्रशासकीय कार्यालयाची इमारत पूर्ण करण्यात येईल. मोताळा तालुक्यात ज्या तहसील कार्यालयामध्ये प्रशासकीय कार्यालये आहेत त्याची सुध्दा डागडुजी करण्याची आवश्यकता असून त्यासाठी लगेचच 25 लाख रूपये देण्यात येतील.

**तालिका सभाध्यक्ष :** मंत्री महोदय आपल्या विभागाच्या नियोजनामध्ये मोताळा तालुक्याचा समावेश आहे काय?

श्री.चंद्रकांत पाटील : अध्यक्ष महाराज, योजनेमध्ये सर्वच तालुके आहेत. प्राधान्यक्रमाने मोताळा तालुका घेऊ. हे अधिवेशन सत्र संपल्यानंतर माननीय राज्यमंत्र्याच्या उपस्थितीत एक बैठक घेऊ. मोताळा येथील प्रशासकीय इमारतीसाठी दहा कोटी रूपयांची आवश्यकता असून त्यासाठी जागा आयडेंटीफॉय झालेली आहे. ती जागा ताब्यात घेऊन अंदाजपत्रक तयार करुन दोन टप्प्यामध्ये निधी देण्याचा प्रयत्न करु

श्री.हर्षवर्धन सपकाळ : अध्यक्ष महाराज, मी मंत्री महोदयांचा आभारी आहे. आपण

.....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हर्षवर्धन सपकाळ.....

मला दुसरा प्रश्न विचारण्याची संधी दिली नाही. आज काही सन्माननीय सदस्य उपस्थित नसल्यामुळे मला अर्धा-तास चर्चा विचारण्यासाठी वेळही आहे. मी मंत्री महोदय श्री.चंद्रकांत पाटील यांचे विशेष आभार व्यक्त करतो. मोताळा तालुक्यात प्रशासकीय इमारत झालीच पाहिजे. मोताळा तालुका हा अवर्षण प्रवण तालुका आहे. या तालुक्यातील रस्त्याचा बॅकलॉग व्यवस्थित मार्गी लावण्याचे काम मंत्री महोदय श्री.चंद्रकांत पाटील यांनी केलेले आहे. माननीय ऊर्जा मंत्री श्री.चंद्रशेखर बावनकुळे यांनी सर्वात जास्त विजेचा लो व्होल्टेज असलेला हा तालुका त्यांच्या सर्वेक्षणामध्ये घेतला आहे. तेथे 33 के.व्ही.चे सब स्टेशन मंजूर करण्याच्या अनुषंगाने प्रस्ताव मागविले म्हणून मी त्यांचेही आभार व्यक्त करतो. सन्माननीय सदस्य तथा माजी उपमुख्यमंत्री श्री.अजित पवार यांनी या सभागृहात एका प्रश्नाच्या अनुषंगाने मोताळा तालुक्यात मागासवर्गीयांसाठी वसतिगृहच नव्हते. मागासवर्गीय मुला/मुलींसाठी वसतिगृह मंजूर करुन दिले. मागासवर्गीयाचा कलंक असलेल्या या तालुक्याला सिंचन आणि इतर माध्यमातून सभागृहाने मदत करावी, ही भावाना या ठिकाणी धन्यवाद देताना व्यक्त करतो. मोताळा तालुक्यासंबंधी कृती आराखडा तयार करुन तो टाईम लिमिट मध्ये करणार का, याबाबत कृपया मंत्री महोदय खुलासा करणार काय?

श्री.चंद्रकांत पाटील : अध्यक्ष महाराज, हे अधिवेशन संपल्यानंतर लगेचच बैठक लावून त्या बैठकीमध्ये वेळापत्रक ठरवून ते काम पूर्ण करु.

-------------

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सन्माननीय सदस्य श्री.मल्लिकार्जुन रेड्डी यांची अर्धा-तास चर्चा व्यपगत करणेसंबंधी**

प्रा.राम शिंदे : अध्यक्ष महाराज, आजच्या सभागृहाच्या कामकाजपत्रिकेवरील अर्धा-तास चर्चा क्रमांक-2 काल रात्री 9.00 वाजता चर्चेला घेण्यासाठी मी आपणास विनंती केली होती. गेली तीन दिवस सलग ही अर्धा-तास चर्चा कामकाजपत्रिकेवर दर्शविली जाते. किमान ही अर्धा-तास चर्चा पुढील अधिवेशनात येऊ नये अशी माझी विनंती आहे. सदरची अर्धा-तास चर्चा व्यपगत करावी.

**तालिका सभाध्यक्ष :** सन्माननीय सदस्यांनी अर्धा-तास चर्चा दिलेली असल्यामुळे सन्माननीय सदस्यांना त्याची जाणीव पाहिजे. आता आपण क्रमांक - 6 वरील सन्माननीय सदस्य श्री.सुरेश गोरे यांची अर्धा-तास चर्चा चर्चेला घेऊ.

...4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ. शी.** : चासकमान व भामा आसखेड या दोन्ही धरणाच्या प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करणे

**मु. शी.** : चासकमान व भामा आसखेड या दोन्ही धरणाच्या प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करणे, यासंबंधी श्री.सुरेश गोरे, वि.स.स. यांनी उपस्थित □लेली अर्धा-तास चर्चा.

श्री.सुरेश गोरे ( खेड-आळंदी ) : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने सन्माननीय सदस्य सुरेश गोरे यांनी म.वि.स.नियम 94 अन्वये पुढील विषयावर दिलेली अर्धा-तास चर्चा उपस्थित □रतो :-

"चासकमान व भामा आसखेड दोन्ही धरणामुळे प्रकल्पबाधितांना पर्यायी जमिनी ,पुनर्वसन व नागरी सुविधा अद्याप उपलब्ध करुन न देणे, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी वारंवार शासनाकडे निवेदन देऊनही कोणतीच कार्यवाही न होणे, चासकमान धरण प्रकल्पग्रस्तांच्या लढा हा गेली २६ वर्षे ते लढत असून मा. उच्च न्यायालयाने जिल्हाधिकारी यांना प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमिनी, पुनर्वसन व नागरी सुविधा द्याव्यात व कार्यपूर्तीचा अहवाल ३ महिन्यात न्यायालयात सादर करावा असा आदेश सन २०१० मध्ये देऊनही शासनाने कोणतीच कार्यवाही न करणे, परिणामी प्रकल्पग्रस्तांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

अध्यक्ष महाराज, अर्धा-तास चर्चेच्या माध्यमातून मी शासनाचे लक्ष वेधण्यासाठी या ठिकाणी उभा आहे. खेड तालुक्यातील चासकमान व भामा आसखेड येथील पुनर्वसनाचा प्रश्न गेल्या 25 ते 30 वर्षापासून प्रलंबित आहे. अनेकवेळा मागणी करुनही तसेच अनेकवेळा बैठका घेऊनही यावर निश्चित असा मार्ग निघाला नाही. माझ्या तालुक्यात भामा आसखेड या प्रकल्पासंदर्भात गेल्या 30 वर्षापासून पुनर्वसनाचा प्रश्न प्रलंबित आहे. असे अनेक विषय आहेत की, त्यामध्ये अजूनही मार्ग निघाला नाही. या प्रकल्पग्रस्त लोकांना न्याय मिळालेला नाही. भामा आसखेड या प्रकल्पाचे 1414 खातेदार आहेत. गेल्या 25 वर्षात 111 शेतकऱ्यांच्या पुनर्वसनाचे काम झालेले आसून

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

1303 खातेदारांचे अजूनही पुनर्वसन झालेले नाही. भामा आसखेड प्रकल्पग्रस्तांना नागरी सुविधा देण्याची प्रक्रिया, जमीन तसेच त्यांना नुकसान भरपाई देण्यात आलेली नाही. याचे कारण असे

...5



श्री.सुरेश गोरे.....

की, शसन स्तरावर या कामावर निर्णय घेण्यासाठी आजपर्यंत कोठलीही प्रोसेस झालेली नाही. पुनर्वसनाचे निश्चित असे धोरण शासनाकडून आखले गेले नाही. ज्या खातेदारांनी 65 टक्के रक्कम भरलेली आहे, त्या खातेदारांचे पुनर्वसन का करण्यात आले नाही? ज्या शेतकऱ्यांनी खऱ्या अर्थाने 65 टक्के रक्कम भरली होती, त्या शेतकऱ्यांचे पुनर्वसन करणे ही शासनाची जबाबदारी होती, परंतु अद्याप ते झालेले नाही. त्याचप्रमाणे प्रकल्पग्रस्तांची बुडित क्षेत्रातील अतिरिक्त जमीन संपादित केलेली आहे असूनही अद्यापपर्यंत पाण्यामध्ये बुडालेली नाही, ती जमीन अद्यापपर्यंत शेतकऱ्यांना परत मिळालेली नाही. ही जमीन त्या शेतकऱ्यांना परत मिळावी. अंशतः बुडित झालेल्या काही गावांचे नागरी सुविधांचे प्रश्न, त्यांचे प्रस्ताव जलसंपदा खात्यामध्ये अनेक वर्षापासून पडून आहेत, परंतु त्या प्रस्तावाला मान्यता मिळालेली नाही. अशा अंशतः बुडित नऊ गावांनी नागरी सोई सुविधांची मागणी केलेली आहे, प्रस्ताव सादर केलेला आहे, परंतु त्याला अद्यापपर्यंत मंजुरी मिळालेली नाही, ती पूर्ण करण्यात यावी.

अध्यक्ष महाराज, प्रकल्पातील उजव्या कॅनॉलचे काम अर्धवट अवस्थेत असून त्या कॅनॉलमध्ये शेतकऱ्यांची गेलेली जमीन बुडित आहे. अर्धवट कॅनॉल असल्यामुळे त्या शेतकऱ्यांना कोठलाही लाभ देता येत नाही, अशी परिस्थिती आहे. या शेतकऱ्यांचा जमीन संपदानाच्या विषयासंबंधी मार्ग काढावा लागेल. पुनर्वसनासाठी संपादित केलेली जमीन जी हस्तांतरित केली, त्यावरील शिक्के काढले. ज्या शेतकऱ्यांची जमीन ताब्यात घेतली आहे त्या राशी आणि नानेकरवाडी गावातील 100 हेक्टर जमिनीवरील शेतकऱ्यांचा प्रश्न मोठा अवघड आहे. त्यांना पाण्याचा लाभ आपण देऊ शकत नाही तसेच त्यांचे पुनर्वसनही करु शकत नाही म्हणून त्यांना मोबदला देण्याबाबत विशेष धोरण अवलंबिणे गरजेचे आहे. भामा धरणातून जेव्हा आपण पाणी सोडतो तेव्हा बुडित क्षेत्रामध्ये असलेल्या गावांचा प्रश्न मोठ्या प्रमाणात उभा राहतो. अशा गावांसाठी बुडित बंधारे बांधण्याची मागणी केलेली आहे. प्रकल्पामध्ये त्यांचा समावेश आहे, परंतु त्या कामास अद्याप सुरुवात झालेली नाही. पुनर्वसनासाठी संपादित क्षेत्राकरिता पाण्याचा लाभ देण्यात येत नसल्याने पुनर्वसनाच्या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

जमिनीवरील शिक्के काढणे आवश्यक आहे, अशी मी मागणी करतो. बुडित क्षेत्रातील बाधित शेतक-यांना मोबदला द्यावा. भामा प्रकल्पाच्या पाण्याचे फेरनियोजन केले. या पाण्याचा बिगर सिंचन क्षेत्रासाठी लाभ देण्याचे नियोजन पाठीमागच्या काळात झालेले आहे. खेड तालुक्यातील

..6



श्री.सुरेश गोरे.....

भामा नदीवरील सिंचनासाठी 11 के.टी.वेअर बंधारे आहेत. शेतकऱ्याला पाणी मिळण्यासाठी त्या के.टी.वेअरला पाणी देण्याचे कसलेही नियोजन केलेले नाही. या धरणाच्या पाण्याचे नियोजन करीत असताना बिगर सिंचनाचे नियोजन केलेले आहे.

यानंतर C-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. सुरेश गोरे ....

त्यामुळे ज्या शेतकऱ्यांनी सिंचनासाठी पाण्याची मागणी केलेली आहे, त्यांना पाणी देता येणार नाही अशी परिस्थिती आहे. एमजीपीने या पाण्याचे नियोजन करताना सिंचनासाठी पुणे महानगरपालिका, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, एमआयडीसीसाठी सिंचनासाठी कोणत्याही प्रकारचे पाणी ठेवलेले नाही. आळंदी, चाकण या नगरपालिकांनी पिण्याच्या पाण्याची मागणी केलेली आहे, आमची ती मागणी पूर्ण करावी, अशी मी निमित्ताने विनंती करतो. त्याबाबतचे प्रस्ताव आम्ही सादर केलेले आहेत.

**तालिका सभाध्यक्ष (डॉ. सतीश पाटील)** : सन्माननीय सदस्य ती मागणी पूर्ण करणार काय, असा प्रश्न विचारावा.

श्री. सुरेश गोरे : अध्यक्ष महोदय, आम्ही याबाबत प्रस्ताव दिलेला आहे, ती मागणी मंत्री महोदयांनी पूर्ण करावी, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, दुसरा विषय चासकमान प्रकल्पग्रस्तांचा आहे. गेल्या 25-30 वर्षांपासून या प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न प्रलंबित आहेत. या धरणामुळे बाधित झालेल्या जवळपास 2640 शेतकऱ्यांचा प्रश्न अद्याप प्रलंबित आहे. त्यापैकी केवळ 877 शेतकऱ्यांचा प्रश्न सुटलेला आहे. 1763 शेतकऱ्यांचा प्रश्न अद्याप प्रलंबित आहे. 65 टक्के रक्कम भरण्यावरुन या प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन आजपर्यंत केलेले नाही.

**तालिका सभाध्यक्ष**: सन्माननीय सदस्य त्यांचे पुनर्वसन करणार काय, असा प्रश्न विचारावा.

श्री. सुरेश गोरे : अध्यक्ष महोदय, या प्रकल्प बाधितांचे पुनर्वसन आपण करणार काय, 16 (2) (अ) च्या नोटीसा आपण देणार काय ? नोटीसा देऊन त्यांचे पुनर्वसन करावे, अशी माझी मागणी आहे. प्रामुख्याने चासकमान प्रकल्पाच्या संपादित क्षेत्रामध्ये काही जमिनीवर अजूनही शिक्के आहेत, ते शिक्के काढण्यासाठी ....

**तालिका सभाध्यक्ष**: सन्माननीय सदस्य आपण आता विचारलेल्या प्रश्नांचे उत्तर मंत्री महोदयांकडून घ्यावे. त्यानंतर आणखी काही अडचण असल्यास, मी आपणास परत बोलण्याकरिता संधी देईन.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. सुरेश गोरे : अध्यक्ष महोदय, चासकमान प्रकल्पग्रस्तांच्या जमिनीवरील पुनर्वसनाचे शिक्के आपण काढणार आहात काय, 65 टक्के रक्कम आपण भरुन घेणार आहात काय, 16 (2) (अ) च्या नोटीसा आपण शेतकऱ्यांना देणार आहात काय ?

...3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. चंद्रशेखर बावनकुळे ( ऊर्जा मंत्री ) : अध्यक्ष महोदय, या अर्धा तास चर्चेच्या विषयाशी जलसंपदा, पुनर्वसन व ऊर्जा अशा 3 मंत्रालयांचा संबंध आहे. आता सन्माननीय सदस्यांनी जलसंपदा व पुनर्वसन या दोन विभागांशी संबंधित प्रश्न विचारले आहेत. मी ऊर्जा खात्याचा मंत्री असल्याने .....

**तालिका सभाध्यक्ष** : त्या खात्याचे मंत्री महोदय सभागृहात उपस्थित का नाहीत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : अध्यक्ष महोदय, ही अर्धा तास चर्चा माझ्याकडेच आहे. मी सन्माननीय सदस्यांना एवढेच आश्वासन देतो की, त्यांचे जलसंपदा विभागाचे मुद्दे वेगळे करुन व पुनर्वसन विभागाचे वेगळे मुद्दे करुन त्या दोन्ही बैठकी त्या त्या मंत्रालयात लावून त्यांचे प्रश्न निकाली काढण्याचा प्रयत्न करीन.

श्री. दिलीप कांबळे ( विशेष सहाय्य राज्यमंत्री ) : अध्यक्ष महोदय, भामा आसखेड व चासकमान प्रकल्पग्रस्तांकडून कब्जा हक्काची 65 टक्के रक्कम भरुन घेऊन पर्यायी जमीन वाटपाची मागणी सातत्याने होत आहे. या संदर्भात कोर्टात देखील एक रिट याचिका दाखल करण्यात आलेली आहे. त्यामुळे पुन्हा अशी नव्याने 65 टक्के रक्कम भरुन घेऊन जमीन वाटल्यास सर्वच धरणग्रस्तांकडून पुन्हा पुन्हा नव्याने वाटप करावे, अशाप्रकारची मागणी मोठ्या संख्येने येऊ शकते. आज आपल्याकडे पर्यायी जमीन नाही, त्यामुळे पुन्हा नव्याने 65 टक्के भरुन घेऊन अशाप्रकारचा निर्णय आपल्याला करता येणार नाही.

**तालिका सभाध्यक्ष** : मंत्री महोदय हा 26 वर्षांपासूनचा लढा आहे. सन 2010 मध्ये माननीय उच्च न्यायालयाने असे आदेश दिले होते की, 3 महिन्यात अहवालपूर्तीचा अहवाल सादर करावा.

श्री. दिलीप कांबळे : अध्यक्ष महोदय, या संदर्भात आजही सुप्रीम कोर्टात एक याचिका प्रलंबित आहे.

श्री. बाबुराव पाचर्णे : अध्यक्ष महोदय, भामा आसखेड व चासकमान या दोन धरणांच्या संदर्भात ही अर्धा तास चर्चा उपस्थित करण्यात आलेली आहे. भामा आसखेड धरण करताना दौंड, हवेली व खेड या 3 तालुक्यातील जमिनीवर संपादन करण्याचे शेरे लाभक्षेत्र म्हणून टाकलेले आहेत. परंतु, जलसंपदा विभागाने अहवाल दिला आहे की, आम्ही या क्षेत्राला पाणी देऊ शकत नाही. अशा परिस्थितीत हवेली व खेड या दोन तालुक्यातील शेतकऱ्यांची मागणी आहे की,

...4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. बाबुराव पाचर्णे ....

आम्हाला पाणी देत नसाल तर आमच्या जमिनीवरील पुनर्वसन शेरे काढून टाकावेत. पिंपरी, चिंचवड व पुणे शहराला 4 टीएमसी पाणी गेलेले आहे. धरणग्रस्तांचा प्रश्न दोन महापालिकांकडून सोडवावा. खेड व शिरुर हद्दीतील ज्या लोकांच्या जमिनीवर पुनर्वसन शेरे पडलेले आहेत, ते शेरे काढावेत. ते शेरे काढणार काय ?

अध्यक्ष महोदय, चासकमान धरणग्रस्तांचे पुनर्वसन 1978 मध्ये सुरु केलेले आहे. त्या काळात खातेफोड बंद केली. त्या काळातला नातू आज कुटुंब प्रमुख झाला आहे. त्या ठिकाणी कोणतेही, पुनर्वसन, संपादन झालेले नाही. आज तेथील अवस्था अशी आहे की, भूमी अधिग्रहण कायदा आपण स्वीकारलेला आहे. रेडीरेकनरच्या 5 पट दर द्यायचे म्हटले तर, आमच्या संपूर्ण शिरुर भागात एकरी 50 लाख रुपये भाव आहे. मग अडीच कोटी रुपये एकराने शासन भूमी संपादन करणार आहे काय, धरणग्रस्तांच्या जमिनी या भावाने घेणार आहे काय, हे जटील प्रश्न आहेत. मंत्री महोदयांनी दोन वेळा आम्हाला आश्वासित केले की, जलसंपदा, ऊर्जा, पुनर्वसन, महसूल या विभागांची एकत्रित बैठक घेण्यात येईल. मात्र ते अद्याप पूर्ण झालेले नाही. जमिनीवर पुनर्वसनाचे शेरे असल्यामुळे आज ते शेतकरी अडकून पडले आहेत. याकरिता चासकमान व भामा आसखेड धरणग्रस्तांच्या जमिनीवरील पुनर्वसनाचे शेरे आपण काढणार काय, या संदर्भात नवीन पुनर्वसन कायद्यात काही सुधारणा करणार काय ?

श्री. दिलीप कांबळे : अध्यक्ष महोदय, हे खरे आहे की, गेले अनेक वर्ष हा प्रश्न प्रलंबित आहे. हे देखील खरे आहे की, गेल्या अधिवेशनात मी असे सांगितले होते की, आम्ही या संदर्भात तिन्ही विभागांची बैठक घेऊन निर्णय करु परंतु, मधल्या काळात ही बैठक होऊ शकली नाही. मी आज आपल्या मार्फत सदनाला सांगू इच्छितो की, माननीय पुनर्वसन मंत्री, माननीय ऊर्जा मंत्री, माननीय महसूल मंत्री व माननीय जलसंपदा मंत्री यांच्यासोबत भामा आसखेड व चासखेडच्या संदर्भात दौंड, शिरुर, चाकण किंवा ज्यांच्या ज्यांच्या मतदारसंघातील नागरिकांचा याच्याशी संबंध आहे, अशा सर्व सन्माननीय सदस्यांची एकत्रित बैठक पुढच्या महिनाभराच्या आत घेण्यात येईल.

...5/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभाध्यक्ष :** आपण तिन्ही विभागांची बैठक लावणार आहात. परंतु, सन्माननीय सदस्यांनी स्पेसिफिक प्रश्न विचारलेला आहे की, जर हे होत नसेल तर, शेरे काढणार काय ?

श्री. दिलीप कांबळे : अध्यक्ष महोदय, या सर्व प्रश्नांच्या संदर्भात त्या ठिकाणी चर्चा करुन, जे योग्य असेल किंवा न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहून जे करणे शक्य आहे, जसे की, शेरे काढणे शक्य आहे काय, तसेच अन्य विषय आहेत जसे त्यांनी सांगितले की, पुणे महानगरपालिका चिंचवड यांना पाणी देणार असल्याने हा प्रश्न उद्‌भवलेला आहे. या संदर्भात जे प्रश्न प्रलंबित आहेत, ते सोडविण्याच्या दृष्टीने सरकार अतिशय सकारात्मक आहे. हा प्रश्न पुणे जिल्ह्यातील असल्याने तो ज्या ज्या सन्माननीय सदस्यांशी संबंधित आहे, त्या सर्वांची माननीय श्री. एकनाथराव खडसे, माननीय श्री. चंद्रशेखर बावनकुळे व माननीय श्री. गिरीष महाजन यांच्यासमवेत एकत्रित बैठक पुढच्या महिनाभराच्या आत घेण्यात येईल.

ॲड. राहूल कूल : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. बाबुराव पाचर्णे यांनी सांगितल्याप्रमाणे खेड, शिरूर, हवेली व दौंड या तालुक्यांचा हा विषय आहे. खेड व हवेलीकरांची भूमिका वेगळी आहे. परंतु, दौंडकरांची भूमिका वेगळी आहे. त्यांचा दृष्टिकोन शिक्के काढावा असा आहे तर आमचा दृष्टिकोन पाणी द्यावे असा आहे. कारण येथून पाणी दिले नाही तर त्या गावांना कोठूनही पाणी मिळणार नाही. त्यामुळे आम्ही सातत्याने ती मागणी केलेली आहे. माझे स्वतःचे गाव भामा आसखेडच्या प्रकल्पांतर्गत आहे. परंतु, आम्हाला न विचारताच सर्व प्रक्रिया सुरु झालेल्या आहेत. त्यामुळे कोणताही निर्णय घेताना तुम्ही दौंडच्या प्रतिनिधींना विचारात घेणार काय ? या प्रकल्पातून आपण ज्या गावांचे नियोजन केलेले आहे, तेथे संपादनाची प्रक्रिया सुरु झालेली आहे त्यामुळे याबाबत आम्हाला भविष्यात विचारात घ्यावे, अशी आमची विनंती आहे, तसे आपण घेणार काय ? पाणी देण्याच्या संदर्भात शासनाचे उद्याचे काय धोरण आहे ?

श्री. दिलीप कांबळे : अध्यक्ष महोदय, मी सुरुवातीलाच सांगितले आहे की, ज्या ज्या सन्माननीय सदस्यांच्या विधानसभा मतदारसंघातील हा प्रश्न आहे, त्या सर्व सन्माननीय सदस्यांना या बैठकीस बोलावले जाईल. जरी तुमची भूमिका वेगळी असली तरी त्या चर्चेतून नक्की मार्ग काढला जाईल, एवढेच या ठिकाणी सांगतो.

...D-1/...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. सुरेश गोरे : अध्यक्ष महोदय, भामा आसखेड प्रकल्पाच्या पाण्याचे पुर्ननियोजन करताना सिंचनाचे पाणी बिगर सिंचनाकडे वळवताना खेड तालुक्यातील स्थानिक शेतकऱ्यांचा प्रश्न न सोडविता त्यांनी याचे नियोजन केले आहे. वास्तविक भामा नदीवर खेड तालुक्यातील जे केटीवेअर आहेत, त्यांना पाणी सोडण्याचे नियोजन नाही. त्यात पाणी शिल्लक नाही. त्याचप्रमाणे बुडीत बंधाऱ्याच्या बाबतीत देखील नियोजन नाही. दोन्ही बाजूला म्हणजेच सांपदिक क्षेत्रामध्ये आणि लाभक्षेत्रामध्ये सुद्धा हा प्रश्न प्रलंबित आहे. या पाण्याचे पुन्हा पुनर्नियोजन करणार आहात, काय असा माझा आपल्या मार्फत मंत्री महोदयांना प्रश्न आहे.

श्री. दिलीप कांबळे : अध्यक्ष महोदय, यासंदर्भात महिन्याभराच्या आत बैठक घेणार असल्याचे मी आताच सांगितले. सदरहू बैठकीमध्ये या सर्व प्रश्नांची चर्चा होईल आणि चर्चेअंती निर्णय करण्यात येईल.

---*---

...2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी. :** सन 2012-2013 मध्ये मंजुरी मिळालेल्या एकलहरे (जि.नाशिक) येथील 660 मेगावॅट विद्युत निर्मिती प्रकल्प नविन जागेवर न उभारता बंद असलेल्या 140 मेगावॅटच्या दोन संचाच्या जागेवरच उभारणे.

**मु.शी. :** सन 2012-2013 मध्ये मंजुरी मिळालेल्या एकलहरे (जि.नाशिक) येथील 660 मेगावॅट विद्युत निर्मिती प्रकल्प नविन जागेवर न उभारता बंद असलेल्या 140 मेगावॅटच्या दोन संचाच्या जागेवरच उभारणे यासंबंधी श्री. योगेश घोलप, वि.स.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री. योगेश घोलप (देवळाली) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 94 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो.

"एकलहरे (जि.नाशिक) येथे 660 मेगावॅट विद्युत निर्मिती प्रकल्प उभारण्यासाठी सन 2012-2013 मध्ये मंजुरी मिळुनही सदर प्रकल्प अद्यापही उभारण्यात न येणे, सदर प्रकल्प पर्यावरणपुरक असून या प्रकल्पामुळे 2500 बेरोजगारांना रोजगार तसेच नाशिक जिल्हा भारनियमन मुक्त होण्याची शक्यता असणे, तसेच नविन प्रकल्पांसाठी मूलभूत व आवश्यक असणाऱ्या बाबी नाशिक जिल्ह्यात उपलब्ध असणे, आयात केलेला कोळसा जहाजाने मुंबईला येऊन तो नाशिक मार्गे भुसावळ, पारस व इतर ठिकाणी पाठविण्यात येत असल्याने नाशिकला इतर विद्युत प्रकल्पापेक्षा वॅगन डॅमरेज हे सर्वात कमी असणे, नाशिक जिल्ह्यातील पाण्याचे स्त्रोत उदा. गंगापूर धरणाच्या वरती कश्यपी व गौतमी गोदावरी हे मध्यम प्रकल्प असून छोटे मोठे पाटबंधारे असल्याने नाशिक जिल्ह्यात सर्वाधिक पाणीसाठी असणे, सदर प्रकल्प उभारण्यासाठी नविन जागा न घेता बंद असलेले 140 मेगावॅटच्या दोन संचाच्या जागेवरच नविन प्रकल्प उभारण्याकरिता शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

अध्यक्ष महोदय, मी अत्यंत महत्वाच्या बाबीकडे शासनाचे लक्ष वेधू इच्छितो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

अध्यक्ष महोदय, नाशिक जिल्ह्यातील एकलहरे येथे 660 मेगावॅटच्या विद्युत निर्मिती प्रकल्पास दिनांक 29.12.2011 मंजुरी मिळाली होती. परंतु सदरहू प्रकल्प अद्यापही उभारण्यात

...3/-



श्री. योगेश घोलप.....

आलेला नाही. तसेच हा प्रकल्प पर्यावरण पुरक असून या प्रकल्पावर 10 ते 12 हजार कुटुंब अवलंबून आहे. 2011 साली मंजूरी मिळाल्यापासून अद्यापपर्यंत राज्यसरकारने याकरिता कोणता पाठपुरावा केला, तसेच प्रकल्प उभारण्यासाठी कोणत्या अडचणी आहेत, याबाबतची माहिती मंत्री महोदयांनी द्यावी. या प्रकल्पाकरिता पाणी व जागा उपलब्ध आहे. याकरिताची जागा महाजनकोच्या ताब्यात आहे. तरी या प्रकल्पास का विलंब होत आहे, याबाबतचे स्पष्टीकरण व्हावे, ही विनंती आहे.

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (ऊर्जा मंत्री) : अध्यक्ष महोदय, शासनाने नाशिक जिल्ह्यातील एकलहरे येथील 660 मेगावॅट वीज प्रकल्पाला दिनांक 29.12.2011 रोजी मान्यता दिलेली आहे. त्या ठिकाणी पाणी, जमीन उपलब्ध आहे. या प्रकल्पाला लागणारा कोळसा हा महाजन वाडी या कोळसा खाणीवरुन येणार होता. ही कोळसा खाण या वर्षी महाजनकोला मिळालेली आहे. या प्रकल्पाकरिता आपण केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाकडे परवानगी मागितली होती. जोपर्यंत कोळसा खाण उपलब्ध होत नाही आणि कोळसा खाणीला पर्यावरणाची परवानगी पूर्णपणे मिळत नाही, तोपर्यंत या प्रकल्पाला पर्यावरणाची मान्यता मिळाली नाही. परंतु आता कोळसा खाण मिळालेली आहे. नवीन शासन आल्यानंतर माननीय मुख्यमंत्री, ऊर्जा विभागाचे प्रधान सचिव व मी यासंदर्भात गेल्या चार, पाच महिन्यामध्ये याकरिता पाठपुरावा केलेला आहे. यामध्ये केंद्र सरकारच्या संरक्षण विभागाचा मुद्दा आहे. प्रकल्पाकरिता 280 मीटरची चिमणी लागणार आहे. सदरहू चिमणीला एअरपोर्ट ॲथॉरिटीने नकार दिलेला आहे. तरी देखील शासन डिफेन्स मिनीस्ट्री आणि एअरपोर्ट मिनिस्ट्री यांना भेटून हा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. मी मागच्या आठवड्यात माननीय संरक्षण मंत्री यांची भेट घेतलेली आहे. यासंदर्भात पुढील महिन्यात बैठक लावण्यात आलेली आहे. या प्रकल्पाकरिता कोळसा खाणीची पहिली अडचण सुटलेली आहे. 280 मीटरच्या चिमणीला नव्याने डिझाईन करायचे आहे काय, त्याची हाईट कमी करायची काय किंवा 280

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

मीटरला परवानगी मिळवायची याबाबत केंद्र सरकारच्या अखत्यारितील एअरपोर्ट ॲथॉरिटी व संरक्षण डिपार्टमेंटकडे पाठपुरावा करावा लागणार आहे.

अध्यक्ष महोदय, 2019 पर्यंतची वीज आपल्याकडे उपलब्ध आहे. या प्रकल्पाची आजच सुरुवात करण्याची गरज नाही. परंतु तेथे पाणी आहे, तसेच जमीन ॲक्वायर केलेली आहे. त्यामुळे

...4/-



श्री. चंद्रशेखर बावनकुळे.....

पुढच्या काळात म्हणजेच 2019 ते 2025 या काळात विजेची गरज लागणार आहे. तेव्हा तीन, चार हजार मेगावॅट वीज निर्माण करावी लागणार आहे. त्यामुळे या प्रकल्पाचा निश्चितपणे विचार करण्यात येईल. हे करण्याकरिता दिल्ली सरकारच्या दोन विभागाच्या परवानग्या प्राप्त करणे आवश्यक आहे. या विभागाच्या परवानग्या प्राप्त झाल्यानंतर आपण केंद्रीय पर्यावरण व वन विभागाची परवानगी घेणार आहोत. या प्रस्तावावर शासन कार्यवाही करीत आहे.

श्री. हरिष पिंपळे : अध्यक्ष महोदय, एका बाजूला वीज प्रकल्पाकरिता विरोध होत आहे तर दुसऱ्या बाजूला वीज प्रकल्प करण्यात यावे, असा तेथील लोकप्रतिनिधी आग्रह करीत आहेत. केंद्रीय पर्यावरण विभागाच्या परवानगी संदर्भात आताच मंत्री महोदयांनी सांगितलेले आहे. आपले केंद्रात सरकार असल्यामुळे परवानग्या तत्काळ मिळत असल्याचे चित्र देशभर निर्माण झालेले आहे. एकलहरे जि.नाशिक येथील 660 मेगावॅट विद्युत प्रकल्पाकरिता आवश्यक असलेली परवानगी किती दिवसात मिळविली जाणार आहे, असा माझा पहिला प्रश्न आहे. तसेच कोळसा खाण केव्हा मिळाली असून ती कोणत्या ठिकाणी आहे, असा माझा दुसरा प्रश्न आहे. 2019 पर्यंतची आवश्यक वीज आपल्याकडे असल्याचे आपण म्हणत आहात. परंतु हा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी किमान तीन, चार वर्षे लागणार आहेत. आता 2016 हे वर्षे सुरु असून आजही काम सुरु केल्यास प्रकल्प पूर्ण होण्यास किमान 2020 पर्यंतचा कालावधी लागणार आहे. आता आपल्याकडे वीज आहे. परंतु स्वयंपाकाचे यंत्र असो की, मोटार सायकल हे विजेवर चालणारे आलेले आहेत. दिवसेंदिवस विजेची मागणी वाढत आहे. या प्रकल्पाचे काम 2019 मध्ये सुरु केले तर तो 2025 पर्यंत पूर्ण होईल. त्यामुळे भविष्यातील विजेची मागणी लक्षात घेऊन यासंदर्भात सकारात्मक कार्यवाही करुन हा प्रकल्प लवकरात लवकर सुरु करणार आहात काय, असा माझा प्रश्न आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : अध्यक्ष महोदय, या प्रकल्पाकरिता चिमणीची डिझाईन 280 मीटरची आहे. 280 मीटरच्या चिमणीला एअरपोर्ट ॲथॉरिटीने नकार दिलेला आहे. या चिमणीचे डिझाईन नवीन टेक्नॉलॉजी वापरुन कमी करता येईल काय, हे पहाण्यात येईल. संरक्षण मंत्रालय आणि एअरपोर्ट मिनिस्ट्रीकडे आम्ही नियमित पाठपुरावा करीत आहे. मी आताच सांगितले की, मी मागील आठवड्यात माननीय संरक्षण मंत्री यांच्यासोबत चर्चा केली आहे. यामध्ये पर्यावरण विभाग, संरक्षण विभाग व एअरपोर्ट मंत्रालयाचा संबंध आहे. त्यामुळे या तीनही विभागाकडे शासनाचा

...5/-



श्री. चंद्रशेखर बावनकुळे.....

पाठपुरावा सुरु आहे. आपल्याला या वर्षी महाजनवाडी कोळसा खाण मिळालेली आहे. नाशिक येथे वीज निर्मिती करायची असेल तर परदेशातून कोळसा आयात करावा लागतो. विदेशातून कोळसा आणून हा प्रकल्प सुरु केल्यास त्यातून निर्माण होणारी वीज स्वस्त मिळणार नाही. आता आपल्याला कोळसा मिळालेला आहे. त्यामुळे हा प्रश्न सुटला आहे. आता तीन प्रश्न बाकी आहेत. या तीन विभागाचे प्रश्न लवकरात लवकर सोडविण्यात येतील. आपल्याकडे 2019 पर्यंतची वीज आहे. प्रकल्प उभा करण्यास तीन वर्षे लागतात हे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे खरे आहे. याबाबत शासन गंभीर आहे. हा प्रकल्प लवकरात लवकर होण्याकरिता शासन काळजी घेत आहे.

श्री. योगेश घोलप : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी चिमणीच्या उंचीची बाब सांगितली. आम्ही आर्मीच्या सर्व अधिकाऱ्यांची बैठक बोलविली होती. तेथे प्रशिक्षण देणारे हेलिकॉप्टर्स उडतात. त्या ठिकाणी संरक्षण मंत्रालयाकडून एक किलो मीटरपर्यंत "नो फ्लाईंग झोन"ची एनओसी मिळाली तर आमची हरकत नाही, असे संबंधित अधिकाऱ्यांनी सांगितले होते. त्यामुळे "नो फ्लाईंग झोन"च्या एनओसी करिता मंत्री महोदय प्रयत्न करतील काय?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : अध्यक्ष महोदय, होय.

श्री. राजाभाऊ वाजे : अध्यक्ष महोदय, तीन दिवसापूर्वी मंत्री महोदयांचा माननीय सरक्षण मंत्री श्री. मनोहर पर्रिकर याच्यासोबतचा फोटा फेसबूकवर आलेला आहे. त्यावेळी आपण या विषयावर चर्चा केली काय व केली असेल तर ती सकारात्मक झाली काय. मंत्री महोदयांनी वेगळ्या विषयावर देखील चर्चा केली असेल. तसेच आमच्याकडे 2019 पर्यंतची वीज शिल्लक असून सद्या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

विजेची आवश्यकता नसल्याचे मंत्री महोदयांनी सांगितले. तेथे जनकोचे काम चालू आहे, विजेची गरज नाही, असे म्हणून चालणार आहे काय?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : अध्यक्ष महोदय, विजेची गरज नाही, असे मी म्हटले नाही. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. अजित पवार बसलेले आहेत. ते ऊर्जा मंत्री होते. त्यांनाही माहीत आहे की, त्यांनी 2019 पर्यंत योग्य नियोजन केले आहे. आपल्याला 2019 ते 2025 या काळात वीज लागणार असून या प्रकल्पाची आवश्यकता आहे. मी माननीय संरक्षण मंत्र्यांकडे नाशिक प्रकल्पाच्या चिमणीकरिता व इतर दोन विषयाकरिता गेलो होतो. पुढील महिन्यामध्ये एअरपोर्ट ॲथॉरिटी, संरक्षण विभाग, पर्यावरण विभाग आणि ऊर्जा विभागाची बैठक होणार आहे. यामध्ये निश्चितपणे मार्ग काढण्यात येईल. याकरिता शासन प्रयत्न करीत आहे. ...E/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभाध्यक्ष (डॉ.सतीश पाटील)** : एकलहरे विद्युत निर्मिती प्रकल्प अतिशय महत्वाचा असून त्यामधून 660 मेगावॅट वीज निर्मिती होणार आहे तसेच, 2,500 बेरोजगारांना रोजगार मिळणार आहे. त्यामुळे सदरहू प्रकरणी ऊर्जा मंत्री महोदयांनी तत्काळ कार्यवाही करावी.

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : अध्यक्ष महोदय, होय.

**तालिका सभाध्यक्ष** : सभागृहाची विशेष बैठक आता स्थगित होऊन पुन: सकाळी 11 वाजता सभागृहाची नियमित बैठक भरेल.

(सभागृहाची विशेष बैठक सकाळी 10 वाजून 40 मिनिटांनी
सकाळी 11 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

-------------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**( अध्यक्षस्थानी माननीय अध्यक्ष)**

**पृ.शी./मु.शी.:** तोंडी प्रश्नोत्तरे

**लोणावळा (ता.मावळ, जि.पुणे) येथील खाजगी वनांच्या क्षेत्रामध्ये सिंहगड इन्स्टिटयुटने केलेल्या वनेत्तर कामांबाबत**

**(1) *53029 श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) लोणावळा (ता.मावळ, जि.पुणे) येथील खाजगी वनांच्या क्षेत्रामध्ये सिंहगड इन्स्टिटयुटने बेकायदा डोंगरफोड केल्याचे माहे फेब्रुवारी, 2016 च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे`खरे आहे काय,

(2) असल्यास, बेकायदा डोंगरफोडीची बुडविलेली दंडाची रक्कम जवळपास तीन कोटी रुपये असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, याबाबततसिंहगड इन्स्टिटयुटवर दंडात्मक कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (1) होय, हे खरे आहे.

(2) होय, हे खरे आहे.

(3) व (4) सिंहगड इंन्स्टिटयुटने खाजगी वन क्षेत्रावर केलेल्या वनेत्तर कामाबद्दल सदर संस्थेविरुध्द दिनांक 6.3.2013 रोजी वनगुन्हा दाखल केला होता. सदर प्रकरण प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, वडगाव येथे न्यायप्रविष्ठ आहे. तद्नंतर वनगुन्हा रद्द करण्याकरिता संस्थेने मा.उच्च न्यायालयात क्रिमिनल याचिका दाखल केली असता, मा.उच्च न्यायालयाने वडगाव, न्यायालयात दाखल प्रकरणात पुढील कार्यवाही करण्यास स्थगिती दिली तसेच सदर क्षेत्राच्या दर्जाबाबत सिंहगड इंन्स्टिटयुटने मा.उच्च न्यायालयात दाखल केलेल्या रिट याचिकेतत मा.न्यायालयाने दिनांक 3.2.2015 रोजी अंतीम आदेश पारित करुन प्रश्नांकित क्षेत्र खाजगी वन नसल्याचे निर्देश देऊन सिंहगड इंन्स्टिटयूटला गोल्फ मैदान उभारण्यापूर्वी सर्व विभागाकडून आवश्यक त्या परवानग्या घेण्याबाबत निर्देश दिले.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

13-04-2016 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) F-2

PPD/ MMP/ AKN/ MMP/ AKN/ 11:00

श्री. सुधीर मुनगंटीवार.... ता.प्र.क्र.53029

सिंहगड टेक्नीकल एज्युकेशन सोसायटी यांनी मौजे कुसगाव, ता.मावळ येथील गट क्र. 309 ते 311 व 314 ते 3166 मध्ये केलेल्या अनधिकृत गौण खनिज उत्खननाबाबत तहसिलदार, मावळ यांचेमार्फत ई.टी.एस. मशिनने मोजणी करण्यात आली असून अनधिकृत गौण खनिज उत्खनन 7271 ब्रास आढळून आले आहे. त्यामुळे तहसिलदार, मावळ यांनी त्यांचेकडील आदेशान्वये रॉयल्टी व दंड रक्कमम रु.2,83,56,900/- शासन जमा करण्याचा आदेश पारित केला आहे.

श्री. भरतशेठ गोगावले : अध्यक्ष महोदय, माझा पॉईन्ट ऑफ इन्फॉर्मेशन आहे. काल रात्री फार भीषण अपघात झाला असून त्यामध्ये 6 जण मृत्यूमुखी पडले आहेत. ही घटना कंत्राटदाराच्या हलगर्जीपणामुळे झाली आहे.

**अध्यक्ष :** सन्माननीय सदस्य श्री. भरतशेठ गोगावले मी आपल्याला प्रश्नोत्तराच्या तासानंतर बोलण्याची संधी देतो. मध्ये कोणताही विषय घेता येत नाही. प्रश्नोत्तराच्या तासामध्ये उगाच नवीन प्रथा पाडू नका. प्रश्नोत्तराच्या तासानंतर मी आपल्याला बोलण्याची संधी देईन. अशी कोणतीही घटना घडलेली नाही की, प्रश्नोत्तरे थांबवून आपल्या पॉईन्ट ऑफ इन्फॉर्मेशनवर चर्चा घेतली पाहिजे. अशी घटना घडली असती तर मलाही कळले असते. सन्माननीय सदस्यांनी कृपया बसावे.

श्री. भिमराव तापकीर : अध्यक्ष महोदय, या ठिकाणी मंत्री महोदयांनी पहिल्या प्रश्नाला उत्तर देताना होय, हे खरे आहे असे उत्तर दिले आहे. त्याचप्रमाणे दुसऱ्या प्रश्नालाही उत्तर देत असताना खरे आहे असे उत्तर देण्यात आलेले आहे. माझा प्रश्न असा आहे की, सिंहगड इन्स्टिट्यूटने ज्यावेळी त्या ठिकाणी गोल्फ मैदान करीत असताना रितसर परवानगी घेतल्यानंतरच काम सुरू करावे असे माननीय न्यायालयाचे निर्देश असतानाही तसे न करता त्या ठिकाणी वृक्षतोड केली, माती, मुरूम या गौण खनिजाचे उत्खनन केले आहे. आजही त्या ठिकाणी उत्खनन करीत आहे असे करुन सदर संस्था ही न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन करीत आहे. त्यामुळे माझा असा प्रश्न आहे की, आपण या संस्थेविरुध्द न्यायालयात अवमान याचिका दाखल केली आहे काय, नसल्यास का केली नाही आणि अशी अवमान याचिका दाखल करण्यास जे जबाबदार आहेत त्या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

संबंधित अधिकाऱ्यांवर आपण काय कार्यवाही करणार आहात, हा माझा पहिला प्रश्न असून दुसरा

3......



श्री. भिमराव तापकीर........

प्रश्न असा आहे की, ज्यावेळी सिंहगड इन्स्टिट्यूटने बेकायदेशीररित्या उत्खनन करीत असताना त्यांना सदर उत्खननापोटी रुपये 2,83,56,900/- इतका दंड ठोठावला असून त्याच्या सातबारावर देखील बोजा चढविण्यात आला आहे. माझा प्रश्न असा आहे की, ती जागा ताब्यात घेण्यासाठी सरकार काही प्रयत्न करणार आहे काय, सदर संस्था दंडाची रक्कम भरत नसेल तर शासन ती जमीन सरकारजमा करण्यासाठी काही प्रयत्न करणार आहे काय, आणि तिसरा प्रश्न असा आहे की, सिंहगड इन्स्टिट्यूटला फक्त दंडात्मक कार्यवाही करुन खुले सोडणे उचित ठरणार नाही, असे केल्यास राज्यात अशा प्रकारे नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांमध्ये चुकीचा संदेश जाईल म्हणून या संस्थेच्या प्रमुखावर शासन गुन्हेगारी कायदा अंतर्गत कार्यवाही व फौजदारी कार्यवाही करण्याचे आदेश देणार आहे काय, असे माझे तीन प्रश्न आहेत.

श्री. सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, या प्रकरणाकडे सरकारचे गंभीर लक्ष आहे आणि म्हणूनच यांच्यावर वन गुन्हाही दाखल केला होता. हा गुन्हा दाखल केल्यानंतर जी जी कायदेशीर कार्यवाही करावयाची असते ती कार्यवाहीसुध्दा केली होती. हायकोर्टामध्ये जेव्हा संबंधित प्रकरण गेले तेव्हा कोर्टाने स्थगिती दिली. त्यानंतर हायकोर्टाने त्यांच्या बाजूने निकाल दिला. हायकोर्टाने निकाल दिल्यानंतर आपण विधी व न्याय विभागाचे मत घेतले की, आपण सुप्रीम कोर्टात जाणे योग्य आहे काय, तर अशाच प्रकारच्या प्रकरणात सुप्रीम कोर्टात काही निर्णय झाले असल्यामुळे विधी व न्याय विभागाने असे अभिप्राय दिले की, खासगी वनांच्या बाबतीत आता सुप्रीम कोर्टात जाणे योग्य नाही. मात्र त्यांना जर गोल्फ मैदान करावयाचे असेल तर त्यासाठी त्यांनी सर्व परवानग्या घ्याव्यात. सिंहगड इन्स्टिट्यूटने अशी परवानगी न घेता काम सुरू केले आहे. हे काम सुरू केल्यानंतर तहसिलदार, मावळ यांनी आदेश काढला आणि त्यांनी केलेल्या खोदकामासंबंधी रुपये 2,83,56,900/- इतका दंड ठोठावल्याचा आदेश पारीत केला आणि हा आदेश पारीत करताना सांगितले की, आपण जर 15 दिवसात पैसे भरले नाहीत तर आपल्या सातबारावर सरकारचा बोजा चढविण्यात येईल. ही जमीन सरकारची नाही. त्यामुळे सन्माननीय सदस्यानी जो प्रश्न केला आहे की, ही जमीन सरकार ताब्यात घेणार आहे काय, तर सरकारला या बाबतीत

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

अधिग्रहण करावे लागेल. काही कारण नसताना ही जमीन अधिग्रहण करणे हे काही योग्य होणार नाही. कारण ही जमीन सरकारची नाही तर श्री. एम. एन. नवले, प्रेसिडेंट, सिंहगड टेक्निकल

4.......



श्री. सुधीर मुनगंटीवार.......

एज्यूकेशन सोसायटी यांनी 12.7.2002 आणि 18.9.2002 ला ही जमीन विकत घेतली. पण कायद्यानुसार ही जमीन खासगी वने म्हणून होती. त्यासंबंधी 1975 मध्ये नोटीस प्रक्रिया झाली नाही आणि त्याचा फायदा घेऊन त्यांना ही जमीन जरी खासगी वने म्हणून मानतो तरी हायकोर्टाने सांगितले की, आपण त्यावेळी प्रोसिजर पूर्ण केली नाही त्यामुळे ती त्याची स्वतःची जागा आहे. आता स्वतःच्या जागेवरही खोदकाम करावयाचे असेल तर त्याची परवानगी घ्यावी लागते, ती घेतली नाही. त्यामुळे तहसिलदार, मावळ यांनी त्यांना रुपये 2,83,56,900/- इतका दंड केला आहे आणि यामध्ये महसूल विभागाच्या माध्यमातून जी जी कायदेशीर कार्यवाही करता येईल ती करण्यात येईल. कारण आता हा प्रश्न आता वन विभागाकडे राहिला नसून तो आता महसूल विभागाकडे गेला आहे. कारण वन विभागाची जागाच नाही, पण तरीही सरकार म्हणून कायद्याच्या चौकटीत राहून ज्या ज्या काही बाबी करता येतील त्याचे आदेश सरकारने दिलेले आहेत.

श्री. भास्कर जाधव : अध्यक्ष महोदय, हे प्रकरण अत्यंत संशयास्पद आहे. याचे कारण असे की, मूळामध्ये ही खासगी जमीन आहे. ही खासगी जमीन असल्यामुळे हायकोर्टाने त्यांना दिलासा दिला आहे, हे आपण सांगितले तर आपल्या अधिकाऱ्यांना कळत नव्हते काय की, ही फॉरेस्टची जमीन नाही. फॉरेस्टची जमीन नसताना त्यांच्यावर काय म्हणून वन कायद्यांतर्गत वन गुन्हा दाखल केला आहे की, जेणेकरुन यामधून त्याची सुटका व्हावी अशा दृष्टीनेच आपल्या अधिकाऱ्यांनी संगनमताने हे काम केले आहे, हे प्रथम दर्शनी हायकोर्टाच्या निर्णयावरुन स्पष्ट होत आहे. म्हणून अधिकाऱ्यांनी जाणिवपूर्वक खासगी वन क्षेत्र कायद्यांतर्गत त्यांना गुन्हा दाखल करता येत नाही. कारण ही फॉरेस्ट लॅन्ड नाही. म्हणून त्या अधिकाऱ्यांनी त्याच्यावर गुन्हा दाखल केला त्याबद्दल त्यांना जबाबदार धरणार काय हा पहिला प्रश्न आणि तहसिलदार, माळव यांनी जी रुपये 2,83,56,900/- इतका दंडाची आकारणी केली आहे ती कधी केली आहे.

श्री. सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, मला वाटते की, सन्माननीय सदस्यांनी प्रश्नाचे उत्तर नीट वाचले असते तर खरे म्हणजे अधिकाऱ्यांचे कौतुक केले पाहिजे असे त्यांच्या लक्षात

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

आले असते. आपण कायदा समजून घेतला तर आपल्या मनामध्ये कोणतीही संदिग्धता राहणार नाही. सन 1975 मध्ये आपण विधानसभेमध्ये एक कायदा मंजूर केला की, एखाद्याची खासगी

5........

13-04-2016 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) F-5

PPD/ MMP/ AKN/ MMP/ AKN/ 11:00

श्री. सुधीर मुनगंटीवार.....

जमीन असेल पण त्याच्यावर जर वन असेल तर त्यासाठी आपण खासगी वन कायदा केला आहे. दुर्दैवाने आपण त्या संदर्भातील ज्या नोटीसेस आहेत त्या संदर्भातील कायदेशीर प्रक्रिया करायला पाहिजे होती ती केली नाही. सन 2005 मध्ये हायकोर्टाने एक निर्णय दिला आणि तो निर्णय दिल्यानंतर हायकोर्टाने सांगितले की, ही जी खासगी जमीन आहे त्या जमिनीवर आपण राखीव वने म्हणून त्यावर शिक्का मारा. 2005 मध्ये तात्कालीक समयी त्या जमिनीस खासगी वने म्हणून संबोधण्यात आले आणि त्यावर शिक्का मारला गेला. शिक्का मारल्यानंतर 12.7.2002 आणि 18.9.2002 श्री. नवले यांनी ती जमीन विकत घेतली. वन अधिकाऱ्याचे मी कौतुक करेल की, ते जेव्हा त्यांनी या ठिकाणी खोदकाम सुरू केले तेव्हा कायदेशीर किचकट प्रक्रियेमध्ये न जाता त्यांनी वन गुन्हा दाखल केला. वन गुन्हा दाखल केल्यानंतर तो कोर्टामध्ये गेला असे म्हणता आले असते. पण वन अधिकाऱ्यांनी असे केले नाही तर प्रामाणिकपणे काम केले आहे. वन गुन्हा दाखल करुन ते थांबले नाहीत तर कोर्टामध्ये ते लढले. पण दरम्यानच्या काळात सुप्रीम कोर्टात एक केस गेली होती आणि सुप्रीम कोर्टाने या संदर्भात काही निर्णय दिले आहेत. त्या निर्णयाचा आधार घेऊन हायकोर्टाने निर्णय दिला की, ही यांची खासगी जमीन आहे, आपण जरी वन म्हणत असाल तरी ते आम्हाला मान्य नाही. हायकोर्टाने असे म्हटले आहे की, आपण जरी ही वन जमीन म्हणत असला तरी ही खासगी जमीन आहे म्हणून आम्हाला आपले म्हणणे मान्य नाही. म्हणून ती खासगी जमीन आहे ती तशीच हायकोर्टाने ठेवली. त्याच्यानंतरही आपण हा प्रयत्न केला की, आपण सुप्रीम कोर्टात जावे. विधी व न्याय विभागाकडे हे प्रकरण सुप्रीम कोर्टात जाण्यासाठी पाठविले.

G-1........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.53029.......

श्री.सुधीर मुनगंटीवार.........

विधी व न्याय विभागाने सांगितले की, याच्या विरुध्द सुप्रिम कोर्टामध्ये जाण्याचे कारण नाही. कारण अशा तत्सम केसेसमध्ये या सेम ग्राऊंडवर सन 1975 नंतर नोटीस दिल्या नाहीत. म्हणून काही प्रकरणे निकालात निघाली आहेत. कोणताही कायदेशीर मुद्दा उपस्थित होतो. तेव्हा विधी व न्याय विभागाकडे जातो. त्यावेळेस विधी व न्याय विभागाने सांगितले की, सुप्रिम कोर्टामध्ये जाण्याची आवश्यकता नाही. तरीही वन विभागाने जागेबाबत विचारणा केली. तेव्हा महसूल विभागाला उच्च न्यायालयाने सांगितले की, गोल्फ मैदान करायचे असेल तर परवानग्या घ्या. वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी महसूल विभागाच्या निदर्शना आणून दिले की, जरी ही आमची जागा नसली तरी अवैध खोदकाम चालू आहे. अवैध खोदकामाच्या संदर्भामध्ये 2 कोटी 83 लाख 56 हजार 900 रुपयांचा दंड लावला. याबाबत मनात कोणताही संशय ठेवू नका. कारण हे संशयास्पद प्रकरण नाही. अतिशय स्पष्ट व पारदर्शक प्रकरण आहे. या दंडाविरुध्द आपण त्याच्या 7/12 वर दंडही चढविला. नुसता बोजा चढविला नाही तर ते उच्च न्यायालयात गेलेत. आपण आता उच्च न्यायालयामध्ये लढत आहोत. याबाबत कडक कारवाई करुन जे काही नियम, कायदे आहेत त्याच्या चौकटीतच राहून गोल्फ मैदान केले पाहिजे.

--------------

**अध्यक्ष** : तारांकित प्रश्न क्रमांक 502744

( सन्माननीय सदस्य अनुपस्थित )

---------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**दिघी (ता.श्रीवर्धन, जि.रायगड) ग्रामपंचायतीमध्ये ग्रामसेवक व सरपंच यांनी लाखो रुपयांचा केलेला अपहार**

**(3) *42065 श्री.विजय औटी (पारनेर)** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) दिघी (ता.श्रीवर्धन, जि.रायगड) ग्रामपंचायतीमध्ये तत्कालीन ग्रामसेवक, सरपंच व अन्य यांनी सन 2010 ते 2014 या चार-पाच वर्षात सुमारे 82 लाख रुपयांचा अपहार केल्याचे दिनांक 26 डिसेंबर, 2015 रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीअंती काय आढळून आले,

(3)3असल्यास, चौकशीनुसार संबंधित ग्रामसेवक, सरपंच व इतरांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.दिपक केसरकर, श्रीमती पंकजा मुंडे यांच्याकरिता :** (1) होय हे खरे आहे.

(2) होय.

सदर प्रकरणी दिघी ग्रामपंचायतचे तत्कालीन ग्रामसेवक श्री.बी.बी.घनमोडे यांनी दिनांक 04.07.2011 ते 22.07.2011 या कालावधीत रु.6,50,811/- व श्री.एस.एस.श्रीवर्धनकर, ग्राम विकास अधिकारी यांनी दिनांक 25.07.2011 ते 10.01.2014 या कालावधीत रु.61,92,813/- तसेच श्री.एम.एच.भालदार, ग्रामसेवक यांनी दिनांक 15.05.2014 ते 31.03.2015 अखेर रु.13,72,804/- असे एकूण रु.82,16,428/- एवढ्या रकमेचे संशयीत अपहार झाल्याचे निदर्शनास आले आहे. सदर ग्रामपंचायतीत प्रमाणके कामांची अंदाजपत्रके व मुल्यांकने उपलब्ध नसल्याचे आढळलेले आहे.

श्री.एस.एस.श्रीवर्धनकर यांनी त्यांचे कालावधीतील अपूर्ण आलेल्या दप्तरातील रु.61,92,813/- एवढ्या रकमेची पुर्तता दिनांक 19/01/2016 रोजी केली आहे.

वरील सर्व कालावधीत श्रीमती गंगा सुधीर पाटील ह्या सरपंच पदावर कार्यरत होत्या. परंतु श्रीमती गंगा सुधीर पाटील यांचा दिनांक 04/11/2015 रोजी कार्यकाल संपला असून त्या दिघी ग्रामपंचायतीच्या सध्याच्या कार्यकारीणीत कोणत्याही पदावर कार्यरत नाहीत.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

13-04-2016 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) G-3

SSK/ AKN/ MMP/ MMP/ AKN/ 11:00

ता.प्र.क्र.42065.......

श्री. दिपक केसरकर....

(3) दिघी ग्रामपंचायतीचे वर नमूद तत्कालीन ग्रामसेवकांच्या संशयीत अपहार रकमेची प्रमाणके व मुल्यांकन उपलब्ध झाली नसल्याने संशयित अपहाराबाबत विशेष लेखा परिक्षण करणेबाबत सहायक संचालक, स्थानिक लेखा परिक्षण अलिबाग यांना दिनांक 02/12/2015 रोजी कळविण्यात आले आहे.

तसेच श्री.एम.एच.भालदार, ग्रामसेवक दिघी यांना संशयित अपहार प्रकरणाबाबत निलंबित करण्यात आले आहे व संबंधित ग्रामसेवक व सरपंच यांचेविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्याबाबत गट विकास अधिकारी, पंचायत समिती श्रीवर्धन यांना दिनांक 20/11/2015 रोजी आदेश देण्यात आले आहेत.

(4) अशी बाब नाही.

श्री. विजय औटी : अध्यक्ष महोदय, ग्रामपंचायतीच्या पातळीवर 82 लाख रुपयांचा घोटाळा झालेला आहे. सदर घोटाळा हा सन 2011 सालातील आहे. सभागृहामध्ये प्रश्न आल्यानंतर उत्तर असे दिले जाते की, सन 2011 चे लेखापरिक्षण करण्याचे आदेश दिनांक 2.12.2015 रोजी देण्यात आले. आता आपण सन 2016 च्या एप्रिल महिन्यात आहोत. हे लेखापरिक्षण पूर्ण करण्यात आले काय? दुसरा प्रश्न असा की, संबंधित ग्रामसेवकावर फौजदारी गुन्हा दाखल करण्याबाबत गटविकास अधिकाऱ्यांना दिनांक 20.11.2015 रोजी आदेशित करण्यात आले. असा गुन्हा दाखल होऊन संबंधित ग्रामसेवकाला अटक करण्यात आली आहे काय?

श्री.दिपक केसरकर : अध्यक्ष महोदय, दिनांक 2.12.2015 रोजी स्पेशल ऑडिट करण्यासंबंधात कळविण्यात आलेले आहे. लेखापरिक्षणामध्ये जे दोष आढळले त्यावरून दोन ग्रामसेवकांना निलंबित केलेले आहे. एक ग्रामसेवक हे दुसऱ्या जिल्ह्यात बदली होऊन गेलेले आहेत. त्यांच्यावर सुध्दा कारवाई करण्याबाबत संबंधित जिल्ह्याला कळविण्यात आलेले आहे. दुसरा प्रश्न विचारलेला होता की, जी पोलीसात गुन्हा दाखल केलेला आहे. त्याबाबत विशेष

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

लेखापरिक्षणाचा अहवाल आल्यावर संबंधित गुन्हे दाखल करण्यात येतील असे संबंधित पोलीस स्टेशनने कळविलेले आहे.

........4



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.42065.......

श्री.विजय औटी : अध्यक्ष महोदय, उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की, गटविकास अधिकारी पंचायत समिती, श्रीवर्धन यांना फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे दिनांक 20.11.2015 रोजी आदेश देण्यात आले आहेत. आता उत्तर देताना मंत्री महोदय असे सांगतात की, विशेष लेखापरिक्षकांचा अहवाल आल्यानंतर गुन्हा दाखल करु असे संबंधित पोलीस स्टेशनचे लोक सांगतात ही सरळ सरळ विसंगती आहे. गुन्हा सिध्द झाला तर एका ग्रामसेवकाने 61 लाख रुपयांचा भरणा केला असेही लेखी उत्तरामध्ये सांगण्यात येत आहे. म्हणजे भ्रष्टाचार केला, एकाने पैसे भरले. सन 2015 ला एका विरुध्द गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले. आता मंत्री महोदय सांगतात की, विशेष लेखापरिक्षणाचा अहवाल येत नाही तोपर्यंत पोलीस गुन्हा दाखल करीत नाहीत. हे काही तर्कसंगत उत्तर नाही.

श्री.दिपक केसरकर : अध्यक्ष महोदय, अपहाराबाबतची जी कागदपत्रे आहेत ती हजर केलेले नव्हते. याठिकाणी 61,92,813 या कागदपत्रांची पूर्तता केलेली असली तरी लेखापरिक्षकांना त्याची पुन्हा खात्री करावी लागते. ज्याठिकाणी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे त्या सागरी पोलीस ठाणे बोरली पंचातन यांचे दिनांक 30.11.2011 रोजी त्यांनी सन 2011-2012, 2012-2013 आणि 2013-2014 चे विशेष लेखापरिक्षण करुन सर्व प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण केल्याबद्दल सदर पोलीस स्टेशनने कळविलेले आहे.

श्री.सुभाष पाटील : अध्यक्ष महोदय, दिघी, ता.श्रीवर्धन, जि.रायगड याबाबत मंत्री महोदयांनी उत्तर दिले की, सरपंचावर गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर सरपंच हा आदिवासी आहे. ग्रामसेवक हा विस्तार अधिकारी म्हणून आहे. याच्याविरुध्द मी जिल्हा परिषदेचा अध्यक्ष असताना तक्रार केली होती. विस्तार अधिकाऱ्याने जिल्हा परिषदेची विकली आणि खाजगी विकासकाला दिली. त्यासंदर्भातही कारवाई झाली नाही. नियमाप्रमाणे ऑडिट रिपोर्ट असल्याशिवाय

गुन्हा दाखल होत नाही. माझा प्रश्न असा आहे की, विस्तार अधिकारी म्हणून जो ग्रामसेवक याठिकाणी होता. त्या गावामध्ये दिघी बंदर होते. त्यामुळे या पंचायतीला भरपूर निधी आलेला आहे.

.........5



ता.प्र.क्र.42065.......

श्री.सुभाष पाटील ........

अध्यक्ष महोदय, संबंधित ग्रामपंचायतीने विकास कामे केली पण त्याचे मुल्यांकन घेतले नाही. संबंधित विस्तार अधिकाऱ्याने यामध्ये अफरातफर केली. म्हणून माझी मागणी आहे की, आदिवासी सरपंचावर गुन्हा दाखल करु नये आणि विस्तार अधिकारी आहे त्याच्यावर गुन्हा दाखल करणार आहात काय?

श्री.दिपक केसरकर : अध्यक्ष महोदय, ग्रामसेवक आणि सरपंच या दोघांच्याही सह्या त्या चेकवर असतात. नियमानुसार त्यांच्यावर कारवाई झालेली असेल तरी पोलीस तपासामध्ये निष्पन्न झाले की, यात संरपंचाचा हात नाही तर तशीही कारवाई पोलीस करु शकतात. गुन्हा दाखल करताना दोघांवरही करावा लागतो. कारण त्या दोघांचीही सही असते.

श्री.विजय औटी : अध्यक्ष महोदय, मी पुन्हा पुन्हा ही विसंगती लक्षात आणून देतो आहे. लेखापरिक्षणाचा अहवाल आल्याशिवाय जर गुन्हा दाखल करता येत नाही असा कायदा असेल तर लेखी उत्तरामध्ये असे म्हणतात की, श्री.एम.एच.भालदार, ग्रामसेवक, दिघी यांना संशयित अपहार प्रकरणावरुन निलंबित करण्यात आले. ग्रामसेवक व सरपंच यांच्याविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्याबाबत गटविकास अधिकारी, पंचायत समिती, श्रीवर्धन यांना आदेश देण्यात आले आहेत. लेखापरिक्षणाची वाट न बघता गुन्हा दाखल करायला सांगितले ही उत्तरातील विसंगती मंत्री महोदय दूर करतील काय?

श्री.दिपक केसरकर : अध्यक्ष महोदय, मी पुन्हा एकदा सांगतो की, ऑडिट आणि स्पेशन ऑडिटमध्ये फरक आहे. यासाठी तीन वर्षाचे स्पेशल ऑडिट लावले जाईल. या स्पेशल ऑडिटची कारवाई चालू आहे. पोलीस स्टेशनने सुध्दा हेच सांगितले आहे की, तीन वर्षाचे स्पेशल ऑडिट करुन आम्हाला अहवाल द्या आम्ही त्यावर कारवाई करतो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुभाष पाटील : अध्यक्ष महोदय, यासंदर्भात तक्रारी केल्या. परंतु संबंधितावर कारवाई करण्यात आली नाही.

श्री.दिपक केसरकर : अध्यक्ष महोदय, हा स्वतंत्र प्रश्न आहे. यासाठी त्यांनी वेगळे पत्र द्यावे त्याची चौकशी केली जाईल.

-----------

........6

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेने निविदा न मागविता शेती विषयक औजारे खरेदी केल्याबाबत**

**(4) *48119 श्री.वैभव नाईक (कुडाळ)** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) सिंधुदुर्ग जिल्हा परिषद, कृषि विभागाकडून सन 2014-2015 ते 2015-2016, या चालू आर्थिक वर्षात शेतकऱ्यांना औजारे/उपकरणे वाटप करण्यासाठी शासन दर करारा व्यतिरिक्त निविदा न मागविता खरेदी करण्यात आल्याचे नुकतेच माहे जानेवारी, 2016 मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(3) असल्यास, चौकशीअंती ी निविदा न मागविता शेती विषयक औजारे खरेदी करणाऱ्या दोषी व्यक्तींविरुध्द कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा ा करण्याתत येत आहे,

(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर, श्रीमती पंकजा मुंडे यांचेकरिता :** (1) सन 2014-15 या वित्तीय वर्षात शासन दरकराराव्यतिरीक्त शेती विषयक औजारे/ उपकरण खरेदी जिल्हास्तरीय गठीत औजारे समिती, कृषि समिती व जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 नियम 84 मधील तरतूदीनुसार उत्पादक /वितरकाकडून करण्यात आलेली आहे.तथापि, सन 2015-16 या वित्तीय वर्षात अशी बाब नाही.

(2), (3) व (4) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.वैभव नाईक : अध्यक्ष महोदय, उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की, सन 2014-2015 या वर्षामध्ये अशाप्रकारची खरेदी केलेली आहे. प्रत्यक्षात मात्र सन 2009 ते 2016 पर्यंत अशाप्रकारची खरेदी संबंधित जिल्हा परिषदेने एकाच वितरकाकडून केलेली आहे. याची किंमत जवळपास दीड कोटी रुपये आहे. बाजार भावामध्ये आणि यामध्ये खूप मोठी तफावत आहे. आपण उत्तरामध्ये म्हटलेले आहे की, विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्याकडे चौकशीचे आदेश देण्यात आलेले आहेत. याची चौकशी कधीपर्यंत पूर्ण होणार आणि दोषी आढळणाऱ्या अधिकाऱ्यांच्या विरोधात काय कारवाई करणार असे माझे दोन प्रश्न आहेत.

.......7

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.48119........

श्री.दिपक केसरकर : अध्यक्ष महोदय, यामध्ये प्रथमदर्शनी असे आढळून आलेले आहे की, निविदेद्वारे ही खरेदी केलेली नाही. सकृतदर्शनी असे आढळून आल्यामुळे विभागीय आयुक्तांकडे हे प्रकरण चौकशीसाठी सोपविण्यात आलेले आहे. त्यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर याबाबत योग्य ती कारवाई केली जाईल. परंतु लवकरात लवकर अहवाल देण्याबाबत त्यांना कळविण्यात येईल.

डॉ.जयप्रकाश मुंदडा : अध्यक्ष महोदय, कुठलीही निविदा न मागविता खरेदी केलेली आहे. हे काय घरचे किराणा सामान थोडेच खरेदी करायचे होते की, जा आणि दुकानात घेऊन या. हे सर्व शासकीय काम आहे. म्हणून निविदा न मागविता खरेदी केलेल्या अधिकारी, कर्मचाऱ्याला निलंबित करणार आहात काय?

श्री.दिपक केसरकर : अध्यक्ष महोदय, या खरेदीसाठी जिल्हा परिषदेचा ठराव झालेला आहे. जिल्हा परिषदेचा ठराव झाला असल्यामुळे केवळ अधिकाऱ्यांना यामध्ये दोषी धरणे कितपत योग्य आहे याची सुध्दा चौकशी झाली पाहिजे. विशिष्ट कंपन्यांची नावे घालून याठिकाणी ठराव केला गेलेला आहे. हा ठराव जिल्हा परिषदेच्या जनरल बॉडी आणि जिल्हा परिषदेचे कृषी समिती या दोघांनी हा ठराव केलेला आहे.

H-1.........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र. 48119........

श्री.दिपक केसरकर.......

कृषि समितीच्या ठरावामध्ये पंपाच्या संदर्भात विशिष्ट कंपनीचा उल्लेख आहे. जिल्हा परिषदेने जो ठराव केलेला आहे, त्यामध्ये क्रेडची खरेदी असेल, स्प्रेपंपची खरेदी असेल, याच्यामध्ये पर्टीक्युलर कंपन्यांची नावे घेऊन त्यांच्याकडून खरेदी व्हावी, अशा तऱ्हेचे स्पेसिफिक ठराव जिल्हा परिषदेने केलेला आहे.

श्री.जयप्रकाश मुंदडा : अध्यक्ष महोदय, निविदा न मागविता ठराव घेतला. ठराव घेतल्यानंतर सुध्दा दर निविदा न मागविता असे करता येत असेल तर प्रत्येक ग्रामपंचायत, प्रत्येक जिल्हापरिषद मनाने ठराव घेतील आणि असा कार्यक्रम करतील. म्हणून यामध्ये जे कोणी सहभागी असतील, शासकीय व अशासकीय असतील त्या सर्वांवर ॲक्शन होणार आहे का ?

श्री.दिपक केसरकर : अध्यक्ष महोदय, अहवाल प्राप्त झाल्यानंतर जर दोषी शासकीय अधिकारी असतील किंवा पदाधिकारी असतील त्यासर्वांवर कारवाई केली जाईल.

श्री.राधाकृष्ण विखे पाटील : अध्यक्ष महोदय, या प्रकरणाची चौकशी होईल, त्यातून जे कोणी दोषी शासकीय अधिकारी असतील किंवा पदाधिकारी असतील त्यांना निलंबित करण्याबाबत मंत्री महोदय सांगत आहेत. राज्यस्तरावर सुध्दा कृषि विभागाच्या योजनेमधून सुध्दा अवजारे खरेदी केली जातात. याचे दरपत्रक निश्चित झालेले आहेत. याबाबतीत मध्यंत्तरी सभागृहामध्ये चर्चा झाली होती. यामध्ये वाढीव भावाने खरेदी होते. याबाबतीत तक्रारी वाढत चाललेल्या आहेत. राज्यस्तरावर अवजारे खरेदी होत आहेत. मला वाटते याबाबतीत जे अनुदान मिळते, राज्यस्तरीय किंवा जिल्हा परिषदेच्या स्तरावर असू देत त्याचे एकत्रिकरण केले पाहिजे. म्हणजे या भानगडी होणार नाहीत. जो लाभार्थी आहे त्याला फक्त अनुदान देण्याची आवश्यकता आहे. त्याच्या इच्छेप्रमाणे त्याला खरेदी करु दिले पाहिजे. म्हणजे घोटाळे वाढणार नाहीत. याबाबतीत शासन विचार करणार का ?

.....2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र. 48119........

श्री.दिपक केसरकर : अध्यक्ष महोदय, ही अतिशय चांगली सूचना केली आहे. याबाबत एक कमिटी नेमून निर्णय घेऊ. परंतु मला एवढेच सांगायचे आहे की, जी खरेदी होते त्याच्यामध्ये शासकीय दरसूची आहे. त्याप्रमाणे खरेदी होत असते, परंतु असे आढळून आलेले आहे की, त्या दरसूची प्रमाणे खरेदी झालेली नाही. डायरेक्टली कंपन्यांकडून निविदा न काढता खरेदी झालेली आहे. त्यामुळे या प्रकरणाच्या चौकशीचे आदेश दिलेले आहेत.

श्री.ग.आ.देशमुख : जिल्हा परिषदेच्या जनरल बॉडीने किंवा कृषि समितीने जरी ठराव केला असला तरी खरेदी करण्यासंबंधीचे शासकीय आदेश आहेत, नियम आहेत ते डावलून खरेदी केली. जरी ठराव केलेले असले तरी ते ठराव रद्दबादल होतात. मंत्री महोदयांनी सांगितले की, शासकीय दरसूची डावलून खरेदी केलेली आहे. शासनाच्या हे निदर्शनाला आलेले आहे. त्यामध्ये शासकीय अधिकारी असो की जिल्हापरिषदेची जनरल बॉडी असो, त्यांनी बेकायदेशीर ठराव करुन शासनाने जिल्हा परिषदेला जे अनुदान दिलेले आहे, त्यातून ही खरेदी केलेली आहे, तेव्हा शासकीय अनुदानामध्ये भ्रष्टाचार झालेला आहे. याबाबतीत चौकशी किंवा समिती न नेमता कालबध्द एक महिना भराच्या कालावधीत या प्रकरणाचा निकाल लागला पाहिजे. दोषी असतील त्यांच्यावर कारवाई केली पाहिजे. याबाबत शासनाला काय म्हणायचे आहे ?

श्री.दिपक केसरकर : अध्यक्ष महोदय, आपले म्हणणे बरोबर आहे. एखादा बेकायदेशीर ठराव केला असेल तर सी.ई.ओ.नी त्यावेळेला कमिशनरच्या निदर्शनास आणून तो ठराव रद्द करुन घ्यायला पाहिजे होता, परंतु अशी कारवाई झालेली नाही. म्हणून कमिशनरना याबाबत चौकशी करत असताना हा ठराव का रद्द करुन देण्यात आला नाही, हा सुध्दा मुद्दा घातला जाईल. आपल्या मागणी प्रमाणे एक महिन्याच्या आत ही चौकशी पूर्ण करावी. याचे सुध्दा निर्देश कमिशनरला देण्यात येतील.

........

......3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**उमा (ता.मूर्तिजापूर, जि.अकोला) प्रकल्पाचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

***(५)*** **[*]४५६३३ *डॉ.मिलिंद* माने (नागपूर उत्तर), श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

***(१)*** उमा (ता.मूर्तिजापूर, जि.अकोला) प्रकल्पाला सन २००९ मध्ये प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून या प्रकल्पाचे काम ५० टक्के करुन कंत्राटदारांने सन २०१३ पासून काम बंद केले आहे तसेच सदर प्रकल्पासाठी आतापर्यंत फक्त ३९९.९० हेक्टर जमीन ताब्यात घेण्यात आलेली असून ६६५ हेक्टर जमीन संपादित करावयाची बाकी आहे, हे खरे आहे काय,
***(२)*** असल्यास, याबाबत कत्रांटदाराला पत्र देवूनही काम सुरु न झाल्याने करारनाम्यानुसार माहे नोव्हेंबर, २०१४ पासून दररोज ५० हजार रुपये दंड आकारुनही काम पूर्ण न केल्याने आता माहे नोव्हेंबर, २०१५ पासून दररोज १ लाख रुपये दंड आकारला जात आहे, हे ही खरे आहे काय,
***(३)*** असल्यास, सदर कंत्राटदाराकडून करारनाम्यानुसार काम काढून नव्याने निविदा प्रक्रिया राबवावी लागणार आहे, हे ही खरे आहे काय,
***(४)*** असल्यास, शेतकऱ्यांना प्रकल्पाचा लाभ घेता यावा याकरिता प्रकल्प पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
***(५)*** नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ***?***

**श्री. गिरीष महाजन :** (१) अंशतः खरे आहे. प्रकल्पास मूळ प्रशासकीय मान्यता दि.३१/०८/२००७ रोजी तर प्रथम सु.प्र.मा. दि.३१/०३/२०११ रोजी प्राप्त आहे. प्रकल्पाच्या बॅरेज घटकाचे काम ५० टक्के पूर्ण झाले असून कंत्राटदाराने जून, २०१२ पासून काम बंद केले आहे.

उमा प्रकल्पांतर्गत (खाजगी व शासकीय) एकूण ६६०.९० हे. जमिनीची आवश्यकता असून त्यापैकी आतापर्यंत ५१३.५२ हे. क्षेत्र संपादित झालेले आहे. उर्वरित १४७.३८ हेक्टर्स जमिनीची भूसंपादन कार्यवाही प्रगतीत आहे.

***(२)*** कंत्राटदाराने बॅरेजचे स्थापत्य काम बंद ठेवल्यामुळे दि.०७/११/२०१४ पासून प्रतिदिन रु.५०,०००/- या प्रमाणे नुकसान भरपाई आकारण्यात आली आहे. कंत्राटदारांना कामाची प्रगती साध्य करण्याबाबत वेळोवेळी पत्रव्यवहार करण्यात येत आहे. तथापि, कंत्राटदाराने काम सरु न केल्यामुळे दि.०१/०९/२०१५ पासून रु.५०,०००/- ऐवजी रु.१,००,०००/- प्रतिदिन याप्रमाणे नुकसान भरपाई आकारण्यात येत आहे.
***(३)*** व (४) कंत्राटदारावर केलेल्या दंडात्मक कार्यवाहीस प्रतिसाद न दिल्यास, मंजूर निविदेच्या अटी व शर्तीनुसार निविदा रद्द करुन नव्याने निविदा कार्यवाही करण्यात येईल.

निधी उपलब्धतेनुसार प्रकल्प २०१९ अखेर पूर्ण करण्याचे नियोजित आहे.
***(५)*** प्रश्न उद्‌भवत नाही.

...४/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

*ता.प्र.क्र.४५६३३.....*

डॉ.मिलिंद माने : अध्यक्ष महोदय, मुर्तीजापूर आणि अकोला जिल्हयातील अत्यंत महत्वाकांक्षी पूर्णा नदीवरील उमा प्रकल्पाला 2007 साली सुप्रमा देण्यात आली. तो प्रकल्प 2009 साली सुरु झाला. 2011 पासून जे कंत्राटदार मे.वैष्णवी कंस्ट्रक्शन, टी.एन.आर. इन्फ्रा कंस्ट्रक्शन कंपनी हैद्राबाद या प्रकल्पाचे कंत्राटदार आहेत. 78.61 कोटीचा हा प्रकल्प होता. परंतु आजच्या तारखेला तो कंत्राटदार 852 कोटी रुपये मागत आहे. जवळपास 2011 पासून कंत्राटदाराने काम करणे बंद केलेले आहे. यामध्ये सर्वात महत्वाची गोष्ट अकोला आणि मुर्तीजापुर तालुक्यातील 21 गावांना पाणीपुरवठा झाला असता तर शेतीला पाणी मिळाल असत, परंतु 21 गावांना पाणीपुरवठा झालेला नाही. जवळपास 5510 हेक्टर जमिन ओलीताखाली येणार होती ती थांबलेली आहे. मला आपल्या मार्फत मंत्री महोदयांना हा प्रश्न विचारावयाचे आहे की, ज्या कंत्राटदाराला 35 वेळा सूचना देऊन आणि त्याच्याकडून प्रति दिवस 50,000/- रुपये दंड आकारण्यात आला, त्यानंतर तो प्रतिदिन 1,00,000/- रुपये करण्यात आला. त्याचे शासनाकडे फक्त 2 कोटी रुपये जमा आहेत. अशा कंत्राटदाराला आपण ब्लॅक लिस्टमध्ये टाकणार आहात का ? त्यांना जी निविदा दिलेली आहे, ती दुस-या कंत्राटदाराला देऊन ते काम पूर्ण करणार आहात का ? हे माझे दोन प्रश्न आहेत.

श्री.गिरीष महाजन : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य सांगता आहेत ती वस्तुस्थिती या ठिकाणी आहे. हे काम सुरु झाल्यानंतर सन 2012 ते 2016 पर्यंत जवळपास 4 वर्षे हे काम संबंधित ठेकेदाराने केले नाही, हे काम बंद होते. त्यानंतर त्याला नोटीस देण्यात आली. त्याला दिनांक 7.11.2014 पासून प्रतिदिनी 50,000/- रुपये नंतर दिनांक 1.9.2015 पासून प्रतिदिनी 1,00,000/- रुपये दंडात्मक कारवाई करण्यात आली. जवळपास साडेतीन कोटी रुपये दंडाचे निघत आहेत. जवळपास 4 कोटी रुपये डिपॉझिट आहेत. 90 लाख रुपयांची बँक गॅरंटी आहे. म्हणून दंडात्मक कारवाई केली. त्याला अंतिम मुदत दिली तेव्हा त्याला कळविले की यानंतरही तू काम नाही केलेस तर ते काम काढून घेण्यात येईल. दिनांक 25 तारखेला मशिनरी आणलेली आहे. त्या कामाला सुरुवात केलेली आहे.

....5/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

***ता.प्र.क्र.४५६३३.....***

श्री.हरिष पिंपळे : अध्यक्ष महोदय, उमा बॅरेज माझ्या मतदार संघात आहे. मंत्री महोदयांनी सांगितले की काम सुरु आहे. यासंदर्भात दिनांक 15 डिसेंबर 2015 रोजी माननीय मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली अकोला जिल्हयाची नागपूर अधिवेशनमध्ये बैठक झाली, त्यातही हा विषय आला होता. सन 2007 मध्ये मान्यता मिळाली. सन 2009 मध्ये त्याचे काम सुरु झाले. सन 2011 पर्यंत काम चालू राहिले. सन 2012 पासून काम बंद आहे. आता मंत्री महोदयांनी सांगितले की, त्याला पन्नास हजार व एक लाख रुपये दंड आकारण्यात येतो आहे, परंतु या चार वर्षात त्या प्रकल्पाची किती किंमत वाढली, किती पैसे वसूल केले ? माझ्या मतदार संघाला लागून हा खारपाण पट्टा आहे. हा जिव्हाळयाचा विषय आहे. स्पेसिफिक प्रश्न आहे की, हे ठेकेदार डबघाईस आलेले आहेत. या ठेकेदाराला 35 वेळा पत्र दिलेले आहे. व त्याद्वारे सांगितले की, अटी व शर्तीनुसार काम केले नाही तर हे काम रद्द करु. तरी यांनी पत्र देऊनही काम सुरु केलेले नाही. म्हणून यांच्याकडून काम काढून घेऊन शिल्लक राहिलेले 40 टक्के काम पूर्ण करण्यासाठी नवीन निविदा काढणार आहे का? या ठेकेदारामुळे प्रकल्पाची किंमत वाढलेली आहे ती रक्कम याच्याकडून वसूल करणार आहात का ? शेतकऱ्यांना कृषी संजीवनी म्हणून जीवदान मिळणार आहे का ? हा आमचा खारपाण पट्टा आहे. व्ही.आय.डी.पी. अंतर्गत याला निधी आहे. तर टाईमबाँड प्रोग्रॅममध्ये दोन वर्षाच्या आत हा प्रकल्प पूर्ण करण्यात येणार आहे का ?

श्री.गिरीष महाजन : अध्यक्ष महोदय, हा प्रकल्प सन 2019 पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. या ठेकेदाराने यंत्रसामुग्री आणलेली आहे. सन्माननीय सदस्य त्या मतदार संघातील आहेत. तेथे काम सुरु झाले नाही, मशिनरी आणली नाही असे ते जर म्हणत असतील तर ही बाब तपासून घेतली जाईल. या नंतरही त्या कामाला वेग देणार नाहीत किंवा ते काम लवकरात लवकर करण्याचा प्रयत्न करणार नसेल तर त्याची एजन्सी रद्द करण्यात येईल व त्या ठिकाणी नवीन ठेकेदार देण्यास हरकत नाही.

I-1..........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.45633.....

श्री.हरिष पिंपळे : अध्यक्ष महोदय, मुख्यमंत्री महोदयांनी आयोजित केलेल्या बैठकीत विषय झाला आहे की, या कंत्राटदारांना ब्लॅकलिस्ट करण्यात यावे. कारण चार वर्षांपासून ते काम करीत नाहीत. विभागाने कंत्राटदारास 35 पत्रे दिलेली आहे तरीही अजून काम सुरु होत नाही. त्यांच्यावर फक्त दंडात्मक कारवाई सुरु आहे. मला दंडात्मक कारवाईबाबत घेणे-देणे नाही. माझ्या मतदारसंघात खारपाण पट्टा असल्यामुळे मला हा प्रकल्प पूर्ण करुन हवा आहे. केवळ कारवाईसाठी तुम्ही हे अडकून ठेऊ नका. हे काम आपण केव्हा सुरु करणार आहात, 2019 पर्यंत हा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी आपण पावले उचलणार का, मुर्तिजापूर मतदारसंघातील शेतकऱ्यांना अच्छे दिन आणण्याकरिता पुढाकार घेणार आहात का ?

श्री.गिरीष महाजन : अध्यक्ष महोदय, मी सांगितले आहे की, आपणास हे काम 2019 पर्यत पूर्ण करावयाचे आहे. संबंधित ठेकेदारास नोटीस दिली, त्याच्यावर दंडात्मक कारवाई केली. त्यांनी आता मार्च महिन्यात या कामाला सुरुवात केलेली आहे. मशीन आणलेली आहे. आता पुन्हा त्यांचे काम रद्द करायचे. पुन्हा नवीन एजन्सी पहावयाची यामध्ये पुन्हा 2-3 महिने निघून जातील. मला वाटते की, आपण त्यांना एकदा संधी देऊन पाहू. महिनाभरात प्रगती दिसली नाही तर आपण त्यांचे काम रद्द करु

श्री.हरिष पिंपळे : अध्यक्ष महोदय, आपल्या विभागाने त्या कंत्राटदारास 35 पत्र दिलेली आहेत व यानंतरही त्यांनी काम सुरु केलेले नाही ही बाब खरी आहे काय ? 35 पत्र देऊनही त्यांनी काम सुरु केले नसेल तर दुसरा कंत्राटदार नेमून हे काम लवकरात लवकर करुन माझ्या मुर्तिजापूर मतदारसंघातील शेतकऱ्यांकरिता अच्छे दिन आणणार आहात का ?

श्री.गिरीष महाजन : अध्यक्ष महोदय, हे खरे आहे की, आपण त्याला 25-30 वेळेस स्मरणपत्रे दिलेली आहेत. त्याने चार वर्षे काम बंद ठेवल्यामुळे त्यांच्यावर दंडात्मक कारवाई केलेली आहे. 2019 पर्यत आपणास हे काम पूर्ण करावयाचे आहे. आपण या कंत्राटदाराकडून काम काढून घेऊन ते काम नवीन एजन्सीला देऊन पुर्ण करु

-----

....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पांढरी (ता.आष्टी, जि.बीड) येथील जलसिंचन**
**विहीरींच्या कामांमध्ये झालेला गैरव्यवहार**

***(६)* * ५०२०७ *अॅड.भीमराव* धोंडे (आष्टी)** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
***(१)*** महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतून पांढरी (ता.आष्टी, जि.बीड) येथील बुडीत क्षेत्रात केलेल्या जलसिंचन विहीरींच्या कामात हजारो रुपयांचा अपहार करण्यात आला असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१६ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
***(२)*** असल्यास, सदर प्रकरणी गटविकास अधिकारी, पंचायत समिती, आष्टी यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना सादर केलेला अहवाल संदिग्ध स्वरुपाचा आहे, हे ही खरे आहे काय,
***(३)*** असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी शासनाने केली आहे काय,
***(४)*** असल्यास, चौकशीनुसार वरिष्ठांना संदिग्ध स्वरुपाचा अहवाल सादर करणाऱ्या अधिकाऱ्यावर व अपहार करणाऱ्या दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
***(५)*** नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ***?***

***श्री.विजय शिवतारे, श्रीमती पंकजा मुंडे यांच्याकरिता :*** (१) हे खरे आहे.
***(२)२*** हे खरे आहे.
***(३)*** व (४) सदर प्रकरणी तक्रारी बाबत गटविकास अधिकारी, पंचायत समिती, आष्टी यांनी दिनांक १४.०१.२०१६ रोजी चौकशी अहवाल सादर केला होता. सदर अहवाल संदिग्ध स्वरूपाचा असल्याने मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हापरिषद बीड यांनी दिनांक ३०.०१.२०१६ रोजी सविस्तर अहवाल सादर करण्याचे गटविकास अधिकारी, पंचायत समिती, आष्टी यांना कळविले. त्यानुसार त्यांनी दिनांक ११.०२.२०१६ रोजी सुधारीत अहवाल सादर केला आहे. त्यानुसार अनियमितता झाल्याचे आढळून आल्याने संबंधितांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आली आहे.
***(५)*** प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.भिमराव धोंडे : अध्यक्ष महोदय, ग्रामीण रोजगार हमी योजनेमधून बुडीत क्षेत्रातील विहीरीबाबत अपहार झालेला आहे याबाबत माझे तीन प्रश्न आहेत. किती रकमेचा अपहार झालेला आहे ? या संदर्भातील संदिग्ध अहवाल पंचायत समितीने जिल्हा परिषदेला दोन वेळा पाठविला होता. या दोन्ही अहवालाची आपण माहिती द्यावी, दुसऱ्या लोकांना आपण फक्त नोटीस पाठविलेली आहे असे म्हटलेले आहे. माझी मागणी आहे की, आपण त्यांना सस्पेंड करणार का ? यामध्ये भ्रष्टाचार व अपहार उघड झालेला आहे त्यामुळे त्यांना आपण निलंबित करणार आहात का ?



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.50207.....

श्री.विजय शिवतारे : अध्यक्ष महोदय, पांढरी गावामध्ये अपहार झालेला आहे हे बाब खरी आहे. त्याला पुरावा म्हणजे एकाच कामाचे दोन वेळा दायित्व काढले गेले आहे. या संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी बीडीओ यांना अहवाल सादर करण्याबाबत सांगितले होते. दिनांक 14.1.2016 रोजी त्यांनी प्राथमिक अहवाल सादर केला होता. त्यामध्ये फक्त कंत्राटी कामगार व अधिकारी यांच्या संदर्भात वाच्यता केली होती म्हणून पुन्हा एकदा त्या अहवालाबाबत फेरविचार करावा असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आदेश दिले होती. त्यानुसार दिनांक 11.2.2016 रोजी फेर व सुधारीत अहवाल सादर केलेला आहे. श्री.आर.बी.भोसले तत्कालीन सहायक कार्यक्रम अधिकारी, श्री.बी.व्ही.घोडके, लिपीक कम डाटा एंट्री ऑपरेटर, श्री.मनोहर आंधळे, ग्राम रोजगार सेवक पोखरी हे तीन व्यक्ती तात्पुरत्या स्वरुपात काम करीत होते. फेरअहवालात या तीन जणावर फौजदारी कारवाई करण्याबाबत म्हटले आहे अशा प्रकारचा आदेश दिनांक 11.4.2015 रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिलेला आहे. या तीन लोकांकडून सायबर व डिजीटल सहीचा वापर करुन हा अपहार झालेला आहे. त्यामुळे या तीन जणांविरुध्द फौजदारी कारवाई करण्याची प्रक्रिया सुरु झालेली आहे. दिनांक 11.4.2015 रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी याबाबतचा आदेश काढलेला आहे. याबाबतची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. त्यांच्यावर निश्चितपणे फौजदारी कार्यवाही केली जात आहे. हा सर्व प्रकार करीत असताना शासकीय नोकरीत असलेले डिजीटल सही असलेली व्यक्ती श्री.एस.एस. सानप हे सहायक लेखाधिकारी आहेत. यामध्ये कोठेतरी असा वास येत आहे की, सर्व तात्पुरत्या कर्मचाऱ्यांबरोबर सरकारी अधिकारी श्री.सानप हे आहेत. या प्रक्रियेमध्ये तीन जणांविरुध्द फौजदारी कारवाई करीत असताना श्री.सानप यांना निलंबित करुन या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात येईल.

-----

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**कोथूर्डे (ता.महाड, जि.रायगड) धरणाच्या विमोचकाच्या दुरुस्तीच्या अंदाजपत्रकाबाबत**

***(७)*** * **४७०६७ *श्री.सुभाष* उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग)** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

***(१)*** कोथूर्डे (ता.महाड, जि.रायगड) धरण खचल्यामुळे पावसाळी हंगामात मोठ्या प्रमाणात पाणी वाया जात असून दुरुस्तीच्या प्रस्तावास सन २०१६ पर्यंत मान्यता देण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,
***(२)*** असल्यास, धरणाची दुरुस्ती न झाल्यास महाड तालुक्यातील धरणांच्या लाभक्षेत्रात येणाऱ्या गावांना पाण्याची टंचाई निर्माण होणार आहे, हे ही खरे आहे काय,
***(३)*** असल्यास, उक्त धरणाच्या दुरुस्तीसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
***(४)*** नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ***?***

***श्री.विजय शिवतारे,* श्री. गिरीष महाजन *यांचेकरिता* :** (१), ***(२)*** व (३) कोथूर्डे (ता. महाड, जि.रायगड) हे धरण खचलेले नाही परंतु या धरणाच्या विमोचकातून गळती होत असल्यामुळे, विमोचकाच्या विशेष दुरुस्तीच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही शासन स्तरावर प्रगतीत आहे. सद्यःस्थितीत विमोचकाद्वारे पाणी नदीत सोडून नदीवरील बंधाऱ्यातून २२ गावांना पिण्यासाठी व सिंचनासाठी पुरविले जात आहे.
***(४)*** प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.सुभाष पाटील : अध्यक्ष महोदय, कोथुर्डे ता.महाड जि.रायगड येथे धरणाचे काम करण्याबाबत मी लक्षवेधी सूचना दिलेली होती. आज त्याला 15 महिन्याचा कालावधी झालेला आहे. सध्या कोकण पाटबंधारे विकास महामंडळ पॅरालाईज झालेले आहेत. या महामंडळामार्फत कोकणात कोणतेच काम होत नाही.

अध्यक्ष महोदय, मी विचारु इच्छितो की, कोथुर्डे येथील एस्टीमेट किती रुपयांचे आहे, याकरिता अद्याप प्रशासकीय मान्यता का देण्यात आली नाही, महाड शहराला पाणीपुरवठा करणारे हे महत्वाचे धरण आहे. या धरणाला निधी कधी मिळणार ?

श्री.विजय शिवतारे : अध्यक्ष महोदय, साधारणपणे दिनांक 24.7.2014 रोजी धरणाचे मुख्य विमोचकास अधोबाजूस अचानक सकाळी 7.30 वाजता तीन मीटर x साडेतीन मीटर व्यासाचे विवर पडले. त्याखालील पहिले व दुसरे बर्म यामधील उताराच्या मातीच्या भरावाचा काही भाग कोसळून पाणी गळती सुरु झाली. सदर गळतीचे प्रमाण 10-15 लीटर प्रती सेकंद असे आहे. परंतु ही बाब अतिशय गंभीर आहे. याबाबत क्षेत्रीय पाहणी करुन विमोचकाच्या गळतीबाबत धरण सुरक्षा

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.47067.....

श्री.विजय शिवतारे .....

संघटनेच्या अधिकाऱ्यांनी पाहणी करुन कार्यवाही करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. दिनांक 16.4.2015 रोजी क्षेत्रीय पाहणीसुध्दा झालेली आहे. त्यानुसार मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना नाशिक यांच्यामार्फत दुरुस्ती करण्याकरिता संकल्पचित्र मंजूर करण्यात आलेले आहे. हे विमोचक नव्याने बांधणे व गळती प्रतिबंधक उपायांच्या विशेष दुरुस्तीसाठी 287.84 लक्ष किंमतीचा प्रस्ताव दिनांक 14.10.2015 रोजी शासनास सादर केलेला आहे. यावर सर्व शेऱ्यांची पुर्तता करुन दिनांक 23.3.2016 रोजी सदरचा प्रस्ताव जलसंपदा विभागाने अनुकूल अशा शिफारशीसह नियोजन विभागाकडे दिलेला आहे. याची प्रशासकीय मान्यता पुढील 15 दिवसात देऊन हे काम लवकरात लवकर करावे. याकरिता मी आज सकाळीच चर्चा केलेली आहे. कदाचित अतिवृष्टी झाली तर छोटे असलेले हे विवर मोठया प्रकारचा धोका निर्माण करु शकेल. याकरिता प्रशासकीय मान्यता देऊन पावसाळयापूर्वी कोणत्याही प्रकारची रिस्क न घेता हे काम पूर्ण करण्याचा प्रयत्न शासन करणार आहे.

श्री.भरतशेठ गोगावले : अध्यक्ष महोदय, सदरील प्रश्न माझ्या मतदारसंघातील आहे. ही बाब बरोबर आहे की, या धरणाला मोठे भगदाड पडलेले आहे. मागील दीड वर्षांपासून आम्ही त्याचा पाठपुरावा करीत आहे. मंत्री महोदयांनी सांगितले की, आम्ही 15 दिवसात याची प्रशासकीय मान्यता देणार आहे. माझा मंत्री महोदयांना प्रश्न आहे की, आता तुम्ही ही बाब तातडीची समजत आहात. या अगोदर हे धरण उडाले असते तर तुम्ही काय केले असते ? महाड शहराला व या धरणाच्या काठावरील 22 गावांच्या ग्रामपंचायतींना या धरणातून पाणीपुरवठा होतो. एवढया मोठया लोकसंख्येला पाणीपुरवठा करणारे हे एकमेव धरण असताना अधिकाऱ्यांनी चुकीचा प्रस्ताव पाठविला आहे. 3-3 वेळा तो प्रस्ताव परत येत आहे. मी मागील वेळी मंत्री महोदयांना कल्पना दिलेली आहे. त्यांना सांगितले आहे की, याची प्रशासकीय मान्यता देण्यात यावी. पण हे काम कोणाला तरी चालू करण्यास सांगावे. कारण महाड तालुक्यात सर्वात जास्त व मोठया प्रमाणावर पाऊस पडतो. तुम्ही 15 दिवसानंतर प्रशासकीय मान्यता दिली तर त्याची वर्क ऑर्डर कधी होणार, काम कधी चालू होणार ? आता मे महिना संपण्यास दीड महिना बाकी आहे. या दीड महिन्यामध्ये

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.47067.....

श्री.भरतशेठ गोगावले .....

हे काम कसे पूर्ण होणार ? माझी विनंती आहे की, अधिवेशन संपण्यापूर्वी तुम्ही या कामाला प्रशासकीय मान्यता देणार का, मे महिन्यापूर्वी हे काम पूर्ण करुन घेणार का ?

श्री.विजय शिवतारे : अध्यक्ष महोदय, मी आपणास सांगितले आहे की, गळतीचे प्रमाण 10 ते 15 लीटर प्रती सेंकद असे होते. ते टेंपररी रिपेअर केले आहे. इन्व्हर्टर व फिल्टर टाकून तात्पुरती दुरुस्ती केलेली आहे. आता होणाऱ्या गळतीचे पाणी वाय जात नाही. गळणाऱ्या पाण्याचा उपयोग सिंचनासाठी व गावातील ग्रामपंचायतींनासुध्दा होतो.

यानंतर जे-1

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.47067....

श्री.विजय शिवतारे......

ही बाब निश्चितपणे गंभीर आहे. अतिवृष्टी झाली तर हे छोटे विमोचन मोठे होऊ शकते. यामुळे त्या परिसरामध्ये धोका निर्माण होऊ शकतो. याबाबत अधिवेशन संपल्यावर तातडीने बैठक घेऊन या कामाकरिता प्रशासकीय मान्यता देऊन दीड-दोन महिन्यात हे काम उपलब्ध आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने लवकरात लवकर पूर्ण करण्यात येईल.

श्री.भरतशेठ गोगावले : अध्यक्ष महोदय, माननीय मंत्री म्हणत आहेत की, यातून मिनिटाला दहा-पंधरा लिटर पाण्याची गळती होत आहे. या धरणाला जे छिद्र पडलेले आहे ते गोल आहे. यामध्ये मोठा दाब आला तर ते मोठे होऊ शकते. हे काम तातडीने विनाविलंब पूर्ण करणे आवश्यक आहे. माननीय मंत्री यांनी या भागामध्ये पाहणीकरिता स्वत: यावे. मी त्यांना तेथे घेऊन जाईल. कारण आम्हाला याच्याशिवाय दुसरा पर्यायच नाही. महड हा ऐतिहासिक जिल्हा आहे, उद्या या भागामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीचा मोठा कार्यक्रम होणार आहे. या भागामध्ये यातूनच पाण्याचा पुरवठा केला जातो. महड या शहराची लोकसंख्या मोठी आहे. माननीय मंत्री यांनी संबंधित अधिका-यांना सदरहू काम सुरु करण्यासंबंधी तातडीने आदेश द्यावेत, ही माझी विनंती आहे.

श्री.विजय शिवतारे : अध्यक्ष महोदय, याकरिता शॉर्ट टर्म टेंडर प्रोसेस करण्यात येणार आहे. याकरिता 7 दिवसांच्या कालमर्यादेची टेंडर प्रोसेस करुन लवकरात लवकर हे काम सुरु करण्यात येईल.

------

...2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**बोरगाव मंजु (जि.अकोला) येथील रोजगार हमी योजनेंतर्गत करण्यात आलेल्या रस्त्यांच्या कामात झालेला गैरव्यवहार**

**(8) * ५१३६३ श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व)**सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) बोरगाव मंजु (जि.अकोला) येथील महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत करण्यात आलेल्या रस्त्यांच्या कामात १९ लक्ष ४० हजार रुपयांचा गैरव्यवहार झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास,सदर प्रकरणी जिल्हाधिकारी, अकोला यांनी दोषींवर दिनांक २४ मार्च, २०१५ रोजी वा त्यासुमारास गुन्हे दाखल करण्याचे निर्देश दिले होते परंतु त्यांच्या आदेशानंतरही प्रत्यक्षात कोणतीही कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,
(3) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,
(4) असल्यास, चौकशीनुसार दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.विजय शिवतारे,**श्रीमती पंकजा मुंडे** यांच्याकरिता **:** (1) हे खरे आहे.
(2) हे खरे नाही.
(3) व (४)४ सदर प्रकरणी केलेल्या चौकशीत ५ शेतरस्त्यांचे कामावर वाढीव मुल्यांकन दर्शवून रु.१९,४०,४१९/- एवढया रकमेचा अपहार झाल्याचे निर्दशनास आले आहे. अपहार करणा-या संबंधित शाखा अभियंता व तत्कालीन कंत्राटी पॅनल तांत्रिक अधिकारी यांच्याकडून प्रत्येकी रु.९,७०,२०९.५० एवढी रक्कम समान हप्त्यात वसुल करण्याचे आदेश देण्यात येत आहेत. तसेच शाखा अभियंता व तत्कालीन ग्रामसेवक यांचे विरुध्द शिस्तभंग कार्यवाही करण्यात येत आहे. तत्कालीन कंत्राटी पॅनल तांत्रिक अधिकारी यांना कंत्राटी पदावरुन कमी करण्यात आले आहे. या प्रकरणाशी संबंधीत जबाबदार तत्कालीन गट विकास अधिकारी पंचायत समिती अकोला यांचेविरुध्द विभागीय चौकशी सुरु करण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.
(5) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.रणधीर सावरकर : अध्यक्ष महोदय, बोरगाव मंजू येथील मनरेगाच्या योजनेमध्ये झालेल्या भ्रष्टाचारासंबंधीची ही तक्रार होती. 2015 मध्ये जिल्हाधिका-यांनी या संदर्भात गुन्हा दाखल करण्यासंबंधीचे आदेश दिले होते. आज या घटनेला एक वर्ष पूर्ण झालेले आहे. तरीही याबाबत गुन्हा दाखल झाला नाही. मी याबाबत तारांकित प्रश्न लावल्यानंतर गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु केलेली आहे. तीन वेळा अकोल्याचे सहायक गट विकास अधिकारी, बोरगाव-मंजू येथे गुन्हा दाखल करण्याकरिता जातात आणि रस्त्यातून परत येतात. आज देखील हे

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

अधिकारी एसपी कार्यालयात गुन्हा दाखल करण्याकरिता बसलेले आहेत. एक वर्ष होत आले तरी या प्रश्नासंबंधी कारवाई होत नाही. ....3

13-04-2016 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) J-3

JN/ AKN/ MMP/ 11:40

ता.प्र.क्र.५१३६३....

श्री.रणधीर सावकर.....

ही आता स्टॅण्डर्ड ऑपरेटिंग प्रोसिजर झालेली आहे. तारांकित प्रश्न लागतात, ते जर पुकारले गेले नाही तर संबंधित प्रकरण थंड बस्त्यात पडते. तारांकित प्रश्न पुकारला तर अधिकारी काहीतरी कारवाई करण्याकरिता हालचाल करतात. याबाबत आज गुन्हा दाखल होईल का ? यामध्ये 19,00,000 रुपयांचा अपहार झाला, हे मान्य असतानाही कारवाईकरिता एक-एक वर्ष लागत असेल तर संबंधित अधिका-यांवर शासन कारवाई करणार आहे का ?

श्री.विजय शिवतारे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितलेली बाब अगदी खरी आहे. बोरगाव-मंजू येथील मग्रारोहयो योजनेमध्ये 19,40,000 लक्ष रुपयांचा अपहार झाल्याचे निदर्शनास आलेले आहे. दिनांक 24.3.2015 रोजी जिल्हाधिकारी,अकोला यांनी गुन्हे दाखल करण्याचे निर्देश दिल्यनंतर आजपर्यंत कारवाई का केली गेली नाही ? त्याच दरम्यान संबंधित सचिव, बोरगाव मंजू, सरपंच, बोरगाव यांनी जिल्हाधिका-यांना आमची बाजू ऐकून घेऊन प्राथमिक चौकशी करुन याबाबतचा निर्णय घ्यावा, अशा प्रकारची विनंती केली होती. याबरोबर त्यांनी माननीय आमदार श्री.बाळासाहेब सिरसकर यांच्या पत्रासह विनंती केली होती. एका सन्माननीय सदस्यांनी यासंदर्भात प्राथमिक चौकशी अहवाल आल्यानंतर गुन्हे दाखल करावे, अशी विनंती केली. चौकशीची प्रक्रिया सुरु केली होती. हा अपहार 19,00,000 रुपयांचा झालेला आहे. अशा प्रकारची मोडस ऑपरेंडी वापरुन जर अन्य काही अपहार झाले असतील तर तेही समोर येत आहेत. श्री.रणभावरे,शाखा अभियंता, श्री.गवई, तत्कालीन ग्रामविकास अधिकारी, बोरगाव यांनी 3 कोटीची कामे तेथे घेतली होती, त्याची चौकशी होणे गरजेचे आहे. संबंधित उक्त अधिकारी आणि श्री.कहार, सहायक लेखाधिकारी, पंचायत समिती अकोला यांच्या विरुध्द चौकशी करण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत. ही चौकशी नि:पक्षपातीपणे होणे आवश्यक आहे. रोहयोमध्ये जे अधिकारी भ्रष्टाचार करीत आहेत, ते योग्य नाही. महाराष्ट्रामध्ये याबाबत चांगला संदेश गेला पाहिजे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

याकरिता तीनही अधिका-यांना आजच निलंबित करण्यात येत आहे. याबाबतची सखोल चौकशी करुन पुढील प्रशासकीय कारवाई करण्यात येईल.

...4



ता.प्र.क्र.५१३६३....

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, या तारांकित प्रश्नाचे स्वरुप गंभीर आहे. मार्च,2015 मध्ये या संदर्भातील चौकशी झाली होती. त्या चौकशीमध्ये या योजनेमध्ये 19,00,000 लाख रुपयांचा भ्रष्टाचार झाला हे प्रथम दर्शनी मान्य केले होते. याबाबत सन 2015 मध्ये जिल्हाधिका-यांनी कारवाई करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. आता मार्च,2016 सुरु झालेले आहे. शासनाच्या जिल्हाधि-यांनी सूचना दिल्यानंतरही त्याच्यामध्ये लोकप्रतिनिधींनी हस्तक्षेप करुन पत्र देणे योग्य नाही. या माध्यमातून ही चौकशी थांबविणे योग्य नाही. चौकशीच्या कामामध्ये लोकप्रतिनिधींनी हस्तक्षेप करुन चौकशी थांबविणे योग्य नाही. हे चुकीचे आहे. या संदर्भात शाखा अधिकारी व इतरांना निलंबित करण्याबाबत माननीय मंत्री यांनी घोषणा केलेली आहे. यांच्याविरुध्द ताबडतोब फौजदारी गुन्हा दाखल करणे आवश्यक होते. याकरिता आणखी कोणाचीही वाट पाहायची गरज नाही. संबंधित अधिकारी चौकशीनंतर निलंबित होतील, त्यांचे काय करायचे ते राज्यामध्ये मनरेगाची आज जी अवस्था आहे, ती चांगली नाही. आता तो चर्चेचा विषय नाही म्हणून मी बोलणार नाही. परंतु ताबडतोबीने ज्या अधिका-यांनी भ्रष्टाचार केला, त्यांच्या विरुध्द आजच फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे आदेश शासन देणार आहे का ? माननीय मंत्री यांनी संबंधित अधिका-यांना निलंबित करण्याची घोषणा केली परंतु संबंधितांविरुध्द तत्काळ फौजदारी गुन्हे आजच दाखल झाले पाहिजेत, त्यासंबधी संबंधितांना शासन आजच सूचना देणार आहे का ?

श्री.विजय शिवतारे : अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जे सांगितले ते खरे आहे. एका सन्माननीय सदस्यांनीच प्राथमिक चौकशी केल्यानंतर एफआयआर करावा, अशी विनंती केली होती. हा खूप गंभीर आहे. सन 2015 मध्ये जिल्हाधिका-यांनी या संबंधी चौकशीचे आदेश दिले होते. त्यानुसार सर्व संबंधित अधिका-यांविरुध्द ताबडतोब फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येतील.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.रणधीर सावकर : अध्यक्ष महोदय, अकोला जिल्हापरिषदेमध्ये अतिरिक्त शिक्षक भरती घोटाळा झाला होता. पदे मंजूर नसताना व अगोदरच अतिरिक्त शिक्षक असतांना 108 लोकांच्या जिल्हांतर्गत बदल्या करण्यात आलेल्या आहेत...(अडथळा)

**अध्यक्ष** : हा प्रश्न वेगळा आहे. ...5



**मलकापूर (जि.बुलढाणा) येथील रा.मा.क्र.६ ते नायगांव तिकोडी या रस्त्याची झालेली दुरवस्था**

**(9) * ४८४७९ श्री.चैनसुख संचेती (मलकापूर)र:र** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मलकापूर (जि.बुलढाणा) येथील रा.मा.क्र.६ ते नायगाव तिकोडी या एकूण २ कि.मी. लांबीच्या रस्त्याची दुरावस्था झाल्यामुळे रस्त्यावरून वाहन धारकांना व ग्रामस्थांना ये-जा करणे गैरसोयीचे होत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, सदर रस्त्याचे डांबरीकरण करणे आवश्यक असून डांबरीकरणासाठी ६० लक्ष रुपयांच्या निधीची आवश्यकता असल्याचे स्थानिक लोकप्रतिनिधींनी वेळोवेळी कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम विभाग, बुलढाणा यांना सूचित केले आहे, हे ही खरे आहे काय,
(3) असल्यास, या रस्त्याच्या डांबरीकरणासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
श्री.दिपक केसरकर,**श्रीमती पंकजा मुंडे यांच्याकरिता :** (१) अंशतः खरे आहे.
(2) अशाप्रकारचे लोकप्रतिनिधीकडून कोणतेही निवेदन बांधकाम विभाग, जिल्हा परिषद बुलढाणा यांच्याकडे प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.
(3) व (४)४ प्रश्नांकित रा.मा.क्र.६ ते नायगांव तिकोडी हा रस्ता इतर जिल्हा मार्ग क्र. ४४ चा भाग रस्ता असून या भाग रस्त्याची लांबी ३.०० कि.मी. आहे. त्यापैकी ०/०० ते १/५०० कि.मी. लांबीतील काम सार्वजनिक बांधकाम विभागाकडे जिल्हा वार्षिक योजना सन २०१५-१६ अंतर्गत मंजूर असून निविदा स्तरावर आहे.` तसेच उर्वरीत १/५०० ते ३/०० कि.मी. लांबीतील क्षतिग्रस्त रस्त्याचे काम जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत मंजूर करण्यासाठी जिल्हा परिषदेने सार्वजनिक बांधकाम विभाग खामगांव यांना कळविले आहे.

श्री.चैनसुख संचेती : अध्यक्ष महोदय, राष्ट्रीय महामार्ग नायगाव ते तिकोडी हा रस्ता 2 कि.मी.चा आहे. हा रस्ता खड्डे आणि खळगे यांनी भरलेला आहे. तेथून नागरिकांना जाण्या येण्याकरिता फार मोठया प्रमाणात गैरसोय निर्माण झालेली आहे. हा रस्ता पूरेसा निधी देऊन तत्काळ दुरूस्त करण्यात येईल का ?

श्री.दिपक केसरकर : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितलेल्या या रस्त्याच्या एकूण लांबीपैकी 1 ते 3 कि.मी.लांबी कडे - पृष्ठ भागाची आहे. त्यापैकी 0-500 मीटर लांबीचे काम पीडब्ल्यूडीने जिल्हा वार्षिक योजना 2015-2016 अंतर्गत मंजूर केलेले आहे. या संदर्भातील

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

39,00,000 रुपयांचे काम निविदा स्तरावर आहे. याला लवकरात लवकर मंजूरी देण्यात येईल. उर्वरित भागासंदर्भातील प्रस्ताव जिल्हापरिषद जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत जिल्हा नियोजन मंडळाकडे पाठविणार आहे, त्यानंतर त्यावर विचार होईल.

....6



ता.प्र.क्र.४८४७९

श्री.चैनसुख संचेती : अध्यक्ष महोदय, या रस्त्याच्या डांबरीकरणाकरिता 60 लाख रुपये खर्च लागणार आहे. सदरहू निधी शासन तत्काळ मंजूर करणार आहे का ?

श्री.दिपक केसरकर : अध्यक्ष महोदय, यापैकी निम्म्या रस्त्याकरिता 19,00,000 रुपयांचा निधी मंजूर केलेला आहे. या संदर्भातील नवीन प्रस्ताव जिल्हा नियोजन मंडळाकडे जाईल, त्यावेळी जिल्हा नियोजन मंडळ यावर विचार करेल.

....7

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**गडनदी (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) प्रकल्पाच्या**
**धरणाचे काम अपूर्ण असल्याबाबत**

**(10) * ४१०२५ श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी)** ाः ा सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) संगमेश्वर (जि.रत्नागिरी) तालुक्यातीलल गडनदी, मध्यम पाटबंधारे प्रकल्पाला दिनांक २० सप्टेंबर, १९८३ रोजी १० कोटी ३७ लाख रूपयांची मान्यता मिळाली असून, सदरहू राजीवली धरणाचे काम अपूर्ण राहिलेले आहे त्यामुळे अद्यापि जमीन ओलिताखाली आलेली नाही, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदरहू राजीवली धरणाचे काम प्रलंबित असल्यामुळे या धरणाच्या कामास सुमारे ३२ वर्षाहून अधिक कालावधी लोटला असून, आतापर्यंत या धरणाच्या कामांवर ५६५ कोटी रूपये खर्च होवूनही धरणाचे काम अपूर्ण आहे, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, या धरणप्रकल्पाचा डावा कालवा २७ कि.मी. व उजवा कालवा ४७ कि.मी. अंतराचा असून कालव्याची कामे पूर्ण न झाल्यामुळे अजूनही सुमारे १०८ कोटी रूपयांची आवश्यकता असून त्यानंतरच शेती ओलीताखाली येण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,

(4) असल्यास, सदरहू राजीवली धरणाचा खर्च १० पटीत झालेला असल्याने येथील शेती विनाविलंब ओलीताखाली आणण्यासाठी उर्वरित सर्व कामे तात्काळ पूर्ण होण्याच्या दृ.ष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.विजय शिवतारे, **श्री. गिरीष महाजन,यांच्याकरिता :** (१) नाही.

गडनदी प्रकल्पाच्या धरणाचे काम बहूतांशी पूर्ण झाले आहे. धरणात अंशतः पाणीसाठा करण्यात येत आहे.

३१११ हेक्टर्स प्रकल्पीय सिंचनक्षमतेपैकी ९७६ हेक्टर्स सिंचन क्षमता निर्मिती झालेली आहे.

(2) अंशतः खरे आहे. सदर प्रकल्पास दिनांक २०.०८.१९८३ मध्ये प्रशासकीय मान्यता मिळालेली होती.

गडनदी प्रकल्पावर ३१ मार्च २०१५ अखेर एकूण ईटीपीसह रु.७५८.०८ कोटी इतका खर्च झाला आहे.

गडनदी प्रकल्पाच्या धरणाचे मातीकाम पूर्ण असूनन सांडव्यावरील वक्राकार द्वाराची उभारणीचे काम अंतिम टप्प्यात आहे. प्रकल्पीय पाणी साठा ८३.२१२ दलघमी असून जून २०१५ अखेरर ७५.६२ दलघमी पाणीसाठा निर्माण झाला आहे.

(3) प्रकल्पाची उर्वरित कामे पूर्ण करण्यासाठी अंदाजे रु.१४३.१३ कोटी निधीची ी ी ी आवश्यकता आहे.

(4) गडनदी प्रकल्पाची कामे शिघ्र गतीने पूर्णण होण्याच्या दृष्टीने सदर प्रकल्पाचा सन २००९-१० मध्ये वेगवर्धित सिंचन लाभ कार्यक्रमा (AIBP) मध्ये समावेश करण्यात आलेला आहे. निधीच्या उपलब्धतेनुसार प्रकल्प सत्वर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(5) प्रश्न उद्‌भवत नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.41025........

श्री. भास्कर जाधव : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी विस्तृतपणे उत्तर दिलेले आहे. मी त्यांना पॉईंटेड प्रश्न विचारणार आहे. मंत्री महोदयांनी प्रकल्पाची उर्वरित कामे पूर्ण करण्यासाठी अंदाजे 143.13 कोटी रुपयांची आवश्यकता असल्याचे उत्तरात नमूद केलेले आहे. सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पात सदर प्रकल्पासाठी किती रुपयांची तरतूद केलेली आहे ? जर तरतूद केलेली नसेल तर सदर प्रकल्प पूर्ण करण्यासाठी तत्काळ तरतूद करणार काय ? सदरहू प्रकल्प अंतिम टप्प्यात आहे. गेल्या 32 वर्षापासून हा प्रकल्प सुरु आहे. सदरहू प्रकल्प किती दिवसांमध्ये 100 टक्के पूर्ण करणार ?

श्री. विजय शिवतारे : अध्यक्ष महोदय, सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पात सदर प्रकल्पासाठी 5 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. सदरहू प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय राज्यपालांच्या सूत्रानुसार किती निधी मिळतो, याबाबत सन्माननीय सदस्य श्री. अजित पवार यांना माहिती आहे. कोकण खोऱ्यासाठी 500 कोटी रुपये लागणार आहेत. जे प्रकल्प त्वरित पूर्ण केल्यामुळे फायदा होणार आहे, अशा प्रकल्पांना प्राधान्य दिले जाणार आहे. माननीय राज्यपालांच्या सूत्रानुसार जेवढा निधी प्राप्त होईल, तेवढ्या निधीमध्ये विदीन दी टाईम लिमिट काम करावे लागणार आहे. त्यामुळे सदर प्रकल्पासाठी 5 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. सदरहू प्रकल्पाच्या संदर्भात एखादी बैठक आयोजित केली जाईल आणि त्या बैठकीस सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांना देखील बोलाविले जाणार आहे. सदर प्रकल्पाबाबत पुढील नियोजन कसे असावे, यादृष्टीकोनातून काम केले जाणार आहे. सदर प्रकल्पाच्या माध्यमातून फायदा त्वरित मिळणार असेल तर त्यानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करण्याबाबत मी ग्वाही देत आहे.

.......2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.41025........

श्री. अजित पवार : अध्यक्ष महोदय, माननीय राज्यमंत्र्यांनी प्रकल्पाची उर्वरित कामे पूर्ण करण्यासाठी अंदाजे 143.13 कोटी रुपयांची आवश्यकता असल्याचे उत्तरात नमूद केलेले आहे. प्रत्यक्षात 5 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. एवढ्या कमी निधीमध्ये सदरहू प्रकल्प पूर्ण होण्यासाठी अनेक वर्षे लागणार आहेत. काल मराठवाड्याच्या प्रस्तावासंबंधी माननीय जलसंपदा मंत्री महोदयांनी 3 वर्षात राज्यातील सर्व प्रकल्प पूर्ण करण्यासाठी कर्ज काढणार असे उत्तर दिले होते. 3 वर्षामध्ये सदर 143.13 कोटी रुपयांचा प्रकल्प हाती घेऊन तो पूर्ण केला जाईल काय ?

श्री. विजय शिवतारे : अध्यक्ष महोदय, काल मराठवाड्याच्या प्रस्तावासंबंधी जलसंपदा मंत्री महोदयांनी 3 वर्षात राज्यातील सर्व प्रकल्प पूर्ण करण्यासाठी कर्ज काढणार असे उत्तर दिलेले असून, ती बाब शासनाच्या विचाराधिन आहे. प्रकल्पांना उशीर झाला तर डीएसआररेटमुळे मोठ्या प्रमाणावर खर्च वाढत असतो. आवश्यक तेवढे कर्ज घेतल्यानंतर सर्व प्रकल्प पूर्ण करण्यासाठी नियोजन केले जाणार आहे. प्रकल्पांना उशीर झाला तर डीएसआररेटमुळे मोठ्या प्रमाणावर खर्च वाढणार आहे. यापेक्षा व्याज परवडेल, अशी शासनाची धारणा आहे. प्रकल्प पूर्ण करण्यासाठी निर्णय घेऊन कर्जाच्या माध्यमातून निधी उभारला जाणार आहे. प्रकल्पाचे काम सुनियोजित पध्दतीने विदीन दी टाईम लिमिटमध्ये करण्याचे शासनाचे धोरण आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अजित पवार यांनी 3 वर्षामध्ये सदर 143.13 कोटी रुपयांचा प्रकल्प हाती घेऊन तो पूर्ण केला जाईल काय असा प्रश्न विचारलेला आहे. सदर प्रकल्पाच्या बाबतीत जेव्हा निर्णय घेतला जाईल, त्यावेळी प्राधान्याने विचार करुन तो प्रकल्प पूर्ण करण्याबाबत शासनाकडून निश्चितपणे विचार केला जाणार आहे.

श्री. भास्कर जाधव : अध्यक्ष महोदय, 75 टक्क्यापर्यंत जे प्रकल्प पूर्ण झालेले आहेत, असे प्रकल्प प्राधान्याने घेण्याचे शासनाचे धोरण आहे. मंत्री महोदयांनी 80 टक्के प्रकल्प पूर्ण झाल्याचे उत्तर दिलेले आहे. गेल्या वर्षी शासनाने 7 प्रकल्प प्राधान्याने घेतले होते. काल

.......3....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.41025........

श्री. भास्कर जाधव.......
मराठवाड्याच्या प्रस्तावासंबंधी माननीय जलसंपदा मंत्री महोदयांनी यावर्षी 13 प्रकल्प हाती घेण्याबाबत शासनाचे धोरण आहे, असे उत्तर दिले होते. या 13 प्रकल्पांमध्ये या प्रकल्पाचा अंतर्भाव आहे काय ? तसेच कोकणातील प्रकल्पांपैकी एखादा प्रकल्प तरी यावर्षी प्राधान्याने पूर्ण करण्यासाठी नियोजन केले आहे काय ?

श्री. विजय शिवतारे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी पर्टिकुलर प्रश्न विचारलेला आहे, त्यास मी उत्तर देणार आहे. सदर प्रकल्प पूर्णत्वास नेण्याबाबत शासनाचा प्रयत्न असणार आहे. सदर प्रकल्पासाठी गेल्या वर्षी 9 कोटी आणि या वर्षी 5 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. सदर प्रकल्प पूर्ण करण्यासाठी अद्ययावत माहिती घेतली जाणार आहे. या विषयी सन्माननीय सदस्यांसमवेत एखादी बैठक आयोजित केली जाणार आहे. सदर बैठकीत मार्ग निघाला तर सदर प्रकल्प प्राधान्याने पूर्ण केला जाईल असे मी आश्वासन देतो.

श्री. पृथ्वीराज चव्हाण : अध्यक्ष महोदय, उत्तरात असे म्हटले आहे की, सन 2009-2010 मध्ये वेगवर्धित सिंचन लाभ कार्यक्रमामध्ये ( AIBP) समावेश करण्यात आलेला आहे. सद्य:स्थितीत केंद्र शासनाने AIBP कार्यक्रम गुंडाळून ठेवलेला आहे. याऐवजी प्रधानमंत्री सिंचन योजनेचा कार्यक्रम घेतलेला आहे. त्यामुळे सदर प्रकल्प प्रधानमंत्री सिंचन योजनेमध्ये आहे काय ?

श्री. विजय शिवतारे : अध्यक्ष महोदय, AIBP अंतर्गत एकूण 21 प्रकल्प होते. सद्य:स्थितीत AIBP योजना बंद झालेली आहे. 21 प्रकल्पांपैकी 7 प्रकल्प प्रधानमंत्री सिंचन योजनेमध्ये घेण्यात आले आहेत. या 7 प्रकल्पांमध्ये हा प्रकल्प नाही. सन 2009-2010 आणि 2011-2012 या आर्थिक वर्षात 37 कोटी 80 लाख रुपये या प्रकल्पास मिळाले होते. परंतु, नवीन धोरणानुसार 21 प्रकल्पांपैकी 7 प्रकल्प प्रधानमंत्री सिंचन योजनेमध्ये घेण्यात आले आहेत. सदर प्रकल्प पुढे घेतला जाणार नाही, अशातला भाग नाही. केंद्र शासनाने प्रधानमंत्री सिंचन योजनेमध्ये 2 वर्षामध्ये जेवढे प्रकल्प पूर्ण होतील, अशा प्रकल्पांना प्राधान्य देण्याचे धोरण आहे. असे नाही की, 21 प्रकल्पांपैकी फक्त 7 प्रकल्प घेतले जाणार आहेत. पहिल्या टप्प्यात 2 वर्षामध्ये पूर्णत्वास जातील असे 7 प्रकल्प

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.41025........

श्री. विजय शिवतारे.......

घेतलेले आहेत. हे प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर प्रधानमंत्री सिंचन योजनेमध्ये पुढील प्रकल्प घेतले जाणार आहेत. सदर प्रकल्पांमध्ये कदाचित त्या प्रकल्पाचा समावेश केला जाईल. सदर प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करणे अशी राज्य शासनाची धारणा आहे. सन 2016-2017 चे अर्थसंकल्पीय अधिवेशन संपल्यानंतर 8 ते 10 दिवसांमध्ये संबंधितांबरोबर विशेष बैठक घेऊन प्रकल्प पूर्ण करण्याबाबत पुढील कार्यवाही केली जाणार आहे.

श्री. ग.आ.देशमुख : अध्यक्ष महोदय, AIBP अंतर्गत एकूण 21 प्रकल्प होते. 21 प्रकल्पांपैकी 7 प्रकल्प प्रधानमंत्री सिंचन योजनेमध्ये घेण्यात आले आहेत. उर्वरित 14 प्रकल्प अर्धवट अवस्थेत आहेत. सदर प्रकल्पांसाठी केंद्र शासनाने अर्धवट निधी दिलेला आहे. असे 14 प्रकल्प पूर्ण करण्यासाठी राज्य शासन स्वत:कडील निधी देऊन पूर्ण करणार आहे काय ?

अध्यक्ष महोदय, केंद्र शासनाने सन 2014-2015 या वर्षापासून राज्य शासनाला एकूण करापोटी 34 टक्के रक्कम मिळत होती. केंद्र शासनाने वाढीव रक्कमेतून पूर्वीचे प्रकल्प हाती घेतले होते. पूर्वी केंद्र शासनाच्या राज्य शासनामध्ये 147 योजना होत्या, त्या कमी करुन 66वर आणलेल्या आहेत. केंद्र शासनाकडून दरवर्षी जे वाढीव अनुदान मिळणार आहे, त्यामधून हे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी निदेश दिले आहेत काय ?

श्री. विजय शिवतारे : अध्यक्ष महोदय, सभागृहातील ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री. ग.आ.देशमुख यांनी सांगितलेली वस्तुस्थिती आहे. AIBP अंतर्गत एकूण 21 प्रकल्प होते. या योजनेऐवजी केंद्र शासनाने प्रधानमंत्री सिंचन योजना सुरु केली. 21 प्रकल्पांना थोडे थोडे पैसे देण्याऐवजी काही प्रकल्प घेऊन ते 2 वर्षाच्या आत पूर्ण करण्याचे धोरण हाती घेतलेले आहे. म्हणून 21 पैकी 7 प्रकल्प पूर्ण करण्यासाठी हाती घेतले आहेत. तिलारी, निम्नदुधना, नांदूर-माध्यमेश्वर, बावनथळी, निम्नवर्धा, निम्नपांजरा आणि वाघोर अशा प्रकारे 7 धरणांची कामे पूर्ण करण्यासाठी घेतलेली आहेत. हे प्रकल्प 2 वर्षाच्या आत पूर्ण करण्याबाबत केंद्र शासनाने राज्य शासनाला कळविलेले आहे. त्यानुसार कार्यवाही केली जात आहे. सभागृहातील ज्येष्ठ सन्माननीय

....5.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.41025........

सदस्य श्री. ग.आ.देशमुख यांनी 14 प्रकल्पांबाबत कोणती कार्यवाही केली जाणार असा प्रश्न विचारलेला आहे. पहिल्या टप्प्यात 2 वर्षामध्ये 7 प्रकल्प पूर्ण होणार आहेत. पुढील टप्प्यात 2 वर्षामध्ये 14 प्रकल्पांपैकी जे प्रकल्प पूर्णत्वास जाणार आहेत, असे प्रकल्प हाती घेतले जाणार आहेत.

अध्यक्ष महोदय, पूर्वी प्लॅनिंग कमिशन होते आता निती आयोग आलेला आहे. त्यामुळे राज्याला जे अनुदान मिळत होते, त्यामध्ये फरक झालेला आहे. केंद्र शासनाकडे मुख्यमंत्र्यांनी आणि आम्ही करसपॉन्डस केले होते. केंद्र शासनामधील संबंधितांच्या आम्ही भेटी घेतलेल्या आहेत. निती आयोगाप्रमाणे राज्य शासनाला जो वाढीव हिस्सा मिळणार आहे, त्यामधून काही प्रकल्प हाती घ्यावेत अशा प्रकारचे निर्देश केंद्र शासनातील माननीय जलसंपदा मंत्र्यांनी दिले आहेत. यानुसार पुढील कार्यवाही सुरु आहे. 21 प्रकल्पांपैकी 7 प्रकल्प हाती घेतले आहेत. 14 प्रकल्प पुढील टप्प्यात घेतले जाईल आणि राज्य शासनाच्या माध्यमातून काही प्रकल्प पूर्ण केले जातील.

**अध्यक्ष :** ठीक आहे. प्रश्नोत्तराचा तास आता संपलेला आहे. सन्माननीय सदस्यांनी मला सहकार्य केल्यामुळे आज आपण एकूण 10 प्रश्न चर्चेला घेतलेली आहेत.

-------

L-1......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ. शी.** : लेखी उत्तरे

**मु. शी.** : अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी क्रमांक 94 ते 109 वी यादी सभागृहासमोर ठेवणे.

प्रधान सचिव : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने अतारांकित प्रश्नोत्तराची क्रमांक 94 ते 109 वी यादी सभागृहासमोर ठेवतो.

**अध्यक्ष:** अतारांकित प्रश्नोत्तरांची 94 ते 109 वी यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

( प्रेस : येथे सोबत जोडलेली यादी छापावी.)

--------

...2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.:** कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

डॉ.रणजित पाटील (गृह राज्यमंत्री) : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने गृह विभागाच्या अर्थसंकल्पीय मागण्यांवरील चर्चेच्या वेळी दिनांक 1 एप्रिल, 2016 रोजी दिलेल्या आश्वासनानुसार राज्यातील दोषसिध्दिच्या प्रमाणाचे माहे जानेवारी, 2015 ते डिसेंबर, 2015 या कालावधीचे विवरणपत्र सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**अध्यक्ष** : विवरणपत्र सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

डॉ.सुधीर मुनगंटीवार (वित्त मंत्री) : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचे सन 2014-2015 या आर्थिक वर्षाचे (1) विनियोजन लेखा अहवाल, (2) वित्तीय लेखा खंड एक व खंड दोन अहवाल, (3) महसुली क्षेत्रावर अहवाल, (4) राज्य वित्त व्यवस्थेवरील अहवाल, (5) आर्थिक क्षेत्रावर अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**अध्यक्ष :** अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.:** विधेयकांना संमती व अधिसंमती

**अध्यक्ष** : विधानसभेने पारित केलेल्या पुढील विधेयकांना विधान परिषदेकडून संमती मिळाल्याची आणि दोन्ही सभागृहाद्वारे पारित केलेल्या विधेयकांना राज्यपाल व राष्ट्रपती यांची अधिसंमती मिळाल्याची यादी प्रधान सचिव वाचून दाखवतील.

प्रधान सचिव : विधानसभेने पारित केलेली पुढील विधेयके विधान परिषदेकडून या अधिवेशनात शिफारशिवाय संमत करण्यात आली.

(अ) खालील विधेयकाला राज्यपालांची अधिसंमती मिळाली:-

सन 2016 चे विधानसभा विधेयक क्रमांक 13 : महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा)विधेयक, 2016

(ब): खालील विधेयक विधानपरिषदेने कोणत्याही शिफारशीशिवाय परत केले :-

(1) सन 2016 चे विधानसभा विधेयक क्रमांक 9 - महाराष्ट्र (पुरवणी) विनियोजन विधेयक, 2016

(2) सन 2016 चे विधानसभा विधेयक क्रमांक 10 - महाराष्ट्र विनियोजन (लेखानुदान) विधेयक, 2016

(3) सन 2016 चे विधानसभा विधेयक क्रमांक 17 - महाराष्ट्र विनियोजन विधेयक, 2016

(4) सन 2016 चे विधानसभा विधेयक क्रमांक 19 - महाराष्ट्र विवादीत थकबाकी तडजोड विधेयक, 2016

(क) खालील विधेयक विधानपरिषदेने सुधारणेसह संमत केले आहे:-

सन 2015 चे विधानसभा विधेयक क्रमांक 70 - महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (चौथी सुधारणा) विधेयक, 2015

(ड) खालील विधेयके विधानपरिषदेने कोणत्याही सुधारणेशिवाय संमत केली :-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(1) सन 2016 चे विधानसभा विधेयक क्रमांक 1 - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) विधेयक,

...4



प्रधान सचिव...

(2) सन 2016 चे विधानसभा विधेयक क्रमांक 6 - महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (सुधारणा) विधेयक, 2016

(3) सन 2016 चे विधानसभा विधेयक क्रमांक 8 - महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ (सुधारणा) विधेयक, 2016

(4) सन 2016 चे विधानसभा विधेयक क्रमांक 13 - महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, 2016

(5) सन 2016 चे विधानसभा विधेयक क्रमांक 14 - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा) विधेयक, 2016

(6) सन 2016 चे विधानसभा विधेयक क्रमांक 15 - महाराष्ट्र मुद्रांक (सुधारण्ा) विधेयक, 2016

(7) सन 2016 चे विधानवभा विधेयक क्रमांक 18 - महाराष्ट्र करविषयक कायदे (कर बसविणे, सुधारणा व विधिग्राह्यीकरण) अधिनियम, 2016

(8) सन 2016 चे विधानसभा विधेयक क्रमांक 20 - महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन, हैदराबाबद कुळवहिवाट व शेतजमीन आणि महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन (विदर्भ प्रदेश) (दुसरी सुधारणा) विधेयक, 2016

(9) सन 2016 चे विधानसभा विधेयक क्रमांक 21 - महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक, 2016

---------

...5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.ग.आ. देशमुख : अध्यक्ष महाराज, या सभागृहाने जी विधेयके मंजूर केलेली आहेत त्याला विधानपरिषदेने तीन महिन्याच्या आत मंजुरी दिली पाहिजे, अशी घटनात्मक तरतूद आहे. असे असताना आपण जी विधेयके वाचून दाखविली त्यातील दोन विधेयके अशी आहेत की, एका विधेयकावर काहीच कार्यवाही केलेली नसून दुसरे विधेयक दुरुस्त करुन पाठविले आहे. त्यामुळे या सभागृहात ते विधेयक पुन्हा ठेवणे आवश्यक आहे. घटनेतील तरतुदीप्रमाणे त्यावर कार्यवाही होणे आवश्यक आहे, ती झालेली नसल्यामुळे या दोन्ही विधेयकांच्या बाबतीत आपण निदेश दिले पाहिजेज. या सभागृहाने जी विधेयके मंजूर केलेली आहेत, परंतु विधानपरिषदेने ती ठराविक मुदतीत मंजूर केली नसतील तर आपल्याला घटनेने अधिकार दिलेला आहे. याबाबतीत आपण निदेश दिलेले नाहीत. ती विधेयके या सभागृहाने मंजुर केलेली असताना अशी लोंबकळत ठेवलेली आहेत, त्यासंबंधी आपण काय निर्णय घेणार आहात, याचा खुलासा झाला पाहिजे.

**अध्यक्ष** : जी विधेयके विधानपरिषदेने मंजूर केलेली नाहती तीही विधेयके आपण या सभागृहात मंजूर केलेली आहेत.

...6

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.:** लोकलेखा समितीचा अहवाल सादर करणे

श्री.योगेश सागर (समिती सदस्य) : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने सन 2010-2011 मधील लोकलेखा समितीचा नववा अहवाल सभागृहास सादर करतो.

**अध्यक्ष :** लोकलेखा समितीचा अहवाल सभागृहास सादर झाला आहे.

-------

..7

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.:** विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीचा अहवाल सादर करणे

श्री.सुधाकर कोहळे (समिती सदस्य) : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीचा आठवा (अनुपालन) अहवाल सभागृहास सादर करतो.

**अध्यक्ष :** विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीचा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

..8

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.:** अल्पसंख्याक समितीचा अहवाल सादर करणे

सरदार तारा सिंह (समिती प्रमुख) : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने अल्पसंख्याक कल्याण समितीचा पहिला अहवाल सभागृहाला सादर करतो.

**अध्यक्ष :** अल्पसंख्यांक समितीचा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

---------

....9

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.:** औचित्याचे मुद्दे

श्री.भरतशेठ गोगावले : अध्यक्ष महाराज, माझा औचित्याचा मुद्दा आहे. काल मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावर रात्री दोन भीषण अपघात झाले. लग्नाचे साहित्य आणायला गेलेल्या रिक्षाला एस.टी. ने उडविले त्यामुळे त्या अपघातात चार लोक जागीच ठार झाले आणि दसुऱ्या एस.टी.च्या एका अपघातामध्ये दोन लोक मृत्युमूखी पडले. माझी माननीय बांधकाम मंत्री श्री.चंद्रकांत पाटील यांचेसमवेत बैठक झाली होती. काल चार लोक लग्नाचे साहित्य आणण्यासाठी गेले असता रात्री 12.30 वाजता एस.टी. ने जोरदार धडक दिल्यामुळे चार लोकांचा जागीच मृत्यू झाला. दुसऱ्या एका एस्.टी. अपघातात दोन हमाल मृत्युमुखी पडले. काल मुंबई-गोवा महामार्गावर झालेल्या अपघातात एकूण सहा लोक मृत्युमूखी पडले. मुंबई-गोवा महामार्गावर अनेकवेळा अपघात झालेले आहेत. गेल्या चार वर्षापासून हा सुप्रिमो ठेकेदार रस्त्याचे काम करीत आहे, त्याच्यामुळे हे अपघात होतात. या दु:खी सहा कुटुंबीयाना शासनाने भरीव मदत द्यावी, अशी माझी विनंती आहे.

--------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

13-04-2016 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) L-10

ADB/ AKN/ AKN/ MMP/ MMP/ 12:00

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पॉईंट ऑफ इन्फर्मेशनसंबंधी**

श्री.हरिभाऊ जावळे : अध्यक्ष महाराज, मला पॉईंट ऑफ इन्फर्मेशनच्या माध्यमातून शासनाच्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, काल माझ्या मतदारसंघात एक गंभीर घटना घडलेली आहे, यासंदर्भात शासनाकडून मला माहिती मिळावी, अशी अपेक्षा व्यक्त करतो. माझ्या रावेर मतदारसंघातील निंभोरा या गावी एक ट्रक सकाळी 7.30 वाजता ग्रामस्थांनी पाहिला. त्या ट्रकमधून मोठ्या प्रमाणात दुर्गंधी येत होती. त्यावेळेला ग्रामस्थांनी ट्रक उघडा केला. त्यामध्ये 100 गोवंश, ज्याला आपण लहान बैल म्हणतो ते सापडले आणि त्यातील 14 मृत्युमूखी पडलेले होते. त्यांचे डोळे बाहेर आलेले होते. त्यांचे पोट फुटलेले होते. जवळ जवळ 50 वासरे ही अर्धमेली झालेली होती. हे प्रकरण पाहिल्यानंतर ग्रामस्थ जमा झाले आणि त्यामुळे वातावरण बिघडले. मध्यप्रदेश राज्याच्या शेजारी नेहमीच अशा घटना घडत असतात. तेथे आपण अत्याधुनिक चेक पोस्ट बसविलेले आहेत. चोरवड आणि मुक्ताईनगर येथे चेक पोस्ट आहे. तेथील अधिकारी करतात काय, असा प्रश्न पडतो. मला तेथून अतिशय धक्कादायक माहिती मिळाली आहे. तेथे ट्रक उभे केले जातात. तेथल्या अधिकाऱ्याला समजते की, यामध्ये वासरे आहेत. 100 वासरे असतील तर प्रत्येक वासरामागे 200 रुपये याप्रमाणे 20 हजार रुपये घेतात आणि ट्रक सोडून देतात. या चोरवड आणि मुक्ताई नगर येथील चेक पोस्टवर अशा घटना नेहमी घडत असतात. मागील वर्षी अशी घटना घडली होती. त्यामध्ये 50 गाई मृत्युमूखी अवस्थेत सापडल्या होत्या. या गाड्या मध्यप्रदेश राज्यातून येतात आणि त्यामुळे असे गंभीर स्वरूपाचे वातावरण तयार

होते. आज निंभोरा येथील वातावरण बिघडलेले आहे. शासनाने यासंबंधी तत्काळ माहिती घेतली पाहिजे आणि कारवाई केली पाहिजे, अशी माझी विनंती आहे.

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महाराज, माझे पाईंट ऑफ इन्फर्मेशनच्या माध्यमातून दोन मुद्दे आहेत. साध्वी प्रज्ञासिंग ठाकूर यांच्यासंदर्भात जो मुद्दा सभागृहात उपस्थित झाला होता. त्यांच्या संदर्भातील कोर्टातून नस्ती गायब झाल्या. त्यासंदर्भात आपण सरकारला निवेदन करण्याबाबत निदेश दिलेले आहेत त्यामुळे सरकार आज निवेदन करणार

...11



श्री.राधाकृष्ण विखे-पाटील....

आहे काय ? आज अधिवेशनाचा शेवटचा दिवस आहे. शुक्रवारला त्या स्वत: मालेगावला गेल्या होत्या, त्यांनी सांगितले की, नस्त्या गायब होणारच होत्या, अशा पध्दतीचे विधान त्यांनी केलेले आहे. त्यांच्यावर खटला चालू असताना नस्त्या गायब होणार असे त्या जाहीरपणे बोलतात, ही अतिशय गंभीर बाब आहे. सन 2008 मधील फोटो माझ्याकडे आहेत. त्यामध्ये मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री आणि केंद्रिय गृह मंत्री, साध्वी प्रज्ञासिंग ठाकूर समवेत बसलेले दिसत आहेत. पाईंट ऑफ इन्फर्मेशनच्या माध्यमातून याचा विचार व्हावा, अशी माझी विनंती आहे.

यानंतर M-1......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील

अध्यक्ष महोदय, पॉईंट ऑफ इन्फर्मेशनच्या माध्यमातून मला दुसरा मुद्दा मांडावयाचा आहे. याबाबत आज मी स्थगन प्रस्ताव मांडलेला होता मात्र आपण तो नाकारला. आज राज्यामध्ये दलित विरोधी, मुस्लीम विरोधी राज्य शासनाची भूमिका दिसते. आता पोलिसांना काही सूचना दिल्या आहेत काय ? अकलुज जिल्हा सोलापूर आणि वैजापूर जिल्हा औरंगाबाद येथे काही घटना घडल्या. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची 125 वी जयंती साजरी करताना पदाधिकाऱ्यांनी मिरवणुकीला परवानगी मागितली. त्यांनी वाजत-गाजत मिरवणूक काढण्यासाठी प्रयत्न केला. वैजापूरचे पोलीस निरीक्षक धमकी देतात की, तुम्ही जर अशा पध्दतीने काही केले तर, तुमच्या विरुध्द देशद्रोहाचा गुन्हा दाखल करु. तुम्ही तुमचे जुने दिवस आठवा मग जयंती साजरी करा. आज राज्य सरकारनेही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची 125 वी जयंती साजरी करण्यासाठी पुढाकार घेतला आहे. आपण त्यांचे एवढे मोठे स्मारक करीत आहोत. एका बाजूला ही भूमिका घ्यायची आणि दुसऱ्या बाजूला जसे पुण्याला घडले की, जय भीम म्हणणाऱ्यांविरुध्द पोलीस स्टेशनमध्ये देशद्रोहाचा गुन्हा दाखल होतो. प्राचार्य पोलीस स्टेशनला जाऊन त्याबाबत सांगतात. आता तर पोलीस निरीक्षकांची तुम्ही जर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मिरवणुकीमध्ये काही वाद्य वाजविले तर, तुमच्या विरुध्द देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात येईल असे सांगण्याची मजल पोलीस अधिकाऱ्याची जाते. या विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन अशाप्रकारच्या माजोऱ्या पोलीस अधिकाऱ्यांविरुध्द शासनाने ताबडतोब कारवाई केली पाहिजे, अशी आमची मागणी आहे.

.............

अनेक सन्माननीय सदस्य : अध्यक्ष महोदय, .....

**अध्यक्ष** : कुठे काही विशेष घडले तर, पॉईंट ऑफ इन्फर्मेशन मांडला जातो. आपण छोट्या, छोट्या गोष्टी पॉईंट ऑफ इन्फर्मेशनद्वारे मांडणार असाल तर वेळ जातो.

मी सर्व स्थगन प्रस्तावांच्या सूचना दालनात नाकारलेल्या आहेत.

( विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन अध्यक्ष महोदयांसमवेत बोलतात.)

मी एक निर्णय जाहीर करीत आहे, सन्माननीय सदस्यांनी जागेवर बसावे.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

( विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन अध्यक्ष महोदयांसमवेत बोलतात.)

श्री. पृथ्वीराज चव्हाण : अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी अतिशय गंभीर विषय उपस्थित केलेला आहे. आमची विनंती आहे की, आपण सरकारला निर्देश द्यावेत. सरकारने 3 दिवसांपासून या बाबतीत निवेदन करतो असे सांगितलेले आहे. आज सरकार निवेदन करणार आहे काय ?

**अध्यक्ष :** आपण सर्वच पॉईंट ऑफ इन्फर्मेशनबाबत निवेदन करण्यास सांगतो काय ? आपण फक्त स्थगन प्रस्तावावर सांगतो.

शासनाने दखल घ्यावी.

डॉ. संजय कुटे : अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी या घटनेबाबत सांगताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या 125 व्या जयंतीचा उल्लेख केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची 125 वी जयंती राज्य शासनच नाही तर आपण सर्व लोकप्रतिनिधी आनंदाने मोठ्या प्रमाणावर साजरी करतो. महाराष्ट्रामध्ये 1-2 ठिकाणी स्थानिक पातळीवर थोडी फार काही घटना घडली असेल, 1-2 ठिकाणी काही स्थानिक वाद असतील त्यातून अशी एखादी घटना स्थानिक पातळीवर घडली असेल. परंतु, त्याचा एवढ्या मोठ्या प्रमाणावर प्रोपगंडा करायचा, याचे कारण असे समजण्यात येते की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या 125 व्या जयंती निमित्ताने भूतकाळात झाले नाहीत एवढे कार्यक्रम राज्य व केंद्र शासन करीत आहे. हे कुठेतरी पचत नाही, त्यामुळे महाराष्ट्रात तेढ निर्माण करण्याचे काम माननीय विरोधी पक्ष नेते करीत आहेत, हा माझा स्पष्ट आरोप आहे. अशा 1-2 घटना घडल्या तर त्यावर कारवाई करता येईल, त्या घटना दाबता येतील, त्यावर चांगल्या प्रकारे कारवाई करता येईल.

श्री. जितेंद्र आव्हाड : अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जो मुद्दा मांडला आहे, त्याबाबत मला असे वाटते की, एकमताने ठराव करावा. ज्यांनी अशा परवानग्या बंद केल्या त्यांच्यावर कारवाई करा, ठराव मांडा. मालेगावच्या संदर्भात माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जे विधान केले, त्यामध्ये मालेगावमध्ये जे काही बॉम्बस्फोट झाले, त्यानंतर तो खटला कोर्टात सुरु झाला. माहिती अशी आहे की, ती फाईलच अख्खी गायब झाली आहे. ... (अडथळा) ...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

( विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन अध्यक्ष महोदयांसमवेत बोलतात.)

**अध्यक्ष** : शासन ते बघेल. तुमच्याकडे अधिकृतपणे रेकॉर्ड आहे काय, काही माहिती आहे काय?

श्री. जितेंद्र आव्हाड : अध्यक्ष महोदय, आपल्या आसनावरुन निवेदन करावे, असे आदेश माननीय तालिका सभाध्यक्षांनी दिले आहेत.

**अध्यक्ष** : सन्माननीय सदस्य कल्पनेच्या आधारे अशाप्रकारे बोलणे बरोबर नाही, आपण खाली बसावे.

मी एक निर्णय देत आहे. आपण कृपया जागेवर बसून तो ऐकावा.

...4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**दिनांक 4 एप्रिल, 2016 रोजीच्या सभागृहातील घटनेबाबत**

**अध्यक्ष** : दिनांक 4 एप्रिल, 2016 रोजी काही सन्माननीय सदस्यांनी सभागृहाचे कामकाज चालू असताना सभागृहामध्ये राष्ट्रध्वज आणून फडकविल्याबाबत अनेक सदस्यांनी तीव्र भावना व्यक्त केल्या होत्या व त्याबाबत कारवाई करण्याची विनंती करण्यात आली होती व या प्रकरणी माझ्याकडून निर्णय देण्यात येईल असे सभागृहास विदित करण्यात आले होते.

त्यानुषंगाने या संदर्भातील ध्वनी चित्रफित, भारतीय ध्वज संहिता व तद्नुषांगिक सर्व बाबींची बारकाईने तपासणी केल्यावर त्या आधारे मी अशा निर्णयाप्रत आलो आहे की, सन्माननीय सदस्यांनी अशाप्रकारे राष्ट्रध्वज सभागृहात आणून फडकवू नये.

शासनाच्या कारभाराबाबत निषेध व्यक्त करण्यासाठी बऱ्याचवेळा सभागृहामध्ये फलक, पोस्टर्स, बॅनर्स इत्यादी आणून फडकविले जातात. मात्र आतापर्यंत सभागृहात कधीही राष्ट्रध्वज आणून फडकविल्याचे आढळून येत नाही. सभागृहात राष्ट्रध्वज आणून फडकविण्याची ही पहिली व शेवटची घटना ठरावी, अशी मी सन्माननीय सदस्यांकडून अपेक्षा करतो.

यापुढे कोणत्याही सदस्याने या सभागृहात राष्ट्रध्वज आणू नये व फडकवू नये कारण राष्ट्रध्वजाबद्दल आपल्या सर्वांनाच प्रेम व आदर आहे, त्याच्याप्रती आपल्या सर्वांचीच निष्ठा आहे.

मला स्वतःला असे वाटते की, राष्ट्रध्वजाचा जाणीवपूर्वक अवमान करण्याचा या सभागृहातील कोणाचाही हेतू नव्हता. अतः यापुढे अशी अप्रिय घटना भविष्यात घडू नये म्हणून सर्वांनी काळजी घेणे अपेक्षित आहे.

...........

...5/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**दिनांक 5 एप्रिल, 2016 रोजी तारांकित प्रश्नाबाबत उपस्थित करण्यात आलेल्या मुद्याबाबत**

**अध्यक्ष** : मंगळवार, दिनांक 5 एप्रिल, 2016 रोजी प्रश्नोत्तराच्या तासाच्या वेळ तारांकित प्रश्नांच्या यादीमध्ये प्रश्नांची संख्या कमी असल्याबाबत सन्माननीय सदस्यांनी मुद्दा उपस्थित केला होता. त्यावर मी प्रस्तुत प्रकरण तपासून सभागृहास अवगत करतो, असे घोषित केले होते.

त्यानुसार मी दिनांक 5 एप्रिल, 2016 रोजीच्या कार्यवाहीत घेण्यात आलेल्या एकूण प्रश्नांसंदर्भात माहिती घेतली असता उक्त दिवसासाठी एकूण 712 प्रश्न सूचना कार्यवाहीमध्ये घेण्यात आल्या होत्या. त्यापैकी 15 प्रश्न तारांकित स्वीकृत करण्यात आले, 181 प्रश्न अतारांकित स्वीकृत करण्यात आले. 40 प्रश्नावर विभागाकडे वस्तुस्थिती / सन्माननीय सदस्यांकडे प्रश्नाधीन विषयावर अधिकची माहिती मागविण्यात आलेली होती. 83 प्रश्न सूचना अस्वीकृत करण्यात आलेल्या आहेत तर 393 प्रश्न सूचना विषयाशी साधर्म्य असल्याने त्या अन्य प्रश्नांमध्ये क्लब करुन जोडण्यात आलेल्या आहेत. सदस्यांची नावे त्या त्या प्रश्नांमध्ये अंतर्भूत करण्यात आल्याचे निदर्शनास आले.

............

अनेक सन्माननीय सदस्य : अध्यक्ष महोदय, ...

**अध्यक्ष** : आता आपण औचित्याचे मुद्दे घेऊ. सन्माननीय सदस्य श्री. कृष्णा खोपडे यांनी औचित्याचा मुद्दा मांडावा. औचित्याचे मुद्दे संपल्यानंतर मी आपले म्हणणे ऐकेन.

N-1/...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.:** औचित्याचे मुद्दे

श्री. कृष्णा खोपडे : अध्यक्ष महोदय, मी महत्त्वाच्या बाबीवर शासनाचे लक्ष वेधू इच्छितो.

अध्यक्ष महोदय, नागपूर शहरातील नवोदय बँकेतील संचालक मंडळाच्या अनियमित कारभारामुळे 126 पतसंस्था व अन्य नागरीकांचे जवळपास 90 कोटी रुपयांच्या ठेवी अडचणीत येणे...(अडथळा)...

**अध्यक्ष :** सन्माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड यांनी खाली बसावे. मी आपल्याला औचित्याचे मुद्दे झाल्यानंतर संधी देतो.

श्री. कृष्णा खोपडे : अध्यक्ष महोदय, मुदत होऊनही ठेवी परत न मिळाल्यामुळे पतसंस्थांना आर्थिक कारभारात फार अडचण निर्माण होणे, पतसंस्थांच्या ठेवी परत मिळाव्या याकरिता नागपूर जिल्हा पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष यांनी दिनांक 22 ते 27 मार्च 2016 पर्यंत केलेले उपोषण, पतसंस्थांचे शिष्टमंडळाने दिनांक 27/03/2016 रोजी माननीय मुख्यमंत्री महोदयांना निवेदन देऊन कार्यवाही करण्याची विनंती केलेली आहे. त्यानुषंगाने बँकेच्या व्यवस्थापनावर त्वरीत चौकशी करुन पतसंस्थांच्या ठेवी परत मिळण्याच्या दृष्टीने प्रशासक नियुक्त करण्याचे मा. सहकार आयुक्त, पुणे यांना दिलेले आदेश, तसेच पतसंस्थांच्या शिष्टमंडळाने सहकार आयुक्त, पुणे यांना भेटून दिलेले निवेदन व मी स्वत: सहकार मंत्री माननीय श्री. चंद्रकांतदादा पाटील यांना दिनांक 06/02/2016 रोजी दिलेले पत्र, त्या अनुषंगाने ठेवीदारांच्या ठेवी परत मिळण्याच्या दृष्टीने भ्रष्टाचारी बँकेच्या व्यवस्थापनावर तातडीने कारवाई करुन प्रशासक नियुक्त करण्याची आवश्यकता, त्यामुळे यासंदर्भात त्वरीत कारवाई करावी, ही विनंती.

---*---

...2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**अध्यक्ष :** मी औचित्याचे मुद्दे मांडणाऱ्या सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की, आपला मुद्दा थोडक्यात मांडावा. आज शेवटचा दिवस आहे. अंतिम आठवडा प्रस्तावावर काही सन्माननीय सदस्यांना बोलायचे आहे. त्यांचे बोलणे झाल्यावर माननीय मंत्र्यांचे उत्तर होणार आहे. तसेच आज लक्षवेधी सूचना देखील जास्त आहेत. औचित्याचा मुद्दा सर्व वाचून दाखविण्याची गरज नाही. कृपया त्यातील मतितार्थ सांगावा.

डॉ. सुजित मिणचेकर : अध्यक्ष महोदय, मी महत्त्वाच्या विषयावर औचित्याचा मुद्दा मांडत आहे. कृपया स्विकृत करावा.

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्र शासनाने 2005 साली माहितीचा अधिकार हा कायदा पारीत केला. अर्जदाराने माहिती मागितली असता एका महिन्याच्या आत माहिती देण्याचा कायदा आहे. परंतु या सभागृहातील कोणत्याही सन्माननीय सदस्यांना विचारले तर ते सांगतील की, एका महिन्याच्या आत माहिती मिळत नाही.

अध्यक्ष महोदय, मुंबईतील वाकोला पोलीस स्टेशन अंतर्गत दिनांक 08/04/2015 रोजी श्री. मनोज चौधरी यांस अटक करण्यात आल्याप्रकरणी श्री. केतन तिरोडकर यांनी माहितीच्या अधिकारात माहे मे 2015 रोजी माहिती मागितली असता या प्रकरणाची माहिती देण्यात आली नाही. तसेच सदरची माहिती देण्याकरिता वाकोला पोलीस स्टेशनने नारपोली पोलीस स्टेशनकडे हे प्रकरण वर्ग करण्यात आले. या प्रकरणी मुंबई पोलीस आयुक्त यांच्याकडे तक्रार केल्यानंतर उपायुक्त श्री. दिपक मिश्रा यांना चौकशी करुन अहवाल देण्याचे सांगण्यात येऊनही सदरचा अहवाल देण्यात आला नाही. माहितीचा अधिकार कायदा हा शासनाने सर्व सामान्य नागरिकांना शासकीय कामकाजाची माहिती मिळावी याकरिता करण्यात येऊनही सदरची माहिती देण्यास टाळाटाळ करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची आवश्यकता आहे. अशी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे मागणी करीत आहे.

---*---



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(अध्यक्षस्थानी माननीय तालिका अध्यक्ष श्री. योगेश सागर)**

श्री. कृष्णा गजबे : अध्यक्ष महोदय, मी महत्त्वाच्या विषयावर औचित्याचा मुद्दा मांडत आहे.

अध्यक्ष महोदय, गडचिरोली जिल्ह्यात मागील खरीप हंगामात तालुका कृषी कार्यालयाने महाबीज कंपनीचे सांबामसूरी या जातीचे संकरीत धान बियाणे वाटप करण्यात आले होते. या बियानांचे 125 ते 130 दिवसांमध्ये भरघोस पीक येत असल्याचे कृषी अधिकारी व कर्मचारी यांनी सांगितले होते. परंतु 150 ते 160 दिवसानंतरही या बियाणांच्या धानाला पालवे सुद्धा फुटले नाही. उलट धान पिकांवर मोठ्या प्रमाणात रोगाचा प्रादुर्भाव होवून पिकच नष्ट झाले. यावर शेतकऱ्यांनी कृषी अधिकारी व कर्मचारी यांच्याकडे वारंवार तक्रारी दिल्या तरीही शेतकऱ्यांची अप्रत्यक्ष मदतही केली नाही व त्याची चौकशी देखील केली नाही. शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले व त्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला. त्यामुळे संपूर्ण गडचिरोली जिल्ह्यातील या कंपनीच्या धान पिकाची पेरणी करणाऱ्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात यावी व महाबीज कंपनीवर कडक कारवाई करावी, अशी मी मागणी करतो. धन्यवाद.

---*---

...4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री अमिन पटेल : अध्यक्ष महोदय, मैं आपके माध्यम से सदन के सामने एक बहुत ही महत्वपुर्ण औचित्य का मुद्दा उपस्थित करना चाहता हूं.

अध्यक्ष महोदय, सन 1890 में स्पोर्टस की सुविधा के लिए सभी जिमखाने को जगह दी गई थी. सन 2000 में इन सभी जिमखाने की लीज एक्सपायर हो गई है. पुलिस जिमखाना, हिंदू जिमखाना, पारसी जिमखाना, कॅथलिक जिमखाना, इस्लाम जिमखाना, ग्रान्ट मेडिकल जिमखाना, इन सभी जिमखाने की लीज सन 2000 में एक्सपायर हो गई है. 16 साल हो गए हैं. स्पोर्टर्स एक्टिविटी को बढ़ावा देने का काम बंद है. एक हजार के लीज रेंट को 17 लाख रूपया करने का प्रस्ताव दिया गया था. हाई कोर्ट ने उसको स्टे दिया है. अगले मुख्यमंत्री जी ने 2-3 लाख रूपये लीज करने का फैसला किया था. मेरा निवेदन है कि जिमखाने की जो लीज है वह तत्काल रिन्यू करनी चाहिए ताकि स्पोर्टस की एक्टिविटी को बढ़ावा दिया जा सके. आप सरकार को आदेश दें कि जल्द से जल्द जिमखाने की लीज को रिन्यूव किया जाए.

---*---

...5/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. राजेश काशिवार : अध्यक्ष महोदय, मी महत्त्वाच्या विषयावर औचित्याचा मुद्दा मांडत आहे.

अध्यक्ष महोदय, राज्य शासनाने 50 पैशाच्या आत आणेवारी असलेल्या गावांना दुष्काळग्रस्त घोषित केले आहे. परंतु दुष्काळग्रस्त भागात अद्याप कोणतीही सुविधा पुरविण्यात आली नाही. कर्जवसुलीची मर्यादा 31 मार्च 2016 पर्यंत असल्यामुळे सक्तीची कर्जवसुली सध्या सुरुच आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये असंतोष आहे. त्याचप्रमाणे कृषी विद्युत बील 33 टक्के माफ करुन दुष्काळांतर्गत इतर सोयीसुविधा अद्यापही दिलेल्या नाहीत, त्यामुळे दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांमध्ये शासनाप्रती तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. त्यामुळे दुष्काळग्रस्त घोषित झालेल्या गावांना त्याअंतर्गत सर्व सोयी सुविधा पुरविण्यात याव्यात, अशी मी मागणी करतो. धन्यवाद.

---*---

...6/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. डी. एस. अहिरे : अध्यक्ष महोदय, मी महत्त्वाच्या विषयावर औचित्याचा मुद्दा मांडत आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदार संघातील टेंभा प्र.भामेर, येथील नळपाणी पुरवठा योजनेचे काम केवळ 5 टक्के राहिलेले आहे. गेल्या तीन वर्षापासून हे काम अपूर्ण आहे. ते पूर्ण करण्यात यावे. हे काम प्रलंबित असल्यामुळे मी तारांकित प्रश्न मांडला होता. सदर प्रश्नाच्या उत्तरात दिनांक 31.03.2016 च्या आत सदर गावाची नळपाणी पुरवठा योजना कार्यान्वित करण्यात येईल, असे उत्तर देण्यात आलेले आहे. परंतु अद्यापही ते काम सुरु झालेले नाही. सदर काम पूर्ण करण्याबाबत आपण शासनाला योग्य त्या सूचना द्याव्यात, ही विनंती.

---*---



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

13-04-2016 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) N-7

SEB/ MMP/ AKN/ 12:20

कॅप्ट.आर.तमिल सेल्वन : अध्यक्ष महोदय, सायन-कोलीवाडा में, 70 प्रतिशत स्लम एरिया में रहने वाले लोगों को, दिनबंधू नगर, शांति नगर, विजय नगर के लोगों को एडिशनल कलेक्टर (एन्क्रोचमेंट) ने नोटीस दिया है. बिना मतलब के लोगों को तकलीफ दी जा रही है. हाई कोर्ट का आदेश है. वन प्लस वन एसआरए में ले सकता है. महाराष्ट्र शासन का आदेश पास हो चुका है. हाई कोर्ट का भी आदेश मिल गया है, फिर भी वन प्लस वन झोपड़ों को तोड़कर तकलीफ देने का काम हो रहा है. लोग 25 सालों से यहाँ रह रहे है. मुंबई महानगरपालिका रेशन कार्ड इश्यू कर रहा है. पानी की सुविधा दी जा रही है. उनको बिजली भी मिल रही है. प्रशासन और कलेक्टर को इसकी जानकारी मालूम नहीं पड़ती है. 25 साल के बाद उनको तकलीफ देने का काम शुरु होता है. गरीब को कोई पूछने के लिए नहीं आते हैं. वोटींग के समय गरीब लोगों के पास जाते हैं और बाद में वे उन्हें भूल जाते हैं. यह विषय बंद होना चाहिए. गरीब लोगों के लिए वन प्लस वन का कोर्ट का आदेश सरकार ने मानना चाहिए. जनता को तकलीफ नहीं होनी चाहिए, धन्यवाद.

---*---

...O/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री मंगल प्रभात लोढा : अध्यक्ष महोदय, मैंने 2-3 औचित्य के मुद्दे दिए है. मैं म्हाडा के बारे में औचित्य का मुद्दा उपस्थित करना चाहता हूं, उस मुद्दे को कृपया आप स्वीकार कीजिए.

अध्यक्ष महोदय, कोचिंग क्लास के बारे में मैंने पहले ही मुद्दा उपस्थित किया है.

अध्यक्ष महोदय, मुंबई में हजारों बिल्डिंग्स है और लाखों टेनेन्ट्स म्हाडा की पुरानी इमारतों के कारण परेशान हो रहे है. बिल्डिंग चार-चार बार रिपेअर होने के बाद भी.....

**तालिका सभाध्यक्ष** (श्री योगेश सागर) : आपका कोचिंग क्लासेस के बारे में औचित्य का मुद्दा है.

श्री मंगल प्रभात लोढा : अध्यक्ष महोदय, मैंने तीन औचित्य के मुद्दे दिए थे. मैं आपकी परमिशन से म्हाडा का विषय उपस्थित करना चाहता हूं. इसके लिए आप आज्ञा दीजिए.

अध्यक्ष महोदय, म्हाडा की पुरानी इमारत में रहने वाले लाखों टेनेन्ट्स म्हाडा के अधिकारी और म्हाडा के कॉन्ट्रेक्टर की मिलीभगत के कारण परेशान होते रहते हैं. सरकार से निवेदन है कि म्हाडा के टेनेन्ट्स की जो समस्याएं हैं उसको समझते हुए सरकार इस बारे में विधानसभा सदस्यों की एक समिति बनाए और म्हाडा के टेनेन्ट्स को अपनी बिल्डिंग......सेस का पैसा उनका खुद का होता है. इसके अलावा इसमें सरकार का भी पैसा होता है. टैक्स का पैसा होता है. सारे कॉन्ट्रेक्टर भ्रष्टाचार करके पैसा खा जाते हैं. तीन सदस्य बनाकर म्हाडा के टेनेन्ट्स को अपनी बिल्डिंग खुद रिपेअर करने का सरकार अधिकार दे, ऐसा मेरा निवेदन है.

-------

...2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राजेश क्षीरसागर : अध्यक्ष महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. पुणे-मुंबई महामार्ग व पुणे कोल्हापूर महामार्ग क्रमांक 4 या मार्गावर अपघातांचे प्रमाण वाढलेले आहे. या महामार्गावरुन अवजड वाहनांसाठी वेगळी लाईन असताना ते महामार्गावरील तिन्ही लाईनवरुन वाहन चालवतात व रेस लावतात. सदरहू अवजड वाहने अनेक वेळा ओव्हर लोड असतात. उक्त बाबींकडे प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून अक्षम्य दुर्लक्ष करण्यात येते. कोल्हापूर ते मुंबई या महामार्गावर जवळपास 1500 रुपये टोल भरुनही खाजगी कार चालकांना नाहक त्रास होत आहे. त्यामुळे सदर प्रकरणी अवजड वाहन चालकांना शिस्त लावण्याकरिता योग्य ती कार्यवाही करण्यात यावी, अशी माझी औचित्याच्या मुद्याद्वारे मागणी आहे.

------------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. जुन्नर येथे असलेल्या आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृहास नगरपालिकेची पाणी पट्टी व घरपट्टी भरावी लागते. परंतु त्याकरिता देण्यात येणारा निधी शासनाकडून वेळेवर देण्यात येत नाही. जुन्नर नगरपालिकेने पाणी पट्टी न भरल्याने सदरहू वसतिगृहाच्या पाण्याचे कनेक्शन खंडीत केले आहे. वसतिगृहाच्या इमारतीच्या आवारात बोअर घेण्यात आले असून त्यासाठी वापरण्यात येणाऱ्या विजेचे कनेक्शन खंडीत करण्यात आले आहे. सध्या वसतिगृहात राहत असलेल्या विद्यार्थिनींची परिक्षा सुरु. त्यामुळे सदरहू प्रकरणी शासनाने गांभीर्याने विचार करुन योग्य ते निदेश द्यावेत, अशी माझी विनंती आहे.

श्री राज पुरोहित : अध्यक्ष महोदय......

**तालिका सभाध्यक्ष** : सभागृह का कामकाज ऑर्डर में चल रहा है. आपका विषय क्या है ? क्या आपका कहना इसी विषय पर है ? कौनसा विषय चल रहा है ? सम्माननीय सदस्य श्री राज पुरोहित जी आप बैठ जाईए. (व्यवधान) सन्माननीय सदस्यांचा माईक सुरु नसल्याने त्यांचे म्हणणे रेकॉर्डवर येणार नाही. माननीय विरोधी पक्ष नेते यांनी आपला औचित्याचा मुद्दा पूर्ण करावा.

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, माझा दुसरा औचित्याचा मुद्दा आहे. राज्याच्या मंत्रिमंडळाचा विस्तार केव्हा करण्यात येणार आहे ? मंत्रिमंडळाचा विस्तार लवकर करण्यात यावा जेणे करुन आम्ही सन्माननीय सदस्य श्री.राजपुरोहित यांचे भाग्य उजळण्याकरिता शिष्टमंडळ घेऊन जाण्यास तयार आहोत.

----------------

...4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.मेधा कुलकर्णी : अध्यक्ष महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. पुणे महानगरपालिकेतील कोथरुड टिडीआर घोटाळा प्रकरणामध्ये विधिखात्यातील विधी सल्लागार श्री.रविंद्र थोरात यांना लाचलुचपत प्रतिबंधक कायद्यान्वये दाखल झालेल्या गुन्ह्यामध्ये अटक होऊन ते 5 - 6 वर्षे निलंबित होते. त्यानंतर श्री.रविंद्र थोरात यांनी उच्च न्यायालयातून त्यांच्यावरील फौजदारी खटल्यातून डिस्चार्ज मिळवला असला तरी पुणे महानगरपालिकेने केलेल्या खातेनिहाय चौकशीमध्ये त्यांना दोषी धरण्यात आले आहे. टिडीआर प्रकरणी त्यांनी हलगर्जीपणा व निष्काळजीपणा केला असतानाही श्री.थोरात यांना दिनांक 15 मार्च, 2016 रोजी महानगरपालिका आयुक्तांच्या आदेशान्वये टिडीआरसह विधी खात्याचा संपूर्ण कार्यभार दिला आहे. श्री.थोरात यांना खातेनिहाय चौकशीमध्ये दोषी धरलेले असतानाही सदरहू खात्याचा भार त्यांच्यावर सोपवणे हे शासनाच्या नियमांच्या विरुध्द आहे व सदर बाब कायदेशीरदृष्ट्या उचित नाही. सदर प्रकरणी शासनाने लक्ष घालून श्री.थोरात यांचेकडे दिलेला कार्यभार काढण्यात यावा, अशी माझी औचित्याच्या मुद्याद्वारे मागणी आहे.

-----------

....5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रताप सरनाईक : अध्यक्ष महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. मागील 7 वर्षामध्ये मी 23 औचित्याचे मुद्दे मांडले असून मला केवळ 2 औचित्याच्या मुद्यांचे उत्तर राज्य शासनाकडून प्राप्त झाले आहे. पुढील अधिवेशनामध्ये मी मांडलेल्या ज्या ज्या औचित्याच्या मुद्यासंदर्भात मला शासनाकडून उत्तर प्राप्त झाले नाही त्यासंदर्भात संबंधित अधिकाऱ्यांच्या विरुध्द हक्कभंग दाखल करण्याची परवानगी देण्यात यावी.

अध्यक्ष महोदय, वडाळा-ठाणे मेट्रो प्रकल्प प्रकरणी आम्ही केलेल्या पाठपुराव्यासंदर्भात मुख्यमंत्री महोदयांनी मागील दीड वर्षात भरपूर वेळा आश्वासने दिली होती. किंबहुना त्यांनी ठाणे येथे येऊन आम्हाला वचन दिले होते की, यावर्षी कोणत्याही परिस्थितीत वडाळा-ठाणे या कासार वडवली येथील मेट्रो मार्गाचे भूमीपूजन करु. वडाळा ते ठाणे हा मेट्रो प्रकल्प रखडणार अशी आज एका वृत्तपत्रामध्ये बातमी आली आहे. पुणे मेट्रोसाठी मान्यता देऊन कोट्यावधी रुपये निधी दिला जातो, नागपूर मेट्रो व मुंबई मेट्रो प्रकल्प होत आहेत. परंतु ठाणेकरांनी कोणते पाप केले आहे, ठाणेकरांनी मेट्रो प्रकरणी शासनाकडून होत असलेला अन्याय का सहन करावा ? ठाणे जिल्ह्यातील कासारवडवली ते वडळा मेट्रो प्रकल्पाचे काम सुरु करुन तो लवकरात लवकर पूर्ण करावा, अशी माझी औचित्याच्या मुद्याद्वारे मागणी आहे.

---------------

.....6

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भिमराव तापकीर : अध्यक्ष महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. शासनाच्या नगर रचना विभागाने मान्य केलेल्या पुणे महानगरपालिकेच्या विकास आराखड्यातील कोथरुड डेपो व भुसारी कॉलनी येथील दिनांक 13 एप्रिल 1966 रोजी मंजूर केलेला खाजगी ले-आऊट उप जिल्हाधिकारी कार्यालयाकडून रद्द करण्यात आला आहे. सामान्य नागरिकांची घरे वाचविण्याकरिता उक्त ले-आऊट करण्यात आला होता. सदर प्रकरणी जागा मालकांना मोबदला न मिळाल्याच्या करणावरुन पूर्णतः विकसित केलेला ले-आऊट रद्द करुन सदरहू भागातील मोकळ्या जागा अर्जदारांना देण्याकरिता फेरफार आदेश क्रमांक 4006 अन्वये रद्द केला आहे. यामुळे या भागातील पूर्णतः बांधून झालेल्या सामान्य सदनिकाधारकांच्या क्षेत्रफळामध्ये कपात होत असल्याने ....

**तालिका सभाध्यक्ष** : सन्माननीय सदस्य श्री.भिमराव तपकीर यांना औचित्याचे मुद्दे संपल्यानंतर बोलण्याची संधी देण्यात येईल.

------------

...7

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अनिल गोटे : अध्यक्ष महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. कॅ.नामदेवराव भोसले, आयुक्त, महानगरपालिका, धुळे यांना राष्ट्रवादीच्या नगरसेवकांनी जबरदस्त मारहाण केली आहे. सदरहू प्रकार धुळे महानगरपालिकेमध्ये तिसऱ्यांदा घडला आहे. याप्रकरणी सरकार कोणती कारवाई करणार आहे, आयुक्त महोदयांना सरकारकडून संरक्षण देण्यात येईल काय ? याप्रकरणी सरकारच्यावतीने वरिष्ठ मंत्री महोदयांनी निवेदन करावे, अशी माझी औचित्याच्या मुद्याद्वारे मागणी आहे.

......यानंतर P-1

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. एकनाथराव खडसे : अध्यक्ष महोदय, काय घटना घडली याबद्दलची माहिती घेण्यात येईल आणि सभागृह संपेपर्यंत निवेदन करण्यात येईल.

श्रीमती वर्षा गायकवाड : अध्यक्ष महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची 125 वी जयंती व शतकोत्तर रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त केंद्र आणि राज्य सरकारने सामाजिक समता व न्याय दिन घोषित केला आहे. माझी अशी मागणी आहे की, 14 एप्रिल ते 21 एप्रिल या काळामध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची 125 वी जयंती व शतकोत्तर रौप्य महोत्सवी सप्ताह साजरा करण्यात येत आहे. म्हणून आपण जरी 14 एप्रिल या दिनांकास रात्रौ 12 वाजेपर्यंत लाऊड स्पीकरसाठी परवानगी दिली असली तरी इतर दिवशी आपण 10 वाजेपर्यंत परवानगी देतो. यावेळी आपण सामाजिक समता आणि न्याय दिन साजरा करीत असल्यामुळे त्या संपूर्ण सप्ताहामध्ये रात्रौ 12 वाजेपर्यंत लाऊड स्पीकर सुरू ठेवण्याची परवानगी द्यावी की, जेणेकरुन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या निमित्ताने जे विविध कार्यक्रम साजरे होतील. असे होत असताना वैजापूरचे पोलिस निरीक्षक बोलतात की, आपण आपले जुने दिवस आठवा आणि मग जयंती साजरी करा. अध्यक्ष महोदय, मी या औचित्याच्या माध्यमातून याचा निषेध करते आणि अशातऱ्हेने जर एखादा पी.आय. बोलला असेल तर त्याला सस्पेन्ड करावे अशी मी मागणी करते.

--------------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

2..........

**तालिका सभाध्यक्ष** : औचित्याच्या मुद्यावर सरकारकडून निवेदन केले जात नाही. औचित्याच्या मुद्यावर सरकार कसे निवेदन करणार ? औचित्याच्या मुद्यांचे सरकारकडून उत्तर पाठविण्यात येते. आपण विषय मांडला रात्रौ 12 वाजेपर्यंत लाऊड स्पीकर सुरू ठेवण्यासाठीचा आपण विषय मांडला आहे. हा विषय औचित्याच्या मुद्याद्वारे मांडला असल्यामुळे त्याच्यावर सरकारला मला निर्देश देता येणार नाहीत.

राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, आपण सन्माननीय सदस्यांना परवानगी दिली आहे. औचित्याचे मुद्दे सुरू झाले नव्हते.

**तालिका सभाध्यक्ष** : नाही. त्या औचित्याच्या मुद्यावर बोलत होत्या.

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, आपण सन्माननीय सदस्यांना पॉईन्ट ऑफ इन्फॉर्मेशनला परवानगी दिली आहे. मी सुध्दा मघाशी पॉईन्ट ऑफ इन्फॉर्मेशनच्या माध्यमातून हा प्रश्न मांडला होता. औचित्याचे मुद्दे सुरू झाले नव्हते. माझी अपेक्षा एवढीच आहे की, ज्याप्रमाणे मंत्री महोदयांनी धुळ्याच्या संदर्भात माहिती घेऊन निवेदन करतो असे म्हटले आहे त्याचप्रमाणे वैजापूरच्या संदर्भात शासनाने माहिती घेऊन निवेदन करावे अशी आमची विनंती आहे.

श्री. एकनाथराव खडसे : अध्यक्ष महोदय, नेहमी काय करतात हे मलाच माहिती नाही. त्यामुळे ती बाब निदर्शनास आणल्यास त्यावर बोलता येईल.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, घटना अशी घडली की, वैजापूरमध्ये कार्यकर्त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या निमित्ताने वाद्य वाजविणे किंवा इतर कारणांसाठी जी परवानगी मागितली आहे, त्या संदर्भात वैजापूर पोलीस स्टेशनचे पी.आय. यांनी स्पष्टपणे म्हटले की, आपण जुने दिवस आठवा. आपण अशा प्रकारे वाद्ये वाजविली आणि असा काही प्रकार केला तर आपल्याविरुध्द देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा लागेल अशा प्रकारची धमकी दिली. जर पी.आय.ने अशा प्रकारचे वक्तव्य केले असेल तर या बाबतीत वस्तुस्थिती मागवून घ्यावी आणि ती खरी असेल तर त्या पी.आय.च्याविरुध्द कारवाई करावी. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या बाबतीतील विषय असल्यामुळे या विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन शासनाने वस्तुस्थितीदर्शक निवेदन करावे अशी विनंती आहे.

श्री. एकनाथराव खडसे : अध्यक्ष महोदय, या घटनेची माहिती घेण्यात येईल आणि सन्माननीय विरोधी पक्षनेते जे सांगत आहेत ते खरे असेल तर नियमानुसार त्यांच्याकडून खुलासा

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

मागवून कार्यवाही करण्यात येईल.

3.....



ॲड. आशिष शेलार : अध्यक्ष महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेतील एच-पश्चिम विभाग म्हणजे वांद्रे, खार, सांताक्रुझ या विभागातील जल विभागाच्या सुमारे 7000 नस्त्या म्हणजे वॉटर डिपार्टमेंटमध्ये ज्या बिल्डींग विभागाच्या फाईल्स असतात जो रेकॉर्डचा भाग असतो, त्या जवळ जवळ 7000 फाईल्स या गहाळ झाल्या आहेत. बिल्डींग प्रपोजलमधील एच-वेस्टमधील 4000 फाईल्स चोरीला गेल्या. या सर्व बाबतीत चौकशीची मागणी सातत्याने होत आहे. त्यामुळे शासनाने या विषयावर औचित्याच्या मुद्याद्वारे लक्ष घालावे.

**तालिका सभाध्यक्ष** : सन्माननीय सदस्य डॉ. जयप्रकाश मुंदडा साहेब मी आपल्याला अमित घोडा यांचा औचित्याचा मुद्दा संपल्यानंतर संधी देतो.

--------

4......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. अमित घोडा : अध्यक्ष महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. डहाणू व पालघर (जि.पालघर) येथील सुर्या प्रकल्पांतर्गत असलेले कालवे 30 ते 35 वर्षे जुने झाले असून धरणाचे मातीकाम तसेच बांधकाम क्षतिग्रस्त झाल्याने शेवटपर्यंतच्या गावांना शेतीसाठी पाणी पोहोचत नाही. दरवर्षी याकरिता उपलब्ध तुटपुंज्या निधीतून तात्पुरती दुरुस्ती करतात. परंतु मेन कॅनॉलचे काम जोपर्यंत हाती घेत नाहीत तोपर्यंत त्या तात्पुरत्या दुरुस्तीचा काहीच उपयोग होत नाही. सदरचा मेन कॅनॉल हा वन विभागातून जात असल्याने त्यांची दुरुस्ती करण्याची परवानगी वन विभागाकडून घेणे आवश्यक आहे. परंतु अद्यापपर्यंत वन विभागाची परवानगी मिळालेली नसल्याने आदिवासी शेतकऱ्यांना सिंचनाकरिता पाणी उपलब्ध असूनही मिळत नाही. तसेच सूर्या डावा तीर कालवा गेल्या अनेक वर्षापासून मौजे रावते ते निहे, नागझरीपर्यंत किलोमीटर 34 ते 47 या मेन कॅनॉलची निविदा सन 2011 साली काढण्यात आलेली असून सदरील कामाचा कार्यारंभ आदेश देऊनसुध्दा अद्यापपर्यंत प्रत्यक्षात काम सुरू झालेले नाही. तसेच गेल्या 20 ते 25 वर्षापासून आदिवासी गोरगरीबांच्या जमिनीतून लहान पाट, मायनर, सब मायनर, पिचिंग, बांधकाम, लायनिंग तसेच मनोर ब्रॉंच, सर्व्हीस रोड अशी अनेक कामे केलेली आहेत. याकरिता शासनाच्या वन विभागाकडून मेन कॅनॉलचे काम त्वरीत सुरू करण्याकरिता तातडीने परवानगी देऊन आदिवासींना सिंचनाचा फायदा मिळवून द्यावा, अशी मागणी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे करीत आहे.

-----------

5.......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. जयप्रकाश मुंदडा : अध्यक्ष महोदय, माझा पॉईन्ट ऑफ इन्फॉर्मेशन आहे. शासनाचे एक परिपत्रक आहे आणि त्यामध्ये कोणत्या व्यक्तीला कोणता दर्जा आहे हे नमूद केलेले आहे. त्यानुसार आमदारांना व्हीआयपी म्हणून स्टेटस दिलेले आहे. आपल्यापैकी बरेचजण रेल्वेने प्रवास करतो आणि रेल्वे कुपनवर आपण प्रवास करतो. आजपर्यंत रेल्वे कुपन्सवर तिकिट काढल्यानंतर आम्हाला कन्फर्म आरक्षण मिळत होते. पण अलिकडच्या काळात ते मिळत नाही. काल प्रधान सचिवांच्या दालनामध्ये रेल्वे अधिकारी आणि आमचे मराठवाड्याचे काही आमदार यांची बैठक झाली होती. त्या ठिकाणी आम्हाला आजकाल हे तिकिट कन्फर्मेशन का मिळत नाही अशी विचारणा केली असता अधिकाऱ्यांनी सांगितले की, रेल्वे बोर्डाने आमदारांचे व्हीआयपीचे स्टेटस काढून टाकले आहे. हे सर्वच आमदारांच्या दृष्टीने उचित नसून आमदारांचा अवमान करण्यासारखे आहे. म्हणून शासनाने केंद्राकडे पाठपुरावा माहिती घेऊन आमदारांचे स्टेटस नक्की काय आहे, जर सर्वसामान्य माणूस म्हणून आम्ही वावरत असणार तर मग निवडून कशाला यायचे ?

**तालिका सभाध्यक्ष** : मागील अधिवेशनामध्ये हा विषय निघाला होता. यावर शासनाने त्याच अधिवेशन काळात असे आश्वासन दिले होते की, ताबडतोब रेल्वे मंत्रालयाशी आणि संबंधित अधिकाऱ्यांशी बोलून ताबडतोब हा विषय सभागृहाच्या माहितीसाठी सादर करण्यात येईल. ते अधिवेशन निघून गेले आहे आणि या अर्थसंकल्पिय अधिवेशनाचा आज शेवटचा दिवस आहे. आमदारांना विधिमंडळात महिन्यातून दोन वेळा बैठका असतात आणि आठवड्यातून एक वेळा बैठक असते. आमदारांना रेल्वे तिकिटासाठी त्रास होत असेल तर शासनाने आजच सभागृह सुरू आहे तोपर्यंत संबंधित अधिकाऱ्यांशी बोलून सभागृह संपण्याअगोदर याची घोषणा करणे गरजेचे आहे. आजच बोलावे, यासाठी जास्त लांब बोलण्याची गरज नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. प्रकाश महेता : अध्यक्ष महोदय, हा गंभीर मुद्दा आहे आणि या सार्वभौम सभागृहाच्या सदस्यांचे स्टेटस आणि त्यांच्या रेल्वे आरक्षणासंबंधी आजच माननीय मुख्यमंत्र्यांना सांगून या बाबतीत तात्काळ बैठक घेऊन सर्व सदस्यांचे हक्क पूर्ववत करण्याचे आदेश काढण्यात येतील.

---------

6........



श्री. राहूल बोंद्रे : अध्यक्ष महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या राज्याच्या बृहत आराखड्यामध्ये बुलढाणा जिल्ह्यातील चिखली येथे उप जिल्हा रुग्णालय मंजूर झालेले आहे. त्याचप्रमाणे चिखली तालुक्यातील मंगरुळ नवघरे येथे प्राथमिक आरोग्य केंद्राला मंजूरी मिळाली आहे. परंतु यासाठी निधीची तरतूद अद्यापी केलेली नाही. त्यामुळे दुर्दैवाने दोन्ही रुग्णालये होऊ शकलेली नाहीत. शासनाने या दोन्ही रुग्णालयांसाठी तातडीने निधी उपलब्ध करुन द्यावा अशी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे आपल्यामार्फत शासनास विनंती करीत आहे.

Q-1......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राजाभाऊ वाजे : अध्यक्ष महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्रात सुमारे अडीच लाख विडी कामगार असून केंद्र सरकारने दिनांक 1 एप्रिल, 2016 पासून विडी बंडलवर सर्व बाजूने 85 टक्के हेल्थ वॉर्निंग छापण्याचा कायदा केला. सध्या विडी बंडलावर 40 टक्के हेल्थ वॉर्निंग छापली जात असून विडी बंडलाचा आकार लहान असल्याने तसेच विडी बंडलावर लेबल हाताने चिकटवले जात असल्याने 85 टक्के हेल्थ वॉर्निंगच्या निर्णयाची अंमलबजावणी करणे विडी उद्योगांना व्यवहारिकदृष्ट्या शक्य होणार नाही. विडी कामगार आणि कारखानदारांच्या अडचणींकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी दिनांक 1 एप्रिल, 2016 पासून आजतागायत बेमुदत संप सुरु असून विडी उद्योग आणि विडी उद्योगावर अवलंबून असलेल्या लाखो विडी कामगारांचा रोजगार वाचविण्यासाठी केंद्र शासनाकडे विडी उद्योगास वरील कायद्यातून सुट मिळावी यासाठी शासनाकडून प्रयत्न व्हावेत ही विनंती.

----------------

........2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती संगीता ठोंबरे : अध्यक्ष महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघातील अंबेजोगाई येथे शहर पोलीस स्टेशनमध्ये पोलीस कॉन्स्टेबल श्री.संतोष चाटे, वय-32 यांनी दिनांक 16 मार्च, 2016 रोजी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या त्रासाला कंटाळून सुसाईड केले होते. त्यांच्याजवळ एक सुसाईड नोट सुध्दा सापडली होती. याबाबत शासनाने आश्वासन दिले होते आणि त्यासंबंधात मंत्री महोदयांनाही भेटलो होतो. त्याठिकाणी कार्यरत असलेल्या व सुसाईट नोटमध्ये उल्लेख असलेले डीवायएसपी श्री.निलेश मोरे, एपीआय श्री.बोरसे तसेच पोलीस निरीक्षक श्री.पोळ या तिघांवर तातडीने कारवाई करण्यात येईल असे सांगण्यात आले होते. परंतु अद्याप त्यांच्यावर कुठलीही कारवाई झालेली नाही. त्यांचे संपूर्ण कुटूंब याठिकाणी उपोषणाला बसलेले आहे. दोन दिवसांपासून माझ्या मतदारसंघात असंतोष पसरलेला आहे. त्यामुळे माझी शासनाला विनंती आहे की, याबाबत तातडीने कारवाई करावी.

--------------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

......3

श्री.मनिषा चौधरी : अध्यक्ष महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

अध्यक्ष महोदय, मुंबईतील दहिसर चेकनाका हा मुंबईतील प्रवेशाचे मुख्य प्रवेशद्वार असून सद्यःस्थितीत चेकनाक्यावर एमएपीआयआरबी कंपनीमार्फत टोल चालविण्यात येतो. राष्ट्रीय महामार्गावर मोठ्या प्रमाणात वाहनांची वर्दळ असल्यामुळे टोलनाक्यामुळे तेथील 500 मीटर अंतरावरील असलेला रस्ता पार करण्यासाठी दीड ते दोन तास लागतात. सुट्टीच्या दिवशी किमान तीन तास लागतात. त्यामुळे वाहतूक ठप्प होऊन रुग्णवाहिकेसारख्या वाहनांचा खोळंबा होणे, दररोज येणाऱ्या नागरिकांची होणारी गैरसोय, वाहनांचे लाखो रुपयांचे वाया जात असलेले इंधन तसेच परिसरात वाढत असलेले प्रदूषण, यामुळे मी आपणास विनंती करीत आहे की, मीरारोड येथे असलेला सिग्नल तातडीने शासनाने काढून टाकावा जेणेकरुन तिकडची वाहतूक सुरळीत होईल.

-----------

.........4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.संजय कुटे : अध्यक्ष महोदय, मला माहिती आहे की, औचित्याच्या मुद्दयाचे उत्तर नंतर देण्यात येते. परंतु एखादा विषय सभागृहामध्ये मांडला आणि तो खरोखर दखलपात्र, गंभीर असला, माननीय मंत्री महोदय याठिकाणी हजर आहेत. ज्या कॉन्स्टेबलने सुसाईड केले, त्याने सुसाईट करताना सुसाईड नोटमध्ये नावे लिहून ठेवलेली आहेत की कुणाकुणाच्या त्रासाला कंटाळून मी सुसाईड करीत आहे. एवढे असताना सुध्दा आतापर्यंत कारवाई होत नाही, त्यावर ॲक्शन घेतली जात नाही. माननीय गृह राज्यमंत्री महोदयांनी त्यावर अजून दखल घेतलेली नाही. याची दखल घेऊन कमीत कमी त्यावर कारवाईचे आश्वासन देण्यात यावे आणि किती दिवसात कारवाई करणार हे तरी सांगण्यात यावे. एखाद्या औचित्याच्या मुद्दयाची दखल घेतली नाही तर चालेल काय?

**तालिका सभाध्यक्ष** : शासनाने याची नोंद घ्यावी.

प्रा.राम शिंदे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती संगीता ठोंबरे व सन्माननीय सदस्य श्री.संजय कुटे यांनी सांगितले त्याप्रमाणे आयजी यांना तातडीने सखोल चौकशी करण्याचे आदेश देण्यात येतील.

-----------

......5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शिवाजीराव नाईक : अध्यक्ष महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

अध्यक्ष महोदय, सांगली जिल्ह्यातील चांदोली धरणाच्या शेजारील कॅनॉलच्या भिंतीला भगदाड पडल्यामुळे धरणातून पाणी सोडणे अचानक बंद करण्यात आले. त्यामुळे नदीतील पाणी एकदम कमी झाले. या पाण्यावर असलेले वीज निर्मिती केंद्र सुध्दा बंद झालेले आहे. म्हैशाळ सारखी मोठी योजना दुष्काळी भागाच्या दृष्टीने वरदाई आहे त्याला पाणी कमी पडले. लातूरला सुध्दा वारणा नदीच्या पात्रातून रेल्वेने आणि टँकरने पाणी पुरवठा केला जातो. अशा या महत्वाच्या कॅनॉलची वारंवार गळती होते. यामुळे मोठ्या प्रमाणात शेतीचे नुकसान होते. याठिकाणच्या शेतकऱ्यांना पेरणी करता येत नाही किंवा त्या शेतीमध्ये असलेली पीके सुध्दा खराब होत आहेत. या निमित्ताने मी शासनाला विनंती करतो की, या कॅनॉलसाठी जास्तीत जास्त निधी उपलब्ध करुन देऊन याची दुरुस्ती लवकरात लवकर करण्यात यावी.

----------

........6

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. भारती लव्हेकर : अध्यक्ष महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघामध्ये मँग्रोजची कत्तल मोठ्या प्रमाणावर सुरु आहे. सीटीएस नं ए-1, लोखंडवाला बॅकरोडला एकूण 500 एकरचा भूखंड आहे. त्यापैकी 100 ते 150 एकरमध्ये मँग्रोज कटींग सुरु आहे. प्रॉपर्टी कार्डवर सहारा आणि बेहराम जी-जी बाई ट्रस्ट यांच्या नावाचा त्यात उल्लेख आहे. कंत्राटदार आणि विकासक हे मिळून त्याठिकाणी मॅग्रोज कटींग करीत आहेत. त्यावर त्वरीत कारवाई करण्यात यावी. बाजूला विल्लप नगरच्या समोर एक भूखंड आहे त्याठिकाणी रोज आग लावण्यात येते आणि तेथेही मँग्रोजची कत्तल होते आहे. त्यामुळे माझी मागणी आहे की, विकासक आणि कंत्राटदारावर कारवाई करण्यात यावी.

---------------

.........7

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सरदार तारा सिंह : अध्यक्ष महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

अध्यक्ष महोदय, मैंने अब तक आठ औचित्य के मुद्दे दिए होंगे. लेकिन एक भी औचित्य का मुद्दा मुझे उपस्थित करने के लिए मौका नहीं मिला. अब आपने मुझे औचित्य का मुद्दा उपस्थित करने की परमिशन दी उसके लिए मैं आपका आभारी हूं.

अध्यक्ष महोदय, मुलुंड में बड़े पैमाने पर बिल्डिंग बनाने का काम होता है. बिल्डर लोग बिना परमिशन से पेड़ काट देते है. नगरपालिका और पुलिस विभाग के कोई भी लोग उनसे पूछते नहीं है. जो बिल्डर लोग पेड़ काटते है उस पर बीएमसी वॉच नहीं रखती है. ऋणवाद करके एक बिल्डर है. वहां पर आठ काम चलते है. सबसे बड़ा चोर यह ऋणवाद है. वह पेड़ भी काटता है, लोगों के पैसे भी खाता है. लोगों को घर भी नहीं देता है. मेरा निवेदन है कि बीएमसी ने इस बारे में वॉच रखनी चाहिए.

--------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी. :** आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याची विधवा पत्नी सुरेखा माने हिने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर केलेला आत्महत्येचा प्रयत्न

**मु.शी. :** आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याची विधवा पत्नी सुरेखा माने हिने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर केलेला आत्महत्येचा प्रयत्न या विषयावर श्री.विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांनी दिलेली स्थगन प्रस्तावाची सूचना

श्री.एकनाथराव खडसे (महसूल मंत्री) : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विजय वडेट्टीवार यांनी आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याची विधवा पत्नी सुरेखा माने हिने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर केलेला आत्महत्येचा प्रयत्न या विषयावर जी स्थगन प्रस्तावाची सूचना दिली होती, त्या सूचनेला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे, मला निवेदन करावयाचे आहे.

अध्यक्ष महोदय, निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आगोदरच वितरित केलेल्या आहेत. म्हणून मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

( प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे. )

-----------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

........9

**पृ.शी. :** नागपूर जिल्ह्यातील जलालखेडा परिसरातील सुरेश पांडव या तरुणाने कर्जबाजारीपणाला कंटाळून केलेली आत्महत्या

**मु.शी. :** नागपूर जिल्ह्यातील जलालखेडा परिसरातील सुरेश पांडव या तरुणाने कर्जबाजारीपणाला कंटाळून केलेली आत्महत्या या विषयावर श्री.विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांनी दिलेली स्थगन प्रस्तावाची सूचना

श्री.एकनाथराव खडसे (कृषी मंत्री) : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विजय वडेट्टीवार यांनी नागपूर जिल्ह्यातील जलालखेडा परिसरातील सुरेश पांडव या तरुणाने कर्जबाजारीपणाला कंटाळून केलेली आत्महत्या या विषयावर जी स्थगन प्रस्तावाची सूचना दिली होती, त्या सूचनेला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे, मला निवेदन करावयाचे आहे.

अध्यक्ष महोदय, निवेदनाच्या प्रत सन्माननीय सदस्यांना आगोदरच वितरित केलेल्या आहेत. म्हणून मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

( प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे. )

--------------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.पृथ्वीराज चव्हाण : अध्यक्ष महोदय, मालेगावच्या निवेदनाबाबत आम्ही अपेक्षा करीत आहोत. ते निवेदन करण्यात येणार आहे काय?

प्रा.राम शिंदे : अध्यक्ष महोदय, आपण आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये लक्षवेधी सूचनेनंतर विधेयक दाखविलेले आहे.

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, माजी मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण यांनी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे. आपण दुसऱ्या माननीय तालिका सभाध्यक्षांचे प्रोसडिंग पहावे. ज्यावेळेस साध्वी प्रज्ञासिंग ठाकूरचा मुद्दा उपस्थित झाला होता, त्यावेळेस त्यांनी सरकारला निवेदन करण्याचे निर्देश दिले होते. मुळात आज दिवसभरात सरकारने निवेदन करावे अशी आमची विनंती आहे.

.........

11/-...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी. :** धम्म परिषदेतील वक्त्यांनी गोमातेबद्दल केलेल्या वादग्रस्त वक्तव्याने गावतील दोन समाजाच्या लोकांमध्ये झालेला वाद

**मु.शी. :** : धम्म परिषदेतील वक्त्यांनी गोमातेबद्दल केलेल्या वादग्रस्त वक्तव्याने गावतील दोन समाजाच्या लोकांमध्ये झालेला वाद या विषयावर श्री.राधाकृष्ण विखे-पाटील वि.स.स. यांनी दिलेली स्थगन प्रस्तावाची सूचना

प्रा.राम शिंदे (गृह (ग्रामीण) राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.राधाकृष्ण विखे-पाटील यांनी स्थगन प्रस्तावाच्या आयुधाच्या माध्यमातून जो प्रश्न उपस्थित केला त्याबाबत आपण निदेश दिले होते की, निवेदन करावे.

अध्यक्ष महोदय, निवेदनाच्या प्रत सन्माननीय सदस्यांना आगोदरच वितरित केलेल्या आहेत. म्हणून मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

( प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे. )

--------------

R-1...........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ. शी.** : श्रीगोंदा तालुक्यातील कोळेगाव परिसरातील किसन एकनाथ मोरे नावाच्या शेतकऱ्याने केलेली आत्महत्या.

**मु. शी.** : श्रीगोंदा तालुक्यातील कोळेगाव परिसरातील किसन एकनाथ मोरे नावाच्या शेतकऱ्याने केलेली आत्महत्या या विषयावर श्री. राधाकृष्ण विखे-पाटील, वि.स.स. यांनी दिलेली स्थगन प्रस्तावाची सूचना.

प्रा. राम शिंदे ( गृह (गग्रमीण) राज्यमंत्री ) : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. राधाकृष्ण विखे-पाटील, वि.स.स. यांनी अहमदनगर जिल्ह्यातील श्रीगोंदा तालुक्यातील कोळेगाव परिसरातील किसन एकनाथ मोरे नावाच्या शेतकऱ्याने कर्जबाजारीपणाला कंटाळून केलेली आत्महत्या या विषयावर जी स्थगन प्रस्तावाची सूचना दिली होती, त्या सूचनेला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे, मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या आहेत. म्हणून मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभाध्यक्ष** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे )

-------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

......2/-

**पृ.शी.:** निघोज, तालुका पारनेर, जिल्हा अहमदनगर येथील ग्रामस्थांनी दारुबंदीसाठी फेरमतदानाची केलेली मागणी

**मु.शी.:** निघोज, तालुका पारनेर, जिल्हा अहमदनगर येथील ग्रामस्थांनी दारुबंदीसाठी फेरमतदानाच्या केलेल्या मागणीसंबंधी माननीय गृह (ग्रामीण) राज्यमंत्र्याचे निवेदन

प्रा. राम शिंदे ( गृह (ग्रामीण) राज्यमंत्री ) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 47 अन्वये पुढील निवेदन करतो :-

( प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे )

...3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राधाकृष्ण विखे पाटील : अध्यक्ष महोदय, हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे ते बरोबर आहे. माननीय ज्येष्ठ समाजसेवक श्री.अण्णा हजारे यांची भूमिका स्पष्ट आहे. दारु गुत्तेदारांनी कोर्टामध्ये जायचे, न्यायालयामध्ये जाऊन सरकारने विशेष करुन सरकारी वकीलीच्या माध्यमातून त्या केसमध्ये ताबडतोबीने लक्ष घालण्याची गरज आहे. माननीय उच्च न्यायालयाच्या खंडपीठापुढे जो दावा आहे यामध्ये राज्य शासनाने कारवाई करण्याची आवश्यकता आहे. पुणे नगर नॅशनल हायवेवर महिला जमा झाल्या होत्या. त्या ठिकाणी लाठी चार्ज झाला असता, अश्रुधूर सोडावा लागला असता, वेळेत हस्तक्षेप झाल्यामुळे हा प्रसंग टाळला गेला. शासनाला आमची अशी विनंती आहे की, विशेष सरकारी वकीलाच्या मार्फत या दाव्यामध्ये लक्ष घालण्याची आवश्यकता आहे. उच्च न्यायालयामध्ये दावा चालू आहे. त्याबाबत शासनाने या परिस्थितीचा विचार करताना पाठपुरावा करण्याची गरज आहे.

प्रा. राम शिंदे : अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते जी बाब सांगत आहे, ती बरोबर आहे. त्या संदर्भात एकदा मतदान झाले. मतदान प्रक्रिया व्यवस्थित पार पाडली नाही म्हणून दुसरे मतदान घेण्यासाठी प्रशासनाने सांगितले. दरम्यानच्या कालखंडामध्ये उच्च न्यायालयामध्ये ही बाब न्यायप्रविष्ट झाली. परंतु अध्यक्ष महोदय मी या निमित्ताने सांगू इच्छितो की, यासंदर्भात ज्येष्ठ समाजसेवक श्री.अण्णा हजारे यांनी यासंदर्भात मोठया प्रमाणात पाठपुरवा केला होता. गावकऱ्यांचा सुध्दा पाठपुरावा सुरु होता. नगर-पुणे हायवेवर रस्ता रोको करुन निदर्शने देखील केलेली होती. ही बाब अतिशय गंभीर स्वरुपाची आहे. म्हणून राज्य सरकारच्या माध्यमातून विशेष सरकारी वकील देऊन याबाबत तातडीने न्यायप्रविष्ट असलेली बाब ही हिअरींगला आणून, त्यासंदर्भात विशेष वकील देऊन, त्यामध्ये योग्य ते निर्देश देण्यात येतील.

-------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ. शी.** : ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, जव्हार अर्बन सहकारी बँक तसेच मर्चंट नागरी पतसंस्था या बँकांमध्ये बोगस सोने तारण ठेऊन कोट्यवधी रुपयांचे कर्ज घेतल्याचे उघडकीस येणे.

**मु. शी.** : ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, जव्हार अर्बन सहकारी बँक तसेच मर्चंट नागरी पतसंस्था या बँकांमध्ये बोगस सोने तारण ठेऊन कोट्यावधी रुपयांचे कर्ज घेतल्याचे उघडकीस येणे या विषयावर सर्वश्री सुभाष पाटील, धैर्यशील पाटील, वि.स.स. यांनी दिलेली स्थगन प्रस्तावाची सूचना.

श्री. चंद्रकांत पाटील ( सहकार मंत्री ) : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री सुभाष पाटील, धैर्यशील पाटील, वि.स.स. यांनी "ठाणे जिल्ह्यतील मध्यवर्ती सहकारी बँक, जव्हार अर्बन सहकारी बँक तसेच मर्चंट नागरी पतसंस्था या बँकांमध्ये बोगस सोने तारण ठेऊन कोट्यावधी रुपयांचे कर्ज घेतल्याचे उघडकीस आल्याबाबत" या विषयावर जी स्थगन प्रस्तावाची सूचना दिली होती, त्या सूचनेला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे, मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या आहेत. म्हणून मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभाध्यक्ष** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे )

-------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**शासकीय विधेयकासंबंधी**

प्रा. राम शिंदे : अध्यक्ष महोदय, मला एक बाब निदर्शनास आणून द्यावयाची आहे की, आज अधिवेशनाचा शेवटचा दिवस असल्यामुळे एक महत्वाचे बिल जात पंचायतीच्या संदर्भामध्ये इंट्रोडयूस केलेले आहे. हे बिल येथे घेऊन वरच्या सभागृहामध्ये दाखल करावयाचे आहे. तरी बिल मांडण्यासाठी अनुमती द्यावी.

श्री.राधाकृष्ण विखे पाटील : अध्यक्ष महोदय, ऑफिशियल बिझनेस घेतो. शेवटच्या दिवशी बिल घेत नाही. बिलावर जर सहा तास, दहा तास बोलायचे असेल तर काय करायचे, ते बिल इंट्रोडयूस झालेले आहे. त्याच्यामुळे बिल घेता येणार नाही. काल शासनाने ज्या-ज्या बिलांची मान्यता मागितली ती दिली. सर्व महत्वाची विधेयके मान्य करण्यात आली आहेत. माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, त्यांनी याबाबत आग्रह करुन नये. अंतिम आठवडयाच्या प्रस्तावावर काही लोकांना बोलायचे आहे. त्यावर मंत्र्यांचे उत्तर आहे. याबाबत जी प्रक्रिया कराची आहे ती नंतर करता येईल.

.....6/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.:** जिल्हा मुख्यालय, तालुका मुख्यालय व शहरांमध्ये राज्य परिवहन महामंडळाच्या बस स्थानकांचे कोणत्याही महापुरुष व लोकनेते यांच्या नावाने नामकरण करण्याचे राज्य परिवहन महामंडळाचे धोरण अथवा प्रथा नसणे

**मु.शी.:** जिल्हा मुख्यालय, तालुका मुख्यालय व शहरांमध्ये राज्य परिवहन महामंडळाच्या बस स्थानकांचे कोणत्याही महापुरुष व लोकनेते यांच्या नावाने नामकरण करण्याचे राज्य परिवहन महामंडळाचे धोरण अथवा प्रथा नसणे यासंबंधी माननीय परिवहन मंत्र्यांचे निवेदन.

............

श्री. दिवाकर रावते (परिवहन मंत्री) : अध्यक्ष महोदय, महाराष्ट्र विधानसभा नियम 47 नुसार आपल्या अनुमतीने निवेदन सादर करीत आहे.

राज्यभरामध्ये जिल्हा मुख्यालय, तालुका मुख्यालय व शहरांमध्ये राज्य परिवहन महामंडळाची बस स्थानके आगारे व त्या अनुषंगाने असणाऱ्या आस्थापना कार्यरत आहेत. राज्य परिवहन महामंडळाची बसस्थानके व आगारे ही त्या ठिकाणच्या नावानी ओळखली जातात, तसेच एकाच शहरामध्ये एकापेक्षा अधिक बसस्थानके आहेत, अशा ठिकाणच्या बसस्थानकांना प्रवाशांच्या सोयीसाठी त्यांच्या स्थानिक क्षेत्रावरुन नावे देण्यात आली आहेत. जसे पुणे येथे शिवाजीनगर बस स्थानक, स्वारगेट बस स्थानक, नाशिक येथे मेळा बसस्थानक अशी नावे देण्यात आलेली आहेत. तथापि, अशा बसस्थानकांना कोणत्याही महापुरुष, लोकनेता अशा नावाने नामकरण करण्याची राज्य परिवहन महामंडळाचे धोरण अथवा प्रथा नाही.

तसेच वाढत्या शहरीकरणामुळे राज्य परिवहन वाहतूक वर्दळीत मोठया प्रमाणावर वाढ झ ाल्याने सध्या कार्यरत असलेली राज्य परिवहन बसस्थानके, आगाराच्या जागा प्रवाशांकरिता व

....7/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दिवाकर रावते.......

प्रवाशांच्या सोयी सुविधा निर्माण करण्याकरिता अपुऱ्या पडत असल्यामुळे राज्य परिवहन बसस्थानके व आगारांच्या जागेमध्ये महापुरुषांचे, लोकनेत्यांचे पुतळे, स्मारके उभारण्यासाठी अथवा त्याकरिता जागा उपलब्ध करुन देण्याचे राज्य परिवहन महामंडळाचे धोरण नाही.

वरील वस्तुस्थिती लक्षात घेता, राज्य परिवहन महामंडळाच्या बसस्थानकांना कोणत्याही महापुरुष, लोकनेते यांचे नावे देणे तसेच राज्य परिवहन महामंडळाच्या जागाचे महापुरुषांचे, लोकनेत्यांचे पुतळे, स्मारके उभारण्यासाठी राज्य परिवहन महामंडळाची जागा उपलब्ध करुन देण्यात येणार नाही.

**तालिका सभाध्यक्ष** : लक्षवेधी सूचना सुरु करण्याच्या अगोदर आज अंतिम आठवडा प्रस्ताव आहे. सभागृहाच्या कामकाजाच्या संदर्भात झालेल्या विषयांची माहिती सुध्दा सभागृहात देण्यात येणार आहे. एकूण 13 लक्षवेधी आहेत. आपल्याला विनंती आहे की, कमीत कमी दोन प्रश्न विचारुन लक्षवेधी संपवून दुपारी 2.00 वाजता अंतिम आठवडा प्रस्ताव सुरु करु.

.....8/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : एमआयजी सहकारी गृहनिर्माण संस्था, वांद्रे (पूर्व) येथील पुनर्विकास प्रकल्पामध्ये विकासकाकडून झालेला गैरप्रकार

**मु.शी.** : एमआयजी सहकारी गृहनिर्माण संस्था, वांद्रे (पूर्व) येथील पुनर्विकास प्रकल्पामध्ये विकासकाकडून झालेला गैरप्रकार यासंबंधी श्री.राधाकृष्ण विखे-पाटील, श्रीमती तृप्ती सावंत, सर्वश्री शशिकांत शिंदे, बाळासाहेब पाटील, मकरंद पाटील, दिपक चव्हाण, अबु आझमी, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील ( विरोधी पक्षनेता ) : अध्यक्ष महोदय, मी नियम 105 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृहनिर्माण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

***"एमआयजी सहकारी गृहनिर्माण संस्था ग्रुप-५ वांद्रे (पू), मुंबई ५१ या संस्थेच्या ए, बी व डी या प्रकारच्या*** ११ ***इमारतीचा पुनर्विकास करण्याकरिता*** जाहिरातीद्वारा निविदा न मागविता ***विकासक मे.कल्पतरु प्रॉपर्टीज प्रा.लि. यांना*** नियमबाह्यरित्या ***मंजूरी देणे, तसेच*** दि.२६.८.२००९ ***च्या*** शासन निर्णयानुसार ***एम.आय.जी. प्रकारच्या सदनिकाधारकांना पुनर्विकासात*** ८० ***चौ.मी. पेक्षा जास्त मोठी सदनिका देता येत नसताना विकासकाने ए आणि बी प्रकारच्या सदनिकाधारकांना पुनर्विकासामध्ये अनुक्रमे*** १६६४ व १२७२ ***चौ.फूट सदनिका देण्याचा केलेला करारनामा, भविष्यात काही अडचणी उद्‌भवल्यास त्यासाठी विकासक जबाबदार राहणार नाही असेही करारात नमूद करणे,*** ८० ***चौ.मी. पेक्षा कमी असलेल्या दोन सदनिका नकाशामध्ये दाखविण्यात येऊन सदर सदनिकामध्ये असलेली भिंत तोडून एकच सदनिका तयार करण्याचे प्रस्तावित करणे,*** ना-हरकत प्रमाणपत्रासाठी आणि महानगरपालिकेमध्ये आय.ओ.डी.साठी अर्ज करताना वेगवेगळे नकाशे सादर करुन दोन्ही नकाशे करारनाम्याशी विसंगत असणे, ***संस्थेच्या कार्यकारी सदस्यांनी विकासकाशी संगनमत करुन पुनर्विकासासाठी*** पर्यावरण कायदा, १९८६ अंतर्गत नियम ५ अन्वये ***पर्यावरण विभागाची परवानगी नसताना, पुनर्विकासासाठी इमारतीच्या सदनिकामध्ये अनधिकृतपणे केलेली तोडफोड, संस्थेचे प्रचलित अध्यक्ष व सचिव यांना उपनिबंधकांनी सदस्य राहण्यास अपात्र घोषित करणे, उपनिबंधकानीच संस्थेचे अधिकारी व विकासकाबरोबर संगनमत करुन शासनाची दिशाभूल करणे, संस्थेच्या सभासदांची केलेली फसवणूक,*** परिणामी संबंधितांविरुद्ध फौजदारी कारवाई करुन सर्व गैरव्यवहाराची लाचलुचपत विभागामार्फत चौकशी करण्याची होत असलेली मागणी, ***याबाबत करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."***

श्री. रवींद्र वायकर ( गृहनिर्माण राज्यमंत्री ) : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभाध्यक्ष ( श्री. योगेश सागर )** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( **प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे ) ...9/-

UNCORRECTED / NOT FOR PUBLICATION

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, एम.आय.जी.चे प्रकरण पुष्कळ मोठे आहे. वांद्रे पूर्व च्या एम.आय.जी. को.ऑप. हौसिंग सोसायटीच्या ग्रुप 5 या सस्थेच्या कार्यकारी मंडळाने परस्पर फायदा मिळविण्यासाठी विकासकाबरोबर संगनमत करुन संस्थेच्या सभासदांची फसवणूक केल्याची तक्रार आहे. म्हाडाने इमारतीच्या पुनर्विकासाकरिता संस्थेला दिलेल्या एन.ओ.सी.मध्ये एक वर्षाच्या आत पुनर्विकास काम सुरु करण्याचे होते. परंतु 4 वर्षे होऊनही अद्यापही त्या कामाला सुरुवात झालेली नाही. पर्यावरण विभागाची परवानगी नसतानाही संस्थेच्या इमारतीमधील सदनिकांची तोडफोड करुन बरेच ऑल्ट्रेशन केल्याच्या तक्रारी आहेत. शासनाने ठरवून दिलेल्या सदनिकाधारकांना एवढी चौरस फुट सदनिका त्याने धारण करायला पाहिजे, त्यापेक्षा 1664, 1272 इतक्या चौरस फुटाच्या सदनिका देण्याचा नोंदणीकृत करारनामा केला. इतके नियमबाहय केले. 80 चौरस मिटरपेक्षा जास्त त्याने धारण करायला नको होते. त्या ऐवजी 1664 चौ.फुटाचा करार करुन त्यांनी नियमांचे उल्लंघन केलेले आहे. विकासकाने प्रत्येक सभासदाला दोन सदनिका नकाशामध्ये दाखवून त्यातील भिंत इमारत तयार झाल्यानंतर तोडून दोन्ही सदनिका वापरण्याचा तोंडी करार केला आहे. त्यामुळे एम.आर.टी.पी. कायद्याचे उल्लंघन झालेले आहे. अशा प्रकारची तक्रार आहे. संस्थेच्या सदनिका प्लॉट खरेदीच्या बाबतीत संस्थेने 2007 साली बेकायदेशीर विकासक नेमण्याची प्रक्रिया पार पाडून 2008 मध्ये याच कार्यकारणीतील 5 सदस्यांनी विकासकाकडून कल्पतरु इस्टेट, जोगेश्वरीतील मोठे प्लॉट खरेदी केलेले आहेत.

S-1...........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राधाकृष्ण विखे पाटील .....

विकासक, सोसायटीचे प्रमोटर, संचालक यांनी संगनमताने कॉम्प्लेक्सवर दरोडा घातलेला आहे. याची वस्तुस्थिती आपल्यासमोर आलेली आहे.

अध्यक्ष महोदय, माझे या निमित्ताने दोन प्रश्न आहेत. मुंबईच्या कोणत्याही विषयावर चर्चा करताना ज्यामध्ये विकासक, बिल्डर्स इन्व्हॉल्व आहेत त्या प्रकरणाकडे लोक वेगळया भूमिकेतून पाहतात. यामध्ये कोणाचा काही इंटरेस्ट आहे का, यामध्ये कोणाची भानगड आहे का ? मी सभागृहाला आपल्या माध्यमातून स्पष्टपणे सांगू इच्छितो की, यामध्ये आमची वेगळी भूमिका नाही. हे लोक मला सातत्याने एक वर्षापासून भेटत होते. माझा प्रयत्न होता की, यामधील वस्तुस्थिती काय आहे ? येथील सामान्य लोकांवर अन्याय होत आहे. धनदांडगे मोठे होत चालले आहेत. आपल्यातील काही मंडळी संगनमत करुन सामान्य लोकांना उद्ध्वस्त करण्याचा प्रयत्न केला जात आहे ही भूमिका मी मांडत आहे.

अध्यक्ष महोदय, माझा प्रश्न आहे की, संस्था व विकासकाने सभासदांची फसवणूक केलेली आहे, ज्या 14 सदनिका स्वतःच्या नावे खरेदी केलेल्या आहेत याबाबत शासन उच्चस्तरीय चौकशी करणार आहे. विकासकाने अंधेरी, जोगेश्वरी, गोरेगाव व कांदिवली येथील पुनर्विकास प्रकल्पाची कामे बेकायदेशीररित्या केल्याने हे प्रकल्पदेखील रखडलेले आहेत. मुळातच या सर्व विकासकाच्या बाबतीत काही विशेष तपास एसआयटीमार्फत आपण करणार आहात का ?

श्री.रविंद्र वायकर : अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते यांना मी सांगू इच्छितो की, एमआयजी कॉलनीच्या विकासाच्या अनुषंगाने सदर प्लॉट हा 6999.01 चौरस मीटरचा आहे. येथे 11 इमारती आहे. तळमजला + 3 अशा इमारती आहेत. यामध्ये ए टाईप, बी टाईप, डी टाईप अशा 128 सदनिका आहेत. यातील 32 सदनिकांचे क्षेत्रफळ 79.05 चौरस मीटर आहे. तसेच 16 सदनिकांचे क्षेत्रफळ 57.13 चौरस मीटर व 80 सदनिकांचे क्षेत्रफळ 45.33 चौरस मीटर इतके आहे. अशा प्रकारे 128 सदनिका या 11 इमारतींमध्ये आहेत. यामध्ये सदर संस्थेने एक विशेष सभा घेतली व पुनर्विकास करण्याबाबत ठरविले. दिनांक 13.11.2005 रोजी ही सभा झाली. आपण ज्या विकासकाचे नाव घेतले त्याच्यासह तेथे 3 विकासक आले होते. यामध्ये कल्पतरु प्रा.लि. यांची

....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.रविंद्र वायकर.....

विकासक म्हणून निवड करुन ठराव करण्यात आला. यांनी भ्रष्टाचार केला असे आपण सांगितले आहे. तेथील 128 पैकी 104 लोक एका बाजूला होते 24 लोकांनी विरोध केलेला होता त्यांनी सहकार न्यायालयात दावा केला, हा दावा फेटाळण्यात आला. त्यानंतर ते अपिलामध्ये गेले. अपिलामध्ये सहकार न्यायालयाचा पहिला निर्णय त्यांनी कायम ठेवला. त्यानंतर हे प्रकरण सहकार उपनिबंधक कार्यालयात गेले, त्यांची बैठक झाली. त्या बैठकीत निर्णय होऊन तो दावा त्यांनी परत घेतला. सदर आदेशाविरुध्द सहकार मंत्री यांच्याकडे अपील केले. सहकार मंत्री यांच्याकडे दिनांक 22.2.2016 रोजी बैठक झाली तेथेही तो अर्ज फेटाळण्यात आला. अशा प्रकारे त्यांनी ज्या ज्या ठिकाणी अपील केले होते, तेथे त्यांचे अपील फेटाळण्यात आले व पुढील कामकाज करण्यास सांगण्यात आले. यामध्ये त्यांनी उल्लेख केलेला आहे की, दिनांक 3 जानेवारी, 2009 च्या उल्लेखाच्या अनुषंगाने ही बैठक कशा प्रकारे घ्यावी याची नियमावली झाली होती. पण यांची बैठक 2006 मध्ये झालेली होती. त्या बैठकीत काही नियम केले होते. बैठकीचे व्हिडीओ चित्रिकरण केले पाहिजे हा त्यामध्ये मुद्दा होता. हा निर्णय 2009 चा असल्या कारणाने तो पूर्वलक्षी नसल्यामुळे तेथे तो कायम करण्यात आला व कामकाज करण्यात आले.

अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी विचारलेल्या दुसऱ्या प्रश्नाबाबत सांगतो. येथे झालेल्या बांधकामाकरिता करारनामा झालेला आहे. तो होत असताना त्यांच्या सदनिका 79.05 चौ.मी. आहेत. यामध्ये 33.5 च्या अनुषंगाने 1.2 किंवा 1.2 च्या वर जो टीडीआर मिळत होता तो 2.4 होता. त्यांनी तसे ॲप्लीकेशन केल्यानंतर ज्यांनी परवानग्या घेतल्या होत्या ते 2.5 ला गेले आहेत. 2.5 ला गेल्यावर त्यांनी फंजीबल एफएसआय घेतला आहे. या माध्यमातून 79.05 चौ.मी. आणि फंजीबल एफएसआय हा 28 चौ.मी. अशा प्रकारे तो मिळाला आहे. 1630 स्क्वेअरफूट बाबत आपण सांगितले आहे. त्यांनी कायद्याप्रमाणे जे ॲग्रीमेंट केले होते, त्यामध्ये असलेला एफएसआय व फंजीबल एफएसआय मिळून त्याचे 155 चौरसमीटर होत होते. त्यांचे आणखी ॲडीशनल बाबीकरिता त्यांच्याबरोबर ॲग्रीमेंट झालेले आहे त्याप्रमाणे त्यांनी 44.08 चौ.मी. दिलेले आहेत.

.....3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.रविंद्र वायकर.....

पण अजूनपर्यंत तेथे बांधकाम झालेले नाही. आपण सांगितले की, तेथे तोडफोड झालेली आहे. पण मी सांगू इच्छितो की, तेथे तोडफोडही झालेली नाही. त्यामुळे यामध्ये कोणताही घोटाळा झाला आहे असे म्हणता येणार नाही.

ॲड.आशिष शेलार : अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते यांनी या लक्षवेधीद्वारे काही महत्वाचे मुद्दे समोर आणलेले आहे. मंत्री महोदयांनी यावर सविस्तर उत्तर दिलेले आहे. पण त्यांनी याबाबत उच्चस्तरीय चौकशी करावी अशी मागणी केलेली आहे. याबाबत मंत्री महोदयांनी उत्तर दिलेले नाही. मुद्दा असा आहे की, 2009 ला बैठक झाली, 2009 च्या नियमानुसार व्हिडीओ शुटींग झाले पाहिजे हे ठरले होते पण 2006 ला बैठक झाली. त्यामुळे पूर्वलक्षी पध्दतीने व्हिडीओ शुटींग अनिवार्य नाही असे मंत्री महोदयांनी सांगितले आहे. मंत्री महोदयांनी वाढीव एफएसआय देण्याबाबत सांगितले की, फंजीबल एफएसआयचा बेनिफीट त्यांना देऊन वाढीव एरिया मिळाला आहे. 2009 ला जेव्हा बैठक झाली तेव्हा फंजीबल एफएसआयची कन्सेप्ट मुंबई शहरात नव्हती. श्री.सुबोध कुमार आयुक्त झाले तेव्हा फंजीबल एफएसआय हा डीसीआर चा भाग झाला. 2009 मध्ये जी बैठक झाली, ज्या व्हिडीओ शुटींगला तुम्ही अनिवार्य असे म्हटलेले नाही. त्यावर सहकार खात्याने निर्णय दिला की, त्यामध्ये फंजीबल एफएसआय हा विषयच नव्हता. फंजीबल एफएसआय मिळाल्यानंतर सेलच्या प्रपोर्शनेटमध्येही वाढ झाली असणार आहे.

अध्यक्ष महोदय, मी विचारु इच्छितो की, यामध्ये हौसींग स्टॉक व प्रिमियममध्ये नेमकी वाढ झाली, फंजीबल एफएसआय मुळे पडलेला बदल या दोन गोष्टींकरीता तरी याची चौकशी करणे आवश्यक आहे. याबाबत मंत्री महोदय चौकशी करणार का ?

श्री.रविंद्र वायकर: अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, 2006 चा निर्णय होता, पण हे जेव्हा स्टेपवाईज घेतले. संस्थेने इमारतीचे अभिहस्तांतर, भाडेपट्टा, करारनामा दिनांक 20.2.2008 रोजी केले. त्यानंतर संस्थेने विकासकाशी 2012 मध्ये करारनामा केला.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.रविंद्र वायकर.....

त्यानंतर 2.4 क्षेत्रफळाकरिता दिनांक 13.11.2012 अन्वये ना-हरकत प्रमाणपत्र दिले गेले. त्यांनी प्रोरेटाकरिता मागणी केली होती. त्याकरिता त्यांना दिनांक 30.3.2013 अन्वये त्यांना देकार पत्र देण्यात आले होते. अशा पध्दतीने प्रोरेटाच्या माध्यमातून देकार पत्र दिल्यानंतर त्यांनी मुदतीमध्ये पैसे भरले नाहीत. त्यांना मुदत वाढवून देण्यात आली होती. त्यांच्याकडून 90 कोटी रुपये भरण्यात आलेले आहेत. याबाबत सन्माननीय सदस्यांनी मागणी केल्याप्रमाणे निश्चितपणे याची चौकशी केली जाईल.

श्रीमती तृप्ती सावंत :अध्यक्ष महोदय, मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार प्रत्येक सभासदाबरोबर वैयक्तिक करारनामा बंधनकारक असताना संस्थेने विकासकाबरोबर एकच करारनामा केलेला आहे. विकासकाने वैयक्तिक करारनामा केलेला नाही. विकासकाने म्हाडामध्ये एनओसीकरिता व बीएमसीमध्ये आयओडीकरिता अर्ज करतांना वेगवेगळे नकाशे सादर केलेले आहेत. म्हाडाच्या ले-आऊटमध्ये आर.जी.अंतर्गत या संस्थेला बेसमेंटमध्ये बांधकाम करण्याकरिता परवानगी दिलेली आहे. लॅण्ड डिस्पोजल ॲक्टचे विकासकाने उल्लंघन केलेले आहे. याबाबत कमिटी लवकर बरखास्त करुन एसीबीमार्फत याची चौकशी करावी. एनओसी रद्द करुन प्रकल्पावर स्थगितीची कारवाई करण्यात यावी.

श्री.रविंद्र वायकर : अध्यक्ष महोदय,ही कमिटी तेथील लोकांनी केलेली आहे. निबंधकाच्या माध्यमातून त्यांना योग्य तो न्याय दिला असेलही परंतु त्यांनी कॉमन करारनामा केलेला आहे. कॉमन करारनामा करुन चालत नसतो. सोसायटीतील प्रत्येक व्यक्तीशी वैयक्तिक करारनामा करणे बंधनकारक आहे. त्या ठिकाणी जेवढी घरकुल असतील त्यांच्यामध्ये जेवढे लोक असतील त्यांच्याबरोबर करारनामा करण्याची गरज आहे. ही कमिटी बरखास्त करता येणार नाही. परंतु संबंधित करारनाम्यांची पाहणी करण्यात येईल.

श्री.अतूल भातखळकर : अध्यक्ष महोदय, या संस्थेने कल्पतरुला विकासक म्हणून नेमत असताना जाहिरात दिलेली नाही. उत्तरामध्ये माननीय मंत्री यांनी सांगितले की, तीन विकासक त्या संस्थेकडे आले, त्यातील एकाची त्यांनी निवड केलेली आहे. मूळ मुद्दा असा आहे की, याकरिता सदरहू संस्थेने जाहिरात दिली होती का ? ....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अतूल भातखळकर....

असल्यास ती कोणत्या वृत्तपत्रात दिली होती ? ही जाहिरात दिली गेलीच नव्हती. त्या संस्थेकडे तीन विकासक आले, त्यातील एकाला त्या सस्थेने निवडलेले आहे. असे करण्याचा अधिकार त्या संस्थेला नाही. नियमानुसार जाहिरात दिल्याशिवाय विकासक नेमता येत नाही. याचा मंत्री महोदयांनी खुलासा करावा. या सर्व प्रकरणामध्ये काहीतरी गोलमाल आहे. माझ्या मतदारसंघामध्ये हाच विकासक काम करीत आहे, त्याने एका प्लॉटचे ॲडव्हान्स पजेशन देऊन टीडीआर घेतला. तसेच, त्याची ओ.सी.घेतली आणि त्या खेळाच्या मैदानाचे पजेशन मात्र आजही त्या विकासकाकडेच आहे. त्यामुळे या सर्व प्रकरणाची चौकशी करण्यात येईल का ?

श्री.रविंद्र वायकर : अध्यक्ष महोदय,दुस-या प्रश्नाच्या बाबत सन्माननीय सदस्यांनी पत्र दिले तर निश्चितपणे चौकशी करण्यात येईल. संस्थेने ज्यावेळी 13.11.2005 रोजी सभा घेतली, त्यामध्ये संस्थेने वर्तमानपत्रात जाहिरात दिली गेली नव्हती. त्यावेळी तशी नियमावली नव्हती. दिनांक 3.1.2009 च्या अनुषंगाने तशी नियमावली तयार केलेली आहे.

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदय चुकीचे उत्तर देत आहेत. 2009 मध्ये अशी नियमावली आली असे काही नाही. पहिल्यापासून शासनाचे सहकारी संस्थेबाबत जाहिरात देण्यासंबंधीचे नियम बंधनकारक आहेत. जाहिरात न देता विकासक नेमू शकत नाही. जाहिरात न देता विकासक नेमू शकतात, हे मी पहिल्यांदा पाहत आहे. यामध्ये पारदर्शकता येणे आवश्यक आहे. एवढया मोठया निर्णयाबाबत वर्तमानपत्रामध्ये जाहिरात देणे बंधनकारक आहे. यामध्ये शासन कोणाला पाठीशी घालत आहे ? हे मला माहिती नाही. मंत्री महोदय ज्या पध्दतीने उत्तर देत आहेत, ते योग्य नाही. यासंबंधी सर्व कागदपत्रे माझ्याकडे आहेत. विनाकारण चुकीचे रेकॉर्डवर आणू नये, अन्यथा आम्हाला आपवल्याविरुध्द हक्कभंग आणावा लागेल. न्यायालयात जनहित याचिकेमार्फत काही कारवाई करावी लागेल. मी सहकारी संस्थेमध्ये गेली 50 वर्ष काम करीत आहे. कोणत्याही संस्थेमध्ये कोणतेही काम करण्यापूर्वी त्याची जाहिरात द्यावी लागते. जाहिरात द्यावी लागत नाही, हा तर आता नवीन शोध लागलेला आहे. असे असेल तर याबाबत आम्हाला उच्च न्यायालयाचे मार्गदर्शन मागावे लागेल. यापूर्वी अशा पध्दतीने जाहिरात देण्याची

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पध्दत होती की नव्हती ? शासनाने एक नवीन शोध लावलेला दिसत आहे. घरात बसून विकासक नेमणे योग्य नाही.

....3



श्री.राधाकृष्ण विखे-पाटील....

जाहिरात काढायला अडचण काय आहे ? जाहिरात न देता परस्पर बंगल्यातील माणसे विकासक म्हणून नेमायचे, हे योग्य नाही. हे बगलबच्चे खिशात घालून तुम्ही मुंबईचे वाटोळे केलेले आहे. याची उच्चस्तरीय चौकशी होणे आवश्यक आहे. याची चौकशी एसआयटी नेमून करा. शासन चौकशीला का घाबरत आहे ?

श्री.रविंद्र वायकर : अध्यक्ष महोदय, त्यावेळी शासनाच्या माध्यमातून जाहिरात दिली पाहिजे अशी नियमावली नव्हती. दिनांक 3 जानेवारीला अशा पध्दतीने नियमावली आली आणि त्या अनुषंगाने शासनाने नियमावली केली. संपूर्ण निविदा अंतिम करण्यासाठी विशेष सर्वसाधारण सभा बोलाविली पाहिजे. त्यामध्ये कळले की, याबाबत जाहिरात दिली नव्हती.

श्री.प्रकाश महेता : अध्यक्ष महोदय,या मुंबई शहरामध्ये म्हाडाचा 56 वसाहती आहेत. इतर म्हाडाच्या छोटया मोठया वसाहतीमधील सोसायटयांना म्हाडाने अधिकार दिलेला आहे. 70 टक्क्यांच्या वर रहिवाशांनी एकत्रितपणे विकासक नेमण्याबाबत त्यांना म्हाडाने अधिकार दिलेला आहे. परंतु त्याच्यामध्ये वर्तमानपत्रात जाहिरात देणे अशा प्रकारची कोणतीही अट` म्हाडाच्या किंवा शासनाच्या वतीने त्यामध्ये नव्हती. हे सर्व प्रकरण 2006-2013 च्या दरम्यान झालेले आहे. या संबंधी विधानपरिषदेमध्ये देखील चर्चा झाली होती. माननीय सभापतींनी याबाबत एक विशेष बैठक घेतली होती. सर्व अधिका-यांच्या समवेत ही बैठक जवळ जवळ 2 तास चालली. त्यानंतर या संपूर्ण प्रकरणामध्ये कुठेही शासनाच्या नितीनियमाच्या विरोधात काहीतरी संगनमत होऊन काहीतरी घोटाळे झाले असे कोणतेही प्रकरण आढळून आलेले नाही. तरीही आज सभागृहामध्ये माननीय विरोधी पक्ष नेते व अन्य सदस्यांनी जे काही मुद्दे मांडलेले आहेत, ते तपासून घेऊन आवश्यकता वाटली तर त्यासंबंधी उचित कारवाई करण्यात येईल.

......4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.**: द्रोणागिरी नोड परिसरात समुद्राच्या भरतीचे पाणी रोखण्यासाठी शासनाने प्रयत्न करणे व तिवरांची झाडे तोडण्याची परवानगी देणेबाबत

**मु.शी.**: द्रोणागिरी नोड परिसरात समुद्राच्या भरतीचे पाणी रोखण्यासाठी शासनाने प्रयत्न करणे व तिवरांची झाडे तोडण्याची परवानगी देणेबाबत यासंबंधी श्री.मनोहर भोईर,वि.स.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.मनोहर भोईर ( उरण ) : अध्यक्ष महोदय, मी नियम 105 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

*"**द्रोणागिरी***  नोड (ता.उरण, जि.रायगड) परिसरात सिडकोने तयार केलेल्या होल्डिंग पाँड मध्ये समुद्राच्या भरतीचे पाणी मोठ्या प्रमाणात येत असल्यामुळे तसेच होल्डिंग पाँडमधील गाळ न काढल्याने आजूबाजूच्या परिसरातील नवघर, भेंडकळ, पागोटे, नविन शेवा, कुंडेगाव, फुंडे इ. गावांमध्ये भरतीचे खारेपाणी घरांच्या जोत्यापर्यंत जात असल्याने जमिनीचे व घरांचे होत असलेले नुकसान, आजूबाजूच्या परिसरामध्ये साठलेल्या समुद्राच्या खाऱ्या पाण्यामुळे तिवरांच्या झाडांची तिथे वाढ होणे, शासनाच्या धोरणामुळे ग्रामस्थांना गावठाणामध्ये तिवरांची झाडे तोडून घरे बांधण्यास व शेतजमिनीमध्ये शेती करण्यास अडचणी येत असून याकडे सिडको प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्यामुळे ग्रामस्थांमध्ये पसरलेला असंतोष, परिणामी शासनाने ग्रामस्थांच्या जागेत तसेच गावठाणामध्ये निर्माण झालेली तिवरांची झाडे तोडण्याची परवानगी देण्यासाठी व समुद्राच्या भरतीचे पाणी रोखण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया."

डॉ.रणजित पाटील ( नगरविकास राज्यमंत्री ) : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**अध्यक्ष** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

-------------- ...5

13-04-2016 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) T-5

JN/ AKN/ MMP/ 13:20

श्री.मनोहर भोईर : कोकणातील रायगड, ठाणे जिल्हयामध्ये मी 1975 पासून काम करीत आहे. ठाणे जिल्हयापासून ऐरोली वाशी नेरूळ खारघर पनवेल उलवा आणि उरण विधानसभा मतदारसंघातील द्रोणागिरी नोडमध्ये विकास करण्याचे काम सिडको प्रशासनाने चालू केलेले आहे. या ठिकाणी मी आपल्या माध्यमातून लक्ष वेधू इच्छितो की, सिडकोने सन 2000 मध्ये होल्डिंग पॉण्डचे बांधकाम केले. 15-16 वर्ष या होल्डिंग पॉण्डकडे दुर्लक्ष झाले. या होल्डिंग पॉण्डचे बांधकाम खोल केले गेले होते. जेवढे खोल हे बांधकाम आहे, त्याच्या 75 टक्के होल्डिंग पॉण्डमध्ये गाळ साचला गेलेला आहे. समुद्राच्या भरतीचे पाणी होल्डिंग पॉण्डमध्ये न राहता आजुबाजूच्या गावामध्ये खेडयामध्ये घुसत आहे. उरण तालुक्यामध्ये पूर्वजात असणारे खेडे आणि अनेक गावे आहेत, मी माझ्या या लक्षवेधी सूचनेमध्ये त्यासंदर्भात माहिती दिलेली आहे.

यू-1/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. मनोहर भोईर........

माझ्या मतदारसंघात नवघर, भेंडकळ, पागोटे, नवीन शेवा अशी अनेक गावे आहेत. अशा गावांमध्ये सिडकोने होल्डिंग पॉंड बांधलेले असून, त्यामधील गाळ न काढल्यामुळे त्या ठिकाणी पाणी साचलेले आहे. तसेच काही ठिकाणच्या खड्डयांमध्ये पाणी साचल्यामुळे गावाच्या 10 फुट लांब असलेल्या गावठणांमध्ये कांदळवणाची झाडे आलेली आहे. परिणामी त्या ठिकाणच्या शेतकऱ्यांच्या शेतजमिनी नापिकी झालेल्या आहेत. जर एखाद्या शेतकऱ्याला गावठाणामध्ये घर बांधावयाचे असेल आणि त्या ठिकाणी कांदळवणाची झाडे असतील तर संबंधित अधिकाऱ्यांमार्फत गुन्हे नोंदविले जात आहेत. सिडकोने सन 2000 मध्ये होल्डिंग पॉंड बांधलेला आहे. सदर होल्डिंग पॉंड बांधताना सिडकोचे दुर्लक्ष झाल्यामुळे त्या ठिकाणी अनेक कांदळवणाची झाडे आलेली आहेत. त्या ठिकाणी पाणी न थांबता पुढील भागात थांबल्यामुळे शेतकऱ्यांच्या जमिनीवर अनेक कांदळवणाची झाडे आलेली आहेत. अशी कांदळवणाची झाडे तोडण्यासाठी शासनाकडून परवानगी दिली जाणार आहे काय ?

अध्यक्ष महोदय, सिडको शासनाच्यामार्फत होल्डिंग पॉंडमधील गाळ काढण्याची कार्यवाही करणार आहे काय ?

डॉ. रणजित पाटील : अध्यक्ष महोदय, द्रोणागिरी आणि लगतच्या खेड्यांमध्ये 5 होल्डिंग पॉंड आहेत. नवी मुंबईसाठी अक्विजिशनचे काम झाले तेव्हा सी लेव्हलपेक्षा खाली असल्यामुळे त्या ठिकाणी बांध होते. अक्विजिशननंतर 6 नवीन होल्डिंग पॉंड तयार करण्यात आले होते. सन 2005 मध्ये कांदळवणाची झाडे तोडता येणार नाही असा एक कायदा आला होता. त्यामुळे सिडकोने नोटीस ऑफ मोशनद्वारे ज्या ठिकाणी होल्डिंग पॉंड आहेत त्या ठिकाणी तत्काळ परवानगी मिळावी, अशी मागणी केली होती. अशा परवानगी पनवेल आणि कळंबोलीला मिळाली होती. परंतु, त्यावेळी द्रोणागिरी आणि लगतच्या खेड्यांमध्ये तशा प्रकारची परवानगी मिळाली नव्हती. कारण त्यावेळी एनजीओंनी कोर्टात धाव घेऊन सध्या हा परिसर डेव्हलपमेंटमध्ये नाही, अशी बाजू मांडली होती. त्यामुळे ते राहिले होते. भविष्यात असा प्रश्न निर्माण होईल म्हणून सिडकोने पुन्हा नोटीस ऑफ मोशनद्वारे द्रोणागिरी आणि लगतच्या खेड्यांमध्ये तशा प्रकारची परवानगी मिळावी अशी मागणी

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. रणजित पाटील.....

केली होती. यासंदर्भात माननीय उच्च न्यायालयाने पॉझिटीव्ह भूमिका घेतली होती. माननीय उच्च न्यायालयाने सर्व होल्डिंग पाँड सीआरझेडमध्ये येतात किंवा कसे याबाबत विचारणा केली होती. म्हणू MCZMA याच्याकडे ॲथोरिटी असल्यामुळे शहानिशा करुन तसा अहवाल मागितला होता. एनजीओ, सीआरझेड, MCZMA मधील संबंधित अधिकाऱ्यांनी नियोजित जागेची पाहणी केली होती. त्यानंतर त्यासंदर्भातील अहवाल केंद्र शासनाचे पर्यावरण व वन विभागास सादर केलेला होता. त्यांनी सीआरझेडमध्ये होल्डिंग पाँड येतात किंवा कसे याबाबत माहिती देत असताना त्यांनी एक आणि तीन पार्टली येतात आणि उर्वरित 6 पैकी 4 येत नाही असे सांगितले होते. MCZMA आज अस्तित्वात असणाऱ्या कांदळवण झाडांच्या 5 पट सिडकोने वनीकरण आणि व्यवस्थापन करण्याबाबत आणि त्यासंदर्भातील अहवाल देण्याबाबत सूचना केली होती. त्यानंतर पुन्हा सिडकोने नोटीस ऑफ मोशन पाठविले होते. त्यानंतर माननीय उच्च न्यायालयाने केंद्र शासनाला दिनांक 10-2-2016 रोजी 4 आठवड्यात निर्णय घेण्याबाबत डायरेक्शन दिल्या आहेत. त्यानंतर पुन्हा दिनांक 29-2-2016 रोजी NCZMA यांनी एनजीपीला म्हणजे एनजीओला आणि शासनाची बाजू ऐकूल्यानंतर त्यामध्ये 80 टक्के चोकिंग होत आहे आणि 4 होल्डिंग पाँड सीआरझेडमध्ये येत नाही, असे सांगितले होते. येत्या 15 दिवसांमध्ये NCZMA देखील पॉझिटिव्ह भूमिका घेईल अशी अपेक्षा आहे. त्यानंतर सिडकोला इनडिपेंडेट असेसमेंट सिडकोने करावे असे NCZMA ने सांगितलेले आहे. तसेच शासनसुध्दा इनडिपेंडेट असेसमेंट करुन देईल. तसेच जो भाग सीआरझेडमध्ये येत नाही, त्याला अट कशी लागू असणार ? MCZMA आज अस्तित्वात असणाऱ्या कांदळवण झाडांच्या 5 पट सिडकोने वनीकरण आणि व्यवस्थापन करण्याबाबत येत्या 15 दिवसाच्या आत कार्यवाही केली जाणार आहे.

श्री. मनोहर भोईर : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी सीआरझेडमध्ये होल्डिंग पाँड आहे असे उत्तर दिलेले आहे. शेतकऱ्यांच्या जमिनीमध्ये कांदळवणाची झाडे झालेली आलेली आहेत. यामध्ये शेतकऱ्यांना 5 पट जमीन देण्याचे धोरण आहे. परंतु, शासनाच्या आणि सिडकोच्या चुकीच्या नियोजनामुळे शेतकऱ्यांच्या जमिनीमध्ये कांदळवणाची झाडे आलेली आहेत. शेतकऱ्यांच्या जमिनीवरील कांदळवणाची झाडे काढण्यासाठी परवानगी दिली जाईल काय ?

........3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. मनोहर भोईर......

अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी त्या ठिकाणी पूरपरिस्थिती निर्माण झाल्याचे मान्य केलेले आहे. गेल्यावर्षी चेन्नई राज्यात खूप मोठा महापूर आलेला होता. उरण तालुक्यातील भाग खोलगट आहे. उरण तालुका समुद्रकिनाऱ्यापासून खूप जवळ आहे. चैन्नईला जसा महापूर आला तशाच प्रकारे उरणमध्ये यावा अशी शासनाची मानसिकता आहे काय ? समुद्राच्या भरतीचे पाणी उरणमध्ये येत असल्यामुळे ते रोखण्यासाठी शासनाकडून कोणत्या उपाययोजना केल्या जाणार आहेत असा माझा प्रश्न आहे.

डॉ. रणजित पाटील : अध्यक्ष महोदय, ही गोष्ट खरी आहे आणि माझ्या भागात देखील तशाच प्रकारचे चित्र आहे. उरणमधील गावांमध्ये भरतीच्या वेळेस आणि इतर वेळी देखील पाणी येत आहे. MCZMA ने यासंदर्भात सहानुभूतिची भूमिका घेतलेली आहे. सद्य:स्थितीत हे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहें. त्यामुळे शासनाची देखील सहानुभूतिची आणि सकारात्मक भूमिका आहे. तेथील होल्डिंग पॉंड सीआरझेडमध्ये येतच नाही. त्यांना ही अटच लागू होत नाही. अशी भूमिका शासनाने MCZMA समोर मांडलेली असून, ती अंतिम टप्प्यात आहे. MCZMAला शासनाने विचारले आहे. अहवाल त्वरित पाठविण्यात येईल. यामध्ये जे पार्टली येतात आणि जे येत नाही त्यांना तर लागू होणार नाही. केंद्र शासनाने त्या ठिकाणी फ्लड सिच्युएशनसारखी अवस्था आहे काय अशी विचारणा राज्य शासनाकडे केलेली आहे. तशा प्रकारची परिस्थिती आहे आणि माझ्याकडे त्यासंदर्भातील फोटोसुध्दा आहेत. यानुसार शासनाने MCZMAला माहिती दिलेली आहे.

**तालिका सभाध्यक्ष ( श्री. योगेश सागर )** : सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे, तो प्रश्न मंत्री महोदयांनी समजून घेतलेला नाही. सिडकोने जमीन अधिगृहीत करण्यापूर्वी संबंधित शेतकरी बांध टाकून समुद्राचे पाणी शेतात येणार नाही, अशी काळजी घेत होते. सिडकोन जमीन अधिगृहीत केल्यानंतर बांध घातल्यामुळे शेतकऱ्यांना काम करण्यास अडचण निर्माण झाली. ते बांध तुटल्यामुळे कांदळवणाच्या झाडांचे बीज पसरल्यामुळे अनेक कांदळवणाची झ ाडे त्या ठिकाणी आलेली आहे. यासंदर्भात सन 2008 मध्ये सिडकोन माननीय न्यायालयात अपील केले होते. या गोष्टीस 7 ते 8 वर्षाचा कालावधी होऊन गेलेला आहे.म्हणजे 8

......4....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभाध्यक्ष ( श्री. योगेश सागर )......**

वर्षात आणखी किती जमीन कांदळवणाच्या झाडांनी व्यापलेली असणार त्याचा कोणताही अंदाज नाही. नॅशलन कॉस्ट मॅनेजमेंट कमिटीने 10-3-2002 मध्ये ऑर्डर दिलेली आहे. कोर्टाच्या निर्देशानुसार एक महिन्याचा कालावधी उलटून गेलेला आहे. त्यामुळे आता शासनाची जबाबदारी आहे. शासनाने यामध्ये लक्ष घालून शेतकऱ्यांची जमीन संरक्षित केली पाहिजे. सिडकोच्या माध्यमातून शेतकरी 5 पट जमिनी देणार असतील तर त्यांना परवडणार नाही. शासनाने एक महिन्याच्या आत आपले म्हणणे कोर्टासमोर सादर करून निकाल लावला पाहिजे अशी माझी मंत्री महोदयांना सूचना आहे.

डॉ. रणजित पाटील : अध्यक्ष महोदय, होय

**तालिका सभाध्यक्ष** : ठीक आहे. आता पुढील लक्षवेधी सूचना चर्चेला घेण्यात येईल.

-----

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

........5.....

श्री. शशिकांत शिंदे : अध्यक्ष महोदय, मी पॉईंट ऑफ प्रोसिजरवर आहे. मी आज कार्यक्रमपत्रिकेवर दर्शविण्यात आलेल्या लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून माननीय पीठासीन अधिकाऱ्यांचे लक्ष वेधणार आहे. आजच्या कार्यक्रमपत्रिकेवर एकूण 13 लक्षवेधी सूचना दर्शविलेल्या आहेत. काही लक्षवेधी सूचना या दोन ते तीन वर्षापूवीच्या असून, त्या आता चर्चेला येत आहेत.

V-1......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पाईंट ऑफ प्रोसिजरबाबत**

श्री. शशिकांत शिंदे. : अध्यक्ष महाराज, मी लक्षवेधी सूचनांसंदर्भात आपले लक्ष वेधू इच्छितो. आज सभागृहाच्या कामकाजपत्रिकेवर जवळपास 13 लक्षवेधी सूचना दाखविण्यात आलेल्या आहेत. मागील आठवड्यात सभागृहाच्या कामकाजपत्रिकेवर काही लक्षवेधी सूचना दाखविण्यात आल्या होत्या. त्यातील काही लक्षवेधी सूचना या दोन, तीन वर्षापूर्वीच्या होत्या. लक्षवेधी सूचना स्वीकारण्यासंबंधी पुढीलप्रमाणे नियम आहे. "सदस्यास माननीय अध्यक्षांची आगाऊ परवानगी घेऊन निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या कोणत्याही बाबीकडे मंत्र्याचे लक्ष वेधता येईल, त्यावर माननीय मंत्र्यांना संक्षिप्त निवेदन करता येईल किंवा नंतरच्या तासात किंवा नंतरच्या दिनांकास निवेदन करण्यासाठी वेळ मागवून घेण्यात येईल." सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा होत असेल तर हरकत नाही. परंतु तो विषय तेवढा गांभीर्याचा असायला हवा. मी सर्वच लक्षवेधी सूचनांवर हरकत घेत नाही. तो माननीय आमदारांचा अधिकार आहे. परंतु अशा लक्षवेधी सूचना स्वीकारल्या जातात की त्यातील आत्मा निघून जातो, असे मला दुर्दैवाने सांगावेसे वाटते. मी लक्षवेधी सूचना स्वीकारण्याच्या बाबतीत कोठलाही विरोध करीत नाही. खरोखर लक्षवेधी सूचना स्वीकारणे गरजेचे आहे का, अशी शंका मनामध्ये उपस्थित होते. विधिमंडळाच्या या सार्वभौम कामकाजावर शंका उपस्थित होऊ शकते, याचा शासनाने तसेच विधिमंडळाचे प्रमुख म्हणून आपण विचार करावा, एवढीच माझी सूचना आहे..

**तालिका सभाध्यक्ष :** मी सन्माननीय सदस्यांच्या मताशी सहमत आहे.

...2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ. शी.** :राज्यात विशेषतः पनवेल (ता.पनवेल, जि.रायगड) परिसरातील अनेक विकासकांकडून वृत्तपत्रातून सदनिका विकण्याच्या बनावट जाहिराती देऊन नागरिकांची होत असलेली फसवणूक.

**मु. शी.** :राज्यात विशेषतः पनवेल (ता.पनवेल, जि.रायगड) परिसरातील अनेक विकासकांकडून वृत्तपत्रातून सदनिका विकण्याच्या बनावट जाहिराती देऊन नागरिकांची होत असलेली फसवणूक या संबंधी सर्वश्री प्रशांत ठाकूर, समीर कुणावार, विजय काळे, ॲड.आशिष शेलार, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. प्रशांत ठाकूर (पनवेल) : अध्यक्ष महोदय, मी नियम 105 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृह राज्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

डॉ.रणजित पाटील (गृह (शहरे) राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभाध्यक्ष** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

--------------

....3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रशांत ठाकूर : अध्यक्ष महाराज, या लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात असे म्हटलेले आहे की, "फसव्या जाहिराती देऊन नागरिकांची मोठ्या प्रमाणात फसवणूक केल्याच्या अनुषंगाने नवी मुंबई पोलीस आयुक्तालयात 15 गुन्हे दाखल झालेले आहेत." याच विषयासंदर्भात दिनांक 23/12/2014 रोजी एक अतारांकित प्रश्न विचारण्यात आला होता. या प्रश्नाला उत्तर देत असताना मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले होते की, विकासक वेगवेगळ्या पध्दतीने वर्तमानपत्रात जाहिराती देऊन लोकांची फसवणूक करतात. यासंदर्भात विकासकांवर गुन्हे दाखल होतात आणि त्यांना जामीन मिळून ते सुटतात. परंतु ज्यांनी आपल्या घरासाठी पै पै जमा करुन या विकासकांना पैसे दिलेले असतात त्यांची मात्र फवसणूक केली जाते. माझ्या मतदारसंघातील अनेक तक्रारी माझ्याकडे आलेल्या आहेत. त्यांची संख्या जवळपास 1000 च्या वर आहे. लोक आपल्या कमाईचा पै अन पै गोळा करुन आपल्या घरासाठी विकासकांकडे पैसे देतात, परंतु त्यांचे पैसे मात्र त्यांना परत मिळत नाहीत आणि घरही मिळत नाही. मुख्यमंत्री महोदयांनी लक्षवेधी सूचनेच्या निवेदनामध्ये म्हटलेले आहे की, एमपीआयडी ॲक्टमध्ये असे गुन्हे अंतर्भूत करुन त्यांची संपत्ती जप्त करुन या लोकांचे पैसे परत देता येतील. अशा प्रकारची दुरुस्ती एक महिन्याच्या आत करता येईल असे दिनांक 23/12/2014 रोजी सांगण्यात आले होते. एमपीआयडी ॲक्टमध्ये अशा प्रकारची दुरुस्ती करुन या आलेल्या तक्रारींसाठी हा कायदा लागू करणार आहात काय ? पैसे घेऊन फसवणुक झाल्याच्या अनेक तक्रारी आहेत, परंतु काहींनी तक्रार केली आहे तर काहींनी तक्रारी केलेल्या नाहीत. गुन्हे दाखल करण्याचे प्रमाण फार कमी आहे. लोकांमध्ये भीती आहे की, गुन्हे दाखल झाले तर आपले जे काही पन्नास हजार रुपये, लाख रुपये मिळणार आहेत तेही परत मिळणार नाहीत. अशा गुन्ह्यांचा तपास करण्यासाठी माननीय मुख्यमंत्री टास्क फोर्स नेमणार आहेत, असेही त्यावेळच्या उत्तरामध्ये नमूद केले होते. अशा गुन्ह्यांचा तपास करण्यासाठी टास्क फोर्स स्थापन करुन यामधील गुन्हेगारांचा तपास करुन शासन त्यांना शिक्षा करणार आहे काय?

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.रणजित पाटील : अध्यक्ष महाराज, वर्तमानपत्रांमध्ये आलेल्या जाहिरातींना बळी पडून मध्यमवर्गीय तसेच गरीब लोक घर घेण्यासाठी आपल्या आयुष्यभरांची पुंजी या विकासकांकडे देतात. मी एमपीआयडी ॲक्ट वाचला आहे. असा प्रकार जेव्हा चालतो तेव्हा पेपरमधून ज्या

..4



डॉ.रणजित पाटील...

जाहिराती येतात, त्या पेपरवर सुध्दा एमपीआयडी ॲम्बीटमध्ये सुधारणा करण्यासंदर्भात डिसेंबर,2014 मध्ये मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले होते. प्रो ॲक्टीव्हली अशा जाहिराती येतात तेव्हा स्थानिक पोलीस स्टेशनला त्यांच्यावर ॲक्शन घेण्यासाठी या कायद्यात मुभा दिलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी जे प्रकरण सांगितले आहे त्यासंबंधी एमपीआयडी ॲम्बीटमध्ये यांना आणण्यासाठी जरुर विचार कला जाईल. एकदा गुन्हा दाखल झाल्यानंतर टास्क फोर्स नेमून गुन्ह्याचा तपास जलद गतीने होण्यासाठी तसेच गरीब लोकांची गुंतवणुक परत मिळण्यासाठी या एमपीआयडी ॲक्टमध्ये प्रॉपर्टी अटॅच्ड करायची तरतूद आहे. ती प्रॉपर्टी लिक्विडेट करुन कॉम्पीटन्ट ॲथॉरिटीद्वारे लिलाव करुन ते पैसे संबंधिताना परत मिळाले पाहिजे यासाठी प्रयत्न केला जातो. आपल्या राज्यात एमपीआयडी ॲक्टमध्ये गेल्या दोन वर्षापूर्वी सुधारणा करुन तो लागू केलेला आहे. मला सांगताना आनंद होतो की, गेल्या पंधरा दिवसामध्ये मंबई येथेच जवळपास 125 केसेसला नोटिफिकेशन करुन दिलेले आहे. याही केसला एमपीआयडी ॲम्बीटमध्ये आणून त्यांच्यावर एमपीआयडीचा कोठला सेक्शन लावता येईल काय, याचा विचार केला जाईल. सध्या मोफा लावलेला आहे.

श्री.समीर कुणावार : अध्यक्ष महाराज, सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे पनवेल भागात 16 गुन्हे दाखल झालेले आहेत. अनजूही बरेच गुन्हे बाहेर येऊ शकतात. काही लोक तक्रारी करण्यासाठी घाबरतात तर काही लोक वाट बघत असतात. यासंदर्भात शासनाने वर्तमानपत्रामध्ये जाहिरात दिली पाहिजे की, ज्या लोकांची अशाप्रकारे फसवणूक झालेली आहे त्यांना पोलीस स्टेशनला बोलाविणार काय? अशा स्वरुपाचे गुन्हे होऊ नयेत म्हणून शासन कडक कायदा करणार आहे काय?

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.रणजित पाटील : अध्यक्ष महाराज, यावर्षी प्रिव्हेन्टीव्ह मेजर्स म्हणून अज्ञान नागरिकांची किंवा गरजेपोटी, निकड म्हणून त्यांची फसणवूक होऊ नये म्हणून दिनांक 23/7/2015 रोजी शासनाने एक कोटी रुपये जाहिरातीसाठी दिलेले आहेत. 40 लाख रुपये सह पोलीस आयुक्त, मुंबई व मुंबई उपनगरांसाठी दिलेले आहेत आणि पोलीस महासंचालक कार्यालयासाठी 60 लाख रुपये वर्ग केलेले आहेत. जेणेकरुन लोकांमध्ये जनजागृती झाली पाहिजे आणि सर्वसामान्यांपर्यंत

....5



डॉ.रणजित पाटील...

हा संदेश गेला पाहिजे. अशा जाहिरातींमध्ये गुंतवणुक करु नये अशी प्रोव्हीजन शासनाने केली आहे.

श्री.राजेंद्र पाटणी : अध्यक्ष महाराज, अशा प्रकारचे गुन्हे मोठ्या प्रमाणावर होत आहेत, हे आपण पाहतो. अनधिकृत बांधकाम असू द्या किंवा अशा प्रकारची अवैध जाहिरात देऊन लोकांची केलेली फसवणूक असू द्या. अशा प्रकारे लोकांना लुटण्याचे प्रकार थांबवायचे असतील तर एफआयआर नोंदवून काहीही उपयोग होत नाही. यासाठी विशेष ट्रायब्युनेल नेमून असे गुन्हे तातडीने मार्गी लावण्यासाठी शासन काही विशेष उपाययोजना करणार आहे काय ? अन्यथा पोलीस आणि पोलिसांचे सर्व मॅनेज असते. एफआयआर नोंदविल्यानंतर सकाळी त्याला अटक दाखविले जाते आणि सकाळीच 11.30 वाजता त्याची जामिनावर सुटका होते. त्यानंतर दहा ते पंधरा वर्षे या केसचा काहीही निकाल लागत नाही. अशी प्रकरणे लवकर मार्गी लावण्यासाठी शासन विशेष ट्रॅायब्युनेल नेमणार आहे काय?

डॉ.रणजित पाटील : अध्यक्ष महाराज, या सर्व प्रकरणांसाठी मोफा कायदा आहे. ज्याच्यामध्ये असे प्रावधान आहे की, कॉग्नीजीबल ऑफेन्स आहे. तीन वर्षाच्या वरती इन्प्रेझेंटमेन्टची प्रोव्हिजन आहे. असे काही असेल तर मोफा कायद्यान्वये वारंटशिवाय अटक करता येते, हा सर्व प्रकार एमपीआयडी ॲम्बीटमध्ये आणला तर यामध्ये गुंतवणुकदारांचे पैसे वापस देण्याची तरतूद आहे. एमपीआयडी ॲक्टमध्ये हे सर्व विकासक ज्यांनी पॉन्जी स्कीम करुन अस्तित्वात नसलेले फ्लॅट विकले असतील तर त्यांना आपण एमपीआयडी ॲक्टमध्ये आणण्याचा प्रयत्न करु.

श्री.प्रशांत ठाकूर : अध्यक्ष महाराज, माझ्या प्रश्नाचे उत्तर आलेले नाही. .....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.रणजित पाटील : अध्यक्ष महाराज, राज्यभरातील अशा स्वरुपाच्या जेवढ्या केसेस असतील त्यासंदर्भात येत्या पंधरा दिवसात विधीमत घेऊन एमपीआयडी ॲक्टमध्ये आणू.

यानंतर W-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड. आशिष शेलार : मंत्री महोदयांनी सदर प्रकरणात एमपीआयडीच्या ॲम्बिटमध्ये सर्व प्रकरणे 15 दिवसांत आणू आणि निर्णय घेऊ असे सांगितलेले आहे, याबद्दल धन्यवाद.

**तालिका सभाध्यक्ष (श्री. योगेश सागर)** : परंतु, अमेंडमेंट केल्याशिवाय तसे करता येत नाही.

ॲड. आशिष शेलार : अध्यक्ष महोदय, मुद्दा तोच आहे. सदर प्रकरणात मंत्री महोदयांनी सकारात्मक उत्तर दिलेले आहे. हा विषय खूप गंभीर आहे. लोक रोज फसली जात आहेत. बनावट डॉक्युमेंट घेऊन लोकांनी प्लान अप्रुव्ह केले नाहीत, शासनाची मंजुरी नाही, प्लानमध्ये अमेंडमेंट नाही, करारनामे बोगस झाले. माझ्या मतदारसंघातील दोन लोकांचे पैसे परत घेण्याबाबत मी सन्माननीय सदस्य श्री. प्रशांत ठाकूर यांच्याकडे शिफारस केली की, जरा सांगा, अशी अवस्था आहे. आपल्याला आठवत असेल की, सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांच्या तारांकित प्रश्नावर उत्तर देताना मुख्यमंत्री महोदय असे म्हणाले की, या सर्व प्रकरणात महाराष्ट्र ऑर्गनाईज क्राईम ॲक्ट मोका लावला पाहिजे. हा ऑर्गनाईज क्राईम आहे. यामध्ये कलेक्टर ऑफिसचे लोक, प्लान अप्रुव्ह नसताना अप्रुव्ह करणारे अधिकारी, जाहीरात देताना वेगवेगळ्या भूलथापा देणारे बिल्डर, त्यांचे एजंट हे सर्व ऑर्गनाईजरित्या काम करतात. एमपीआयडी मध्ये पैसे परत मिळतात बरोबर आहे. परंतु, मोकामध्ये अटक झालेला आरोपी लवकर सुटू शकत नाही. एकदा मोका लागला तर त्याला तडीपार करण्याचीही प्रोव्हिजन आहे. त्यामुळे मोकाचा सुध्दा विचार करणार काय ?

डॉ. रणजित पाटील : अध्यक्ष महोदय, याबाबतीत मुख्यमंत्री महोदयांनी मागच्या वेळेस असे सांगितले असेल तर, निश्चितपणे त्याच्या अंमलबजावणीसाठी मग जे काही असेल मोका, मोफा यामध्ये लावलेला आहे असे मी आधीच सांगितलेले आहे. या लोकांना मोकाच्या ॲम्बिटमध्ये आणता येईल काय, याचाही विचार केला जाईल.

**तालिका सभाध्यक्ष** : अध्यादेश काढणार काय असे विचारावे. सरकारला एमपीआयडी ॲक्टमध्ये अमेंडमेंट करण्यासाठी अध्यादेश काढावा लागेल.

श्री. दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी या लक्षवेधी सूचनेवरील प्रश्नांचे उत्तर देताना सन्माननीय सदस्यांनी आग्रहाची मागणी केली की, यासंबंधी बिल्डरना

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. दिलीप वळसे-पाटील ....

एमपीआयडी कायदा लागू करणार काय ? मंत्री महोदयांनी आधीच्या प्रश्नाचे उत्तर देताना एमपीआयडी कायद्यामध्ये हा विषय समाविष्ट करण्याच्या बाबतीत साशंकता व्यक्त केलेली होती. चर्चेअंती आपण आग्रह धरून हा विषय एमपीआयडीखाली 15 दिवसांत घेऊ असे सांगितले आहे. परंतु, आज जर कायद्यात तशी तरतूद नसेल तर आपल्याला कायद्यात दुरूस्ती करावी लागेल. ती दुरूस्ती जेव्हा होईल तेव्हा होईल. मग एमपीआयडी लावायचा की मोका लावायचा की काय लावायचे. परंतु, या सर्व केसेस आर्थिक गैरव्यवहाराच्या असतील किंवा जाणूनबुजून फसवणुकीच्या असतील तर आपण ही सर्व प्रकरणे आर्थिक गुन्हे विभागाकडे देणार काय ?

डॉ. रणजित पाटील : अध्यक्ष महोदय, आर्थिक गुन्हे विभागाकडे प्रकरणे देण्याचा एक निकष आहे. त्याप्रमाणे ठरावीक अमाऊंटच्यावर म्हणजे साधारणत: 25 लाख रूपयांच्या वरील प्रकरण असेल तर आपण ते इओडब्ल्यूकडे पाठवितो. परंतु, छोट्या छोट्या इन्व्हेस्टर्सच्या वैयक्तिक तक्रारी असतात. तरीही व्यापक स्वरूपात असेल. आता सन्माननीय सदस्य सांगत आहे की, हे मोठ्या प्रमाणात आहे. निश्चितपणे या पनवेलच्या केसमध्ये आपण इओडब्ल्यूच्या मार्फतसुध्दा त्यांच्यावर केसेस करू

.............



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** ***मौजे हट्टा*** (ता.वसमत, ***जि.हिंगोली) येथील बस*** स्थानकाजवळ ***असलेल्या फॅब्रिकेटरच्या दुकानात झालेल्या स्फोटात चार व्यक्तींचा*** झालेला ***मृत्यू.***

**मु. शी.** ***मौजे हट्टा*** (ता.वसमत, ***जि.हिंगोली) येथील बस*** स्थानकाजवळ ***असलेल्या फॅब्रिकेटरच्या दुकानात झालेल्या स्फोटात चार व्यक्तींचा*** झालेला ***मृत्यू*** यासंबंधी डॉ. जयप्रकाश मुंदडा, डॉ. संजय रायमुलकर, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. जयप्रकाश मुंदडा ( वसमत ) : अध्यक्ष महाराज, मी नियम 105 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

***"मौजे हट्टा*** (ता.वसमत, ***जि.हिंगोली) येथील बस*** स्थानकाजवळ ***असलेल्या फॅब्रिकेटरच्या दुकानात शुक्रवार,*** दिनांक *१८* मार्च, ***२०१६ रोजी सकाळी ९.३० वाजण्याच्या सुमारास*** भीषण ***स्वरूपाचा*** झालेला ***स्फोट, सदर स्फोटात चार व्यक्तींचा*** झालेला ***मृत्यु, एका जखमी व्यक्तीस रुग्णालयात दाखल करणे, सदर भीषण स्फोटाच्या कारणाबाबत चौकशी करण्याची आवश्यकता, तसेच मृतांच्या वारसांना तसेच जखमी व्यक्तीला आर्थिक मदत देण्याची नितांत गरज, शासनाने या संदर्भात करावयाची कार्यवाही*** व ***शासनाची प्रतिक्रिया."***

प्रा. राम शिंदे ( गृह (ग्रामीण) राज्यमंत्री ) : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभाध्यक्ष** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

-----------

...4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. जयप्रकाश मुंदडा : अध्यक्ष महोदय, या लक्षवेधी सूचनेचे उत्तर अर्धवट आहे तरीही मी त्यावर काही बोलणार नाही. माझा प्रश्न एवढाच आहे की, या स्फोटामध्ये जवळजवळ 4 व्यक्ती मृत्यू पावलेल्या आहेत. केरळमधील एका मंदिरात फटाक्यांचा स्फोट झाल्याच्या दुर्घटनेत 105 लोकांचा मृत्यू झाला होता. तेथील सरकारने त्यांच्या कुटुंबीयांना मदतीपोटी प्रत्येकी 10 लाख रुपये देण्याचे जाहीर केले. या घटनेतील मृतांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी 5 लाख रुपये शासन देणार आहे काय, जखमी झालेल्यांनाही आर्थिक मदत करणार आहे काय ?

प्रा. राम शिंदे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. जयप्रकाश मुंदडा यांनी विचारलेल्या प्रश्नाच्या अनुषंगाने मी हे सांगू इच्छितो की, या स्फोटामुळे 4 व्यक्ती मयत झालेल्या आहेत व 1 जण जखमी झालेला आहे. या संदर्भात पोलीस विभागाने ऑलरेडी जिल्हा प्रशासनाला आर्थिक सहाय्य करण्याच्या संदर्भात कळविलेले आहे. सन्माननीय सदस्य सांगत आहेत ते बरोबर आहे की, रफिक भाई फॅब्रिकेटरच्या दुकानात फ्रिज कॉम्प्रेसरला गॅसकटरने वेल्डिंग करीत असताना स्फोट झाला व तपासाच्या अंती जे निष्पन्न झाले त्या अनुषंगाने या संदर्भामध्ये राज्य शासन तातडीने जिल्हाधिकारी प्रशासनाकडून हा प्रस्ताव मागवून घेईल व त्या संदर्भात सहानुभूतीपूर्वक योग्य तो विचार करील.

**तालिका सभाध्यक्ष :** मंत्री महोदयांनी सहानुभूतीपूर्वक विचार करण्याबाबत सांगितलेले आहे.

डॉ. जयप्रकाश मुंदडा : अध्यक्ष महोदय, मी आर्थिक मदतीबाबत विचारलेले आहे. प्रशासनाकडून अहवाल येतच असतो, आपण तो मागवत असतो व ते अहवाल देतील. परंतु, आर्थिक मदत काय करणार ?

प्रा. राम शिंदे : अध्यक्ष महोदय, मी तेच सांगितलेले आहे की, जिल्हा प्रशासनाकडे हा प्रस्ताव पोलीस विभागाने ऑलरेडी पाठविलेला आहे. परंतु, तो राज्यशासनाकडे अद्याप आलेला नाही. मयत झालेल्यांच्या कुटुंबीयांना मुख्यमंत्री सहायता निधीतून मदत करण्याच्या दृष्टिकोनातून सहानुभूतीपूर्वक विचार केला जाईल.

............



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** ***मौजे इन्द्रपै (सासवणे)*** ता.अलिबाग, जि.रायगड ***येथील गट नं.९७ लगत असलेल्या*** शासकीय जमिनीवरील ***कांदळवनाची*** अवैध ***तोड करून अनधिकृत पूलाचे*** केलेले ***बांधकाम,***

**मु. शी.:** ***मौजे इन्द्रपै (सासवणे)*** ता.अलिबाग, जि.रायगड ***येथील गट नं.९७ लगत असलेल्या*** शासकीय जमिनीवरील ***कांदळवनाची*** अवैध ***तोड करून अनधिकृत पूलाचे*** केलेले ***बांधकाम,*** यासंबंधी श्री. सुभाष पाटील, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. सुभाष पाटील ( अलिबाग ) : अध्यक्ष महाराज, मी नियम 105 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

***"मौजे इन्द्रपै (सासवणे)*** ता.अलिबाग, जि.रायगड ***येथील गट नं.९७ लगत असलेल्या*** शासकीय जमिनीवरील ***कांदळवनाची*** अवैध ***तोड करून अनधिकृत पूलाचे*** केलेले ***बांधकाम, याबाबत मांडवा सागरी पोलीस*** स्टेशन ***येथे*** नोंदविण्यात आलेला गुन्हा, सदर पूलाचे बांधकाम केल्यामुळे परिसरातील शेतीमध्ये खाडीचे खारे पाणी शिरुन शेतीचे तसेच वसाहतीमधील ग्रामस्थांच्या मालमत्तेची झालेली हानी, पूलाचे ***अनधिकृत बांधकाम*** सुरू असून सदर बांधकाम तोडण्याबाबत स्थानिक नागरिकांनी जिल्हाधिकारी, ***उपविभागीय अधिकारी*** तसेच ***तहसीलदार यांचेकडे लेखी निवेदन*** देऊनही कोणतीच कार्यवाही न होणे, परिणामी शेतकऱ्यांमध्ये व नागरिकांमध्ये पसरलेला असंतोष, याबाबत शासनाने ***करावयाची कार्यवाही व*** शासनाची प्रतिक्रिया."

डॉ. रणजित पाटील ( नगरविकास राज्यमंत्री ) : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभाध्यक्ष** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

-----------

...6/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. सुभाष पाटील : अध्यक्ष महोदय, मौजे इन्द्रपै आवास सर्व्हे नंबर 97 मध्ये राकेशकुमार वाधवान यांनी कांदळवन तोडून, मॅंग्रोव्हज तोडून त्या ठिकाणी ब्रिज बांधला. या संदर्भात आम्ही सातत्याने कलेक्टर ऑफिस, प्रांत ऑफिस यांच्याकडे तक्रारी केल्या. या लक्षवेधी सूचनेच्या लेखी निवेदनात असे नमूद केले आहे की, दिनांक 4.12.20115 रोजी त्यांच्यावर गुन्हा दाखल झाला. या संदर्भात मी सर्वप्रथम प्रश्न दिला होता, तो स्वीकृत झाला होता परंतु, नंतर तो चर्चेकरिता आला नाही. याकरिता मी या विषयावर लक्षवेधी सूचना उपस्थित केली. संबंधित ग्रामस्थ हा ब्रिज तोडावा याकरिता उपोषणास बसले आहेत. तरीही त्यावर कारवाई झाली नाही. आवास ही मोठी ग्रामपंचायत आहे. मोठमोठे धनिक लोक तेथे राहतात. या ग्रामपंचायतीने 11 एकर सरकारी जमीन विकली आणि त्या मालकांच्या नावाने केली.

माझे 2 स्पेसिफिक प्रश्न आहेत की, मॅंग्रोव्हज तोडणाऱ्या विकासकावर, बंगले बांधणाऱ्या लोकांवर काय कारवाई करणार ? आज रायगड जिल्ह्यात उरणमध्ये मॅंग्रोव्हजला बंदी आहे. लोकांच्या गावात पाणी आले आहे परंतु, हे धनिक लोक मॅंग्रोव्हजची कत्तल करून तेथे स्वतःचे बंगले बांधतात, रस्ते तयार करतात, आम्ही शासनाकडे तक्रारी करतो तरीही त्यावर कारवाई होत नाही. त्याच्यावर मॅंग्रोव्हजच्या ॲक्टखाली कारवाई करणार काय ? त्याच बरोबर आवास ग्रामपंचायतीने सरकारी जमिनीची खुलेआम विक्री केली, सरकारची कोणतीही परवानगी घेतली नाही, या प्रकरणाची चौकशी करणार काय ?

डॉ. रणजित पाटील : अध्यक्ष महोदय, इन्द्रपै सासवणे ग्रामपंचायत गट क्रमांक 97 येथे संबंधित व्यक्ती राकेशकुमार वाधवान यांनी नोव्हेंबर, 2015 मध्ये या प्रायव्हेट प्रॉपर्टीवर जाण्यासाठी तेथे असणाऱ्या खाजण जमिनीवर, नाल्यावर पाईप टाकून एक पूल तयार केला. याबाबतीत सन्माननीय सदस्यांनी सांगितलेली गोष्ट बरोबर आहे. स्थानिक लोकांच्या तक्रारी दिनांक 5.12.2015 रोजी प्राप्त झाल्या. लोकांच्या तक्रारीनंतर जे होईल ते होईल परंतु, या तक्रारी प्राप्त होण्याच्या आधीच स्थानिक तहसीलदारांनी एक नोटीस 16 ऑक्टोबरला इशु केली होती. दिनांक 4.12.2015 रोजी त्यांच्या विरुध्द एफआयआर दाखल झाला. मालक, कंत्राटादार आणि मॅनेजर असे 3 आरोपी यामध्ये आहेत.

...7/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. रणजित पाटील .....

या सोबतच या पुलाच्या निष्कासनाचे कामही पूर्ण झालेले आहे. तो पूल तेथून काढलेला आहे. हे बांधकाम सीआरझेड मधील आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे याबद्दलची तक्रार एमसीझेडएमएलाही केली जाईल. या तक्रारीसोबत, एफआयआर दाखल केल्यासोबत सीआरझेडच्या अनुषंगाने जी काही कलमे लावावी लागतात, ती अनुषंगिक कलमेही लावली जातील.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी सरकारी जमिनीबद्दल स्थानिक लोकांनी, ग्रामपंचायतीने किंवा तेथील लोकांनी जे केलेले आहे त्याबाबतचा प्रश्न विचारलेला आहे. मात्र हा प्रश्न या विभागाशी संबंधित नसून हे काम महसूल विभागाकडे जाते. सन्माननीय सदस्यांनी त्या विभागाकडे हा प्रश्न विचारल्यास त्यांचे समाधान होऊ शकते.

X-1/...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. सुभाष पाटील : अध्यक्ष महोदय, ही लक्षवेधी सूचना महसूल विभागासंदर्भात आहे. असे असताना आपण या खात्याकडे का दिली. आम्हाला उत्तर देण्याची आपली जबाबदारी आहे. शासनाच्या जमिनीची खुलेआम विक्री केली जात असेल आणि त्याविरोधात तक्रार करुनही कारवाई होत नसेल तर आम्ही कुठल्या मार्गाने न्याय मागायचा. सभागृहामध्ये लक्षवेधी येण्यास 15 दिवस लागले. संबंधित मंत्री महोदयांनी उत्तर देताना माझे समाधान करायला पाहीजे. संबंधितांवर कारवाई करायला पाहीजे. या जमीन विक्रीची संपूर्ण चौकशी व्हायला पाहीजे. मुंबईमध्ये मोक्का लावण्यात येतो. रायगड जिल्ह्यामध्ये जमिनीचे बरेच गैरव्यवहार होतात. कायद्यामध्ये तरतूद नसल्यामुळे असे प्रकार वारंवार होतात. मुंबईसारखाच आमचाही प्रश्न महत्त्वाचा आहे. माझी स्पेसिफिक मागणी आहे की, सरपंच किंवा ग्रामस्थांनी सरकारची परवानगी न घेता जमिनी विकल्या असतील तर अशा लोकांवर कोणती कारवाई करण्यात येणार आहे.

डॉ. रणजित पाटील : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांचे म्हणणे बरोबर आहे की, हा सार्वजनिक हिताचा प्रश्न आहे. हा प्रश्न या खात्याचा म्हटल्या पेक्षा जॉईंट रिस्पॉन्सीबिलीटी म्हणून देखील असावा. तेथील सरकारी जमीन स्थानिक लोकांनी विक्रीला काढली असेल तर त्यांच्यावर एफआयआर दाखल झालेलाच आहे. परंतु त्याबाबतीत सविस्तर तपास होईल. अशा बाबतीतील अजुनही काही केसेस असतील तर संबंधित खात्याच्या माननीय मंत्र्यांना आणि विभागाला देखील यासंदर्भातील माहिती दिली जाईल आणि या सर्व प्रकरणाची चौकशी केली जाईल.

श्री. दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य श्री. पंडीतशेठ पाटील यांनी असे सांगितले की, ही लक्षवेधी सूचना महसूल विभागाकडे दिली होती. परंतु उत्तर देताना ही लक्षवेधी नगरविकास विभागाकडे ट्रान्सफर झाली. एखाद्या विभागाकडे गेलेली लक्षवेधी दुसऱ्या विभागाकडे ट्रान्सफर करण्याचे काही नियम आहेत, काही प्रथा आहेत. ती लक्षवेधी योग्य पद्धतीने ट्रान्सफर झाली काय किंवा अयोग्य पद्धतीने ट्रान्सफर झाली हे पाहिले पाहिजे. या सूचनेवर सन्माननीय सदस्यांनी एवढा प्रयत्न करुनदेखील 15 दिवसानंतर त्यांना योग्य ते उत्तर मिळू शकले नाही. माझी आपल्याला हरकतीच्या मुद्याद्वारे एवढी विनंती आहे की, आपण या बाबतीत चौकशी करावी.

...2/-



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**( अध्यक्षस्थानी माननीय अध्यक्ष )**

**अध्यक्ष :** आपण जेव्हा एखादी लक्षवेधी सूचना खात्याकडे पाठवितो, तेव्हा सदरहू लक्षवेधी संबंधित खात्याची आहे, असे त्यांना वाटते. त्यांनी ती कोणत्या विभागाला दिली, त्यापेक्षा लक्षवेधीतील विषयाचा कोणत्या विभागाशी अधिक संबंध येतो हे पाहून त्या विभागाकडे ती पाठविली जाते. परंतु याबाबत चौकशी करण्यात येईल.

श्री. दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, हा विषय कोणत्या विभागाने हाताळायचा यासंदर्भात जेव्हा दोन विभागामध्ये वाद असतो, त्यावेळेला मुख्य सचिवांनी अंतिम निर्णय घेऊन ती सूचना संबंधित विभागाकडे पाठवायची असते. आपल्याला एवढीच विनंती आहे. यासंदर्भात नेमकी काय कृती झालेली आहे, ती समजून घेतली पाहीजे.

**अध्यक्ष :** सदरहू लक्षवेधी सूचना त्यांनी त्या विभागाला पाठविली असली तरी ती कुठल्या विभागाची आहे, याचा नक्की शोध घेण्यात येईल. त्या विभागाने का ट्रान्सफर केली, हे देखील पहाण्यात येईल. योग्य असेल तर त्यांनी ट्रान्सफर केली असेल आणि योग्य नसेल तर का ट्रान्सफर केली ते देखील पाहिले जाईल.

---*---

...3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ. शी.** : मौजे खंडाळा (ता. वैजापूर, जि. औरंगाबाद) येथे गौण खनिज उत्खनन केल्याप्रकरणी लोकप्रतिनिधीवर तहसीलदार, वैजापूर यांनी दंडाची नोटीस काढणे

**मु. शी.** : मौजे खंडाळा (ता. वैजापूर, जि. औरंगाबाद) येथे गौण खनिज उत्खनन केल्याप्रकरणी लोकप्रतिनिधीवर तहसीलदार, वैजापूर यांनी दंडाची नोटीस काढल्यासंबंधी सर्वश्री भाऊसाहेब पाटील-चिकटगावकर, अजित पवार, दिलीप वळसे-पाटील, जयंत पाटील, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. भाऊसाहेब पाटील-चिकटगावकर (वैजापूर) : अध्यक्ष महोदय, मी नियम 105 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मौजे खंडाळा (ता. वैजापूर, जि. औरंगाबाद) येथे गौण खनिज उत्खनन केल्याप्रकरणी एका राजकीय पक्षाच्या लोकप्रतिनिधीवर तहसिलदार वैजापूर यांनी कोणतीही शहानिशा न करता महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम 1960 चे कलम 48 (7) व एम.एल.आर.सी.अंतर्गत कोणतीही सुचना न देता रूपये 7,08,000 दंडाची नोटीस काढण्यात येणे, नोटीस प्रकरणी सदर लोकप्रतिनिधीनी स्वतःच्या नावावर असलेल्या गट क्रमांक 725 वर कोणत्याही प्रकारचे उत्खनन झााले नसता अतिरिक्त जिल्हाधिकारी यांना चौकशी करण्याचा अर्ज केला असता गट क्रमांक 725 मध्ये कोणत्याही प्रकारचा निर्वाळा देण्यात येणे, सदर प्रकरणी सखोल चौकशी करून आकसबुध्दीने लोकप्रतिनिधी यांना दंडाची नोटीस पाठविल्या प्रकरणी चौकशी करून तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करण्यात येत असलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.संजय राठोड ( महसूल राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**अध्यक्ष** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

---*---

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. भाऊसाहेब पाटील-चिकटगावकर : अध्यक्ष महोदय, आपण या वर्षी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची 125 वी जयंत साजरी करीत आहोत.

**अध्यक्ष :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाचा उल्लेख लक्षेवधी सुचनेमध्ये नाही. आपण लक्षवेधी सूचनेसंदर्भात थेट प्रश्न विचारावा.

श्री. भाऊसाहेब पाटील-चिकटगावकर : अध्यक्ष महोदय, या गोष्टीचे दु:ख वाटते की, कुठलीही चौकशी न करता माझ्यावर तहसीलदार, वैजापूर यानी 7 लाख रुपयांचा दंड ठोटावला. उत्खनन केलेल्या 7/12 मध्ये 10 नावे असताना केवळ आमदारावरच कारवाई केली. माझ्यावरच कारवाई का झाली याचे मी कारण सांगणार आहे.

अध्यक्ष महोदय, वैजापूर येथील तहसीलदार श्रीमती निकुंब यांची बदली झाली असताना त्यांची बदली होऊ नये म्हणून मी माननीय मुख्यमंत्र्यांना निवेदन दिले होते. मुख्यमंत्री महोदयांनी या बदलीस स्थगिती का मागत आहात, असे मला विचारले होते. मागील काळामध्ये श्रीमती निकुंब ज्या ठिकाणी कार्यरत होत्या, तेथे उप जिल्हा दंडाधिकारी यांनी त्यांना गैरहजर रहात असल्याबाबत कारणे दाखवा नोटीस दिली होती. त्या गैरहजर रहात असल्यामुळे त्यांना वारंवार नोटीसा दिल्या. या महिलेने उप जिल्हा दंडाधिकारी यांच्यावरच अब्रुनुकसानीचा आणि विनयभंगाचा दावा दाखल केला. सदरहू उप जिल्हाधिकारी यांना उच्च न्यायालयात जावे लागले. उच्च न्यायालयाने त्यांना निर्दोश असल्याचे सिद्ध केले. त्यामुळे अशी अधिकारी आमच्याकडे नेमू नये म्हणून मी स्थगिती मागितली होती. त्यामुळे श्रीमती निकुंब यांनी तो राग मनात ठेवून मला 7 लाख रुपये दंड केला. यासंदर्भात मला माहिती न देता प्रथम इलेक्ट्रानिक मिडीयाचे प्रतिनिधी, महाराष्ट्र टाईम्स या वतर्मान पत्राला कळविले. तुम्ही चोरी केली काय, दगड चोरला काय यासंदर्भात मला नातेवाईक व अनेक आमदारांनी फोनवरुन विचारणा केली. मी उद्विग्न भावनेने बोलत आहे. त्या दिवशी माझी काय परिस्थिती झाली असेल. अध्यक्ष महोदय आपणही मराठवाड्यातील आहात. तुम्ही शासनाचे दगड चोरता काय, असे मला नातेवाईकांनी विचारले, माझी मानसिक हानी झाली. हे सर्व

खोटे असताना ही कारवाई झालेली आहे. यासंदर्भात चौकशी करावी व मी खरोखर दोषी असेल तर माझ्यावर कारवाई करावी, याकरिता मी अपर जिल्हाधिकारी यांच्याकडे अर्ज केला. अपर जिल्हाधिकारी यांनी दुसऱ्या तहसीलदाराला नेमून चौकशी केली. माझ्यावर दंडात्मक स्वरुपाची

...5/-



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. भाऊसाहेब पाटील-चिकटगावकर.....

खोटी कारवाई का करण्यात आली, असा माझा प्रश्न आहे. तसेच आपण निवेदनात अर्धसत्य दिलेले आहे. तहसीलदार यांनी प्रत्यक्ष पहाणी, व तपासणी न करता आकसबुद्धीने नोटीस बजावून तो पेपर मिडीयाला दिला. माझी विनाकारण बदनामी केली. अपर जिल्हाधिकारी यांच्या अहवालानुसार लोकप्रतिनिधी यांच्या जागेवर उत्खनन झालेच नाही. तेथे वाहतुकीला रस्ता नाही. त्यामुळे नोटीस देणाऱ्या तहसीलदाराला निलंबित करणार आहात काय, असा माझा आपल्या मार्फत मंत्री महोदयांना प्रश्न आहे.

श्री. संजय राठोड : अध्यक्ष महोदय, जिल्हाधिकारी औरंगाबाद यांनी जिल्ह्यातील सर्व दगड खाणीची इलेक्ट्रीक ट्रोवेल मशीनद्वारे मोजणी करण्याचे आदेश दिनांक 08.12.2015 रोजी दिले होते. त्यानुसार औरंगाबाद जिल्ह्यातील सर्व दगड खाणीची तपासणी आणि मोजणी करण्याकरिता सर्व तहसीलदार, गौण खनीज अधिकारी, उप संचालक, भूविज्ञान आणि खणिकर्म अधिकारी यांचे पथक निर्माण केले होते. या पथकाने जिल्ह्यातील सर्व खदानींची तपासणी करुन त्या त्या ठिकाणी दोषी असलेल्यांवर कारवाई करण्याच्या नोटीसेस दिल्या होत्या. सन्माननीय सदस्यांनी आता उल्लेख केला. श्री. भाऊसाहेब रामरावजी पाटील यांच्या नावाने खदान आहे. मोजणी झाल्यानंतर सन्माननीय सदस्यांना 7 लाख 8 हजार रुपये दंडाची नोटीस दिलेली आहे. वैजापूर तहसीलदाराने त्यांच्यावर जाणिपूर्वक अन्याय केल्याचे सन्माननीय सदस्यांनी मत मांडले. त्यांनी स्वतः अपर जिल्हाधिकारी यांच्याकडे अपील केल्यावर याबाबतची दुसऱ्या तहसीलदाराकडून पुन्हा तपासणी करण्यात आली. जिल्ह्यामध्ये अशा खदानींची तपासणी केली होती, ती पुन्हा करण्यासंदर्भात शासन निर्णय घेणार आहे.

**अध्यक्ष :** सदरहू 7/12 वर अनेक जणांची नावे असून अनेक जणांच्या तेथे खाणी असतील. या सर्व खाणीतील दगड एकट्याच्या नावावर दाखवून सन्माननीय सदस्य यांना एकट्यालाच दंड आकारण्यात आला, असे त्यांचे म्हणणे आहे.

श्री. संजय राठोड : अध्यक्ष महोदय, या ठिकाणी एकट्यावर दंड ठोटावला नाही. गट क्रमांक 732, श्री. रमेश गोविंदराव फुलारे यांना 2 लाख 47 हजार दंड ठोटावला. श्री. अविनाश देविदास निकम यांचा वेगळा गट नंबर असून त्यांना देखील दंड ठोटावलेला आहे. श्री. सुधाकर शंकर बागूल यांना देखील दंड ठोटावलेला आहे.

...Y/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.संजय राठोड : अध्यक्ष महोदय, गौण खनिज उत्खनन प्रकरणी केवळ एकाच प्रकरणी कारवाई करुन दंड ठोठावण्यात आला नाही. गट क्रमांक 732 चे मालक श्री.रमेश गोविंदराव फुलारी यांना 2 लाख 47 हजार रुपये दंड अवैध उत्खनन प्रकरणी ठोठावण्यात आला आहे. तसेच, सर्वश्री.अविनाश देविदास निकम, सुधाकर शंकर बागुल व इतर यांना देखील अवैध उत्खनन प्रकरणी ठोठावण्यात आला आहे.

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, सभागृहामध्ये सन्माननीय सदस्यांनी एखादे निवेदन केले तर ते खरे समजले पाहिजे, असा प्रघात आहे. आमदार महोदय सभागृहामध्ये सांगत आहेत की, माझ्या मतदार संघातील गावामध्ये तहसिलदारांनी जो दंड ठोठावला त्यामध्ये मला गोवले व त्याची मोठ्या प्रमाणात जाहिरात केली. याकृतीतून लोकप्रतिनिधींची मानहानी करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. यानंतर दुसऱ्या एका निरीक्षणामध्ये लोकप्रतिनिधींनी केलेल्या अर्जाचा काही अंश मान्य करण्यात आला आहे. याचा अर्थ असा आहे की, सदरहू ठिकाणच्या तहसिलदार यांनी सन्माननीय सदस्य श्री.भाऊसाहेब पाटील-चिकटगावकर यांना डोळ्यासमोर ठेवून कारवाई केली. आमदार महोदयांना जाणीवपूर्वक बदनाम करण्यासाठी तहसिलदार यांनी कारवाई केली असेल तर ही बाब गंभीर आहे. म्हणून सदर प्रकरणाची चौकशी करण्यात यावी. आमदार महोदयांनी सदर प्रकरणी केलेले अपिल पार्शिअली ॲक्सेप्ट केले आहे. मला वाटते याचा अर्थ असा आहे की, तहसिलदारांनी केलेली कार्यवाही अंशतः तरी चुकीची आहे. लोकप्रतिनिधींच्या बाबतीत जाणीवपूर्वक न करता ती लक्षपूर्वक कारवाई केली पाहिजे. याकरिता सदरहू तहसिलदारांनी जाणीवपूर्वक कारवाई केलेली असल्याने त्यांना निलंबित करुन त्यांची चौकशी करण्यात यावी, अशी मागणी आमदारांच्यावतीने आम्ही करतो.

श्री.संजय राठोड : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी अपिल दाखल केले आहे. त्यावर जो निर्णय होणार आहे तो अंशतः.... दुसऱ्या तहसिलदाराकडून चौकशी सुरु आहे. ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी मागणी केल्यामुळे सदर प्रकरणाची चौकशी विभागीय आयुक्त यांच्यामार्फत करण्यात येईल व तहसिलदार दोषी आढळले तर त्यांच्या विरुध्द कारवाई करण्यात येईल.

...2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, लोकप्रतिनिधींचा अवमान करण्याचे प्रकार वारंवार घडत आहेत व अनेक प्रकरणी अधिकाऱ्यांकडून अवमान करण्याच्या घटना घडत आहेत. अशाच प्रकारचे वैजापूर तालुक्यातील सदर उदाहरण आहे. तहसिलदार यांनी ज्या पध्दतीने कारवाई केली त्यासंदर्भात माननीय जिल्हाधिकारी यांनी स्वतंत्र पत्र पाठविले व व्हेरीफिकेशन केले. सदरहू प्रकरणी माननीय आमदारांचा संबंध नाही. याचा अर्थ सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी सांतिल्याप्रमाणे स्पष्ट आहे. विनाकारण लोकप्रतिनिधींना बदनाम करण्याचा प्रयत्न झाला आहे. यापूर्वी सांगितल्याप्रमाणे सभागृहामध्ये सन्माननीय सदस्यांकडून एखाद्या प्रकरणी माहिती देण्यात येते तेव्हा ती खरी समजण्यात येते. संबंधिताची चौकशी कोणाच्या माध्यमातून करावयाची असेल ती करण्यात यावी, त्याबाबत आमचा आक्षेप नाही. परंतु घडलेल्या सदर प्रकरणासंदर्भात संबंधित तहसिलदार यांना निलंबित करण्यात यावे, अशी आमची मागणी आहे.

श्री.संजय राठोड : अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी म्हटल्याप्रमाणे सन्माननीय सदस्यांनी सभागृहामध्ये दिलेली माहिती खरी आहे असे समजून सदर प्रकरणी विभागीय आयुक्तामार्फत तातडीने तपासणी करुन कारवाई करण्यात येईल. चौकशी अहवालानंतर .....

**अध्यक्ष :** सन्माननीय सदस्यांनी मंत्री महोदयांचे उत्तर ऐकावे.

श्री.संजय राठोड : अध्यक्ष महोदय, सदर प्रकरणी 15 दिवसामध्ये चौकशी करुन त्यामध्ये तहसिलदार दोषी आढळले तर त्यांच्याविरुध्द कारवाई करण्यात येईल.

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, आपण आम्हाला संरक्षण दिले पाहिजे, अशी माझी विनंती आहे. याप्रकरणी विभागीय आयुक्तामार्फत चौकशी करु नये, असे आमचे म्हणणे नाही. जिल्हाधिकारी यांनी केलेल्या व्हेरीफिकेशननुसार प्रथमदर्शनी स्पष्ट दिसते की सदर प्रकरणी आमदार महोदयांचा संबंध नाही. त्याबाबत आमदार महोदयांनी स्वतःही सांगितले आहे. अधिकाऱ्यांचे धाडस वाढलेले आहे. विभागीय आयुक्तामार्फत चौकशी करण्यात येईल व त्यांच्या अहवालानुसार जी काही कार्यवाही करावयाची असेल ती करण्यात यावी. परंतु सन्माननीय सदस्यांना आपण संरक्षण दिले पाहिजे, त्यांचा पदोपदी अवमान होत आहे, अशा प्रकारे हे सरकार

काम करणार असेल तर बरोबर नाही. संबंधित तहसिलदार यांना आज तत्काळ निलंबित करण्यात यावे, अशी आमची मागणी आहे व त्याबाबत मंत्री महोदयांनी सभागृहात घोषणा करावी.

....3



श्री.संजय राठोड : अध्यक्ष महोदय, जिल्हाधिकारी यांनी औरंगाबाद जिल्ह्यातील सर्व खाणींची चौकशी करण्याचे आदेश दिले होते. सन्माननीय सदस्यांच्याच खाणीची चौकशी करण्यात यावी, अशा प्रकारचे कोणतेही.....

**अध्यक्ष :** इतर खाणींची चौकशी करण्याचे आदेश मंत्री महोदयांना द्यावयाचे असतील तर त्यांनी ते द्यावेत ती बाब वेगळी आहे. मंत्री महोदय मी आपणास सांगू इच्छितो की, सदर लक्षवेधी केवळ एका खाणीच्या संदर्भातील आहे.

श्री.संजय राठोड : अध्यक्ष महोदय, जिल्हाधिकारी यांनी औरंगाबाद जिल्ह्यातील संपूर्ण खाणी तपासण्यासंदर्भात आदेश काढला होता. त्यामध्ये सन्माननीय सदस्यांची देखील खाण होती. गौण खनिजाच्या अवैध उत्खननाप्रकरणी दंडाची नोटीस दिल्यानंतर त्याबाबत अपिल करता येते. त्यानुसार सन्माननीय सदस्यांनी अपिल केले असून ते अंशतः मान्य करण्यात आले.

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, आमदार महोदयांना नोटीस देऊन त्यास प्रसिध्दी देऊन जाणीवपूर्वक विधिमंडळ सन्माननीय सदस्यांची बदनामी करण्याचे हे षडयंत्र आहे. माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, सदरहू प्रकरणी संबंधित तहसिलदार यांना ताबडतोब निलंबित करण्यात यावे. सदरहू प्रकरणीच्या चौकशी संदर्भात आमची काही तक्रार नाही. सर्व जिल्ह्यातील खाणींची मोजणी करण्याचे आदेश देण्यात आले होते त्यामुळे सन्माननीय सदस्यांच्या खाणीची मोजणी करण्यात आली, याबाबत आमची हरकत नाही. आमचे असे ऑब्जेक्शन आहे की, सदरहू भागामध्ये अनेकांच्या मालकीचे गट क्रमांक असताना सन्माननीय सदस्यांना टार्गेट करुन त्यांच्या खाणीची मोजणी करण्यात आली. त्यानंतर त्या ठिकाणी नवा सर्व्हे करण्यात आला त्यावेळी तेथे ताजे उत्खनन झाले नाही, असा अहवाल देण्यात आला आहे. याचा अर्थ ही बाब शासनास मान्य आहे. सन्माननीय सदस्यांनी सभागृहामध्ये केलेले निवेदन खरे समजून संबंधित तहसिलदार यांना निलंबित करण्यात यावे व त्यांची चौकशी करण्यात यावी. विधिमंडळाच्या विधानसभा सन्माननीय

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सदस्यांचा अवमान करण्याचे काम संबंधित अधिकाऱ्यांनी केले असेल तर त्यांना प्राय:श्चित भोगावे लागले.

....4

13-04-2016 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) Y-4

GSS/ AKN/ MMP/ 14:10

श्री.संजय राठोड : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी केलेले कथन खरे समजून विभागीय आयुक्तांच्या मार्फत चौकशी करण्याच्या संदर्भात मी बोललो आहे. 15 दिवसांच्या आत सदरहू चौकशी करण्यात येईल व तहसिलदार दोषी असतील तर त्यांच्यावर कारवाई केली जाईल.

श्री.शशिकांत शिंदे : अध्यक्ष महोदय, सभागृहात मंत्री महोदयांनी सांगितले आहे की, सन्माननीय सदस्यांनी सांगितलेली बाब अंशतः खरी आहे. याबाबत खात्री करण्यासाठी आपण प्रोसेडींग पहावे. लोकप्रतिनिधींनी दिलेली माहिती खरी आहे असे मंत्री महोदय म्हणत असतील तर त्याचा अर्थ तहसिलदार यांनी सन्माननीय सदस्यांना जाणीवपूर्वक बदनाम करण्याचा प्रयत्न केला आहे. पोलीस अधिकाऱ्यावर ऑब्जेक्शन घेतले म्हणून लाठी चार्ज करण्यात आला यासंदर्भात सन्माननीय सदस्या श्रीमती दिपीका चव्हाण यांनी देखील सदनामध्ये मुद्दा मांडला होता. सन्माननीय सदस्यांचे म्हणणे ग्राह्य धरुन चौकशी करण्यात येणार आहे, त्यास आमचा विरोध नाही. सदरहू प्रकरणातील संबंधित तहसिलदार यांना तत्काळ निलंबित करण्याचा आदेश देण्यात यावा, अशी आमची मागणी असून त्याप्रमाणे सरकार निर्णय देईल काय ?

श्री.संजय राठोड : अध्यक्ष महोदय, विभागीय आयुक्तामार्फत सदरहू प्रकरणी 15 दिवसामध्ये चौकशी करण्यात येईल व त्यामध्ये तहसिलदार, वैजापूर हे दोषी आढळले तर त्यांच्या विरुध्द तातडीने कारवाई करण्यात येईल.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**अध्यक्ष :** सन्माननीय सदस्यांनी कृपया आपल्या जागेवर बसावे.

यानंतर Z-1....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, सन्माननीय मंत्री महोदय सांगतात की, अपिल करावे. अपिल केले आणि त्या अपिलाचा निकालही आला आहे. अपिलाच्या निकालामध्ये स्पष्टपणे अभिप्राय आलेले आहेत. त्यामध्ये लोकप्रतिनिधीचा सन्मान नाही. विभागीय आयुक्तांनी काय चौकशी करावी ती करावी त्याबद्दल आमचा आक्षेप नाही. कोणत्या टर्मला प्रेफरन्स द्यावा, आमचा त्याला आक्षेप नाही. ज्या अर्थी अपिल झाले आणि अपिलाचा निकाल आला आहे. त्यामुळे अध्यक्ष महोदय आपणास विनंती आहे की, या ठिकाणी सभागृहाच्या सदस्याच्या अधिकाराचे संरक्षण झाले पाहिजे. या पध्दतीने अधिकाऱ्यांची मनमानी वाढली तर ते योग्य नाही. माझी आपल्याला पुन्हा विनंती आहे की, या तहसिलदाराला आपण ताबडतोब निलंबित करावे, अशी आमची मागणी आहे आणि ती मागणी आपण मान्य करावी.

श्री. संजय राठोड : अध्यक्ष महोदय, ही सातत्याने चालणारी प्रक्रिया आहे. या ठिकाणी ज्या ज्या लोकांच्या खदानी आहेत, त्या त्या तक्रारीची दखल घेऊन मोजणी करणे, नोटीसा देणे, रॉयल्टीची रक्कम कमी भरली असेल तर कार्यवाही करणे आणि त्यामध्ये एखाद्याला नोटीस दिली असेल तर त्या नोटीसीच्या विरोधात तो अपिलमध्ये जाऊ शकतो. सन्माननीय सदस्य अपिलमध्ये सुध्दा गेलेले आहेत.

**अध्यक्ष :** मी ही लक्षवेधी सूचना काही काळापुरती स्थगित ठेवतो.

---------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ. शी.** : कृषि उत्पन्न बाजार समिती तासगाव (जि.सांगली) येथील सभापती यांनी आपल्या पदाचा गैरवापर करुन आपल्या मुलाला गैरमार्गाने नोकरीत लावणे

**मु. शी.** : कृषि उत्पन्न बाजार समिती तासगाव (जि.सांगली) येथील सभापती यांनी आपल्या पदाचा गैरवापर करुन आपल्या मुलाला गैरमार्गाने नोकरीत लावणे या संबंधी सर्वश्री **शशिकांत शिंदे, अजित पवार, दिलीप वळसे-पाटील, जयंत पाटील, श्रीमती सुमन पाटील, सर्वश्री बाळासाहेब पाटील, दिपक चव्हाण,** यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्रीमती सुमनताई पाटील (तासगाव) : अध्यक्ष महोदय, मी नियम 105 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय पणन मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समितीमध्ये झालेली अवैध नोकर भरती, अनेक संचालक मंडळाच्या अधिकाऱ्यांनी आपले नातेवाईक तसेच मुलांना अवैधरित्या प्रक्रियेचा अवलंब करुन भरती करणे, त्यामुळे गुणवत्ताधारक उमेदवारांवर झालेला अन्याय, कृषि उत्पन्न बाजार समिती तासगाव (जि.सांगली) येथील सभापती यांनी आपल्या पदाचा गैरवापर करुन आपल्या मुलाला गैरमार्गाने नोकरीत लावणे, याबाबत शासनाकडे अनेक तक्रारी करुनसुध्दा त्यांच्यावर कोणतीच कारवाई न होणे, त्यामुळे अप्रत्यक्ष गुणवत्ताधारक उमेदवारांवर झालेला अन्याय, त्यांच्यामध्ये पसरलेला असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

प्रा. राम शिंदे (राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**अध्यक्ष** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती सुमनताई पाटील : अध्यक्ष महोदय, उत्तरामध्ये हे मान्य केले आहे की, चुकीच्या पध्दतीने ही भरती झाली आहे. या निमित्ताने माझे दोन प्रश्न आहेत. सभापतीने आपल्या मुलाला लिपिक पदी नियुक्ती केली आहे, हे देखील उत्तरामध्ये मान्य केले आहे. भरतीच्या वेळी ज्या अधिकाऱ्यांनी मदत केली आहे त्यांच्यावर कार्यवाही होणार आहे काय, सभागृहात चुकीची माहिती दिलेल्या व्यक्तीला पदावरुन बरखास्त करणार आहात काय, सचिवांनी स्वतःच्या सहीने दिनांक 1 सप्टेबर 1986 ला निवड झाली असताना 1 ऑक्टोबर 1986 ला निवड झाली अशी असत्य माहिती दिली हे खरे आहे काय ?

प्रा. राम शिंदे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती सुमनताई पाटील यांनी हा तासगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संदर्भातील प्रश्न उपस्थित केला आहे. 1986 मध्ये तत्कालीन सभापतीने आपल्याला मुलाला बाजार समितीमध्ये लिपिक पदावर नियुक्त केले होते. या कर्मचाऱ्याच्या संदर्भात अनेक विषय समोर आले आहेत. या कर्मचाऱ्याला सचिव पदापर्यंत नेण्यात आले. त्याला ठराव करुन पुन्हा काढण्यात आले. पुन्हा त्याला डायरेक्ट संचालकाकडून नियुक्ती देण्यात आली. त्यानंतर परत काढण्यात आले. हे सर्व प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. म्हणून या संदर्भात त्यांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे की, सी.एच.सुर्यवंशी यांच्या तद्नंतरचा नियुक्तीचा जो कालावधी आहे त्यासंबंधीचे अपिल दि.29-11-2005 च्या नंतर मंत्री पणन यांच्याकडे दाखल झाल्यानंतर त्यावरील निकालामध्ये सचिव पदाच्या पदोन्नतीस मान्यता दिली होती. साधारणपणे सचिव श्री. सुर्यवंशी यांच्या बाबतीतील जो प्रश्न आहे तो प्रश्न आणि त्यानंतर सरळसेवेने दुसऱ्या व्यक्तीची नियुक्ती केली. म्हणून हा प्रश्न उपस्थित झाला आहे. त्यामुळे पणन संचालक यांना या संदर्भात निश्चितपणे योग्य ते आदेश देण्यात येतील आणि यामधील त्रुटी 15 दिवसाच्या आत दूर करण्यासाठी सांगण्यात येईल.

श्री. जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, या लक्षवेधीमध्ये महाराष्ट्रातील काही बाजार समित्यांचा उल्लेख आहे. पण सांगली जिल्ह्यातील तासगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे कोणतेही प्रकरण हे या व्यक्तीच्या बाबतीतील न्यायप्रविष्ठ नाही. मुद्दा एवढाच आहे की, यापूर्वी या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सभागृहामध्ये प्रश्न विचारल्यावर या सद्‌गृहस्थाने आपल्या जॉईनिंगच्या डेट बाबतीत सभागृहाला जी माहिती पाठविण्यात आली ती त्यावेळी सभागृहासमोर खोटी सादर करण्यात आली आहे.

4.....



श्री. जयंत पाटील........

महाराष्ट्राच्या विधानसभेने एखादा प्रश्न विचारला आणि बाजार समितीमधून येणारी माहिती पणन विभागामार्फत मंत्र्यांपर्यंत येऊन त्यांनी जर सभागृहात खोटी माहिती दिली तर या सभागृहाला काही अर्थ राहणार नाही. खोटी शब्द मागे घेतो, असत्य माहिती दिली तर हा या व्यक्तीचा पहिला गुन्हा आहे. म्हणून असत्य माहिती या सभागृहाला देण्याची व्यवस्था करण्यासाठी जे कारणीभूत आहेत त्या गृहस्थांना ताबडतोब निलंबित केले पाहिजे. त्यांची शैक्षणिक पात्रता 10 वी आहे. त्यांचे वडील सभापती असताना त्यांची भरती केलेली आहे असे वगैरे वगैरे सर्व काही नमूद आहे. त्यामुळे न्यायालयात या व्यक्तीच्या बाबतीत कोणतेही प्रकरण पेंडींग नाही त्यामुळे आपण आज निर्णय केला तर त्याला कोठेही अडथळा येणार नाही. सभागृहात येणारी माहिती त्याच्यामार्फत त्याच्या सहीने आली आणि ती असत्य आली, म्हणून त्याला बडतर्फ करावे अशी आमची मागणी आहे.

प्रा. राम शिंदे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी सांगितले की, माहिती असत्य दिली आहे. या संदर्भात निश्चितपणे पडताळणी करण्यात येईल आणि त्यांनी सांगितलेली माहिती खरी मानून त्यामध्ये तथ्य आढळल्यास 8 दिवसामध्ये योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

श्री. दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, यामध्ये दोन वेगवेगळे विषय आहेत. एक म्हणजे मंत्री महोदयांनी सभागृहाला असत्य माहिती दिली हा एक विषय आहे आणि दुसरा विषय असा आहे की, संबंधित कर्मचाऱ्यांने नोकरी लागत असताना आपले क्वॉलिफिकेशन, आपली जाईनिंग डेट आणि त्याचे सभापतींशी असलेले नाते या तीन गोष्टींसंबंधी मार्केट समिती कायद्याचा भंग केलेला असल्यामुळे त्यांना त्या पदावर नेमणूक करण्याचा अधिकारच नव्हता. त्यांनी त्या पदावर अनाधिकाराने स्वतःची नियुक्ती करुन घेतली ती नियुक्ती आजच्या आज आपण रद्द करणार आहात काय, आणि त्यांना ताबडतोब डिसमिस करणार आहात काय ?

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(अध्यक्षस्थानी तालिका सभाध्यक्ष श्री. योगेश सागर)**

प्रा. राम शिंदे : अध्यक्ष महोदय, हा निर्णय दि.30.9.1986 रोजी जिल्हा उपनिबंधकाच्या मान्यतेने झाला आहे. त्याच्यानंतर लिपिक पदावर उपनिबंधकाची पुन्हा मान्यता आहे. याबाबत

5.....



प्रा. राम शिंदे......

1987 ला मान्यता मिळालेली आहे. लेखापाल म्हणून जिल्हा उपनिबंधकाची 28.9.1993 ला मान्यता आहे. सहायक सचिव म्हणून विभागीय सह निबंधक व पणन संचालकांची 19.7.2002 ला मान्यता आहे. या संदर्भातील जो घटनाक्रम आणि ज्या नियुक्त्या केलेल्या आहेत त्याबाबत त्या त्या वेळी योग्य त्या अधिकाऱ्यांनी मान्यता दिली आहे. म्हणून ज्येष्ठ सदस्यांनी सभागृहात हा प्रश्न उपस्थित केल्यानंतर त्यांचे हे सत्य कथन मानून त्या अनुषंगाने 8 दिवसाच्या आत पणन संचालकाच्या माध्यमातून या सर्व घटनेची तपशीलनिहाय पडताळणी करण्यात येईल, चौकशी करण्यात येईल आणि दोषी आढळल्यास घटनाक्रमानुसार जे प्रश्न समोर येतील आणि जे दोषारोप ठेवण्यात येतील त्या अनुषंगाने कार्यवाही करण्यासंबंधी शासन स्तरावरुन कळविण्यात येईल.

श्री. शशिकांत शिंदे : अध्यक्ष महोदय, माझा स्पेसिफिक प्रश्न एवढाच आहे की, एखादा व्यक्ती पदाचा लाभ घेत असताना त्या पदाचा लाभार्थी म्हणून उपयोग करु शकतो का. तो जर करीत असेल तर त्यांच्यावर कार्यवाही करणे गरजेचे आहे. त्यांचे वडील सभापती होते. सभापती हे लाभाचे पद असताना त्यांनी आपल्या मुलाला नियुक्त केलेले आहे. ते 1986 ला केले, 1995 ला केले की, 2016 ला परवानगी दिली असेल ते महत्वाचे नाही.

AA-1....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शशिकांत शिंदे.........

आज विचारलेला प्रश्न एवढाच आहे की, लाभाचे पद असताना त्याची नियुक्ती करणे. नियम असे म्हणतो की, लाभाचे पद असलेल्या व्यक्तीने जर त्याप्रकारचा फायदा घेतला असेल तर सहकार खात्याच्या माध्यमातून त्याठिकाणी त्वरित त्यासंदर्भातील कारवाई करावी लागते. त्यांनी चुकीची माहिती दिली ती गोष्ट वेगळी आहे. आपण सांगितले मी चौकशी करतो. माझे एवढेच म्हणणे आहे की, लाभाचे पद घेतल्यामुळे ताबडतोब त्यांची बरखास्ती करणे, त्यांचे पद रद्द करणे हे नियमात असल्यामुळे आपण त्याप्रमाणे कारवाई करणार काय ?

प्रा.राम शिंदे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.शशिकांत शिंदे यांनी जे सांगितले त्याप्रमाणे राज्य सरकारचे हेच मत आहे. पणन विभागाच्या माध्यमातून हे सरकार आल्यानंतर तीन वेळेस ऑर्डिनन्स आणला. परंतु विधान परिषद सभागृहामध्ये तो पास होऊ शकला नाही. असा कार्यक्रम होतो आहे. म्हणून मार्केट कमिटीमध्ये कायदा आणू पाहतो आहे. विधानसभा सभागृहामध्ये दोन वेळा हा कायदा पासही झाला. परंतु विधान परिषद सभागृहामध्ये तो होऊ शकला नाही. माझ्याकडे आता महाराष्ट्रातील 306 मार्केट कमिटीची माहिती आहे. परंतु तासगावच्या संदर्भात अतिशय स्पेसिफिक माहिती यासाठी देतो आहे की, आपला आरोप हा बरोबर आहे. मी तो नाकारत नाही आणि म्हणून या तज्ज्ञ संचालकांची कशी गरज आहे हे आपल्याला अवगत व्हावे. उच्च न्यायालयाचा दिनांक 9.3.2005 रोजी निर्णय झालेला आहे. जे सांगितले हे सर्व पटलावरही आहे. या अनुषंगाने सखोल चौकशीचे आदेश याआधी दिलेले आहेत. लाभाच्या पदाच्या मार्केट कमिटीबाबत काढले तर आमच्या या बाजूपेक्षा आपल्या बाजूकडे जास्त माहिती असेल. रेशयोचे प्रमाण बघितले तर आपल्याकडे थोडा जास्त आहे. म्हणून मार्केट कमिटीच्या तासगाव आणि सांगली जिल्ह्याच्या संदर्भात आपण जे काही मुद्दे उपस्थित केले. ते मुद्दे उपस्थित केल्याच्या अनुषंगाने पणन संचालकाच्या माध्यमातून 8 दिवसाच्या आत याबाबत सखोल चौकशी करण्याचे निर्देश देण्यात येतील. जर दोषी आढळला तर तातडीने त्याच्यावर कारवाई करण्यास सांगण्यात येईल.

-----------

...........2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.**: मिडिया हाऊसने वेतन आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी न करता राज्य शासनाची केलेली दिशाभूल

**मु.शी.**: मिडिया हाऊसने वेतन आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी न करता राज्य शासनाची केलेली दिशाभूल यासंबंधी श्री.राधाकृष्ण विखे-पाटील यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील ( शिर्डी ) : अध्यक्ष महोदय, मी नियम 105 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय कामगार मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

***"पत्रकारांच्या वेतनवाढीसाठी नेमलेल्या सातव्या न्या.मजिठिया वेतन आयोगाच्या शिफारशींची काटेकोरपणे अंमलबजावणी करा, असे मा.सर्वोच्च न्यायालयाने सर्व मिडिया हाऊस यांना दिलेल्या आदेशाची एक वर्ष होऊनही अद्यापपर्यंत अंमलबजावणी न झाल्याची बाब*** माहे ***एप्रिल,*** २०१६ ***मध्ये निदर्शनास येणे, मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांनी कामगार आयुक्त कार्यालयामार्फत वस्तुनिष्ठ अहवाल सादर करणे आवश्यक असताना, कामगार आयुक्त कार्यालयाच्या विभागीय आयुक्तांनी मिडिया हाऊसच्या व्यवस्थापनाशी संगनमत करुन, मिडीया हाऊस अंतर्गत कामगार संघटनाच्या प्रतिनिधीकडे कोणतीही खातरजमा न करताच व्यवस्थापनाला अनुरुप असे दिशाभूल करणारे अहवाल राज्याच्या मुख्य सचिवांना सादर करणे, सदर अहवालाच्या आधारे राज्याच्या मुख्य सचिवांनाही पत्रकार व पत्रकारेत्तर कंपन्यांच्या वेतन आयोगाच्या अंमलबजावणी संदर्भात दिशाभूल करणारा अहवाल सादर करणे, राज्यातील*** ९० ***टक्क्यांहून अधिक नफेखोर मिडिया हाऊसने वेतन आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी न करता राज्य शासनाची केलेली दिशाभूल, परिणामी श्रमिक पत्रकारांचे होणारे आर्थिक व मानसिक शोषण व खच्चीकरण, प्रतिवर्षी वेतनवाढ नाही, कालबध्द पदोन्नती नाही, रिक्त पदावर भरती नाही, वरिष्ठ पदे रिक्त ठेवून, त्यांची कामे कनिष्ठ पत्रकारांकडून अत्यल्प मोबदल्यात करुन घेणे, कंत्राटी***

.......3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

***( अध्यक्षस्थानी माननीय अध्यक्ष )***

***पत्रकारांना कायम पत्रकारांप्रमाणे वेतन न देणे, अतिरिक्त कामाची होणारी सक्ती, यासारखी वेठबिगारासारखी करुन घेण्यात येणारी कामे, याकडे शासनाचे होणारे दुर्लक्ष, याबाबत*** शासनाने ***करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."***

श्री.प्रकाश महेता (कामगार मंत्री) : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**अध्यक्ष** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

--------------

........4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, जे उत्तर छापलेले आहे त्यामध्ये पान नं.2 वर आपण म्हटलेले आहे की, सद्य:स्थितीमध्ये राज्यामध्ये 978 वृत्तपत्र आस्थापना असून यापैकी 762 आस्थापना ह्या एकल कर्मचारी आस्थापना आहेत. एकूण 44 वृत्तपत्र आस्थापनांनी मजिठिया वेतन आयोगाची संपूर्ण व 11 आस्थापनांनी अंशत: हे जे म्हटले आहे हे पूर्णत: चुकीचे आहे, दिशाभूल करणारे आहे. माझ्याकडे कोणी अंमलबजावणी केली याची संपूर्ण वर्तमानपत्राची माहिती आहे. दिशाभूल करणारी माहिती असल्याने ती दुरूस्त करणार आहात काय? ही माहिती वस्तुस्थितीवर आधारीत नाही. आपल्या विभागातील कमर्चाऱ्यांनी वृत्तपत्र समुहाच्या संबंधितांशी बसून ही चुकीची माहिती पाठविलेली आहे. यामध्ये वस्तुस्थिती असल्याने मी अतिशय गांर्भियाने बोलत आहे. तुमच्या सरकारच्या विरोधात उद्या अवमान याचिका सुध्दा दाखल होऊ शकते. म्हणून ही दिशाभूल केलेली माहिती दुरूस्त केली पाहिजे ही माझी पहिल्यांदा मागणी आहे. याबाबत आपण दुरूस्ती करणार आहात काय?

श्री.प्रकाश महेता : अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितले की, याठिकाणी दिलेली सर्व माहिती चुकीची आहे. मी आठ दिवसांच्या आत माननीय विरोधी पक्षनेत्यांसह याचा संपूर्ण तपास करुन, अधिकाऱ्यांबरोबर बैठक घेऊन, यासंबंधी जो काही पुनर्विचार करता येईल ती सुधारणा करुन जी काही कार्यवाही करता येईल ती निश्चितपणे करण्यात येईल.

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, मी फक्त ॲडीशनल माहिती देतो. माननीय मंत्री महोदय म्हणाले त्याप्रमाणे यात दुरूस्ती करता येईल. मघाशी म्हटल्याप्रमाणे आपण मान्य केले की, आठवडाभरात बैठक घेणार, खरे म्हणजे वर्तमानपत्रातील जे पत्रकार आहेत. त्या संस्थेच्या समुहाचे मालक असतील. अशी तिघांची एकत्रित बैठक घ्यावी अशी आमची पहिली मागणी आहे. यातून सर्व वस्तुस्थिती समोर येईल. शासनाची फसवणूक झाली किंवा नाही हे कळेल. ही लक्षवेधी सूचना राखून ठेवली पाहिजे. मंत्रालय स्तरावर पत्रकारांना संरक्षण देण्याची एवढी अनास्था आहे. शेवटच्या परिच्छेदमध्ये आपण म्हटलेले आहे की, कंत्राटी पत्रकारांना कायम पत्रकारांप्रमाणे वेतन देण्याबाबत अशी कोणी मागणी केलेली नाही. सर्वोच्च न्यायालयाचा निकाल आहे की, कंत्राटी कामगारांना कायम पत्रकारांप्रमाणे वेतन आयोग लागू झाला पाहिजे. लक्षवेधीचे उत्तर पाहिले तर

........5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील........

त्यामध्ये श्रमिक पत्रकारांचे होणारे आर्थिक व मानसिक शोषण व खच्चीकरण प्रतिवर्षी वेतनवाढ नाही, कालबध्द पदोन्नती नाही, रिक्त पदावर भरती नाही, वरिष्ठ पदे रिक्त ठेवून त्यांची कामे कनिष्ठ पत्रकारांकडून अत्यल्प मोबदल्यात करुन घेणे, कंत्राटी पत्रकारांना कायम पत्रकारांप्रमाणे वेतन न देणे, यामध्ये आपण तक्रारी आलेल्या नाहीत असे म्हटले आहे. वृत्तपत्र आस्थापना, खाजगी आस्थापना येथील कर्मचाऱ्यांना सेवाविषयक बाबी या राज्य शासनाच्या अखत्यारित येत नाहीत. यात अनेक त्रुटी झालेल्या आहेत. त्यामुळे ही लक्षवेधी सूचना राखून ठेवावी आणि आठ दिवसामध्ये ही बैठक बोलावून पत्रकार संघटनेचे प्रतिनिधी, राज्य सरकार आणि वृत्तपत्र समुहाचे मालक यांना बैठकीला बोलाविण्यात यावे. उत्तरामध्ये जी चूक झालेली आहे ती दुरूस्त करण्यात यावी. ही लक्षवेधी सूचना राखून ठेवावी अशी माझी विनंती आहे.

श्री.प्रकाश महेता : अध्यक्ष महोदय, प्रश्नाच्या उत्तराची माहिति चुकीची आहे असे मी आज मानत नाही. त्याचे कारण असे आहे की, वृत्तपत्र आस्थापना माहिती संचालन व माहिती जनसंपर्क कार्यालयाकडून आपल्याला प्राप्त होत असते. या उत्तरामध्ये पूर्ण डिटेल्सपण सांगितलेले आहेत. माझे दोन मिनिट ऐकून घ्या. यासंबंधी विभागाच्या वतीने 978 वृत्तपत्र आस्थापना आहेत त्यापैकी किती लोकांवर कारवाई केली. हा केंद्राचा कायदा आहे. तरी मजेठिया समितीने जो अहवाल दिला त्याच्या आधारावर कारवाई केलेली आहे. माझ्याकडे 7 तक्रारींचा रिपोर्ट आहे. सन 2014 पासून आतापर्यंत 7 आस्थापनांपैकी 6 आस्थापनांचे प्रश्न निकाली काढले. म्हणून पत्रकारांचे म्हणणे या उत्तरामध्ये कुठेही नाकारित नाही. जे आस्थापना मजेठिया समितीच्या अहवालाची अंमलबजावणी करीत नाही. त्यासाठी आयुक्त स्तरावर एक समिती नेमलेली आहे. जेव्हा आपण उभे राहिलात तेव्हा तुमची माहिती गृहीत धरुन आठ दिवसांच्या आत तुमच्यासह अधिकारी आणि पत्रकार यांच्यासमवेत एक बैठक घेऊ. ज्या-ज्या आस्थापनांनी मजेठिया समितीचा अहवाल स्वीकारला नसेल त्यांच्यावर कडक कायदेशीर कारवाई करण्यात येईल. मग नंतर पाहिजे तर परत पुढच्या वेळेस दुसऱ्या लक्षवेधीच्या माध्यमातून चर्चा करू. लक्षवेधी राखून ठेवण्याचा प्रश्न येत नाही. कारवाई करण्यासंबंधीचे समाधान करीत आहोत.

BB-1........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अतुल भातखळकर : अध्यक्ष महोदय, या संदर्भात 8 दिवसात बैठक बोलावणार असाल तर फार चांगली गोष्ट आहे. प्रत्येक पक्षाच्या गट नेत्यांकडून एक ते दोन आमदारांची नावे घेऊन या बैठकीला बोलाविले पाहिजे. ही माझी सूचना आहे. लक्षवेधी सूचना राखून ठेवण्याच्या सूचनेला पाठींबा देतो म्हणून एकालाच बोलायचे का ? ही लक्षवेधी आता सभागृहाची प्रॉपर्टी झाली आहे. त्यांची एकटयाची नाही.

श्री.प्रकाश महेता : अध्यक्ष महोदय, ज्या पक्षातील एक-दोन कार्यकर्त्यांना या बैठकीमध्ये सहभाग घ्यायचा असेल त्या सर्वांना बोलवावे.

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, मला बोलवा असा माझा मुद्दा नाही. ज्यांनी लक्षवेधी विचारली, पत्रकारांच्या प्रश्नाविषयी काळजी घेऊन त्यांनी लक्षवेधी टाकली. ही आता सभागृहाची प्रापर्टी झाली. याबाबत दुमत नाही. पण आम्हालाही बोलवा. हे उशीरा सूचलेले शहाणपण आहे. माझा प्रश्न एवढाच आहे की, मजिठीया समितीने जो निर्णय दिला त्याची अंमलबजावणी महाराष्ट्रातील वृत्तपत्र मालक, समूह करीत नसतील तर पत्रकारांनी कोणत्या प्रकारच्या तक्रारी केलेल्या आहेत.

अध्यक्ष महोदय, त्याचे उत्तर दिले की, तुमच्याकडे प्राप्त झाल्या नाहीत, दिलेल्या नाही. समितीचा अहवाल आल्यानंतर अशा स्वरुपाच्या तक्रारी वेगवेगळया पत्रकारांच्या सतत येत आहेत. अशा तक्रारी असल्यामुळे ही लक्षवेधी सूचना करण्यात आलेली आहे. त्यामुळे या मजिठीया समितीच्या दिलेल्या निकषाप्रमाणे प्रत्येक वर्तमानपत्र त्यांच्या पत्रकारांना सगळया सुविधा देते किंवा नाही ? या विषयी "देत नाही" असे उत्तर आहे. या विषयी चौकशी करा, सात दिवस बसा, याच्याविषयी तक्रार नाही. आजच्या आज महाराष्ट्रातल्या ज्या वर्तमानपत्रांनी पत्रकारांना अशी चुकीची किंवा कमी व्यवस्थेची ट्रीटमेंट दिली असेल त्यांना ताबडतोब आदेश करुन येणाऱ्या काही दिवसात पुर्तता करण्याचे आदेश दिले जातील काय ?

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

...2/-

श्री.प्रकाश महेता : अध्यक्ष महोदय, हा विषय आज सभागृहामध्ये उपस्थित झालेला आहे. वृत्तपत्र चालविणारे समूह दुनियाभरच्या बातम्या छापतात आणि छापलेल्या बातम्या जे पत्रकार छापतात आणि लोकशाहीचे काम करतात त्यांच्यावर हे वृत्तपत्र मालक समूह अन्याय करतो. त्या मालक समूहांवर मजिठीया समितीचा अहवाल निश्चितपणाने बंधनकारक आहे. सन 2010 मध्ये हा अहवाल आल्यानंतर पाच वर्षे आपण इतकी तीव्रता दाखविली असती तर पाच वर्षापुर्वीच पत्रकारांना न्याय मिळाला असता. आपण घाबरु नका, चिंता करु नका. या मालक समूहांना मजिठीया समितीचा अहवाल लागू करावा लागेल अशा प्रकारची कार्यवाही शासनाकडून करण्यात येईल.

श्री.नितेश राणे : अध्यक्ष महोदय, माननीय मंत्री श्री.प्रकाश महेता साहेब सकारात्मक आहेत. औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून मी एक प्रश्न विचारला आहे. पत्राकारांना दिलेले जे स्टॉल आहेत, त्यांना कायम स्वरुपी करण्यासंबंधीच्या असंख्य बैठका झालेल्या होत्या. यासाठी सन्माननीय सदस्य श्री.आशिष शेलार सतत प्रयत्न करीत आहेत. यापूर्वी सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांनी सुध्दा हा प्रश्न मांडलेला आहे. जेव्हा सर्वांना संरक्षण द्यायला चाललेला आहात त्याच बरोबर जे वृत्तपत्र धारक जे रस्त्यावर पेपरचे स्टॉल घेऊन बसतात त्यांना शासनामार्फत संरक्षण किंवा कायम स्वरुपी स्टॉल देणार का ?

श्री.प्रकाश महेता : अध्यक्ष महोदय, हा प्रश्न या विषयाशी निगडीत नसला तरी चांगला प्रश्न आहे. शासनाच्या विचाराधीन आहे की, जे वृत्तपत्र विक्रेता आहेत, त्यांचे एक मंडळ स्थापन करायचे. हा विचाराधीन प्रस्ताव आहे. त्यांच्या बाबतीत सकारात्मक दृष्टीकोनातून विचार करण्यात येईल. एक छोटासा चिमटा तुम्हाला घेतो. प्रहारमध्ये जर मजिठीया कमिशन दाखल केले नसेल तर ते करुन घ्यावे.

...3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राधाकृष्ण विखे पाटील : अध्यक्ष महोदय, आम्ही जी सातत्याने मागणी करतो आहोत की, तुमचे उत्तर परीपूर्ण नाही. जे वृत्तपत्र मालक, समूह मजिठीया आयोगाच्या शिफारशी लागू करत नसतील त्यांच्याविरुध्द कारवाई करणार असे म्हणता. आम्ही लक्षवेधी राखून ठेवा असे का म्हणतो आहोत ? जे उत्तर दिलेले आहे त्याच्यामध्ये त्रुटी आहेत. उत्तरात म्हणालात की, विशेष कक्षाची स्थापना झाली. त्यामध्ये रोजगार मंत्रालयाचा त्रैमासिक अहवाल सादर केलेला आहे. आतापर्यंत किती अहवाल सादर झाले आहेत ? एकही अहवाल सादर झालेला नाही, हेही आपण दिशाभूल करणारे उत्तर दिलेले आहे. कायदेशिर कारवाई करण्याच्या बाबतीमध्ये आपण तत्परता दाखविता आहात, वर्तमान पत्रांच्या मालक, समूहाला बैठकीला बोलावणार आहोत. आमची अपेक्षा अशी होती की, पत्रकार, सरकार व कंपनी आस्थापना यांची त्रिपक्षीय समिती नेमायला पाहिजे होती. ती जर उत्तरामध्ये म्हटले असते की, नेमतो आहोत, तर निदान या पत्रकारांना न्याय मिळाला असता. केवळ या पध्दतीने हे कामकाज चालले आहे.

पत्रकारांचे शोषण चालले आहे. पाच दहा वर्षे काम केल्यानंतरही पाच हजार रुपये, तीन हजार रुपये, आठ हजार रुपये पगार मिळतो. निवडणूकीच्या काळामध्ये पॅकेज घेतात. हे सर्वदूर चालले आहे. याबाबतीत केव्हा तरी गांभीर्याने विचार केला पाहिजे. आता काही लोकांनी मला सांगितले की, हा मुद्दा उपस्थित केला तर वर्तमानपत्राच्या समूहांना काय वाटेल ? आपण त्यांच्या विरोधात बोलत नाही. त्यांच्या विरोधात काही भूमिका घेत नाही. ज्या पत्रकारांच्या कष्टावर, दिवसरात्र काम करुन ते वर्तमानपत्र चालते. ते फिल्डवर जातात, बातम्या आणतात त्याच्या आधारावर हे वर्तमानपत्र चालते. म्हणून त्यांना न्याय मिळाला पाहिजे ही आमची भूमिका या लक्षवेधीच्या माध्यमातून आहे. एकतर मिडीया हाऊसचे वर्गीकरण करण्याची गरज आहे. प्रत्येक मिडीयाचे उत्पन्नाची साधने, स्त्रोत वेगळे आहे. त्याचा या लक्षवेधीच्या उत्तरामध्ये उल्लेख नाही. मजिठीया समितीच्या बाबतीतमध्ये फक्त असे म्हटले आहे की, हा केंद्राचा कायदा आहे.

....4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राधाकृष्ण विखे पाटील.......

हा केंद्राचा कायदा असताना त्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी आपली होती. ती आपण केली नाही, हा खरा मूळात आक्षेप आहे. या विषयाची व्याप्ती मोठी असल्यामुळे ही लक्षवेधी राखून ठेवावी. आपण म्हटल्याप्रमाणे बैठक बोलवावी, अशी विनंती आहे.

श्री.प्रकाश महेता : अध्यक्ष महाराज, हे स्पष्ट आहे की, सर्वोच्च न्यायालयाने दिलेला हा निर्णय असल्यामुळे सर्व आस्थापनांना बंधनकारक आहे. या अधिनियमातील तरतूदी अनुसार तक्रार करण्यासाठी कामगार न्यायालयातदाद मागता येते. शासनाकडे यासंबंधी पत्रकार मित्रांकडून तक्रार आली तर निश्चितपणाने त्याची कारवाई केलेली आहे. याचे उदाहरण मी तुम्हाला दिलेले आहे. पत्रकार मित्रांकडून ज्या सात आस्थापनांची तक्रार आली. त्या सातही लोकांवर कारवाई केली. हा विषय शासनाकडे तक्रारीच्या स्वरुपात आला आहे. मी त्याला तक्रारीच्या स्वरुपात समजत आहे. म्हणून मी सांगितले की, तत्काळ याची आठ दिवसात दखल घेऊन तो निर्णय घेण्यात येईल. त्यावर लक्षवेधी राखून ठेवणे हा त्याच्या मागचा उपाय नाही.

श्री.आशिष शेलार : अध्यक्ष महोदय, सरकार ही लक्षवेधी राखून ठेवून त्यावर बैठक लावणार आहे. याबाबत सकारात्मक भूमिका आहे. हा प्रश्न अतिशय रिलेव्हंट आहे. याचे कारण सुप्रिम कोर्टाने सांगितले, त्यांच्या नंतर निरीक्षक नेमले. आपण असे म्हटले की, राज्यात सन 2002 मध्ये निरीक्षक नेमले आहेत. निरीक्षकाचे काम काय होते ? मजिठीया कमिटीचे इम्प्लिमेंटेशन मालकांचा समूह करतो की, नाही ते बघणे.

CC-1...........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.आशिष शेलार .....

असे असतानासुध्दा 4-5 प्रकरणात कार्यवाही झालेली नाही असे मंत्री महोदय स्वत: सांगत आहेत. म्हणजे हे निरीक्षक 2002 पासून त्यांचे काम योग्य पध्दतीने करीत नव्हते. याबाबत तक्रार प्राप्त झाल्यानंतर सरकारने कारवाई केली आहे. म्हणजे निरीक्षक बरोबर काम करीत नव्हते त्यामुळे त्यांच्यावर आपण तातडीने कारवाई करणार का ?

अध्यक्ष महोदय, शासनाकडून ऑन रेकॉर्ड असे उत्तर आले आहे की, मालक समुह हे पत्रकार व कंत्राटी पत्रकारांवर अन्याय करीत आहेत. जर अशी भूमिका मंत्री महोदयांची व सरकारची असेल तर माझी अशी मागणी आहे की, इंडियन न्यूजपेपर फोरम एजन्सी म्हणजे या मालकांच्या समुहाला बीकेसीमध्ये एक भूखंड दिलेला आहे. त्यामध्ये त्यांची कार्यालये असणार आहेत. त्यांना स्वस्त एफएसआय दिलेला आहे, जमीन फुकट दिलेली आहे. पत्रकारांवर होणारा अन्याय सरकारने मान्य केलेला आहे. हा अन्याय जोपर्यत दूर होत नाही तोपर्यत वृत्तपत्र मालकांच्या समुहाला बीकेसीमध्ये दिलेल्या भूखंडावर झालेल्या इमारतीस ओ.सी. देण्यात येऊ नये अशी भूमिका सरकार घेणार का ?

श्री.प्रकाश महेता : अध्यक्ष महोदय, 2002 मध्ये शासनाने निरीक्षक नेमले. परंतु मजिठिया आयोग 2007 मध्ये स्थापन झाला व 2010 मध्ये त्यांचा अहवाल आला. 2010 नंतर त्याची अंमलबजावणी सुरु झाली. 2010 नंतर सर्वोच्च न्यायालयाने ठरवून दिलेल्या निर्देशाप्रमाणे याबाबत राज्य सरकारचे काम चालू आहे. पत्रकारांनी केलेल्या लेखी तक्रारींचे समाधान झाले आहे व पत्रकारांना लेखी कळविल्याबाबतच्या नोंदीही कामगार विभागात आहेत. यानंतरचा विषय आज मांडला गेलेला आहे की, काही आस्थापना मजिठिया आयोगाची अंमलबजावणी करीत नाहीत. त्यांची यादी माझ्याकडेही आहे. सन्माननीय सदस्यांकडूनही मी काही माहिती घेतो. याबाबत बैठक घेऊन पुढील कार्यवाही करण्यात येईल.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांना बीकेसी मधील वृत्तपत्र समुहाच्या असलेल्या भूखंडाबाबत मी सांगू इच्छितो की, मी आता सांगितल्याप्रमाणे येत्या आठ दिवसात याबाबतची बैठक झाल्यानंतर त्यांच्याकडून समाधानकारक उत्तर आले नाही तर त्याबाबत पुढील कारवाई करण्यात येईल.

.....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**महात्मा ज्योतीबा फुले यांची 125 वी पुण्यतिथी साजरी करणेबाबत**

डॉ.संजय कुटे : अध्यक्ष महोदय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची 125 वी जयंती आपण महाराष्ट्रात मोठया प्रमाणावर साजरी करीत आहोत. त्यांच्याबद्दलचा आदर महाराष्ट्रातून व्यक्त होत आहे. याचबरोबर महात्मा ज्योतीबा फुले यांचेही शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील कार्य सर्वांना माहिती आहे. ते बहुजन समाजासह सर्वांना आदरणीय आहेत. हे त्यांचे 125 वे पुण्यतिथीचे वर्ष आहे. सभागृहात मुख्यमंत्री महोदय उपस्थित आहेत. काही ठिकाणी लोक संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे महात्मा ज्योतीबा फुले यांची 125 व्या पुण्यतिथीनिमित्त शासनाने काही धोरण आखून त्याप्रमाणे कोणते कार्यक्रम घेणार आहे याची माहिती सदनामध्ये दिली गेली तर योग्य होईल असे मला वाटते.

श्री.देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, मी सभागृहाला परवाही सांगितले व आजही अतिशय स्पष्टपणे सांगतो की, राज्यामध्ये आपण नेहमी जयंती साजरी करतो पण महापुरुषांच्या पुण्यतिथीही आपण काही प्रमाणात साजऱ्या करतो. महात्मा ज्योतीबा फुले हे खऱ्या अर्थाने परिवर्तनाचे जनक होते. स्त्री शिक्षणाची सुरुवात करुन रुढी, प्रथा व परंपरा मोडीत काढण्याकरिता त्यांनी कार्य केलेले आहे. सामान्य शेतकरी त्या काळात सावकाराकडून नागवला जात होता म्हणून त्यांनी शेतकऱ्याचे आसूड आपल्यासमोर आणले. मला वाटते की, हे व्यक्तिमत्व खऱ्या अर्थाने मोठे आहे म्हणून राज्य सरकार त्यांच्या 125 च्या पुण्यतिथीच्या निमित्ताने बृहत कार्यक्रम हातामध्ये घेईल. या पुण्यतिथीच्या माध्यमातून त्यांचे विचार सामान्य माणसांपर्यत पुन्हा एकदा गेले पाहिजेत, पोहचले पाहिजेत, ते रुजले पाहिजेत याकरिता राज्य सरकार प्रयत्न करील. एवढेच नव्हे तर राज्य सरकार या निमित्ताने केंद्र सरकारला महात्मा ज्योतीबा फुले यांना भारतरत्न दिले पाहिजे याची शिफारस देखील पाठवेल.

श्री.शशिकांत शिंदे : अध्यक्ष महोदय, मी मुख्यमंत्री महोदयांचे अभिनंदन करतो. त्यांनी भारतरत्न पुरस्कार महात्मा ज्योतीबा फुले यांना देण्याबाबत शिफारस करण्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय आज सभागृहामध्ये एकमताने होत असताना कालच मी व माननीय गटनेते

श्री.शशिकांत शिंदे .....

श्री.जयंत पाटील मिळून सन्माननीय सदस्य श्री.छगन भुजबळ यांचे निवेदन माननीय मुख्यमंत्री यांना देऊन आलो होतो. सन्माननीय सदस्य श्री.छगन भुजबळ यांनीही आशा व्यक्त केली होती की, या महापुरुषाचा विसर पडू नये व पुण्यतिथीच्या निमित्ताने कार्यक्रम घेण्यात यावा. आता मुख्यमंत्री महोदयांनी जाहिर केल्याबाबत मी त्यांचे आभार व्यक्त करतो.

श्रीमती मनिषा चौधरी : अध्यक्ष महोदय, मी मुख्यमंत्री महोदयांचे अभिनंदन करते की, शासन क्रांतीसूर्य महात्मा ज्योतीबा फुले यांची पुण्यतिथी साजरी करीत आहे. परंतु मी विनंती करते की, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनासुध्दा भारतरत्न मिळावा. क्रांतीसूर्य महात्मा ज्योतीबा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना मरणोत्तर भारतरत्न देण्याची शिफारस केंद्र सरकारकडे करावी अशी मी विनंती करते.

श्री.राधाकृष्ण विखे पाटील : अध्यक्ष महोदय, मुख्यमंत्री महोदयांनी महात्मा ज्योतीबा फुले यांना भारतरत्न देण्याचा प्रस्ताव मांडलेला आहे याकरिता मी त्यांचे अभिनंदन करतो. त्यांनी आज अतिशय महत्वाचे पाऊल टाकलेले आहे. महात्मा ज्योतीबा फुले यांचे 125 वे पुण्यतिथी वर्ष आपण साजरे करीत आहोत. ते खऱ्या अर्थाने समाजपरिवर्तनाचे पाईक होते हे म्हणणे योग्य आहे. त्यांच्या विचाराचा प्रचार व प्रसार आजच्या तरुण पिढीमध्ये व्हावा याकरिता राज्य शासन काही विशेष पावले उचलणार आहे. मला वाटते की, शासनाने योग्य दिशेने पाऊल टाकलेले आहे. भारतरत्नबाबत आपण जो सभागृहात प्रस्ताव मांडलेला आहे तो सभागृहाचा ठराव समजून आपण केंद्र सरकारला शिफारस करावी अशी विनंती करतो व आपले पुन्हा एकदा अभिनंदन करतो.

श्री.जितेंद्र आव्हाड : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.पृथ्वीराज चव्हाण हे मुख्यमंत्री असताना महात्मा ज्योतीबा फुले यांच्या स्मारकाकरिता 10 एकराचा भूखंड मान्य ठेवला होता. त्यावेळी माननीय श्री.एकनाथराव खडसे हे विरोधी पक्ष नेते असताना त्यांनी याबाबत मागणी केली होती.

श्री.देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, सदरहू बाब तपासून पाहण्यात येईल व सकारात्मक निर्णय घेण्यात येईल.

-----

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

13-04-2016 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) CC-4

PNG/ AKN/ AKN/ MMP/ MMP/ 14:50

**पृ. शी.** : पाटण जि.सातारा येथील तारळी मध्यम धरण प्रकल्पाच्या कॅनॉलचा फायदा होत नसणे

**मु. शी. :** पाटण जि.सातारा येथील तारळी मध्यम धरण प्रकल्पाच्या कॅनॉलचा फायदा होत नसणे या संबंधी श्री.शंभूराज देसाई वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. शंभूराज देसाई (पाटण) : अध्यक्ष महोदय, मी नियम 105 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय जलसंपदा मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

***"पाटण*** जि.सातारा मधील ***कृष्णा खोरे विकास महामंडळांतर्गत*** कार्यान्वित करण्यात आलेला ***तारळी मध्यम धरणप्रकल्प, या धरणाच्या माध्यमातून तारळी नदीच्या दोन्ही तीरावर धरणातील पाणी*** पाटण ***मतदारसंघाच्या बाहेर नेण्याकरीता एक्सप्रेस कॅनॉलचे कामही सध्या सुरु करण्यात येणे, या विभागातील धरणग्रस्तांना व शेतकऱ्यांना एक्सप्रेस कॅनॉलचा कोणताही फायदा होत नसून या शेतकऱ्यांच्या केवळ ५० मीटरच्या आतील क्षेत्रास पाणी मिळत असल्याने ५० मीटर उंचीच्या वरील व डोंगरपायथ्यापर्यंतचे क्षेत्रास पाणी मिळावे अशी या विभागातील शेतकऱ्यांची राज्य शासनाकडे*** असलेली मागणी, ***या मागणीसाठी विभागातील धरणग्रस्तांनी व शेतकऱ्यांनी अनेकदा*** केलेले ***आंदोलन, कृष्णा खोरे विकास महामंडळ हे तारळी विभागातील शेतकऱ्यांवर अन्याय करीत असणे, याबाबत*** राज्य मंत्री, ***जलसंपदा विभाग तथा सातारा जिल्ह्याचे पालकमंत्री यांनी सदर प्रकल्पाचा पाहणी दौरा करुन अधिकाऱ्यांच्या समवेत धरणग्रस्त व शेतकऱ्यांची*** घेतलेली ***बैठक, या बैठकीमध्ये या विभागातील शेतकऱ्यांच्या ५० मीटर उंचीच्या वरील व डोंगरपायथ्यापर्यंतचे क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळवून देण्याकरिता अधिकाऱ्यांनी तातडीने यासंदर्भातील प्रस्ताव व आवश्यक निधीचा अहवाल राज्य शासनाकडे सादर करावा असे सुचित करण्यात येणे, यासंदर्भात कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांकडून कोणताही अहवाल राज्य शासनाकडे सादर केला नसल्याने शेतकऱ्यांमध्ये*** पसरलेली ***नाराजी, याबाबत शासनाने*** करावयाची कार्यवाही ***व*** शासनाची प्रतिक्रिया."

श्री.गिरीष महाजन (जलसंपदा मंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**अध्यक्ष** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शंभुराज देसाई : अध्यक्ष महोदय, या लक्षवेधीच्या माध्यमातून एका अत्यंत महत्त्वाच्या प्रश्नाकडे मी माननीय मंत्री महोदयांचे लक्ष वेधतो. माझ्या मतदारसंघातील तारळी येथे एक धरण आहे. या धरणाचे काम पूर्ण झालेले आहे आणि या धरणातील पाणी संबंधित शेतक-याला देण्यासाठीची कार्यवाही सुरु झालेली आहे. हे धरणातील पाणी सात ठिकाणी उपसा जलसिंचन योजना करुन शेतक-यांना 50 मीटर उंचीपर्यंतच देण्याची तरतूद आराखडयामध्ये आहे. या सात योजनांपैकी दोन योजना पूर्ण झाल्या आणि पाच योजना अपूर्ण आहेत. पूर्ण झालेल्या दोन योजनाही संपूर्ण क्षमतेने चालत नाहीत. अद्यापहि त्या दोन योजनांचे पाणी शेतक-यांना मिळालेले नाही. ही लक्षवेधी सूचना लागल्यानंतर चार-पाच दिवसापूर्वी त्याची ट्रायल घेतलेली आहे. पूर्वीच्या आराखडयामध्ये 50 मीटरच अंतरापर्यंत पाणी देण्याची केलेली तरतूद चुकीची आहे. या 50 मीटरच्या पाण्याअंतर्गत त्या विभागातील केवळ 23 टक्के क्षेत्र भिजत आहे आणि 77 टक्के क्षेत्र जिराईत राहत आहे. मी अनेक माध्यमातून याकरिता प्रयत्न केला. 50 मीटर हेडच्या वरचे जे 77 टक्के क्षेत्र आहे, त्याकरिताही शासन जे उपसा सिंचन करणार आहे, त्याचा दुसरा टप्पा करुन शेतक-यांना पाणी देणार का ? दिनांक 09 डिसेंबर,2010 रोजी कृष्णा खोरे महामंडळाच्या कार्यकारी संचालकांनी पत्र दिलेले आहे की, पाटण तालुक्यातील तारळी प्रकल्पाच्या सध्याच्या नियोजनानुसार लाभ क्षेत्रात न येणा-या 50 मीटरवरील उंचीवरील क्षेत्रास एआयबीपीव्यतिरिक्त शासन खर्चाने पाणी देण्याबाबतच्या प्रस्तावावर कार्यवाही करण्यात येत आहे. दुस-या पत्रामध्ये असे म्हटलेले आह की, दिनांक 07.1.2011 रोजी....(अडथळा )....

**अध्यक्ष :** सन्माननीय सदस्य मी आपल्याला डिस्टर्ब करत नाही. परंतु मंत्री महोदयांना ज्यावेळी ब्रिफींग दिले जाते, त्यावेळी त्यांना हे संदर्भ सांगितले जातात. सन्माननीय सदस्यांनी नेमके प्रश्न विचारुन मंत्री महोदयांकडून नेमके उत्तर घ्यावे.

श्री.शंभुराज देसाई : शासनाने हे मान्य करुन तीन-चार वर्ष झाले तरीही त्यावर कार्यवाही केलेली नाही. दुस-या पत्रामध्ये म्हटलेले आहे की, माननीय मंत्री जलसंपदा यांच्या अध्यक्षतेखाली 15.1.2011 रोजीच्या बैठकीमध्ये तारळी प्रकल्पावर चर्चा झाली होती. खो-यातील 50 मीटर उंचीच्या भागातील शेत जमिनीस एआयबीपीव्यतिरिक्त शासन खर्चाने पाणी देण्याचे मान्य केलेले

....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शंभुराज देसाई....

आहे. दोन्हीही पत्रात शासनाने हे मान्य केलेले आहे. शासन खर्चाने 50 मीटर वरच्या क्षेत्राला पाणी देण्यात येणार आहे का ? देत असल्यास किती दिवसात हे काम पूर्ण केले जाईल ?

श्री.गिरीष महाजन : अध्यक्ष महोदय,सन्माननीय सदस्यांच्या मतदारसंघातील हा प्रकल्प आहे. मंजूर प्रकल्प अहवालामध्ये 0.83 अब्ज घनफूट पाण्याची तरतूद आहे. 2164 हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आणणे प्रस्तावित आहे. 50 मीटरच्या वरचे पाणी उचलणार का ? असा सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला होता. 2164 हेक्टर क्षेत्राकरिता 0.83 अब्ज घनफुट इतके पाणी 50 मीटरच्या आतील आहे. 50 मीटरच्या वरचे पाणी सन्माननीय सदस्यांच्या मतदारसंघात मिळाले पाहिजे. मूळ प्रस्तावामध्ये अशी कोणतीही तरतूद नाही. परंतु सन्माननीय सदस्यांच्या आग्रहास्तव मागील बैठकीमध्ये अधिका-यांना सूचना देण्यात आल्या होत्या. अतिरिक्त क्षेत्र सर्वेक्षण, सुक्ष्मसिंचनाचा पर्याय काढणे आणि उपलब्ध पाण्यात धरणाचे नियोजन झालेले आहे. आपल्याला सुक्ष्म सिंचन करुन पाणी वाचविता येईल का ? अतिरिक्त पाणी मिळत आहे का सर्वे व सर्वेक्षण झालेला आहे. आपल्या भागातील 1368 हेक्टर क्षेत्र सिंचनापासून वंचित आहे. 0.83 अब्जघनफूट पाण्यातून किती क्षेत्र सिंचनाखाली येऊ शकते, याचा अभ्यास केला आहे. त्यातून 33.87 अब्ज घनफूट पाणी वाचू शकते. त्याकरिता कसरत करावी लागेल. सुक्ष्मसिंचनाच्या माध्यमातून हे पाणी वाचविले तर त्याप्रामणे कार्यवाही करता येईल. 09 डिसेंबर व 7 जानेवारीला याबाबतचे पत्र दिलेले आहे. हेखरे आहे की, यासंदर्भातील पत्रामध्ये तपासण्यात येईल, पाहण्यात येईल या संदर्भातही सर्वेक्षण झालेले आहे, त्याचा अहवाल आलेला आहे. लवकरात लवकर या बाबतीमध्ये निर्णय घेण्यात येईल. हा व्याप्तीतील बदल आहे, त्याकरिता शासनाची व एमडब्ल्यूआरआरआयची परवानगी घ्यावी लागेल. व्याप्तीतील बदल असल्यामुळे परत सुप्रमाचा प्रश्न येईल. याकरिता तत्काळ सुप्रमा घेऊन प्रकल्प लवकरात लवकर मार्गी लावण्याचा प्रयत्न केला जाईल.

श्री.बाळासाहेब पाटील : अध्यक्ष महोदय,या चार योजना पूर्ण झालेल्या आहेत. असे म्हटले जाते की पाल आणि इंदूल योजना कराड मतदारसंघामध्ये आहे. चुकीची माहिती आहे की, या योजनांची टेस्टींग घेतलेली आहे. या योजना सुरु नाहीत. या पाण्यामध्ये आपण म्हणत आहात तेवढे क्षेत्र भिजू शकत नाही. .....3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.बाळासाहेब पाटील....

कारण या योजनांच्या पोटपाटयाची कामे अपूर्ण असून ती पूर्ण केव्हा होणार ? हा सर्वात महत्त्वाचा प्रश्न असा आहे की, 50 मीटरपर्यंत पाणी दिले गेलेले आहे. जमिनी घेत असताना राज्य शासनाने 50 मीटरच्या वरच्या जमिनी घेतल्या होत्या. काही ठिकाणी 50 मीटरच्या वरच्या क्षेत्रात प्रकल्पग्रस्ताना जमिनी देण्यात आल्या, त्यांनाही अद्याप पाणी दिलेले नाही. ज्यांच्या जमिनी घेतल्या त्यांनाही पाणी दिलेले नाही. 50 मीटरवरच्या लोकांना व इतर लोकांना पाणी देण्याची व्यवस्था होणार आहे का ?

श्री.गिरीष महाजन : अध्यक्ष महोदय,मूळ नियोजन करताना 50मीटरच्या आतील नियोजन केलेले होते. मूळ नियोजनामध्ये 50 मीटरवरील पाणी आणण्याचे नियोजन केलेले नव्हते. पाण्याची बचत करुन प्रकल्पाकरिता शेतक-यांच्या जमिनी घेतल्या गेलेल्या आहेत. मूळ नियोजन करीत असताना प्रकल्प अहवालामध्ये 50 मीटरच्या वरचे पाणी उचलावे अशी तरतूद नाही. 50 मीटरच्या खालचे पाणी उचलावे अशी तरतूद होती. याबाबतचे सर्वेक्षण केलेले आहे. निश्चित त्या ठिकाणी पाणी वाचवावे लागणार आहे. ड्रिप इरिगेशनच्या सहाय्याने पाणी वापरले तर 33-34 टक्के पाण्याची बचत केलेली आहे. 1200 हेक्टरला पाणी देता येईल, त्यातील अडचण एवढीच आहे की, शासनाकडून परवानगी घ्यावी लागणार आहे. ती परवानगी लवकरात लवकर देण्यात येईल. या संबंधीचा सर्वेक्षण अहवाल आमच्याकडे आलेला आहे. याकरिता एमडब्ल्यूआरआरआयकडे जाणे आवश्यक आहे. तसेच, यासंदर्भात एसटीसीकडे परवानगीकरिता जावे लागणार आहे. शासन स्तरावर याकरिता परवानगी मिळेल. ही परवानगी घेऊन लवकरात लवकर काम सुरु करण्याची कार्यवाही सुरु करण्यात येईल.

श्री.अनिल बाबर : अध्यक्ष महोदय,मंत्री महोदयांनी उत्तरामध्ये असे सांगितले की, या 50मीटरच्या वरच्या भागामध्ये पाणी देण्याच्या दृष्टीने त्या प्रकल्पाला सुधारित प्रशासकीय मान्यता देणे आवश्यक आहे, असे त्यांनी सांगितले. त्या धरणाचे काम 99 टक्के काम पूर्ण झालेले आहे. त्यांनी जे सांगितले त्याप्रमाणे ठिबकवर ती योजना गेल्यावर पाणी शिल्लक राहत असले तर 50

.....4

श्री.अनिल बाबर....

मीटरच्या वर पाणी देण्याकरिता स्वतंत्र योजना करुन सुधारित प्रशासकीय मान्यतेऐवजी केवळ शासनाची 50 मीटरच्या वर प्रकल्प करण्याची परवागनी घेऊन स्वतंत्र योजना करण्यात येईल का ?

श्री.गिरीष महाजन : अध्यक्ष महोदय,मी आधीच सांगितले की, मूळ नियोजनामधील हा बदल आहे. याकरिता एमडब्ल्यूआरआरआयची परवानगी घ्यावी लागणार आहे. याकरिता एसटीसीची परवानगी घेऊन योजनेला मंजूरी देण्यात येईल.

श्री.शंभुराज देसाई : अध्यक्ष महोदय, शासनाने यापूर्वी प्रकल्पाचा आराखडा केला त्याच्यामध्ये 50 मीटरच्या वरचा उल्लेख नव्हता. याबाबत पूर्वीच्या लोकांनी चूका केलेल्या असल्या तरीही त्या दुरूस्त करणे आवश्यक आहे. शासनाने तत्काळ या 50 मीटरच्या वरच्या लोकांच्या लोकांना पाणी देण्यात येईल, हे शासनाने मान्य केलेले आहे. 2010-2011 मधील शासकीय पत्रामध्ये शासन खर्चाने पाणी देऊ असे मान्य केलेले आहे. या भागामध्ये शासन किती दिवसात हे पाणी देणार ? याकरिता शासनाची वा इतर कोणाची मान्यता घ्यावयाची असेल तर तीही घेण्यात यावी. कारण हे जे पाणी बाहेर नेण्याचे काम तेथील लोकांनी मोठया प्रमाणात थांबविले होते. आपले सहकारी आमच्या जिल्हयाचे पालकमंत्री महोदय आले होते, त्यांनी लोकांना समजावून सांगितले होते. केवळ 6000 हेक्टर क्षेत्राचा हा प्रश्न आहे. या संदर्भात तांत्रिक बाबींमध्ये न जाता पाणी नियोजनाचा कालबध्द कार्यक्रम आखला पाहिजे. जलसंपदा खाते वर्ष - दीड वर्ष चांगल्या पध्दतीने काम सांभाळत असल्याचे दिसून येत आहे. तसेच, कामांचे रिझल्टही आम्ही बघत आहोत.

ईई-1/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**( अध्यक्षस्थानी माननीय तालिका सभाध्यक्ष श्री. योगेश सागर )**

श्री. शंभुराज देसाई.......

त्यामुळे एक वर्षाच्या आत सर्व बाबी पूर्ण करुन शेतीला पाणी देण्याचा निर्णय घेतला जाणार आहे.

श्री. गिरीश महाजन : अध्यक्ष महोदय, सदर योजना एक वर्षाच्या आत मार्गी लावली जाणार आहे. सन्माननीय सदस्यांचा माझ्यावर विश्वास आहे काय ?

श्री. पृथ्वीराज चव्हाण : अध्यक्ष महोदय, उंच भागात राहणाऱ्या लोकांना पाणी दिले जाईल काय ?

श्री. गिरीश महाजन : अध्यक्ष महोदय, होय. मी वरील भागात पाणी देण्याबाबत माहिती दिलेली आह.

**तालिका सभाध्यक्ष ( श्री. योगेश सागर )** : ठीक आहे. आता लक्षवेधी सूचना क्रमांक 7 चर्चेला घेण्यात येईल.

-------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : एरंडोल तालुक्यातील, जिल्हा जळगाव, अंजनी धरणामुळे सोनबर्डी, हनुमंतखेडा व मालचे या गावांना नागरी सुविधा उपलब्ध न होणे

**मु.शी.** : एरंडोल तालुक्यातील, जिल्हा जळगाव, अंजनी धरणामुळे सोनबर्डी, हनुमंतखेडा व मालचे या गावांना नागरी सुविधा उपलब्ध न होणे यासंबंधी डॉ. सतीश पाटील, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

डॉ. सतीश पाटील ( एरंडोल ) : अध्यक्ष महाराज, मी नियम 105 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मदत व पुनर्वसन मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"एरंडोल तालुक्यातील (जि.जळगाव) अंजनी धरणामुळे सोनबर्डी, हनुमंतखेडा व मालचे ही गावे विस्थापित होणे, सदर गावे पुनर्वसित म्हणून जाहिर होणे, सदरच्या गावांना आजपर्यंत पुनर्वसनाचा लाभ न मिळणे, सदर धरणामुळे विस्थापित झालेल्या गावांचे पुनर्वसन व आवश्यक रस्ता, शाळा, पाणी व आरोग्य इ. नागरी सुविधा अद्याप उपलब्ध करून दिल्या नसल्याने ग्रामस्थांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत असणे, दरवर्षी या गावांना पुराच्या पाण्याचा वेढा पडणे, राहत्या घरात पुराचे पाणी घुसणे, सदर गावाचे आवश्यक त्या प्राथमिक सुविधांसह पुनर्वसन त्वरीत करण्याबाबतचे निवेदन ग्रामस्थांनी सर्व संबंधित अधिकाऱ्यांकडे दिले असतानाही त्याकडे संबंधितांनी केलेले दुर्लक्ष, आधी पुनर्वसन मग धरण असे शासनाचे धोरण असतानाही या गावाच्या बाबतीत मात्र तसे होत नसणे, पुनर्वसन न झाल्यास ग्रामस्थांनी वेळोवेळी आंदोलनाचा दिलेला इशारा तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिलेली उपोषणाची नोटीस, या सर्व बाबींकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, या प्रकरणी त्वरीत पुनर्वसनाचा प्रश्न सोडविण्याकरीता शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. एकनाथराव खडसे ( महसूल मंत्री ) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभाध्यक्ष** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( **प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे )

--------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. सतीश पाटील : अध्यक्ष महोदय, माननीय पीठासीन अधिकाऱ्यांनी मला पार्श्वभूमी सांगण्याठी 5 मिनिटांचा अवधी द्यावा अशी विनंती करीत आहे. माझ्या मतदारसंघात अंजनी मध्यम प्रकल्प आहे. या धरणास 1974 मध्ये मंजुरी मिळाली होती. सदर धरण सन 2008 मध्ये पूर्ण झालेले आहे. धरणामुळे एकूण 5 गावे बाधित झालेली आहेत. या 5 गावांपैकी 2 गावांचे पुनर्वसन झालेले असून, त्या गावांना सर्व मूलभूत सुविधा मिळालेल्या आहेत. सोनबर्डी, हनमनखेडा आणि मालचे अशी तीन गावे बाधित असून, त्यांना आजतागायत न्याय मिळालेला नाही. या विषयी मी अनेक वेळा संबंधितांबरोबर चर्चा आणि धरणे आंदोलने केलेली आहेत. मी आमदार या नात्याने संबंधित जिल्हाधिकारी यांना 3 गावांच्या पुनर्वसनाचा प्रश्न तत्काळ सोडविला नाही तर आमरण उपोषणास बसणार असे पत्र दिले होते. त्यानंतर दिनांक 30-10-2015 रोजी या विषयी संबंधितांबरोबर एक बैठक झाली होती. त्यानुसार दिनांक 27-11-2015 रोजी जिल्हाधिकारी यांनी जलसंपदा विभागाकडे प्रस्ताव पाठविला होता. माननीय महसूल मंत्री हे ज्याप्रमाणे दोन गावांचे पुनर्वसन झाले, त्याच धर्तीवर उपरोक्त संबंधित तीन गावांच्या पुनर्वसनाचा प्रश्न सोडवतील काय, असा माझा त्यांना प्रश्न आहे.

अध्यक्ष महोदय, अंजनी मध्यम प्रकल्पाच्या संदर्भात शासनाची कोणती भूमिका आहे ?

श्री. एकनाथराव खडसे : अध्यक्ष महोदय, अंजनी धरणाच्या कामाला मंजुरी मिळाल्यानंतर धरणाची उंची निश्चित करण्यात आली होती आणि त्यानंतर कामाला सुरुवात झाली होती. त्यावेळी धरणाच्या उंचीमध्ये वाढ करावी अशा प्रकारची मागणी स्थानिक लोकांनी केल्यामुळे धरणाची उंची वाढविण्यासंदर्भातील प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. अंजनी धरणाची उंची वाढविली तर आजुबाजूची गावे पाण्याखाली जाण्याची शक्यता होती. संबंधित गावांच्या पुनर्वसनाच्या संदर्भात मोजनी केली नव्हती. पण त्यांना पुनर्वसनाच्या यादीमध्ये घेण्यात आले होते. धरणाची उंची वाढविली तर जी गावे पाण्याखाली जाणार होती, अशा गावांचा पुनर्वसनाच्या यादीमध्ये समावेश करण्यात आला होता. सदर निर्णय 15 ते 16 वर्षापूर्वी घेण्यात आला होता. धरणाची एक मिटरने जरी उंची वाढविली तर 450 कोटी रूपयांचा अंदाजित खर्च येणार होता. अशा प्रकारचा प्राथमिक अंदाज वर्तविल्यामुळे सदर धरणाची उंची वाढविण्यासंदर्भातील प्रस्ताव तात्पुरता स्थगित करण्यात

.....4....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. एकनाथराव खडसे.......

आला होता. 15 ते 16 वर्षापासून संबंधित गावे पाण्याखाली येत असल्यामुळे, पुनर्वसन होत असल्यामुळे नव्याने काही मूलभूत सुविधा देता येत नव्हत्या. अशा प्रकारे विचित्र अवस्था संबंधित गांवाची झाली होती. संबंधित गावांचे पुनर्वसन होत नसेल तर अशा गावांमध्ये पूर्ण नागरी सुविधा देण्याबाबत राज्य शासन निर्णय घेणार आहे. धरणाचे पाणी आजुबाजूच्या गावांमध्ये येऊन हानी होत असेल तर नियोजित ठिकाणी संरक्षक भिंत बांधून गावाला संरक्षण देण्याबाबत राज्य शासन त्यासंदर्भातील निर्णय घेण्यासाठी पाटबंधारे विकास महामंडळाकडे प्रस्ताव पाठविणार आहे. काही ठिकाणी पाण्यामुळे रस्ते बुडत आहे, असे लक्षात आल्यानंतर अशा रस्त्यावरील पूलाचे बांधकाम करण्यासाठी परवानगी द्यावी याकरिता पाटबंधारे नियमाक विकास महामंडळाकडे प्रस्ताव पाठविण्यात येईल.

डॉ. सतीश पाटील : अध्यक्ष महोदय, गेल्या 20 वर्षात बाधित गावातील लोकांना न्याय मिळालेला नाही. धरणाची उंची वाढविणे ही खर्चीक बाब आहे, असे महसूल मंत्री महोदयांनी उत्तर दिलेले आहे. धरणाची मंजुरी मिळाल्यानंतर उंचीच्या संदर्भात निर्णय घेण्यात आलेला होता. आता यासंदर्भात राज्य शासनाकडून पाटबंधारे नियमाक विकास महामंडळाकडे प्रस्ताव पाठविला जाणार आहे. 20 वर्षापूर्वी संबंधित 3 गावांना पुनर्वसित घोषित केल्यामुळे गावामध्ये शाळा, अंगणवाडी, रस्ते आणि दवाखाने नाहीत. तसेच या गावातील लोकांना खरेदी विक्री देखील करता येत नाही. संबंधित गावांवरील पुनर्वसनाचा जो शिक्का मारलेला आहे, तो तत्काळा काढून घेण्याबाबत महसूल मंत्री निर्णय घेतील काय ? संबंधित तीन गावे पुनर्वसनात नाही, असा निर्णय महसूल मंत्री घेतील काय ? संबंधित गावांमध्ये संरक्षक भिंत, रस्त्यावर पूल, शाळा, इमारती आणि अल्पभुधारक शेतकऱ्यांना मूलभूत सुविधा देण्यासंदर्भात महसूल मंत्री आजच्या आज निर्णय घेतील काय आणि संबंधित बाधित गावांमध्ये किती दिवसांमध्ये सुविधा दिल्या जाणार ?

श्री. एकनाथराव खडसे : अध्यक्ष महोदय, शासनाने त्यासंदर्भातील प्रस्ताव तयार केलेला आहे. तापी पाटबंधारे महामंडळाच्या नियामक मंडळाकडे प्रस्ताव पाठविण्यात आलेला आहे. नियामक मंडळाची बैठक केव्हा घ्यायची याबाबतची तारीख निश्चित झालेली नाही. नियामक

.......5....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. एकनाथराव खडसे.......

मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार पुढील अंमलबजावणी केली जाणार आहे. तापी पाटबंधारे महामंडळाच्या नियामक मंडळाबरोबर चर्चा करुन सदर प्रस्ताव मंजूर करण्यात यावे, यासाठी मी स्वत: सूचना देणार आहे. पुनर्वसन विभागाच्या माध्यमातून संबंधित गावांना ज्या काही सोयी-सुविधा अनुज्ञेय आहेत, त्या 100 टक्के दिल्या जातील.

श्री. दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, सदरहू प्रश्न जळगाव जिल्ह्यांतील एरंडोल तालुक्याशी संबंधित असली तरी तो केवळ एकट्या जिल्ह्यापुरता मर्यादित प्रश्न नाही. सभागृहात माननीय महसूलमंत्री आणि माननीय मुख्यमंत्री उपस्थित आहेत. मी सरकारकडे धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी प्रश्न विचारणार आहे. शासनाने राज्यातील जेवढे सिंचनाचे प्रकल्प हाती घेतलेले आहेत, अशा ठिकाणच्या संबंधित विस्थापितांचा प्रश्न अतिशय गंभीर झालेला आहे. पूर्वीच्या काळात मदत व पुनर्वसन विभागाकडून सुविधा उपलब्ध करुन दिल्या जात होत्या. मधल्या काळात त्यामध्ये बदल करुन सर्व सुविधा देण्याची जबाबदारी संबंधित प्रोजेक्टवर निश्चित केली होती. आता प्रोजेक्टने हा पैसा खर्च करायचा असल्यामुळे आणि सुप्रमा नसल्यामुळे, निधी नाही, अनुषेशाचा प्रश्न या आणि अशा अनेक कारणांमुळे संबंधित प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न मार्गी लागले नाहीत. शासनाने पुनर्वसनाचा कायदा केलेला आहे.

FF-1.......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दिलीप वळसे-पाटील....

माझा प्रश्न पाईंटेड आहे. हा एखाद्या गल्लीतला प्रश्न नसून राज्याचा व्यापक प्रश्न आहे. ही धोरणात्मक बाब संपूर्ण राज्याला लागू होईल. शासनाने "मेक इन इंडिया", "स्मार्ट सिटी" योजना जाहिर केलेली आहे. याप्रमाणे राज्यातील सिंचनाच्या सुविधा वाढविण्याच्या दृष्टीकोनातून तसेच प्रकल्पबाधितांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी सर्वंकष असे नवीन धोरण तयार करण्यासाठी शासन प्रयत्न करणार आहे काय? मी आपणास एक उदाहरण सांगतो. जेवढी गावे विस्थापित झालेली आहेत, त्यांचे नव्याने पुनर्वसन झालेले आहे. अनेक वर्षापासून त्यांच्या ग्रामपंचायती स्थापन झालेल्या नाहीत. हे सर्व प्रश्न एकत्रित करुन जुलै महिन्याच्या अधिवेशनात प्रकल्पग्रस्तांची होणारी परवड थांबविण्यासाठी सरकार काही उपाययोजना करणार आहे काय, याबाबत मंत्री महोदय कृपया खुलासा करतील काय?

श्री.एकनाथराव खडसे : अध्यक्ष महाराज, सन्माननीय सदस्यांनी विचारलेला प्रश्न हा पुनर्वसनासंदर्भातील व्यापक आहे त्यामुळे उत्तर द्यायला वेळ लागेल. प्रकल्पबाधितांचा हा अनुशेष नाही. अनुशेषाच्या बाहेर हे प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन आहे. सन 1976 पूर्वीचे जे प्रकल्प आहेत त्यांच्या पुनर्वसनासाठी शासनाने एक नवीन धोरण जाहिर केलेले आहे. 1976 पूर्वीच्या प्रकल्पबाधितांकडून नागरी सोई सुविधा देण्यासाठी काही मर्यादा येत होती. प्रकल्प खर्चाच्या पाच टक्के एवढी तरतूद पुनर्वसनासाठी करण्याचा नियम असल्यामुळे 1976 पूर्वीच्या प्रकल्पबाधितांना तो लागू करावा अशी मागणी होती. 1976 पूर्वीच्या प्रकल्पग्रस्तांच्या ज्या सुविधा राहिलेल्या आहेत, त्यासंदर्भात राज्य शासनाने धोरण आखलेले आहे. सन 1976 पूर्वीच्या प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन वेगाने होण्यासाठी पैसे उपलब्ध करुन दिलेले आहेत. जशी मागणी आहे तसे पैसे उपलब्ध करुन दिलेले आहेत. आपण जे प्रकल्प सांगत आहात ती कामे पूर्वी जिल्हा परिषदेकडे होती, परंतु त्यांच्यासंदर्भात मोठ्या प्रमाणात तक्रारी येत होत्या. त्यामुळे ही कामे अपूर्ण राहिली होती. काही कामे निधीअभावी आणि काही कामामध्ये गैरव्यवहार, भ्रष्टाचार झालेला होता म्हणून ही कामे रखडलेली होती. यापुढे प्रकल्पामध्येच प्रकल्पबाधितांचा खर्च समाविष्ट करणार आहोत. जशी प्रोजेक्ट कॉस्ट वाढेल त्याप्रमाणे ही पाच टक्के रक्कमही वाढेल. आता पुनर्वसन करीत असतना प्रकल्पाच्या खर्चाधून ते पुनर्वसन करायला सुरुवात झाली आहे.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे....

जिल्हापरिषदेकडील काम काढून प्रकल्पाकडे देण्यात आलेले आहे. पुनर्वसन खाते कधीही स्वतः काम करीत नव्हते तर इरिगेशन खाते काम करीत होते. पूर्वी जिल्हा परिषदेचे बांधकाम खाते आणि इरिगेशन विभाग काम करीत होते. प्रकल्पग्रस्तांच्या 18 नागरी सुविधांमध्ये आता वाढ करण्यात आलेली आहे. जस जशी मागणी येईल तस तसा कालबध्द कार्यक्रम आखण्यात येईल. यामध्ये अनेक अडचणी आहेत. जमीन संपादनची अडचण, गावातील स्थानिक अडचणी, गावातील लोकांचे स्थलांतर, काही लोक जायला विलंब करतात म्हणून पुनर्वसनाचे काम रखडते. या लोकांचे पुनर्वसन केल्यानंतरही टप्प्या टप्प्याने स्थलांतर होते त्यामुळे विलंब लागतो म्हणून प्रकल्पाची कॉस्टही वाढते. काही ठिकाणी प्रकल्पबाधितांना पर्यायी जमीन देणे, प्रकल्पग्रस्तांना नोकरी देणे असे वेगवेगळे प्रश्न आहेत. या प्रकल्पबाधितांच्या पुनर्वसनासाठी अधिवेशनामध्ये दोन तीन तासाची चर्चा उपस्थित करुन त्यासंदर्भात धोरणात्मक निर्णय राज्य सरकारला घेता येईल. यासंदर्भात सन्माननीय सदस्यांच्या सूचनांचा निश्चितपणे विचार करुन प्रकल्पग्रस्तांना प्राधान्याने न्याय देण्याचा प्रयत्न केला जाईल.

डॉ.सतीश पाटील : अध्यक्ष महाराज, मंत्री महोदयांनी अतिशय सकारात्मक उत्तर दिले, त्याबद्दल मी मंत्री महोदयांचे आभार मानतो. इरिगेशन विभागाने धरणाची उंची वाढविण्याचा प्रस्ताव संबंधित विभागाकडे पाठविला तर ही सर्व गावे बुडित क्षेत्रात जाणार आहेत. या धरणाची उंची वाढली तर यांच्या पुनर्वसनाला आपण मान्यता देणार काय? सद्यस्थित्तीत प्रकल्पग्रस्तांना सेवा सुविधा देण्याचे आपण मान्य केलेले आहे. यांसदर्भात किती दिवसात बैठक घेऊन आपण आदेश काढणार आहात?

श्री.एकनाथराव खडसे : अध्यक्ष महाराज, उंची वाढविण्याचा निर्णय घेतला तर आपोआप गावांचे पुनर्वसन होईलच. आता उंची वाढविण्याचा निर्णय तूर्त स्थगित असल्यामुळे 16 वर्षापासून हा प्रकल्प प्रलंबित आहे. यामुळे गावकऱ्यांनाही सोई सवलती मिळत नाहीत आणि त्यांचे पुनर्वसनही होत नाही. अशा विचित्र अवस्थेत ही गावे असल्यामुळे धरणाची उंची वाढविण्याचा निर्णय जेव्हा होईल तेव्हा होईल, परंतु पुनर्वसित गावांना सोई सुविधा देण्याचे राज्य सरकारचे धोरण आहे. याला लागणाऱ्या ज्या सोई सुविधा अनुज्ञेय असतील त्या सर्व देण्यात येतील.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ. शी.** : राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेतंर्गत 4000 नळ पाणीपुरवठा योजना अद्यापहि हाती न घेणे

**मु. शी. :** राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेतंर्गत 4000 नळ पाणीपुरवठा योजना अद्यापहि हाती न घेणे या संबंधी सर्वश्री सत्यजित पाटील, चंद्रदीप नरके, शंभूराज देसाई, राधाकृष विखे-पाटील, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.सत्यजित पाटील-सरुडकर (राधानगरी) : अध्यक्ष महाराज, मी नियम 105न्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय पाणी पुरवठा मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजना ही सन २०११-१२ पासून शासनतर्फे चालू करण्यात आलेली असणे, राज्यातील राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेंतर्गत ४००० नळ पाणीपुरवठा योजना हाती न घेण्याचा निर्णय होणे, राज्यातल्या अनेक जिल्ह्यामध्ये दुष्काळसदृश्य परिस्थिती असून पाणीटंचाई असणे, बहुतांश जिल्ह्यातील भूजल पातळी मोठ्या प्रमाणात खालावली असणे, स्वजलधारा, जलस्वराज्य, भारत निर्माण व राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनांच्या माध्यमातून सुमारे ३८,००० पाणी पुरवठा योजना पूर्ण केलेल्या असणे, यापैकी अनेक योजनांची कामे निकृष्ट दर्जाची झालेली असणे, अनेक योजना नादुरुस्त असणे, अनेक योजनांचे अंदाजपत्रक चुकीचे झालेले असणे, कोट्यवधी रुपये खर्च होऊन सुध्दा अनेक गावात पाणी टंचाई असणे, पिण्याच्या पाण्याची टंचाईचे निवारण करण्यासाठी ग्रामीण पाणी पुरवठा विभागाने रद्द केलेल्या योजनांचे नव्याने सर्वेक्षण करुन सदर योजनेचे काम हाती घेण्याची आवश्यकता असणे, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

श्री. बबनराव लोणीकर.( पाणी पुरवठा मंत्री) : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो. *

**तालिका सभाध्यक्ष (श्री.योगेश सागर)** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.





UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

--------------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सत्यजित पाटील-सरूडकर : अध्यक्ष महाराज, सन 2015-2016 मध्ये राज्यातील राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेतंर्गत अनेक योजनांना मंजुरी देण्यात आली. त्यातील 4000 नळ पाणी पुरवठा योजनांना प्रशासकीय मान्यता मिळाली होती. त्या योजनेसाठी काही ग्रामपंचायतीने पाण्याची टाकी बांधण्यासाठी जागा खरेदी केलेल्या आहेत. परंतु शासनाने आता या चार हजार पाणी पुरवठा योजना बंद केलेल्या आहेत. आज त्या ठिकाणी पाण्याची टंचाई निर्माण झालेली आहे. त्या गावांमध्ये संभ्रम निर्माण पसरलेला आहे की या योजना पूर्ण झाल्या नाही तर पुढील वर्षी फार मोठ्या संकटाला सामोरे जावे लागणार आहे. दुसरीकडे महाराष्ट्र शासनाने मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल योजनेची घोषणा केली आहे. या योजनेसाठी 500 कोटी रूपयांची तरतूद केली आहे. या लक्षवेधी सूचनेच्या निवेदनामध्ये असे म्हटलेले आहे की, मुख्यमंत्री पेयजल योजनेमध्ये राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेतील योजना काही प्रमाणात या योजनेत समाविष्ट करू.. एकीकडे ज्या योजना मंजूर झालेल्या आहेत, त्या लोंबकळत ठेवायच्या आणि दुसरीकडे नवीन मुख्यमंत्री पेयजल योजना आपण प्रस्तावित करीत आहात. या चार हजार योजना मुख्यमंत्री पेयजल योजनेत समाविष्ट करणार आहात काय? या योजना आपण केल्या नाहीत तर या योजना केंद्र सरकारकडून होणार नाहीत. या योजना होणे अत्यंत गरजेचे आहे. या चार हजार पाणी पुरवठा योजनांना प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. या योजना मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल योजनेत समावेश करणार आहात काय, याबाबत मंत्री महोदय खुलासा करतील काय?

श्री.बबनराव लोणीकर : अध्यक्ष महाराज, राज्यात मोठ्या प्रमाणावर राष्ट्रीय पेयजल योजनेचे काम हाती घेण्यात आले, परंतु हे काम गेल्या दहा वर्षापासून अर्धवट स्थित्‍ीत आहे. अर्धवट कामे पूर्ण केल्याशिवाय नवीन योजना हाती घेऊ नये अशा प्रकारचे केंद्र सरकारचे पत्र आहे. राज्यातील 5385 योजना केंद्र सरकारने मान्य केलेल्या आहेत. याला तात्पुरती स्थगिती दिलेली आहे. ज्या योजना अर्धवट होत्या त्यासंदर्भात माननीय मुख्यमंत्री आणि माननीय वित्त मंत्र्यांनी केंद्र सरकारला विनंती केलेली आहे की, राष्ट्रीय पेयजल योजनेला दिलेली तात्पुरती स्थगिती उठविण्यात यावी.

डॉ.सत्यजित पाटील-सरूडकर : अध्यक्ष महाराज, राष्ट्रीय पेयजल योजना ही केंद्र



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.सत्यजित पाटील-सरुडकर..

सरकारची आहे. आपल्याला या योजनेची वाट बघण्याची आवश्यकता नाही. राज्य शासनाने मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल योजना जाहिर केलेली असून त्यासाठी 500 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे त्यामुळे आपल्याला केंद्र सरकारवर अवलंबून राहण्याची गरज नाही. आपण या सर्व योजना मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल योजनेमध्ये समाविष्ट करणार आहात काय?

यानंतर GG-1..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. बबनराव लोणीकर : अध्यक्ष महोदय, मुख्यमंत्री पाणी पुरवठा योजनेबाबत सचिव स्तरावर समिती आहे. या समितीने याचे काही नियम, निकष ठरविलेले आहेत. 1 हजार लोकसंख्या असणारे गाव, जेथे सतत 3 वर्षे टँकर आहे ते गाव, 50 लाखापेक्षा जास्त किंमत असलेले गाव, अशा प्रकारचे गाव मुख्यमंत्री ग्रामीण पाणी पुरवठा योजनेत घेतलेली आहेत. केंद्र सरकारने राष्ट्रीय पेयजल योजना बंद केलेली नाही. राष्ट्रीय पेयजल योजनेतून या योजना पूर्ण करण्यात येतील.

**हरकतीचा मुद्दा**

श्री. दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी ही लक्षवेधी सूचना केंद्र शासन पुरस्कृत राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेसंदर्भात विचारलेली आहे. ही योजना केंद्र सरकारने सन 2009 मध्ये सुरु केली. आता अलीकडच्या काळात दिनांक 29 जून, 2015 रोजी ही योजना बंद केली. काही अपवाद वगळता नवीन योजना हातात घेऊ नये असे या लक्षवेधी सूचनेच्या लेखी उत्तरात म्हटले आहे.

**तालिका सभाध्यक्ष (श्री. योगेश सागर)** : मंत्री महोदयांनी स्थगिती दिली आहे, असे म्हटले आहे.

श्री. दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, या लक्षवेधी सूचनेच्या लेखी उत्तरात असे म्हटले आहे की, काही अपवाद वगळता नवीन योजना हातात घेऊ नये, अशा सूचना दिल्या आहेत. आज राज्यामध्ये एकूण 40484 योजनांपैकी 38 हजार योजना बंद आहेत तर, जुन्या 1600 योजना बंद आहेत. नवीन योजनांची मागणी वेगळी आहे.

मुख्यमंत्री महोदय माझा हरकतीचा मुद्दा असा आहे की, मुख्यमंत्री पाणी पुरवठा योजना काढलेली आहे परंतु, मंत्री महोदय उत्तर देताना टंचाईच्या काळात करावयाच्या उपाययोजना, टँकर द्यायचे आहेत, बोअरवेल खोदायच्या आहेत असे उत्तर देत आहेत. मात्र हे उत्तर देणे येथे अपेक्षित नाही. सन्माननीय सदस्यांचे असे म्हणणे आहे की, केंद्र सरकारच्या पेयजल योजनेतून आपल्याला जर निधी उपलब्ध झाला नाही तर आपल्या मुख्यमंत्री पेयजल योजनेत या राहिलेल्या सर्व योजनांचा समावेश आपण करणार काय ? ही माझी हरकत आहे, या संदर्भात शासनाची भूमिका स्पष्ट व्हावी, ही अपेक्षा आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, ही राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजना केंद्र सरकारने बंद केलेली नाही. पैसेही दिले. मुळात त्यांनी अतिशय स्पष्टपणे या ठिकाणी सांगितले की, तुम्ही केवळ योजना मंजूर करीत आहात व सर्व योजना अर्धवट ठेवत आहात. त्यामुळे प्रथम मंजूर झालेल्या योजनांचे प्रस्ताव पाठवा त्याला आम्ही पैसे देऊ आणि आता ते दिले आहेत. माननीय श्री. एकनाथराव खडसे सांगतील त्यांच्या जिल्ह्यातील जवळपास 12 ते 14 योजनांना पैसे मिळाले आहेत व सगळीकडेच मिळत आहेत. 63 योजनांना पैसे दिलेले आहेत. केंद्र सरकारने "theme spreading of resources" वरच केवळ ऑब्जेक्शन घेतलेले आहे. योजना अजूनही सुरु आहे. त्यांनी असे सांगितले आहे की, ज्या योजना हाती घेतल्या आहेत, त्या पूर्ण केल्यानंतर नवीन योजना हाती घ्या. त्यांना जेव्हा विचारले की, खारपाण पट्टयाचे वगैरे काय तेव्हा त्यांनी सांगितले की, ठीक आहे तेथे नवीन घेता येतील. त्यामुळे केंद्र सरकारकडून यामध्ये कोणतीही नकारात्मक बाब सांगण्यात आलेली नाही. तथापि सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्याच्या अनुषंगाने मी हे सांगू इच्छितो की, मुळात मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल योजना ही आपण सप्लीमेंटरी योजना म्हणूनच तयार केली आहे. ज्या योजना केंद्र सरकारच्या योजनेत कव्हर होणार नाहीत, त्या योजना आपल्याला यामध्ये कव्हर करावयाच्या आहेत. आपल्या माहितीकरिता सांगतो की, याचा आराखडा हा प्रत्येक जिल्ह्यातून पंचायत समितीने तयार केला आहे. जिल्हापरिषदेने त्याला मान्यता दिली व त्यानंतर राज्य सरकारने तो आराखडा स्वीकारला आहे. त्याचा 4 वर्षांचा बृहत आराखडा तयार केलेला आहे. आता तरी त्याकरिता 500 कोटी रुपये दिलेले असले तरी, अडीच हजार कोटी रुपयांचा प्राथमिक कार्यक्रम हातात घेतला आहे. आपल्याला माहीत आहे की, माननीय वित्त मंत्र्यांनी त्याकरिता अधिकचा निधी वाढवून देण्याचे कबूलही केलेले आहे. यामध्ये मंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली एक समिती तयार करण्यात आलेली आहे. या समितीला काही अधिकार दिले आहेत. या आराखड्या व्यतिरिक्त जर एखादी योजना अपूर्ण असेल किंवा एखादी योजना यातून सुटली असेल तर, ती योजना देखील त्या आराखड्यात समाविष्ट करण्याकरिता मंत्री महोदयांची समिती तयार करण्यात आलेली आहे. राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनांमध्ये ज्या 4 हजार योजना होत्या त्यातील 1003 योजना या योजनेत ऑलरेडी समाविष्ट केलेल्या आहेत. त्यामुळे यात

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. देवेंद्र फडणवीस ....

कोणतीही अडचण येणार नाही आणि जर असे लक्षात आले की, एखादी योजना सुटली आहे किंवा ग्रामीण पेयजल योजनेत तिला पैसा मिळत नाही, ती आवश्यक आहे तर कॅबिनेटने दिलेल्या अधिकारानुसार मंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखालील समिती कुठल्याही क्षणी तिचा समावेश त्यामध्ये करु शकेल.

श्री. दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, मुख्यमंत्री महोदयांनी नवीन योजनेच्या संदर्भात उत्तर दिलेले आहे हे बरोबर आहे. परंतु, या राज्यातील 40 हजार योजनांपैकी आज अनेक कारणांमुळे 1600 योजना कायमच्या बंद झालेल्या आहेत. आपण "theme spreading of resources" म्हटलेले आहे तर या 1600 योजना सुरु करण्याच्या संदर्भात आपली भूमिका काय राहणार आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल योजनेचे नवीन योजना करणे व बंद पडलेल्या योजना सुरु करणे असे दोन घटक आहेत. मुळात या योजनेचा हा एक महत्त्वाचा घटकच आपण ठेवला आहे. पूर्वी आपण काय करायचो तर, एखाद्या ठिकाणी योजना बंद पडली, एखादा सोर्स आटला की, त्यानंतर त्या ठिकाणी आपण दुसरी योजना करायचो. काही काही गावांत अशा 5-5 योजना झालेल्या आहेत. आता आपण यामध्ये असे म्हटले आहे की, सोर्स मजबूत करणे, योजना पुन्हा सुरु करणे. मी आपल्याला वाचून दाखवितो की, बंद पडलेल्या, नादुरुस्त असलेल्या ग्रामीण पाणी पुरवठा योजनांपैकी पुनरुज्जीवित होऊ शकणाऱ्या 83 प्रादेशिक योजना आता या कार्यक्रमात लागलीच घेतलेल्या आहेत. ज्यामध्ये 1100 गाव कव्हर होत आहेत. याकरिता मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल योजनेत स्वतंत्र तरतूद करण्यात आलेली आहे. त्यामुळे बंद पडलेल्या योजनांचाही यात समावेश आहे.

अनेक सन्माननीय सदस्य : अध्यक्ष महोदय, ...

**तालिका सभाध्यक्ष :** मी सर्व सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी देणार आहे. मी मुंबईतच राहतो अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चेकरिता ज्या सन्माननीय सदस्यांना थांबायचे आहे त्यांनी थांबावे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. शंभूराज देसाई : अध्यक्ष महोदय, मुख्यमंत्री महोदयांनी या संदर्भातील राज्य सरकारची अतिशय सकारात्मक भूमिका जाहीर केली, त्याकरिता मी त्यांचे आभार मानतो. परंतु, फिल्डवर काम करताना अधिकाऱ्यांकडून असे सांगितले जाते की, राष्ट्रीय पेयजल योजना केंद्राने बंद केली आहे. त्यामुळे त्यातील कोणत्याही योजनेची टेंडर आता काढता येणार नाहीत. काही योजनांना प्रशासकीय मान्यता दिलेली आहे, परंतु, केंद शासनाने त्यांना निधी न दिल्याने त्याची टेंडर्स निघालेली नाहीत. काही ठिकाणी टेंडर निघालेली आहेत, परंतु, वर्क ऑर्डर निघालेली नाही. आमची एवढीच विनंती आहे की, ज्याला ऑलरेडी प्रशासकीय मान्यता दिलेली आहे, मग त्याचा 1 टप्पा करा, 2 टप्पे करा, परंतु प्रशासकीय मान्यता दिलेल्या योजनांचे टेंडर तातडीने काढून ती कामे आपण सुरु करणार काय?

श्री. बबनराव लोणीकर : अध्यक्ष महोदय, अशा कामांना प्राधान्य देण्यात येईल.

श्री. शशिकांत शिंदे : अध्यक्ष महोदय, मी मुख्यमंत्री महोदयांना प्रॅक्टिकल सांगतो व येथील सर्व सन्माननीय सदस्य त्याबाबतीत सांगतील. मुख्यमंत्री महोदय आपण सांगितले परंतु, वस्तुस्थिती तशी नाही. राष्ट्रीय पेयजल योजनेत सन 2015-2016 मध्ये ज्या योजनांची कामे मंजूर झाली व सुरु झाली ती कामे ठेकेदारांनी अर्धवट सोडून दिलेली आहेत, ही वस्तुस्थिती आहे. ही कामे ते का करीत नाहीत, तर आम्हाला पैसे मिळाले नाहीत, असे ते सांगत आहेत. सन 2015-2016 ची कामे तशीच अर्धवट राहिलेली आहेत. सन 2016-2017 च्या नवीन प्रस्तावातसुध्दा केवळ सातारा जिल्ह्याबाबत सांगावयाचे झाले तर, 134 कोटी रुपयांचे अख्ख्या सातारा जिल्ह्याचे नवीन प्रस्ताव आपल्याकडे आलेले आहेत. आपण या योजनेकरिता केवळ 500 कोटी रुपये दिलेले आहेत. मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल योजना ही राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेला पर्याय म्हणूनच काढलेली आहे ही, वस्तुस्थिती आहे. सन 2016-2017 मध्ये आपल्या राज्याला राष्ट्रीय पेयजल योजनेतून पैसे आलेले नाहीत, ही सत्य परिस्थिती आहे. नळ पाणी पुरवठा योजनेकरिता आपली मागणी 1600 कोटी रुपयांची असेल तर, मुख्यमंत्री महोदय, 500 कोटी रुपये देऊन काही होणार नाही. मागणी फार आहे व सर्व लोकप्रतिनिधींची तळमळ आहे. गेल्या दीड वर्षापासून हे काम बंद आहे.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. शशिकांत शिंदे

यामध्ये आपण लक्ष घालावे व अहवाल घ्यावा. मी आज निर्णय घ्या असे म्हणत नाही वाटल्यास जूनच्या अधिवेशनापर्यंत आपण अहवाल घ्यावा. जी कामे प्रलंबित असतील ती का प्रलंबित आहेत, त्यांना केंद्राकडून पैसे येत नसतील तर राज्याचे प्रमुख म्हणून आपण ते केंद्राकडून आणणे गरजेचे आहे. पेयजल योजना बंद झाली असल्यास मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल योजनेत 500 कोटी रुपयांऐवजी लागणारा निधी आपल्याला उपलब्ध करुन द्यावा लागणार आहे, याबाबत आपण सांगावे.

H-1/...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, मुख्यमंत्री पेय जल योजना ही चार वर्षाची योजना आहे. याचा नियतव्यय 2500 कोटी रुपये आहे. पहिल्या टप्प्यात त्याकरिता 500 कोटी रुपये देण्यात आलेले आहेत. माननीय मंत्री महोदयांनी त्यामध्ये वाढवून देण्यात येईल असे सांगितले. आपले राज्य मोठे असून याची आपल्याला कल्पना आहे. मोठ्या राज्यात सर्व योजना एका वर्षात करु शकणार नाही. आपण गेली 60 वर्षे हे करायचा प्रयत्न करत आहोत, तरी सर्व गावे कव्हर करु शकलो नाही. सर्व गावे कव्हर करण्याच्या दृष्टीनेच ही योजना समग्र तयार केली. राज्य सरकारने आपल्या मनात येईल ती गावे घेतली नाही. प्रत्येक पंचायत समितीचा ठराव व जिल्हा परिषदेचा ठराव घेऊन त्यांनी सूचविलेली यामध्ये समाविष्ट केली. त्याचा 2500 कोटी रुपयांचा आराखडा तयार झाला आहे. तथापि आपण केलेल्या सूचनेसंदर्भात अशा कुठल्या योजना बंद आहेत, त्याची माहिती घेण्यात येईल. त्या योजना कशा सुरु करता येतील, याकरिता प्राधान्य देण्यात येईल.

---*---

...2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**( अध्यक्षस्थानी माननीय अध्यक्ष )**

**पृ. शी.** : ***नागपूर येथील जुना बगडगंज, पाचपावली व सोमवारी पेठ येथे सेवा दवाखाने बांधण्यास्तव नागपूर सुधार प्रन्यासकडून शासनाने भुखंडाचा ताबा घेऊन ४७ वर्षे होऊनही या भुखंडावर बांधकाम न होणे***

**मु. शी.** : ***नागपूर येथील जुना बगडगंज, पाचपावली व सोमवारी पेठ येथे सेवा दवाखाने बांधण्यास्तव नागपूर सुधार प्रन्यासकडून शासनाने भुखंडाचा ताबा घेऊन ४७ वर्षे होऊनही या भुखंडावर बांधकाम न झाल्या*** संबंधी सर्वश्री कृष्णा खोपडे, सुधाकर देशमुख, विकास कुंभारे, सुधाकर कोहळे, डॉ.मिलिंद माने, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व) : अध्यक्ष महोदय, मी नियम 105 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

***"नागपूर येथील जुना बगडगंज, पाचपावली व सोमवारी पेठ सेवा दवाखाने बांधण्यास्तव नागपूर सुधार प्रन्यासकडून शासनाने घेतलेला भुखंडाचा ताबा, परंतु ४७ वर्षे होऊनही सदर भुखंडावर कसल्याही प्रकारचे बांधकाम न होणे, परिणामी या जागेवर अतिक्रमण होण्याची शक्यता, या जागेबाबत माहितीसुध्दा विभागाला नसणे, ना.सु.प्र.चे लागणारे शुल्क अद्यापही न भरणे व*** भाडेपट्टा ***न करणे, स्थानिक*** लोकप्रतिनिधी ***यांनी या जागेसंदर्भात संबंधीत विभागास निदर्शनास आणून*** दिल्यानंतर ***आयुक्त, राज्य कामगार विमा योजना यांनी सदर जागेची केलेली पाहणी, या जागेवर*** रूग्णालयाच्या ***इमारतीच्या बांधकामासंदर्भात शासन निर्णय*** निर्गमित ***होऊन निधी उपलब्ध होण्याच्या दृष्टिने शासनाकडे सादर केलेला प्रस्ताव, आयुक्त, रा.का.वी.यो. यांनी पुढील कार्यवाही करण्यासंदर्भात कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (वै.), सा.बां.विभाग, नागपूर*** यांना ***दिलेले पत्र, विनाकारण दिरंगाई केल्यामुळे संबंधित विभागाच्या दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने*** तात्काळ ***करावयाची कारवाई आणि यावर शासनाची प्रतिक्रिया."***

प्रा. राम शिंदे (सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**अध्यक्ष** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

---*---

...3/-



**( अध्यक्षस्थानी माननीय अध्यक्ष )**

श्री. कृष्णा खोपडे : अध्यक्ष महोदय, नागपूर शहरामध्ये कामगारांचे रुग्णालय खोलण्याकरिता जागेची आवश्यकता असल्याबाबत कामगार विभागाने नागपूर सुधार प्रन्यासला पत्र दिले होते. त्यानुसार नागपूर सुधार प्रन्यासने दिनांक 31.03.1967 रोजी बगडगंज, पाचपावली आणि सोमवारी पेठ या ठिकाणी जागा उपलब्ध करुन दिल्या. त्यावेळी दोन ओळीची लीखापडी झाली, ॲग्रीमेंट झाले. त्यानंतर दिनांक 19.10.1973, 30.06.1975, 06.10.1976, 31.12.1976, 01.03.1977, 03.07.1977, 03.10.1977, 16.01.1978...(अडथळा)...

**अध्यक्ष** : लक्षवेधी सुचनेवर भाषण करु नये. कृपया आपण प्रश्न विचारावा.

श्री. कृष्णा खोपडे : अध्यक्ष महोदय, मी या तारखा यासाठी सांगत आहे की, नागपूर सुधार प्रन्यासने कामगार विभागाला याची रजिस्ट्री करण्यासाठी व नियमितीकरण करण्यासाठी 10 स्मरण पत्रे दिले. भारत देश 1947 मध्ये स्वातंत्र झाला. सदरहू जागा देऊन 49 वर्षे झाले तरी देखील आजपर्यंत त्यावर कोणतीही कार्यवाही केली नाही. याउलट दिनांक 18.03.1978 रोजी आम्हाला दिलेली जागा इतरांना विकता येईल काय, असे कामगार विभागाने एनआयटीला कळवून त्यांच्याकडे तशी परवानगी मागितली होती. माझी विनंती आहे की, 49 वर्षामध्ये कामगार विभागाने रिन्युव्हल केले नाही, रजिस्ट्री केली नाही, ॲग्रीमेंट केले नाही, एनआयटीचे ग्राऊंड रेट भरले नाही. मी असेल, सन्माननीय सदस्य सर्वश्री. सुधाकर देशमुख, विकास कुंभारे, डॉ. मिलिंद माने साहेब आम्ही सर्वांनी याबाबतीत पाठपुरावा केला. आम्ही यासंदर्भातील पूर्ण कागदपत्रे कामगार आयुक्तालयाला दिले. परंतु त्यानंतर काहीही कार्यवाही झालेली नाही. पूर्वीचे आयुक्त सिमा व्यास तेथे येऊन गेले होते. त्यानंतरही कार्यवाही झाली नाही. या ठिकाणी रुग्णालय न बांधण्याचा कामगार विभागाचा मानस दिसत आहे. नागपूर सुधार प्रन्यासची ही जागा नागपूर सुधार प्रन्यासला परत केली तर आम्ही नागपूर सुधार प्रन्यासच्या माध्यमातून गोरगरिबांकरिता चांगले रुग्णालय बांधू शकू. जेणे करुन हे रुग्णालय गोरगरीब आणि कामगारांकरिता उपयोगात येईल. त्यामुळे ही जागा नागपूर सुधार प्रन्यासला परत करणार आहात काय, असा माझा प्रश्न आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा. राम शिंदे : अध्यक्ष महोदय,  सन्माननीय सदस्यांनी विचारलेला प्रश्न गंभीर असल्याचे मी मान्य करतो. गेल्या 49 वर्षापासून या जागेचा उपयोग करण्यात आलेला नाही. त्यांनी गोरगरिबांकरिता रुग्णालय बांधण्याचा महत्वाचा प्रश्न उपस्थित केला आहे. ही जागा नागपूर सुधार

...4/-



प्रा. राम शिंदे.....

प्रन्यासला देण्यासाठी युडी, इसीआयसी, लोकप्रतिनिधी यांच्याबरोबर संयुक्त बैठक घेऊन यासंदर्भात योग्य ते आदेश करण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.

श्री. सुधाकर देशमुख : अध्यक्ष महोदय, जवळपास 49 वर्षापासून विभागाने कार्यवाही केली नसल्यामुळे ती जागा परत करण्यासंबंधी राज्यमंत्री महोदयांनी बैठक घेण्याचा सकारात्मक निर्णय घेतला, याबद्दल मी राज्यमंत्री महोदयांचे अभिनंदन करतो. मी स्कोपच्या बाहेरील प्रश्न विचारणार असून तो एनआयटीशी संबंधित आहे. आदरणीय मुख्यमंत्री देखील सभागृहामध्ये उपस्थित आहेत. एनआयटीच्या जागा विविध विभागाने उपयोगाकरिता घेतल्या, त्यावर आरक्षण टाकले परंतु त्याचा उपयोग केला नाही. अशाच प्रकारची जगनाडे चौकामध्ये ट्रान्सपोर्ट प्लाझाची राखीव जागा होती. परंतु त्या ठिकाणी ट्रान्सपोर्ट प्लाझा न करता व्यक्तीगत मॉलचे बांधकाम केलेले आहे. त्यामध्ये पूर्णपणे अनियमितता झालेली आहे. त्या मॉलमध्ये 200 दुकाने काढण्यात आली. याकरिता नागपूर सुधार प्रन्यासची एनओसी देखील घेतलेली नाही. माझी आपल्या माध्यमातून मुख्यमंत्री महोदयांना विनंती आहे. त्या ठिकाणी ज्या बाबीचे आरक्षण होते ते न करता खाजगी मॉल उभा केला व त्याकरिता नागपूर सुधार प्रन्यासची परवानगी घेतली नाही. त्यामध्ये अनियमितता झालेली आहे. ज्यांनी अनियमितता केली त्यांची चौकशी करणार आहात काय आणि सदरहू बांधकाम ज्या बिल्डरने केले त्याची व संपूर्ण प्रकरणाची चौकशी करुन न्याय मिळवून देणार आहात काय.

प्रा. राम शिंदे : अध्यक्ष महोदय, होय. सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री. सुधाकर देशमुख साहेब आपल्याला सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील साहेब समर्थन देत आहेत. आपण सांगितलेल्या प्रस्तावनेच्या अधिन राहून मी स्पेसिफिक होय असे उत्तर दिलेले आहे. त्यामुळे आपल्या प्रश्नाचा अंतर्भाव त्यामध्ये आला.

**अध्यक्ष** : आपल्या प्रश्नाला न्याय मिळाला आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. विकास कुंभारे : अध्यक्ष महोदय, राज्यमंत्री महोदयांनी उत्तरामध्ये होय असे म्हटले आहे. त्याचप्रमाणे नागपूरमधील अनेक जागा एनआयटी आणि महाराष्ट्र शासनाने अनेक संस्थांना दिल्या आहेत. मुख्यत्वे नागपूरातील माजी मंत्री सन्माननीय श्री. सतिश चतुर्वेदी यांना नागपूर विनकर सुतगिरणीची 22 एकर जागा ज्या उद्देशाकरिता दिली होती, परंतु तेथे ते न होता त्या जागेचा कमर्शिअल वापर केला जात आहे. ही जागा कार्यवाही करुन परत घेणार आहात काय आणि त्याची लिज रद्द करणार आहात काय, असा माझा प्रश्न आहे. ...5/-



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा. राम शिंदे : अध्यक्ष महोदय, हा प्रश्न आणि लक्षवेधीचा विषय हे दोन्ही भाग वेगळे आहेत. तरी देखील सन्माननीय सदस्यांनी सांगितलेली बाब तपासून पहाण्यात येईल.

श्री. सुनिल केदार : अध्यक्ष महोदय, ही लक्षवेधी नागपूर येथील कामगारांकरिता बांधावयाच्या रुग्णालयासंदर्भातील होती. परंतु आता हा विषय एनआयटी म्हणजेच युडीकडे वळला आहे. माननीय मुख्यमंत्री येथे उपस्थित आहेत. आपण युडी संदर्भात चर्चा लावावी.

**अध्यक्ष :** आपल्याला लक्षवेधी सुचनेसंदर्भात प्रश्न विचारायचा आहे काय?

श्री. सुनिल केदार : अध्यक्ष महोदय, नाही.

प्रा. राम शिंदे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी सर्वच प्रश्नामध्ये असा स्कोप बघून प्रश्न विचारले तर आपले कामकाज आणखी लवकर होईल.

**अध्यक्ष :** त्यांनी लक्षवेधी सुचनेसंदर्भात प्रश्न विचारलेलाच नाही.

श्री. सुधाकर कोहळे : अध्यक्ष महोदय, ही जागा इएसआय हॉस्पिटलसाठी राखीव होती. यातील एक जागा माझ्या मतदार संघात सोमवारी पेठमध्ये आहे. सोमवारी पेठला इएसआयचे मोठे हॉस्पिटल आहे. जवळपास 6 लाख रुग्ण या हॉस्पिटलचा लाभ घेत आहेत. या हॉस्पिटला लागून 43 हजार चौरस फुट जागा होती. त्यापैकी 28 हजार चौरस फुट जागा समाज भवनासाठी देण्यात आली. या जागेची इएसआय हॉस्पिटलला नित्तांत गरज आहे. परंतु उत्तरात असे म्हटले आहे की, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अभियंत्याकडे प्रपोजल मागविले असून ते दिले नाही. हे प्रपोजल तातडीने मागवून या हॉस्पिटलचे काम तातडीने सुरु करणार आहात काय, असा माझा प्रश्न आहे.

प्रा. राम शिंदे : अध्यक्ष महोदय, नागपूर येथील जुना बगडगंज, पाचपावली आणि सोमवारी पेठ या तीन वेगवेगळ्या जागेसंदर्भातील हा विषय आहे. सन्माननीय सदस्यांनी सोमवारी पेठच्या

संदर्भातील बाब उपस्थित केली. या बजेटमध्येच आपण त्यासाठी तरतूद करण्याकरिता तयारी ठेवली होती. परंतु तरतूद होऊ शकली नाही. सोमवारी पेठेच्या हॉस्पिटलसाठी येणाऱ्या पावसाळी अधिवेशनातील पुरवणी मागण्यांमध्ये याचा अंतर्भाव करण्याचा विषय येणार आहे. मी या तीनही ठिकाणच्या जागेसंदर्भात बैठक घेण्याचे अगोदरच सांगितलेले आहे. त्यामुळे या प्रश्नावर अधिक विस्ताराने चर्चा करता येईल व योग्य तो निर्णय करता येईल.

---*---

...II/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : ठाणे जिल्हा शासकीय रुग्णालयात सोयीसुविधांचा असलेला अभाव व शवागाराची झालेला दुरावस्था

**मु.शी.** : ठाणे जिल्हा शासकीय रुग्णालयात सोयीसुविधांचा असलेला अभाव व शवागाराची झालेला दुरावस्था यासंबंधी सर्वश्री प्रताप सरनाईक व रुपेश म्हात्रे, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रताप सरनाईक (ओवळा-माजीवडा) : अध्यक्ष महाराज, मी नियम 105 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"ठाणे जिल्हा हा मुंबई व उपनगरांसारख्या प्रगत व सर्व सुखसोयींनी समृध्द असलेल्या शहरांलगत असलेला जिल्हा असला तरी आवश्यक त्या सोयीसुविधांचा असलेला अभाव, ठाणे जिल्ह्याचा झपाट्याने होत असलेला विकास आणि वाढती लोकसंख्या पाहता येथे गरीब व गरजू जनतेसाठी सुसज्ज रुग्णालयाची असलेली आवश्यकता, राज्य शासनामार्फत ठाणे शहरात जिल्हा शासकीय रुग्णालयाची करण्यात आलेली उभारणी, परंतु सदरच्या रूग्णालयात आवश्यक त्या सोयीसुविधा पुरविण्यात आल्या नसल्याने रुग्णांची मोठ्या प्रमाणात होत असलेली गैरसोय, सोयीसुविधांअभावी नागरिकांना खाजगी रुग्णालयाचा अथवा मुंबईतील जे.जे. अथवा के.ई.एम. रूग्णालयाचा घ्यावा लागत असलेला आधार, त्यातच एखादा गंभीर आजार असलेल्या रूग्णास ठाणे ते मुंबई असा प्रवास करावा लागत असल्याने त्याकरिता दीड ते दोन तासांचा अवधी वाया जाणे, या काळात वेळीच योग्य उपचार न मिळाल्यास रुग्ण दगावण्याची निर्माण झालेली शक्यता, ठाणे जिल्हा शासकीय रुग्णालयातील शवविच्छेदन विभागाची अत्यंत दयनीय परिस्थिती असून कोणतीही अत्याधुनिक सोयीसुविधा तसेच पुरेसा अधिकारी व कर्मचारी वर्ग नसल्याने मृतदेहाची होत असलेली हेळसांड, त्यातच शवागारात पुरेशी जागा नसणे, शवागृहाचे दरवाजे तुटलेल्या अवस्थेत असणे, त्यामुळे मृतदेह कुठेही, कोणत्याही अवस्थेत टाकले जाणे, परिणामी प्रचंड दुर्गंधी पसरणे त्यामुळे मृतांच्या नातेवाईकांत व जनतेत निर्माण झालेला असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

...2

प्रा.राम शिंदे (सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री ) : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**अध्यक्ष** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( **प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे )

--------

...3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रताप सरनाईक : अध्यक्ष महोदय, मी उपस्थित केलेल्या लक्षवेधीचे उत्तर वाचल्यानंतर मला असे वाटले की, आम्ही विधिमंडळात आहोत की टी.व्ही.वरील "चला हवा येऊ द्या" ही मालिका पाहत आहोत. या लक्षवेधीच्या उत्तराची माहिती देणारे अधिकारी टी.व्ही.वरील नाट्य कलावंतर आहे काय, असा प्रश्न आमच्या मनामध्ये निर्माण झाला आहे व ही बाब मला अतिशय खेदाने सांगाविशी वाटते. उत्तरामध्ये दिल्याप्रमाणे संबंधित जागेवर वस्तुस्थिती असती तर आम्हाला लक्षवेधी उपस्थित करण्याची आवश्यकता भासली नसती.

अध्यक्ष महोदय, कासार वडवली येथे दोन महिन्यापूर्वी एक दुर्घटना घडली व त्यामध्ये 13 लोकांचा मृत्यू झाला होता. त्यावेळी मी व ठाणे जिल्ह्याचे पालक मंत्री महोदय श्री.एकनाथ शिंदे जिल्हा रुग्णालय ठाणे येथे गेलो होतो. सदरहू अपघातामध्ये मृत्यू पावलेल्या लोकांच्या शवविच्छेदनासाठी जिल्हा रुग्णालय ठाणे येथे खूप वेळ लागला होता. त्यावेळची परिस्थिती आम्ही त्या ठिकाणी पाहिली होती व त्यामुळे सदरहू लक्षवेधीच्या उत्तरासंबंधातील माहिती अशा प्रकारे देणाऱ्या अधिकाऱ्यांवर मंत्री महोदयांनी कडक कारवाई करणे आवश्यक आहे.

अध्यक्ष महोदय, ठाणे जिल्हा रुग्णालय हे 1 कोटी लोकसंख्येसाठी असलेले जिल्ह्यातील एकमेव हॉस्पिटल आहे. सन 1931 साली या हॉस्पिटलची निर्मिती झाली असून त्यास आता 80 वर्षे कालावधी झाला आहे. या हॉस्पिटलला अद्ययावत असलेल्या काही सेवा काही प्रमाणात पुरविण्यात येतात. परंतु सदरहू हॉस्पिटलसाठी इमारत बांधण्याची आवश्यकता असल्याने ठाणे येथे सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल किती दिवसामध्ये सुरु करण्यात येईल ? मागील वर्षी आरोग्य मंत्री महोदयांनी ठाणे जिल्हा रुग्णालयाला भेट दिली होती त्यावेळी त्यांनी पुढील 4 ते 5 महिन्यामध्ये याप्रकरणी निर्णय घेऊ असे अश्वासन दिले होते व ठाणे जिल्ह्याच्या पालक मंत्र्यांनीही दिले होते. डायलिसीस सेंटर सुरु करुन डायलिसीसची संख्या वाढविण्यात येईल काय, या परिसरातील नागरिकांना आरोग्य विषयक सुखसुविधा पुरविण्याकरिता निधी देण्यात येईल काय, मीरा-भाईंदर येथे जे रुग्णालय ताब्यात घेण्यात येणार आहे त्यास मंत्रिमंडळाने व मुख्यमंत्री महोदयांनी मान्यता दिली आहे काय, असल्यास सदर उपकेंद्र कधी सुरु करण्यात येईल ?

....4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.दीपक सावंत : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.प्रताप सरनाईक यांनी जिल्हा सामान्य रुग्णालय ठाणे संदर्भातील लक्षवेधीच्या माध्यमातून 4 प्रश्न उपस्थित केले आहेत. मी ठाणे येथील सामान्य रुग्णालयास भेट दिली होती. त्यावेळी हॉस्पिटलची स्थिती अत्यंत वाईट होती व त्यामध्ये सुधारणा करणे आवश्यक होते, हे खरे आहे. मागील कित्येक वर्षामध्ये सदर हॉस्पिटलची सुधारणा झालेली नव्हती, हे ही खरे आहे. जिल्हा रुग्णालय येथे आता 360 ते 361 बेडचे हॉस्पिटल सुरु असून ते 550 बेडचे करण्याची बाब प्रस्तावित असून त्यामध्येच सुपर स्पेशालिटीच्या सेवा इन्क्लूड करण्यात येतील.

श्री.प्रताप सरनाईक : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी हेच उत्तर एक वर्षापूर्वी दिले होते.

डॉ.दीपक सावंत : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांचे म्हणणे बरोबर आहे. सदरहू हॉस्पिटल पहिल्यांदा शिफ्ट करणे अत्यंत आवश्यक आहे. या हॉस्पिटलच्या काही भागात काम सुरु आहे त्यामुळे रुग्णांची गैरसोय होऊ नये याकरिता सदर हॉस्पिटल शिफ्ट करण्याची आवश्यकता आहे. सदर हॉस्पिटल नर्सिंग कॉलेज असलेल्या भागात शिफ्ट करणे शक्य आहे. पुढील एक वर्षाच्या कालावधीमध्ये सदर हॉस्पिटल कार्यरत करण्यात येईल, असे मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी मिरा-भाईंदर येथील हॉस्पिटलच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केला त्याबाबत मी सांगू इच्छितो की, मिरा-भाईंदरच्या उद्‌घाटन प्रसंगी मी व माननीय अर्थ मंत्री उपस्थित होतो. मिरा-भाईंदर, इचलकरंजी येथील हॉस्पिटल व छाया रुग्णालयाचा एकत्रित प्रस्ताव मुख्यमंत्री महोदयांकडे पाठविण्यात येईल व त्यास मंत्रिमंडळाची मान्यता घेण्यात येईल व मिरा-भाईंदर रुग्णालयास निधी उपलब्ध करुन दिला जाईल.

**अध्यक्ष :** मंत्री महोदयांनी लक्षवेधीच्या उत्तरामध्ये सांगितले आहे की, एक वर्षामध्ये सुविधा उपलब्ध करुन देण्यात येतील.

सरदार तारा सिंह : अध्यक्ष महोदय, थाना और मुलुंड में 5 किलोमीटर का अंतर है. आज थाना में बस्ती बढ़ गई है इसलिए उनको केईएम हॉस्पिटल में जाना पड़ता है. मेरा निवेदन है कि 5 किलोमीटर की अंतर पर मुलुंड में कामगार हॉस्पिटल है. उस हॉस्पिटल में आदमी, डॉक्टर और मशीन नहीं है. आप उस हॉस्पिटल की ओर ध्यान देंगे तो थाना के लोगों को उस हॉस्पिटल का फायदा होगा.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**अध्यक्ष** : आपका प्रश्न अलग है. इसका उत्तर नहीं मिलेगा.

सरदार तारा सिंह : अध्यक्ष महोदय, हमारे यहाँ अग्रवाल हॉस्पिटल है. 80 बेड्स का हॉस्पिटल आने वाला है. यह मैं तीन साल से सुन रहा हूं. ये दो हॉस्पिटल ठीक सही तरह से काम करेंगे तो थाना के लोगों को अधिक फायदा हो सकता है.

प्रा.राम शिंदे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य सरदार तारासिंग यांनी विचारलेला प्रश्न हा स्कोपच्या बाहेरील असे आपणच सांगितले आहे. सन्माननीय सदस्य श्री.प्रताप सरनाईक यांनी विचारलेल्या प्रश्नामध्ये सांगितले होते की, सदर हॉस्पिटल मागील 60-70 वर्षापूर्वी त्यावेळच्या लोकसंख्येनुसार स्थापन करण्यात आले आहे. आता वाढलेली लोकसंख्या, हॉस्पिटलसाठी उपलब्ध असलेली जागा ही बाब लक्षात घेऊन 336 बेडचे हॉस्पिटल श्रेणीवर्धीत करुन ते 541 बेडचे करावयाचे आहे. त्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे प्रस्तावित झाला असून त्यामध्ये मल्टी सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलच्या सर्व सुविधा देण्याच्या दृष्टीने सर्व बाबींचा अंतार्भाव करण्यात आला आहे. सदर प्रकरणी तातडीने निधी उपलब्ध करुन देण्यासंदर्भात आरोग्य मंत्री महोदयांनी अगोदर सांगितलेले आहे. सदर हॉस्पिटलमध्ये असलेल्या शवविच्छेदनाच्या रुममध्ये काही त्रुटी राहिल्या असतील. सन्माननीय सदस्यांनी 13 मृत्यू झालेल्या व्यक्तिच्या शवविच्छेदनाची बाब सांगितली आहे त्यासंदर्भात दिरंगाई होण्याची कारणे, सुविधांचा अभाव, याबाबत रिव्ह्यू घेण्यात येईल. कारण हा प्रश्न दुसऱ्या-तिसऱ्या वेळी सदनामध्ये उपस्थित झाला आहे. त्यामुळे सदर रिव्ह्यू घेऊन योग्य ती उपाययोजना करण्याच्या दृष्टीकोनातून विभागास निर्देश देण्यात येतील.

श्री.रुपेश म्हात्रे : अध्यक्ष महोदय, उपस्थित करण्यात आलेल्या लक्षवेधीच्या माध्यमातून ठाणे जिल्हा रुग्णालयाचा प्रश्न उपस्थित करण्यात आला असला तरी भिवंडी येथे उप जिल्हा रुग्णालय आहे. सदर रुग्णालय पूर्वी कॉर्पोरेशनच्या माध्यमातून चालविण्यात येत होते परंतु त्यावेळी रुग्णांना योग्य औषधोपचार मिळत नव्हता. त्यामुळे सदर रुग्णालयाचे रुपांतर उप जिल्हा रुग्णालयामध्ये करण्यात आले असून येथेही शवविच्छेदनासंदर्भात ठाणे जिल्हा रुग्णालयाप्रमाणेच स्थिती आहे. लक्षवेधीच्या उत्तरामध्ये सांगण्यात आले आहे की, शवविच्छेदनाची सुविधा 24 तास

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.रुपोश म्हात्रे.......

देण्यात येते. परंतु भिवंडी येथील उप जिल्हा रुग्णालयामध्ये रात्रीच्या वेळी शवविच्छेदन करण्यात येत नाही. सदर प्रकरणी मंत्री महोदय कारवाई करतील काय, सदर ठिकाणी 200 खाटांचे रुग्णालय मंजूर झाल्याचे सांगण्यात येते परंतु त्यासंर्भातील कार्यवाही झालेली नसल्यामुळे ती लवकरात लवकर करण्यात येईल काय, सदर हॉस्पिटलमध्ये प्रभारी डॉक्टरांची नियुक्ती करण्यात आली असून ती कायम स्वरुपी करण्यात येईल का ?

प्रा.राम शिंदे : अध्यक्ष महोदय, रात्रीच्या वेळी शवविच्छेदन करण्यात येत नाही. पण ते नियमाने होते किंवा होत नाही अथवा ठराविक केसमध्ये स्पेशल सँक्शन घेऊन शवविच्छेदन करण्यात येत असते. सन्माननीय सदस्यांनी विचारलेला 200 खाटांच्या संदर्भातील प्रश्न स्कोपमध्ये नाही, त्यासंदर्भात त्यांच्या सूचनेनुसार योग्य ते विषय त्यांना अवगत करण्यात येतील. सन्माननीय सदस्यांनी डायलिसीसमध्ये वाढ होण्यासंदर्भात प्रश्न विचारला होता, सदर बाब तपासून पाहिली जाईल. तसेच योग्य ते इक्विपमेंट हॉस्पिटलला पुरवठा करण्याच्या संदर्भात किंवा उपलब्ध असलेले इक्विपमेंट दुरुस्त करण्याची आवश्यकता आहे का किंवा आधुनिक पध्दतीच्या इक्विपमेंटची आवश्यकता आहे का, हे पाहिले जाईल. ठाणे जिल्ह्याची लोकसंख्या व लोकांची गरज याबाबत आढावा घेऊन योग्य त्या सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीकोनातून विभागामार्फत सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात सांगण्यात येईल.

----------------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ. शी.** : मौजे खंडाळा (ता. वैजापूर, जि. औरंगाबाद) येथे गौण खनिज उत्खनन केल्याप्रकरणी लोकप्रतिनिधीवर तहसीलदार, वैजापूर यांनी दंडाची नोटीस काढणे.

**मु. शी.** : मौजे खंडाळा (ता. वैजापूर, जि. औरंगाबाद) येथे गौण खनिज उत्खनन केल्याप्रकरणी लोकप्रतिनिधीवर तहसीलदार, वैजापूर यांनी दंडाची नोटीस काढल्यासंबंधी सर्वश्री भाऊसाहेब पाटील-चिकटगावकर, अजित पवार, दिलीप वळसे-पाटील, जयंत पाटील, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

(चर्चा पुढे सुरु....

श्री.भाऊसाहेब पाटील-चिकटगावकर : अध्यक्ष महोदय, मी विचारलेल्या प्रश्नासंदर्भात मंत्री महोदयांनी सांगितले होते की, चौकशी करुन योग्य ते उत्तर देण्यात येईल. मी मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, मी लक्षवेधीमध्ये उपस्थित केलेल्या विषयाच्या अनुषंगाने चौकशी झाली, त्याचा निकाल देण्यात आला व गट क्रमांक 725 चे 5 मालक असताना केवळ आमदार असलेल्या एका मालकावर कारवाई झाली इतर लोकांवर कारवाई करण्यात आली नाही. त्यामुळे माननीय जिल्हाधिकारी यांना पत्र देऊन मी चौकशी करण्याची विनंती केली होती. त्याकरिता त्यांनी एका तहसिलदाराची नेमणूक केली होती व त्या तहसिलदाराने माझ्यावर केलेली कारवाई चुकीची असल्याने ती रद्द केली. तसेच, कोणत्याही प्रकारचे उत्खनन झाले नसल्याचे सिध्द झाले. तरी देखील संबंधित तहसिलदार यांचेवर कोणती कारवाई करण्यात येणार आहे, यासंदर्भात राज्यमंत्री महोदयांनी उत्तर दिले नाही.

यानंतर JJ-1....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. भाऊसाहेब पाटील-चिकटगावकर.....
संबंधित तहसिलदारामुळे माझ्यावर जो अन्याय झालेला आहे, आणि माझी जी बदनामी झालेली आहे त्याबद्दल सर्व प्रकरणामध्ये निकाल लागून माझ्याविरुध्द खोटी कारवाई झाल्याचे सिध्द झाल्यामुळे संबंधित तहसिलदाराला निलंबित करुन कार्यवाही करावी एवढीच विनंती आहे.

श्री. एकनाथराव खडसे : अध्यक्ष महोदय, या ठिकाणी तहसिलदार यांनी 30.12.2015 रोजी ईटीएसद्वारे उत्खनन केलेल्या दगडखाणीची मोजणी केली आणि त्या क्षणी त्यांच्या लक्षात आले आहे की, मंजूरीपेक्षा जादाचे उत्खनन करण्यात आले असून त्यासंबंधी परवानगी घेतलेली नाही किंवा त्याबद्दल शासनाला रॉयल्टी मिळालेली नसल्यामुळे त्यांनी संबंधितांना 5 पट दंड आकारला आहे. आपण जे म्हणता की, यामध्ये आपण किंवा इतर कोणीही ज्यादाचे उत्खनन केले नसल्याचे हे सिध्द झाले आहे आणि यासाठी अपर जिल्हाधिकारी यांच्याकडे अपिल दाखल केलेले आहे, तर त्याबद्दल अपर जिल्हाधिकारी यांनी ईटीएसद्वारे उत्खनन केल्याच्या संदर्भातील कुठलाही उल्लेख केलेला नाही. आपण म्हणता की, मोजणी करीत असताना आपण संबंधिताना नोटीस द्यायला पाहिजे या कारणाबद्दल मी सांगू इच्छितो की, ज्यावेळी आपण एखाद्या ठिकाणी धाड घातलो किंवा एखाद्या ठिकाणी रेड करतो त्यावेळी आपण त्याला कधीही अशा प्रकारची नोटीस देत नाही. ज्या ज्या वेळी अचानक तपासणी होते त्या त्या वेळी नोटीस देण्याची आवश्यकता नसते. जर त्याला चालेंज करायचे असते तर त्या ईटीएस तपासणी यंत्रणेला चालेंज केले असते. ईटीएस अशी यंत्रणा आहे की, ज्या यंत्रणेला उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयाने मान्यता दिलेली आहे. परंतु अपर जिल्हाधिकारी यांनी निर्णय दिलेला आहे. त्यामुळे त्या निर्णयाच्या अनुषंगाने आवश्यकता वाटत असल्यास आपल्या समक्ष ईटीएसद्वारे मोजणी करण्यात येईल. आपल्याला वाटत असेल तर त्या तहसिलदारऐवजी दुसऱ्या तहसिलदाराकडे प्रकरण देता येईल. अपर जिल्हाधिकारी नको असेल तर जिल्हाधिकारी यांच्यामार्फत तपासणी करण्यात येईल. मात्र आपल्या समक्ष ईटीएस मशीनद्वारे तपासणी करण्यात येईल. त्यामध्ये जर तो दोषी आढळला आणि हेतूपुरस्सर व जाणीवपूर्वक त्याने हे कृत्य केल्याचे आढळले तर त्या तहसिलदाराला निलंबित करण्यात येईल.

श्री. जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, सन्माननीय महसूल मंत्र्यांनी जे उत्तर दिले त्याच संदर्भात श्री. चंद्रकांत शेळके, तहसिलदार, गंगापूर यांना या प्रकरणी पुन्हा तपासणी करण्यास

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयंत पाटील........

सांगितले आणि त्यानुसार त्यांनी जी स्थळपाहणी केली त्याचे वर्णन केलेले आहे ते मी फक्त वाचून दाखवितो म्हणजे आपल्या लक्षात येईल.

"7/12 रेकॉर्डनुसार सदर गटामध्ये 1) श्री. कचरु रामभाऊ यांचे क्षेत्र 0.77 आर, 2) श्रीमती केसरबाई दशरथ दारुंटे यांचे क्षेत्र 1 हे. 53 आर, 3) श्री. भाऊसाहेब रामराव पाटील, सावनकुमार कल्याणसिंग राजपुत यांचे क्षेत्र 1 हे 14 आर. 4) श्री. दिपक रायभान सुर्यवंशी क्षेत्र 1 हे. 15 आर. आहे तसेच श्री. ज्ञानेश्वर आसाराम इंगळे व उपस्थित पंच यांनी नमूद केले की, उक्त सामाईक क्षेत्र 1 हे. 14 आर. हे दोन तुकड्यात विभागलेले आहे. यातील उत्तर बाजूने असलेल्या क्षेत्रात निम्न प्रतिचा दगड आढळून येतो. त्या क्षेत्रातून उत्खनन झाल्याचे दिसून येते. हे क्षेत्र समतोल नसून उत्तर बाजूने उंच आहे. तर दक्षिण बाजूने नाला दिसून येतो. नाल्याच्या दक्षिणेस उक्त सामाईक क्षेत्रातील उर्वरित तुकडा (क्षेत्र) आहे, असे पंचांचे मत आहे. आज रोजी सदर खदाण बंद असून येथून डबराचे उत्खनन अथवा वाहतूक सुरू नाही. तसेच वाहतुकीसाठी रस्ता दिसून येत नाही."

म्हणजे येथून जर उत्खनन झाले असते तर वाहतुकीसाठी रस्ताच नाही. त्यामुळे स्थळपाहणी पंचनाम्यानुसार पंचानुमते ताजे उत्खनन आढळून आलेले नाही, असे श्री. चंद्रकांत शेळके, तहसिलदार, गंगापूर हे त्यांच्या दि.30.3.2015 च्या अहवालात म्हणत आहेत. म्हणून मला असे वाटते की, सन्माननीय सदस्य हे त्या ठिकाणी कोणत्याही प्रकारचे उत्खनन केलेले नाही असे ठामपणाने सांगत आहेत. त्या गटामध्ये इतरांवर केस झालेली नाही आणि फक्त सन्माननीय सदस्यांवरच केस दाखल झाली आहे. तसेच यामध्ये त्यांनी अपिल केलेले असून त्यासही मान्यता दिलेली आहे. म्हणून माझे मत असे आहे की, सभागृहाच्या सदस्यांच्या सांगण्यावर विश्वास ठेऊन आम्ही केलेल्या मागणीनुसार संबंधित तहसिलदार यास निलंबित करावे आणि निलंबित करावयाचे नसेल तर चौकशी पूर्ण व्हावी. मात्र तोपर्यंत या तहसिलदाराची बदली करावी. कारण त्या ठिकाणी राहून जास्त दबाव येऊन या चौकशीला फारसा अर्थ उरणार नाही आणि आपली चौकशी पूर्ण झाल्यानंतर निष्कर्ष काढाल तो आम्हालाही मान्य असेल. पण सध्या प्रथमदर्शनी जे दिसत आहे की,

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

13-04-2016 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) JJ-3

PPD/ MMP/ AKN/ 16:00

श्री. जयंत पाटील........

सभागृहाच्या सन्माननीय सदस्याचे नाव खराब होईल आणि त्यांची बदनामी होईल असा प्रयत्न करण्यात आला आहे. त्या मानहानीकडे बघून पेंडींग इन्क्वायरी दरम्यान या तहसिलदारांची ट्रान्फर करावी अशी आमची मागणी आहे.

श्री. एकनाथराव खडसे : अध्यक्ष महोदय, याठिकाणी डिसेंबर महिन्यात ईटीएसद्वारे खदानीची तपासणी केली होती त्याला चार महिने झाले. त्यामुळे आताच्या अहवालामध्ये असे येणार की उत्खनन झालेच नाही. पंचनाम्यामध्ये उत्खनन केले असा अहवाल आज तरी येऊ शकत नाही. हा अहवाल चार महिन्यांनंतरचा आहे. त्यामुळे या कालखंडामध्ये ईटीएस प्रणालीने जे मोजमाप केलेले आहे याला सुप्रिम कोर्टाने मान्यता दिलेली आहे. जे निष्कर्ष आहेत ते 100 टक्के खरे आहेत असे सुप्रिम कोर्टाने शिक्कामोर्तब केलेले आहे. फक्त यामध्ये अडचण अशी आहे की, नैसर्गिक न्याय तत्त्वानुसार त्यांना बोलवायला पाहिजे होते, पण शासनाची भूमिका असते की एखाद्या दारुच्या दुकानावर धाड घालायची असेल तर त्याला आधी सांगतो का की आम्ही धाड घालायला येत आहोत. हे होणे शक्य नाही. अशा स्वरुपाचे अधिकार त्यांना दिलेले आहेत की तपासणी करायची असेल तर परवानगीची आवश्यकता नाही. 24 तासामध्ये केव्हाही जाऊन तपासणी करु शकता. आता त्या तहसिलदाराकडून चार्ज काढून घेऊन गंगापूर तहसिलदाराकडे चार्ज दिलेला आहे. तेथील स्थानिक लोकप्रतिनिधी आणि जिल्हाधिकाऱ्यांसमवेत ईटीएसद्वारे पाहणी करण्यात येईल. उत्खनन केले किंवा नाही हे रेकॉर्डला आहे. ठेका घेतला, नाही घेतला, तपासणी केली, नाही केली याची संपूर्ण तपासणी जिल्हाधिकारी त्याठिकाणी करतील. यामध्ये किंचितही हेतूपुरस्सर केलेले आहे असे आढळून आल्यास ताबडतोब त्याच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात येईल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी. :** लक्षवेधी सूचनांसंबंधीची निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

उप सचिव : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेतील बाब क्रमांक 9 (ब) च्या अंतर्गत दाखविण्यात आलेल्या क्रमांक 1 ते 73 या लक्षवेधी सूचनांसंबंधीची निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवते.

**अध्यक्ष** : निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहेत.

( प्रेस : येथे सोबत जोडलेली क्रमांक 1 ते 73 ही निवेदने कृपया छापावी. )

5.......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**आंतरराष्ट्रीय मल्ल श्री.राहूल आवारे याला ऑलिंम्पिक निवड स्पर्धेतून डावलल्याबाबत.**

श्री. जयंत पाटील : अध्यध महोदय, माननीय मुख्यमंत्री सभागृहात उपस्थित असल्यामुळे मला एक सूचना याठिकाणी करावयाची आहे. महाराष्ट्राचा एकमेव आंतरराष्ट्रीय मल्ल श्री.राहूल आवारे याला भारतीय कुस्ती महासंघाने रिओ ऑलंम्पिक सन 2016 साठी ज्या पात्रता स्पर्घा घेतल्या त्यात या आवारेने ज्यांना पराभूत केले ते मल्ल श्री.अमित कुमार आणि संदीप तुमर यांना रिओ ऑलंम्पिकसाठी संधी देण्यात आली. श्री.राहूल आवारे यांना मात्र पुढे जाण्याची संधी देण्यात आलेली नाही. आवारे यांनी दिल्लीच्या दोन्ही मल्लांना पराभूत केले. मंगोली आणि तुर्की येथे होणाऱ्या ऑलंम्पिक निवड स्पर्धेसाठी व्हिजा न देता स्पर्धेतून डावलले गेले. श्री.आवारे हा जॉर्जिया येथे होणाऱ्या कॅम्पसाठी दिल्ली विमानतळावरुन निघाला. त्यावेळी विमानतळावर त्याला फक्त जॉर्जियाचा व्हिजा आहे दुसरा व्हिजा नाही. त्यामुळे तुला मागे यायचे आहे असे सांगण्यात आले. श्री.आवारे यांनी ज्या दोन मल्लांचा पराभव केला त्या दोघांना पुढे पाठविण्यात आले. भारतीय कुस्तीगीर परिषदेने अशाप्रकारचे कृत्य केले असल्यामुळे मराठी आणि ज्याला मेडल मिळण्याची जास्त शक्यता आहे अशा मल्लाची बाजू घेऊन माननीय मुख्यमंत्र्यांना माझी विनंती आहे की, माननीय केंद्रीय क्रीडा मंत्र्यांशी बोलून आणि भारतीय कुस्ती असोशिएनसोबत बोलून त्या दोघांना पाठवावयचे तर पाठवा, परंतु या मल्लाला सुध्दा पाठवा. कारण याला जास्त मेडल मिळण्याची शाश्वती आहे. म्हणून माननीय मुख्यमंत्र्यांनी यात हस्तक्षेप करावा आणि केंद्र स्तरावरील लोकांशी बालावे अशी माझी विनंती आहे.

UU-1.........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी जो विषय मांडला. त्याबाबत सन्माननीय सदस्य श्री.महेश लांडगे हे सुध्दा माझ्याकडे आले होते. त्यांनी सर्व वस्तुस्थितीची माहिती माझ्याकडे दिलेली आहे. याबाबत जरूर मी स्वत: आदरणीय केंद्रीय स्पोर्टस् मंत्र्यांसोबत चर्चा करेल आणि त्यांना हा अन्याय त्यांनी दूर करावा अशी विनंती करेल. याबाबत चौकशी करुन सदर कुस्तीगीराला त्याठिकाणी कसे पाठविता येईल यासंदर्भातील कारवाई केली पाहिजे.

श्री.पृथ्वीराज चव्हाण : अध्यक्ष महोदय, मी हा विषय त्यांच्यासमोर मांडू इच्छितो. कालपासून आम्ही सभागृहामध्ये मालेगाव खटल्यामध्ये जी बातमी आपल्यासमोर आलेली आहे. मालेगाव खटल्यातील अतिशय महत्वाच्या साक्षीची कागदपत्रे, नस्त्या विशेषत: प्रज्ञासिंग ठाकूर यांच्या ज्या साक्षीच्या नस्त्या होत्या त्या हरवलेल्या आहेत. चोरीला गेल्या की गायब केल्या गेल्या. अशी बातमी वर्तमानपत्रामध्ये आलेली आहे. याचे स्पष्टीकरण आम्ही कालपासून मागतो आहोत. परंतु कोणी उत्तर द्यायला तयार नाही. खरी परिस्थिती काय आहे. सरकार या खटल्याला खरोखरीच वेगळ्या दिशेने नेणार आहे काय? आज पुन्हा एक दुसरी बातमी आलेली आहे. एनआयएने ज्या अल्पसंख्यांक समाजाच्या काही व्यक्तींना बरेच दिवस आत ठेवले होते. त्यांना नंतर सोडले गेले होते. कारण त्यांच्याकडे काही पुरावा सापडला नव्हता. त्यामध्ये परत काही बदल होतो आहे अशी बातमी आलेली आहे. याबाबत खरी परिस्थिती काय आहे ?

श्री.देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, सन्माननीय माजी मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण यांनी जो विषय मांडला. ही बाब कोर्टाच्या अखत्यारितील आहे. पण कोर्टाकडून ती माहिती मागवित आहोत. सदर माहिती कोर्टाकडून मिळाल्यानंतर खरच फाईली गेल्या आहेत किंवा यासंदर्भातील वस्तुस्थिती काय आहे हे याठिकाणी मांडण्यात येईल. दुसरा विषय आपण जो सांगितला त्याची माहिती आता माझ्याकडे नाही. पण त्यातील जी काही उपलब्ध माहिती आहे. म्हणजे काळात चर्चेच्या निमित्ताने मी जे ब्रिफिंग घेतले होते तर त्यासंदर्भात राज्य सरकारने त्याही काळात वेगळी भूमिका घेतली होती आणि एनआयएने वेगळी भूमिका घेतली होती. राज्य सरकारने आपल्या ॲफिडेव्हीडमध्ये अतिशय स्पष्टपणे असे सांगितले होते की, ज्यांना आम्ही पकडले होते तेच आरोपी आहेत. एनआयएने मात्र त्याच्या विरोधात भूमिका घेतली आणि एनआयएने सांगितले



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस ........

की, राज्य सरकारने ज्यांना पकडले आहे ते योग्य आरोपी नाहीत. आम्ही ज्यांना पकडले ते योग्य आरोपी आहेत. त्यामुळे दोघांचीही भूमिका त्यावेळेसपासून सारखीच आहे. पण आता केस एनआयए चालविते. परंतु राज्य सरकारने भूमिका बदललेली नाही. जी आपल्या काळात होती तीच भूमिका राज्य सरकारने घेतलेली आहे. पण आता केस एनआयए चालवित असल्यामुळे एनआयएच्या भूमिकेवरच केस त्याठिकाणी चालू आहे.

श्री.जयकुमार गोरे : अध्यक्ष महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास मी एक गोष्ट आणू इच्छितो की, सियाचीनमध्ये एक दुर्घटना घडली आणि त्या घटनेत 10 जवान शहीद झाले. त्याचवेळी शहीद झालेल्या जवानांना तामिळनाडू सरकारने 25 लाखांची मदत केली. भूखंड दिला, त्या जवानाच्या पत्नीला नोकरी दिली. कर्नाटक सरकारनेही तशाच प्रकारचा निर्णय घेतला. आपल्या महाराष्ट्रातील मान तालुक्यातील एकमेव जवान त्यावेळी सुनिल सुर्यवंशी शहीद झाला होता. या जवानाच्या कुटूंबियांना महाराष्ट्र सरकारच्या माध्यमातून मदत व्हावी अशी मी आपल्या माध्यमातून मुख्यमंत्री महोदयांना विनंती करतो. शासनाच्या वतीने अजून त्या कुटूंबियांना कोणी भेटायला गेलेले नाही. यामध्ये राजकारण मला करायचे नाही. यात आपण लक्ष घालून शासनाच्या वतीने मदत व्हावी अशी मी विनंती करतो.

श्री.देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, त्यांना मदत करण्याची घोषणा मी यापूर्वीच केलेली आहे आणि ती निश्चित केली जाईल. मी पुन्हा माहिती घेतो. पण राज्यमंत्री त्याठिकाणी जाऊन भेट देऊन आलेले आहेत. तरीही तुम्ही सांगत आहात तर त्याची माहिती घेण्यात येईल.

श्री.दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, माझी पॉईंट ऑफ प्रोसिजर आहे. गेल्या दीड महिन्यापासून अधिवेशन सुरु आहे. या दीड महिन्यात चर्चेच्या किंवा प्रश्नोत्तराच्या माध्यमातून मंत्री महोदयांनी उत्तरे देत असताना अनेक प्रश्नांच्या संदर्भात अतिरिक्त माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतो अशाप्रकारच्या अनेक विषयावर घोषणा केलेल्या आहेत. आतापर्यत ही अतिरिक्त माहिती सभागृहाच्या पटलावर एकदाही आलेली नाही. ती आज संध्याकाळपर्यंत येणार आहे किंवा त्याचे काय करणार आहात याबाबत कळले तर बरे होईल. आज शक्य नसेल तर सन्माननीय सदस्यांना

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पोष्टाने पाठविण्याची व्यवस्था करावी. पण मला असे वाटते की, सभागृहाची सॅन्टिटी लक्षात घेता

........3



श्री.दिलीप वळसे-पाटील .........

एकदा पटलावर ठेवतो म्हटल्यानंतर त्यादिवशी किंवा दुसऱ्या दिवशी ती माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवायला पाहिजे. याबाबतची योग्य ती भूमिका घेऊन त्याची नोंद घ्यावी अशी माझी विनंती आहे.

श्री.देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, जरुर याची माहिती घेतली जाईल. एक अशाप्रकारचे आश्वासन मी स्वतः दिले होते. रेट ऑफ कन्व्हीक्शनची माहिती मी सभागृहाच्या पटलावर ठेवतो आहे. दुसरी कोणती माहिती राहिली असेल ती देखील ठेवण्यात येईल.

........4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : सामाजिक बहिष्कारापासून व्यक्तींचे संरक्षण
(प्रतिबंध, बंदी व निवारण) विधेयक

L.A. BILL NO. XXIII OF 2016.

(A BILL TO PROVIDE FOR THE PROHIBITION OF SOCIAL BOYCOTT OF A PERSON OR GROUP OF PERSONS INCLUDING THEIR FAMILY MEMBERS, AND FOR MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO.)

प्रा.राम शिंदे ( गृह (ग्रामीण) राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2016 चे वि.स.वि. क्रमांक 23, एखादी व्यक्ती किंवा व्यक्तींचा समूह तसेच त्यांच्या कुटूंबातील सदस्य यांच्यावरील सामाजिक बहिष्कारावर बंदी आणण्याकरिता प्रतिबंध करण्यासाठी आणि त्यांच्याशी संबंधित व तद्नुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न प्रस्तुत झाला

**अध्यक्ष** : आता विधेयक विचारात घेण्याबाबतच्या प्रश्नावर चर्चा घेण्यात येईल. त्यानंतर विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकला जाईल.

आता सन्माननीय सदस्यांनी आपले भाषण सुरु करावे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) : अध्यक्ष महोदय, हे अतिशय महत्वाचे विधेयक सभागृहात शासनाने आणलेले आहे. महाराष्ट्रातील वेगवेगळ्या भागातील वेगवेगळ्या ठिकाणी जातपंचायतीकडून ज्या अन्यायकारक भूमिका अलीकडच्या काळात घेण्यात आल्या, त्या फार धक्कादायक आहेत. माझ्या स्वतःच्या मतदारसंघात देखील लग्न करण्यावरुन आणि लग्न मोडण्यावरुन एखाद्या व्यक्तीला बहिस्कृत करण्यापर्यंत वेगवेगळ्या गोष्टी होतात. हे आपण यापूर्वी अनेकवेळा ऐकले आहे, माझ्या मतदारसंघातील याची मला जाणीव आहे. याबाबत महाराष्ट्रामध्ये महाराष्ट्र जातपंचायत प्रतिबंधक अधिनियम, 2016 आपण याठिकाणी विचारात घेत आहोत. एक अतिशय चांगला प्रयत्न शासनाचा आहे. याबाबत माझ्या मनात कोणतीही शंका नाही. अंधश्रध्देच्या माध्यमातून जातपंचायतीकडून ज्या चुकीच्या गोष्टी होत आहेत त्या महाराष्ट्रात थांबल्या पाहिजेत, याबाबत कोणतेच दुमत नाही. पण हे होत असताना आपल्या संविधानाच्या मुलभूत हक्कामध्ये संस्कृती, भाषा, लिपी याचे संरक्षण करण्याचा मुलभूत हक्क भारतीय संविधानाच्या मुलभूत हक्कामध्ये सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क या कलम 29-1 नुसार भारताच्या राज्यक्षेत्रात किंवा त्याच्या कोणत्याही भागात राहणाऱ्या ज्या कोणत्या नागरिक गटाला स्वतःची वेगळी भाषा, लिपी, संस्कृती असेल, त्याला ती जतन करण्याचा हक्क असेल असे संविधानाचे संरक्षण या सर्वच जमातींना आहे.

अध्यक्ष महोदय, मुलभूत अधिकारावर गदा येईल असे कोणतेही काम आपल्याला करता येणार नाही. आपला उद्देश फार चांगला आहे. पण मला खात्री आहे की, आपण हे तपासून घेतले असेल, शेवटी त्यांच्या संस्कृतीवर गदा येणार नाही म्हणून त्याने काहीही करावे यालाही आपल्या सर्वांचा विरोध आहे, त्याचे मी काही समर्थन करीत नाही. याचा ड्राफ्ट आपण वेबसाईटवर टाकलेला आहे. या क्षेत्रातील भटक्या विमुक्त जातीतील ज्या संघटना आहेत त्याचा अलीकडच्या काळात असा समज झालेला आहे की, त्यांच्या संस्कृतीवर गदा आणण्याचे काम सुरु झाले की काय. म्हणून मी याठिकाणी सभागृहाचा वेळ घेत आहे. कदाचित याचे रिपरकेशन म्हणून किंवा रिप्लेक्शन म्हणून या भटक्या विमुक्त जमातीच्या संघटना आहेत. त्यांना त्यांचे म्हणणे अधिक जोरात मांडण्याची इच्छा तयार होईल. आज हे विधेयक मंजूर करा, पण माझी मुख्यमंत्री

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

महोदयांना विनंती आहे की, लक्ष्मण माने पद्मश्री आहेत त्यांनी याबाबतचे बरेच मोठे लिखाण

........6



श्री.जयंत पाटील...........

माझ्याकडे दिलेले आहे. ते सर्व वाचून मी सभागृहाचा वेळ घेत नाही. आज या विधेयकाला मंजूरी देऊ या. पण त्यांच्या अधिकारावर गदा येत असेल तर माननीय मुख्यमंत्री आणि माननीय गृह राज्यमंत्री यांनी त्यांचेही म्हणणे भविष्यकाळात ऐकून घ्यावे एवढी विनंती करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

------------------

**अध्यक्ष** : विधेयकावर बोलण्यासाठी कोणाला बंदी करता येत नाही हे खरे असले तरी आज अधिवेशनाचा शेवटचा दिवस आहे. अजून अंतिम आठवडा प्रस्तावावर काही सदस्य भाषणे करणार आहेत, त्यानंतर मंत्र्यांचे उत्तर होणार आहे.

..........7

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) : अध्यक्ष महोदय, सामाजिकदृष्ट्या अतिशय महत्वाचे असे हे विधेयक आहे. यामध्ये पुष्कळशा गोष्टींचा अंतर्भाव केलेला आहे. दबलेला जो वर्ग आहे त्याला याचा त्रास सर्वात जास्त होतो. अतिशय चांगल्या उद्देशाने हे विधेयक आले त्याबद्दल मी सरकारचे मनापासून आभार मानू इच्छिते. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी सांगितले, त्याचप्रमाणे माझेही म्हणणे आहे की, काही संघटनांची याबाबत वेगवेगळी मते आहेत.

LL-1……

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती वर्षा गायकवाड........

माझी विनंती आहे की, आपण त्यांची मते ऐकून घ्या. बिलामध्ये फक्त बळी पडलेल्या व्यक्ती लिहीलेल्या आहेत. शारीरिक हानी, आर्थिक हानी, मालमत्तेची हानी सोसावी लागते, तुम्ही शारीरिक, आर्थिक, मालमत्तेच्या हानी बद्दल बोललात. मानसिक हानी बद्दल काही बोलला नाहीत. ज्यावेळेला महिलेची नग्न धिंड काढली जाते. ज्या महिलेला समाजाच्या बाहेर बहिष्कृत करतो, तीचे अन्न, पाणी समाजाच्या माध्यमातून बंद केले जाते. तेव्हा तिला मानसिक आधाराची गरज असते. तुम्ही शारीरिक म्हटले तर बरोबर आहे. तुम्ही म्हटले आहे की, पुढच्याकाळामध्ये तिला मदत करणार. महिलेची मानसिक हानी, व्यक्ती किंवा समुहाची मानसिक हानी झाली तर याच्यामध्ये त्यांना प्रोटेक्शन मिळावे, अशी मी आपल्या माध्यमातून सूचना करते. दुसरी सूचना अशी आहे की, काही लोकांचे म्हणणे वेब साईटवर ठेवले, या संदर्भात काही मंडळी मला भेटली. परंपरागत रुढीला कुठे हात बसू नये असेही लोकांचे त्याच्याबद्दल गैरसमज निर्माण होण्याचे काम होत आहे, त्याबद्दल आपण आपल्या भाषणामध्ये क्लेरिफीकेशन करावे. एक चांगले बिल आणल्याबद्दल मनापासून धन्यवाद.

......

...2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.उन्मेश पाटील ( चाळीसगांव ) : अध्यक्ष महोदय, सर्व प्रथम मी महाराष्ट्र शासनाचे मनापासून अभिनंदन करतो की, अतिशय गरजेचे बिल आणले आहे. परिपत्रकाच्या आधारे गुन्हे दाखल केले जायचे, त्यासंदर्भात राज्यामध्ये कायदा नव्हता. खऱ्या अर्थाने शासनाने महत्वाचा कायदा आणला म्हणून या शासनाचे अभिनंदन करतो. परंतु अभिनंदन करत असताना एकाच मिनिटात सूचना करावयाची आहे. वेळेचे गांभीर्य आहे. यामध्ये जवळवजळ 80 पेक्षा जास्त गुन्हे आणि 900 गुन्हेगारांना अटक केली आहे.

अध्यक्ष महोदय, कायदा नसताना परिपत्रक होते, त्यामुळे त्यामध्ये त्रुटी होत्या, त्यांना जामीन लवकर मिळायचे. आता याबाबतीत कायदा होत असताना विनंती करायची आहे की, यासंदर्भात गृह विभागाकडून मसूदा आला आहे, त्यामध्ये सामाजिक बहिष्कार गृहीत धरण्यात आला आहे. यासंदर्भात आरोपींचा अभ्यास केला तर त्यामध्ये अघोरी अंधश्रध्दा आहे, शारीरिक इजा आहे. आर्थिक दंड आकारला जातो. काही ठिकाणी नवीन वधुवरांना पांढरे कपडे घालायला सांगतात. जर कपडयाला लाल डाग नसेल तर तो विवाह मान्य नाही. अशा पध्दतीचे गुन्हे त्या ठिकाणी घडलेले आहेत. त्याची नोंद झालेली आहे. महिला अत्याचाराचा उल्लेख नाही. याचा उल्लेख केला गेला तर स्पेसिफिक आरोपीला चपराक देता येईल. म्हणून मी विनंती करेन, हा दखल पात्र आणि अजामिन पात्र गुन्हा केला गेला, त्याच बरोबर जलदगतीने सहा महिन्यांच्या कालावधीत निर्णय दिला गेला तर खऱ्या अर्थाने कायदा खूप चांगल्या पध्दतीने राबविता येईल. मी एवढयाच सूचना आपल्या माध्यमातून करतो. धन्यवाद.

........

...3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हर्षवर्धन सपकाळ ( बुलढाणा ) : अध्यक्ष महोदय, या विधेयकाचे कार्यकर्ता या नात्याने स्वागत करतो. अंधश्रध्दा निर्मुलनचा कायदा आणत असताना चर्चा झाली. हा कायदा आणल्याने खूप मोठा वादंग होणार आहे. आपल्या धार्मिक प्रॅक्टीस आहे त्यावर बंदी येणार आहे असे वातावरण होते. मात्र नरेंद्र दाभोळकरांसारख्या कार्यकर्त्याचे बलिदान झाल्यानंतर हा कायदा झाल्यानंतर तो किती आवश्यक होता हे आज उभ्या महाराष्ट्राला पटलेले आहे. अधिकचा वेळ घेणार नाही. विधेयकामध्ये पाच दुरुस्तीच्या अनुषंगाने सूचना करु इच्छितो. यामधील 2 (क) विधेयकाची व्याख्या दर्शविते, जात पंचायत म्हणजे काय आणि त्यामध्ये या गुन्हयाचे स्वरुप कसे राहील, हे करत असताना फार मोघम स्वरुपाच्या शब्दांचा उपयोग केलेला आहे. "मौखिक किंवा लेखी फतवे काढून" हया शब्दांवर व्याख्येमध्ये थांबता येणार नाही. ही जात पंचायत काय करते, शिक्षा देते, बऱ्याच शिक्षा भारतीय दंड संहितेमध्ये बसणार नाहीत. कलम 323, 324 सारख्या बसतील. एखाद्याला दिवसभर उभे रहा, किंवा आठ दिवस उभे रहा असे म्हटले तर तिथे कुठे बसणार नाही. मात्र ही व्याख्या अजून खोल करण्याची आवश्यकता आहे. त्यामध्ये दंड आकारला जातो, वर्गणी घेतली जाते. कोणाला म्हटले तुला व्हाळीत टाकले, पंधरा लाख रुपये दे तुला पुन्हा समाजात वापस घेतो. अशा ज्या प्रॅक्टीसेस या जात पंचायत नियमाच्या होतात. त्यांचा कायदे करण्याचा, फतवे काढण्याचा दंड, शिक्षा, ठोठावयाचा प्रकार आहे हया प्रकाराला कव्हरेज या 2 (क) मध्ये येऊ शकले नाही. यामध्ये शिक्षा, दंड, वर्गणी, देगणी या शब्दांचा आणि या व्याख्येला वस्तुस्थिती जन्य करावा अशा प्रकारची दुरुस्ती सूचवावीसी वाटते.

अध्यक्ष महोदय, तक्रार मिळाल्यानंतर काय करावे, हे नियम 25 च्या अनुषंगाने सूचविलेले आहे. या विधेयकात व्हिजीलन्सची कुठेही व्यवस्था केल्याचे आढळत नाही. दक्षता अधिकारी नेमले नाही तर कंप्लेंट सर्वदूर फिरत राहील. यापूर्वीच्या प्रत्येक कायद्यामध्ये व्हिजीलन्सची व्यवस्था केलेली आहे. त्यामुळे दक्षता अधिकारी नेमावा, जेणेकरुन संबंधिताला जिल्हा पातळीवर संबंधित भागापुरते जबाबदार धरता येईल. या नियम 15 च्या अनुषंगाने "सामाजिक बहिष्कार बंदी

....4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हर्षवर्धन सपकाळ.......

अधिकारी" हा शब्द नियम 15 मध्ये घातलेला आहे, यालाच दक्षता या मोडवर करण्याची आवश्यकता आहे. नियम 17 मध्ये बळी पडलेल्या व्यक्तीला नुकसान भरपाई देणे, अशी या विधेयकामध्ये तरतुद आढळून येते. मात्र रक्कम आणि ताबडतोब त्या संदर्भात रिलिफ देणे गरजेचे आहे.

अध्यक्ष महोदय, बलात्कार पिढीत भगिनीला मदत देतो, अॅट्रॉसिटीमध्ये गुन्हे दाखल होणाऱ्यांनाही अनुदान देतो, थेट स्वरुपामध्ये ताबडतोबीने पिडीताला शासकीय अनुदान देण्याची तरतुद असावी, ही दुरुस्ती या ठिकाणी सूचवु इच्छितो. सोबतच जेव्हा समाजाला जाती सोबत माती खायला नकार देतो तेव्हा फार मोठे संकट त्याच्यावर कोसळते ते कोसळत असताना त्याला तग धरुन ठेवण्याकरिता काय व्यवस्था करित आहोत ? महिला सुधारगृहे, बाल सुधारगृहे किंवा पिडीत महिलेला निवाऱ्याची जिल्हा स्तरीय गृहे आहेत. यामधील ज्या व्यक्ती असतील त्या तात्पुरते पुनर्वसनाच्या अनुषंगाने यांना निवासाची व्यवस्था करायला पाहिजे. यापूर्वीची उपलब्ध गृहे आहेत. महिला बाल गृहे असतील, बाल गृहे असतील, यामध्ये कोणा कोणाला ठेवायचे याची लिस्ट आहे. त्या लिस्टमध्ये या कायद्याचा अंतरभाव होणे जरुरीचे आहे. दरम्यानच्या काळामध्ये त्या महिलेला किंवा त्या पुरुषाला, त्या बालकाला, बालिकेला राहण्याकरिता देखिल व्यवस्था करण्याची आवश्यकता आहे. या सर्वासोबत शासनाच्या वेगवेगळया पुनर्वसनाच्या योजना आहेत. या पुनर्वसनाच्या योजनेमध्ये मुख्यमंत्री महोदय प्रथम प्राधान्याने सर्व योजनांचा लाभ देत असताना पुनर्वसनाचा प्रश्न या विधेयकाच्या अनुषंगाने घ्यावा. अशा प्रकारची दुरुस्ती या ठिकाणी सूचवितो व महाराष्ट्राला पुरोगामी म्हणणाऱ्या शाहु, फुले, यांच्या महाराष्ट्राला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या 125 व्या जयंतीच्या पूर्व संध्येला विधेयक पारित होत असताना जरुर त्याचे स्वागत करतो. या नंतरच्या काळात जी मोठी धर्मपिठे आहेत, त्या नागपूर सारख्या धर्मपिठांचे काही व्हावे अशी शुभेच्छा या ठिकाणी मुख्यमंत्री महोदयांना देतो. धन्यवाद.

..........



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शंभूराज देसाई (पाटण) : अध्यक्ष महोदय, या विधेयकाचे मी स्वागत करतो माननीय मुख्यमंत्र्यांनी हा कायद्या दुष्ट प्रवृत्तींवर रोक लावण्याकरिता आणलेला आहे. मला एक गोष्ट मुख्यमंत्री महोदयांच्या निदर्शनास आणावयाची आहे. कलम (3) च्या 13 मध्ये उल्लेख केलेला आहे की, जर तो नीतिमत्ता, सामाजिक स्वीकृती आणि राजकीय कल........ काही ठिकाणी राजकीय गुंडगिरी या माध्यमातून किंवा राजकीय मंडळी काही लोकांना जर एखादे कुटुंबे, दोन कुटुंबे त्यांच्या विचाराच्या उलट वागले तर त्यांना गावातून बाहेर करायचे, गावकीतून बाहेर करायचे, भावकीतून बाहेर कराचे, त्याला पाणी घेऊ द्यायचे नाही. त्याला शेतात जाऊ द्यायचे नाही. अशा सुध्दा गोष्टी होऊ शकतात.

अध्यक्ष महोदय, राजकीय कल याबाबतचा त्या कलमामध्ये उल्लेख केलेला आहे. तशा पध्दतीने या राजकीय गुंडगिरीला बंद करणे, अशा वागणाऱ्या प्रवृत्तींवर आळा घालणे याचा सुध्दा निश्चिपणाने यामध्ये समावेश आहे. याबद्दल सुध्दा मुख्यमंत्री महोदयांना धन्यवाद देतो. राजकीय गुंडगिरीच्या तक्रारी हे विधेयक संमत झाल्यानंतर आल्यातर पोलीस अधिकाऱ्यांनी त्या तक्रारी प्राधान्याने घ्याव्यात. पोलीस अधिकारी या लोकांकडे लक्ष देत नाहीत, प्राधान्याने यांच्या सुध्दा तक्रारीची दखल घेऊन त्याला कायद्याचा आधार द्यावा, एवढी मी मुख्यमंत्री महोदयांना विनंती करतो.

.........

MM-1 ........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस (मुख्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, या सभागृहात सामाजिक बहिष्कारापासून संरक्षण, अटकाव व प्रतिबंध व सुधारणा विधेयक 2016 मांडलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील, प्रा.वर्षा गायकवाड, श्री.हर्षवर्धन सपकाळ, श्री.शंभुराज देसाई, श्री.उन्मेष पाटील यांनी यावर त्यांचे विचार मांडले आहे. माननीय विरोधी पक्ष नेते यांनी या विधेयकाला लेखी सूचना देत असल्याचे सांगितले आहे. या सर्व सन्माननीय सदस्यांचे मी आभार मानतो कारण त्यांनी काही सूचना केलेल्या असून विधेयकाला पाठींबा दिलेला आहे.

अध्यक्ष महोदय, आपणास माहिती आहे की, महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्यामध्ये अशा अनेक घटना घडलेल्या आपणास दिसलेल्या आहेत. यामध्ये जात पंचायतीच्या नावाखाली सामान्य, गरीब, दलित, आदिवासी माणसाला व समाजाला वाळीत टाकण्याचे प्रकार, त्यांना दंड करण्याचे प्रकार, स्वतः न्यायालय बनून तेथे बहिष्काराचे वातावरण तयार झाल्याचे प्रकार आपण पाहिलेले आहे. विशेषतः गेल्या काही वर्षात एकटया रायगड जिल्हयामध्ये जवळजवळ 46 असे गुन्हे घडले आहेत व 633 आरोपी यामध्ये निष्पन्न झालेले आहेत. म्हणून वेळोवेळी मागणी येत होती की, अस्तित्वात असलेले कायदे याकरिता अपुरे पडत आहेत. याकरिता ॲडीशनल व स्वतंत्र कायदा केला पाहिजे अशी बऱ्याच वर्षापासून मागणी चालू होती. आज आपण आयपीसीअंतर्गत काही कारवाई करतो. आजच्या विधेयकामध्ये असलेली तरतूद आयपीसीमध्ये नसल्यामुळे गुन्हेगार सुटून जातो किंवा त्याला शिक्षा देता येत नाही. वर्षानुवर्षे केस सुरु राहते. पुराव्यामध्ये असणाऱ्या गॅपमुळे आरोपी सुटून जातो. म्हणून स्वतंत्र कायदा याकरिता करावा अशी मागणी सातत्याने येत होती. या सभागृहात मागच्या काळात मी असे घोषित केले होते की, राज्य सरकार याबाबत कायदा करील. याचा मसुदा आपण राज्य सरकारच्या संकेतस्थळावर टाकला होता. 33 विविध संघटनांनी त्यासंदर्भात काही सूचना व हरकती दिल्या होत्या. त्या सर्वांची आपण सुनावणी घेतली. सामाजिक न्याय विभाग, आदिवासी विकास विभाग, महिला व बालकल्याण विभागांचे या विषयी अभिप्राय मागविले. त्यांच्या माध्यमातून सर्वंकष कायदा आपणास कसा तयार करता येईल याचा आपण प्रयत्न केला आहे. आवश्यक सुधारणासह आपण याकरिता मंत्रिमंडळाची मान्यता दिलेली आहे.

.....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस .....

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी या विधेयकाबाबत विचारले होते की, संविधानिक अधिकारावर यामुळे अधिक्षेप होत नाही का ? या संदर्भात विधी व न्याय विभागाचे अभिमत घेण्यात आले व त्यांनी अतिशय स्पष्ट अभिमत दिले. दुसरा प्रश्न माननीय राष्ट्रपतीच्या पूर्व परवानगीचा आला होता. पण याबाबत सांगितले की, या कायद्याला अशा प्रकारच्या पूर्व परवानगीची आवश्यकता नाही. त्यानंतर आपण हा अधिनियम मान्यतेकरिता घेतला आहे. या अधिनियमामध्ये सामाजिक बहिष्कार टाकणे ही कृती आपण गुन्हा ठरविलेला आहे. 3 वर्षांपर्यंत कारावास किंवा एक लाखापर्यंत दंड किंवा दोन्ही अशा प्रकारच्या शिक्षेची तरतूद ठेवलेली आहे. सदर अधिनियमात एखादी घटना घडण्याची शक्यता असल्यास त्याबद्दल प्रतिबंधक कारवाईदेखील आपणास करता येते. केवळ गुन्हा घडण्याची वाट पाहण्याची आवश्यकता नाही. यामुळे प्रतिबंधात्मक कारवाई व अटकाव करण्याची तरतूद देखील यामध्ये केलेली आहे. त्याचप्रमाणे अपराधाखालील शिक्षापात्र अपराध, बळी पडलेल्या व्यक्तींच्या संमतीने व न्यायालयाच्या परवानगीने आपसात मिटविता येतील अशा प्रकारची तरतूद ठेवलेली आहे. द्रव्यदंडाची शिक्षा लावण्यात आली तर न्यायालयाला असे वाटले की, द्रव्यदंडाचा काही किंवा पूर्ण भाग पिडितांना द्यायचा आहे तर तो पिडितांनादेखील देता येईल. पिडितांच्या पुनर्वसनाची तरतूद देखील यामध्ये आपण ठेवलेली आहे. अशा सर्व तरतुदी यामध्ये ठेवलेल्या आहेत. मला असे वाटते की, सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील व प्रा.वर्षा गायकवाड यांनी शंका व्यक्त केली त्याबाबत यामध्ये निश्चित अशी काळजी घेण्यात आलेली आहे. तरीही भविष्यात अशा काही समस्या आढळल्यास त्यांची मते पुन्हा ऐकून घेतली जातील. हे सार्वभौम सभागृह आहे. त्यामुळे कोठे अडचण आल्यास तसा बदल देखील निश्चितपणे आपणास करता येईल.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.उन्मेष पाटील यांनी या विधेयकामध्ये काही तरतुदी नसल्याबाबतचा उल्लेख केलेला आहे. मला त्यांना एवढेच सांगावयाचे आहे की, हा कायदा स्टँड अलोन नाही. समजा स्त्री अत्याचाराचे प्रकरण असेल तर स्त्री अत्याचाराबाबतची प्रतिबंधात्मक कारवाई करताच येते किंवा आयपीसीची ॲडीशनल कारवाई यामध्ये करताच येते. त्यामुळे आता आपण करीत असलेला पुरक कायदा आहे. या 2-3 कायद्यांतर्गत जे गॅप्स होते. ज्यामुळे हे लोक

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस .....

सुटून जात होते. हे गॅप्स भरण्याचे काम आपण येथे केलेले आहे. एखाद्या स्त्रीवर वेगळया प्रकारचा अत्याचार झाला असेल तर ते कायदे व हा कायदा देखील याकरिता लागू होईल. आपणास माहिती आहे की, पॅरलली विविध कायद्यांर्गत आपण चार्जशीट तयार करतो. त्यानुसार न्यायालय निर्णय देत असते.

सन्माननीय सदस्य श्री.हर्षवर्धन सपकाळ यांनी मांडलेल्या मुद्दयाबाबत सांगू इच्छितो की, आपण नेमलेल्या अधिकाऱ्याकडून तीच अपेक्षा आहे. सन्माननीय सदस्यांनी वाचल्याप्रमाणे या कायद्याचे नाव असणार आहे. आपण यामध्ये नियम तयार करणार आहोत. त्यामुळे दंड किती हे आपण कायद्यात आणले नाही ते आपण नियमामध्ये आणणार आहोत. नियमामध्ये उचित दंड आकारण्यात येईल. याच्या नावाबाबत कधीही विचार करुन ते नाव व्यापक करता येईल.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.शंभुराज देसाई यांनी राजकीय बहिष्काराबाबतचा विषय मांडलेला आहे. सामाजिक प्रकारचा राजकीय बहिष्कार असेल तर तो यामध्ये कव्हर झालेला आहे. राजकीय प्रकारचा बहिष्कार असेल तर त्यामध्ये फारसे काही नाही. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे बालगृहामध्ये यामधील व्हिक्टीमला प्राधान्य देण्यात येईल. आपण नियम करताना याची पॉलीसीही तयार करु या विधेयकाला संपूर्ण सभागृहाने समर्थन दिलेले आहे. माननीय विरोधी पक्ष नेते यांनी केलेल्या सूचनाही याबाबत विचारात घेण्यात येतील. या सभागृहाच्या पुरोगामी परंपरेमध्ये चांगला पुरोगामी कायदा आपण एकमताने मंजूर करीत आहोत याबद्ल मला अतिशय आनंद आहे. मी सभागृहाचे आभार मानतो व हे विधेयक मंजूर करावे अशी विनंती करतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**अध्यक्ष** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 22 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

13-04-2016 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) MM-4

PNG/ AKN/ MMP/ 16:30

श्री.देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2016 चे वि.स.वि. क्रमांक 23 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**अध्यक्ष** : सन 2016 चे वि.स.वि. क्रमांक 23 संमत झाले आहे.

-----

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.:** धुळे महानगरपालिकेच्या महासभेच्या वेळी घडलेली घटना

**मु.शी.:** धुळे महानगरपालिकेच्या महासभेच्या वेळी घडलेली घटना यासंबंधी माननीय गृह राज्यमंत्री यांचे निवेदन.

प्रा.राम शिंदे (गृह (ग्रामीण) राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अनिल गोटे यांनी धुळे महानगरपालिकेत घडलेल्या घटनेबाबत उपस्थित केलेल्या मुद्दयाच्या अनुषंगाने मी आपल्या अनुमतीने नियम 47 अन्वये पुढील निवेदन करतो.

(प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे)

-----

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.:** वैजापूर येथील पोलीस निरीक्षक यांनी भिमजयंती मंडळाच्या पदाधिकाऱ्यांना वापरलेले कथित उपरोधिक शब्द

**मु.शी.:** वैजापूर येथील पोलीस निरीक्षक यांनी भिमजयंती मंडळाच्या पदाधिकाऱ्यांना वापरलेले कथित उपरोधिक शब्द याबाबत माननीय गृह राज्यमंत्री यांचे निवेदन.

प्रा.राम शिंदे (गृह (ग्रामीण) राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने श्री.राधाकृष्ण विखे पाटील, माननीय विरोधी पक्ष नेता यांनी सभागृहात उपस्थित केलेल्या विषयाबाबत नियम 47 अन्वये पुढील निवेदन करतो.

(प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे)

----

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या अनुषंगाने आयोजित शांतता कमिटी बैठकीमध्ये पो.नि.साळोखे, अकलुज पोलीस ठाणे यांनी केलेले आक्षेपार्ह वक्तव्य.

**मु.शी.:** डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या अनुषंगाने आयोजित शांतता कमिटी बैठकीमध्ये पो.नि.साळोखे, अकलुज पोलीस ठाणे यांनी केलेल्या आक्षेपार्ह वक्तव्यासंबंधी माननीय गृह राज्यमंत्री यांचे निवेदन

प्रा.राम शिंदे ( गृह ( ग्रामीण ) राज्यमंत्री ): अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने नियम 47 अन्वये पुढील निवेदन करतो :-

( प्रेस: येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

----

....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.पृथ्वीराज चव्हाण : अध्यक्ष महोदय, आज सभागृहाच्या कामकाजाचा व अधिवेशनाचा शेवटचा दिवस आहे, सर्वांनाच सभागृहाचे कामकाज कधी संपेल असे वाटत आहे. कधीपर्यंत सभागृहाचे कामकाज चालणार आहे ? हेही सांगण्यात यावे. असे असताना आपण एक-एक मुद्दे मांडण्याकरिता संधी देत आहात. मला माझे भाषण करावयाचे आहे. मी कालच कोणत्या मुद्दयांवर बोलणार आहे, हे सांगितले होते.

**अध्यक्ष :** सभागृहाची बैठक कामकाज संपेपर्यंत चालेल.

-------

......3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.:** सार्वजनिक विद्यापीठ विधेयक

**मु.शी.:** सन 2016 चे वि.स.वि.क्रमांक 16 सार्वजनिक विद्यापीठ विधेयक दोन्ही सभागृहांच्या संयुक्त समितीकडे विचारार्थ पाठविण्यात यावे या विधानसभेने पारित केलेल्या प्रस्तावास विधानपरिषदेने सहमती दिल्याबद्दलचा संदेश व विधेयक संयुक्त समितीकडे विचारार्थ पाठविण्यासंबंधीचा प्रस्ताव.

**अध्यक्ष :** विधानपरिषदेकडून एक संदेश आलेला आहे. उप सचिव तो वाचून दाखवतील.

**संदेश**

उप सचिव : "कळविण्यात येत आहे की, सन 2016 चे वि.स.वि.क्रमांक 16, विद्याविषयक स्वायत्तता व अत्युच्च गुणवत्ता,लोकशाही प्रक्रियेद्वारे पर्याप्त प्रतिनिधीत्त्व, उच्च शिक्षणाची अभिवृध्दी, त्याचे बळकटीकरण व विनियमन यांकरिता आणि त्यांच्याशी संबंधित किंवा तद्नुषंगिक बाबींकरिता तरतूद करण्यासाठी विधेयक, 2016 विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या 21 सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे. या विधानसभेच्या प्रस्तावास विधानपरिषदेने आपल्या दिनांक 13 एप्रिल,2016 रोजीच्या सभेत सहमती दिली आहे. आणखी असेही कळविण्यात येत आहे की, या संयुक्त समितीवर विधानपरिषदेने पुढील सदस्य नामनिर्दिष्ट केलेले आहेत."

1.ॲड.अनिल परब,वि.प.स.

2.श्री.शरद रणपिसे,वि.प.स.

3.श्री.सतीश चव्हाण,वि.प.स.

4 श्री.कपिल पाटील,वि.प.स.

5 प्रा.अनिल सोले,वि.प.स.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विनोद तावडे ( उच्च व तंत्रशिक्षण मंत्री ): अध्यक्ष महोदय, सन 2016 चे वि.स.वि.क्रमांक 16 विद्याविषयक स्वायत्तता व अत्युच्च गुणवत्ता,लोकशाही प्रक्रियेद्वारे पर्याप्त प्रतिनिधीत्त्व, उच्च शिक्षणाची अभिवृध्दी, त्याचे बळकटीकरण व विनियमन यांकरिता आणि

....4



श्री.विनोद तावडे.....

त्यांच्याशी संबंधित किंवा तद्नुषंगिक बाबींकरिता तरतूद करण्यासाठी विधेयक दोन्ही सभागृहाच्या संयुक्त समितीकडे विचारार्थ पाठविण्यात यावे या सभागृहाने संमत केलेल्या प्रस्तावास विधानपरिषदेची सहमती मिळाल्यावरुन हे विधेयक दोन्ही सभागृहाच्या 21 सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्याच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे आणि या समितीवर या सभागृहाचे पुढील सदस्य नामनिर्देशित करण्यात यावेत.

1. डॉ.पतंगराव कदम,वि.स.स.
2. श्री.दिलीप वळसे-पाटील,वि.स.स.
3. श्री.राजेश टोपे,वि.स.स.
4. श्री.डी.पी.सावंत,वि.स.स.
5. श्री.राजेंद्र पाटणी,वि.स.स.
6. प्रा.विरेंद्र जगताप,वि.स.स.
7. ॲड.पराग अळवणी,वि.स.स.
8. डॉ.अशोक उईके,वि.स.स.
9. ॲड.आशिष शेलार,वि.स.स.
10. प्रा.संगीता ठोंबरे,वि.स.स.
11. प्रा.मेधा कुलकर्णी,वि.स.स.
12. श्री.राहुल पाटील,वि.स.स.
13. श्री.हेमंत पाटील,वि.स.स.
14. श्री.प्रकाश आबिटकर,वि.स.स.
15. डॉ.पंकज भोयर,वि.स.स.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

अध्यक्ष महोदय, या संयुक्त समितीवर दोन्ही सभागृहाच्या माननीय विरोधी पक्ष नेत्यांचा "निमंत्रित सदस्य" म्हणून समावेश केलेला आहे.

विधानपरिषदेने या समितीवर पुढील सदस्य नामनिर्दिष्ट केलेले आहेत.

1.ॲड.अनिल परब,वि.प.स.

2.श्री.शरद रणपिसे,वि.प.स. .....5



श्री.विनोद तावडे.....

3.श्री.सतीश चव्हाण,वि.प.स.

4 श्री.कपिल पाटील,वि.प.स.

5 प्रा.अनिल सोले,वि.प.स.

**अध्यक्ष :** श्री.विनोद तावडे, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री यांना संयुक्त समितीचे समिती प्रमुख म्हणून नियुक्त करण्यात येत आहे.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

-----

**.....6**

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

<u>**सभागृहाच्या कामकाजासंदर्भात**</u>

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, अंतिम आठवडा प्रस्तावावर चर्चा सुरु असताना संबंधित खात्याचे माननीय मंत्री महोदय सभागृहात उपस्थित नाहीत. किमान तेवढे गांभीर्य जरी शासनाने दाखविले तरी पुष्कळ झाले.

**अध्यक्ष :** अंतिम आठवडा प्रस्तावाला माननीय मंत्री श्री. गिरीश बापट,माननीय मंत्री श्रीमती पंकजा मुंडे, माननीय मंत्री डॉ.दिपक सावंत, माननीय मंत्री श्री.विनोद तावडे हे एकूण 4 मंत्री महोदय उत्तर देणार आहेत, त्यापैकी दोन मंत्रीमहोदय सभागृहात उपस्थित आहेत. आपण चर्चेला सुरुवात करावी. उर्वरित मंत्रीमहोदय सभागृहात उपस्थित राहतीलच. सन्माननीय सदस्य श्री.पृथ्वीराज चव्हाण यांनी भाषणास सुरुवात करावी. प्रस्तावातील विषय शक्यतोवर एक किंवा दोन मंत्री महोदयांच्या खात्याशी संबंधित असला असता तर बरे झाले असते.

( माननीय अन्न व नागरी पुरवठा मंत्री सभागृहात प्रवेश करतात. )

------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

***पृ.शी. :*** राज्यात जून ते ऑक्टोबर, २०१५ या कालावधीत शासनाने व्यापाऱ्यांना साठेबाजी करण्यास दिलेली खुली मुभा, जीवनावश्यक वस्तुंच्या किमतीवर नियंत्रण ठेवण्यासंबंधी केंद्र शासनाकडून आलेल्या सूचनांची दखल न घेणे, डॉक्टरांची रोडावणारी विश्वासार्हता, विविध घटक एकत्र येऊन वैद्यकीय kव्यवसायाची तयार झालेली साखळी, ***तसेच राज्यात अवयवदानाचे अत्यल्प प्रमाण या सर्व बाबींवर उपाययोजना करण्याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष***

***मु.शी. :*** राज्यात जून ते ऑक्टोबर, २०१५ या कालावधीत शासनाने व्यापाऱ्यांना साठेबाजी करण्यास दिलेली खुली मुभा, जीवनावश्यक वस्तुंच्या किमतीवर नियंत्रण ठेवण्यासंबंधी केंद्र शासनाकडून आलेल्या सूचनांची दखल न घेणे, डॉक्टरांची रोडावणारी विश्वासार्हता, विविध घटक एकत्र येऊन वैद्यकीय व्यवसायाची तयार झालेली साखळी, ***तसेच राज्यात अवयवदानाचे अत्यल्प प्रमाण या सर्व बाबींवर उपाययोजना करण्याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष या विषयावर*** सर्वश्री राधाकृष्ण विखे पाटील, अजित पवार, पृथ्वीराज चव्हाण, जयंत पाटील, डॉ. पतंगराव कदम, सर्वश्री. दिलीप वळसे-पाटील, गणपतराव देशमुख, बाळासाहेब थोरात, शशिकांत शिंदे, विजय वडेट्टीवार, भास्कर जाधव, अब्दुल सत्तार, जितेंद्र आव्हाड, प्रा.विरेंद्र जगताप, सर्वश्री जयदत्त क्षीरसागर, सुनील केदार, ॲड. यशोमती ठाकूर, सर्वश्री. सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील, डी. पी. सावंत, बबनराव शिंदे, प्रा. वर्षा गायकवाड, सर्वश्री. अस्लम शेख, वसंतराव चव्हाण, नितेश राणे, कालीदास कोळंबकर, मधुकरराव चव्हाण, भारत भालके, मो. आरिफ नसीम खान, शेख आसिफ शेख रशीद, राणाजगजितसिंह पाटील, अमित देशमुख, अमिन पटेल, डॉ. संतोष टारफे, सर्वश्री संग्राम थोपटे, जयकुमार गोरे, काशिराम पावरा, डी.एस. अहिरे, त्र्यंबक भिसे, कु. प्रणिती शिंदे, सर्वश्रीमती अमिता चव्हाण, निर्मला गावित, श्री. बसवराज पाटील, ॲड के.सी. पाडवी, सर्वश्री कुणाल पाटील, हर्षवर्धन सपकाळ, राहुल बोंद्रे, अमित झनक, अमर काळे, रणजित कांबळे, भाऊसाहेब कांबळे, सिध्दाराम म्हेत्रे, बाळासाहेब पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव.

श्री.पृथ्वीराज चव्हाण ( कराड-दक्षिण ) : अध्यक्ष महोदय, मी काल विरोधी पक्षाच्या प्रस्तावावर बोलायला सुरुवात केली होती. मी कोणत्या मुद्दयांवर बोलणार आहे, हेही सांगितले होते. राज्याचे माननीय मुख्यमंत्री महोदय व संबंधित खात्याचे मंत्रीमहोदय सभागृहात उपस्थित

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

असतील अशी मला अपेक्षा होती. या मुद्दयाची चर्चा नागपूर अधिवेशनामध्येही झाली होती. त्यावेळीही याबाबत शासनाकडून उत्तर अपेक्षित होते. ....8



श्री.पृथ्वीराज चव्हाण......

त्यावेळी काही कारणामुळे आम्ही सभागृहाच्या बाहेर कामकाजावर बहिष्कार टाकून गेलो होतो. आम्ही सभागृहामध्ये अनुपस्थित होतो.

श्री.गिरीश बापट : अध्यक्ष महोदय, रेकॉर्डवर चुकीचे राहू नये म्हणून सांगत आहे. सरकार यासंदर्भात पूर्ण उत्तर द्यावयाला तयार होते. पण सरकारचे ऐकूनच घ्यावयाचे नाही आणि पराचा कावळा करुन सभागृहामध्ये गोंधळ घालून उत्तरच देऊ द्यायचे नाही, असे त्यावेळी झाले होते. त्यावेळी सभागृहातील गोंधळामुळेशासन उत्तर देऊ शकले नव्हते. विरोधकांच्या गोंधळामुळे त्यावेळी सभागृहामध्ये याबाबतचे उत्तर शासन देऊ शकले नव्हते.

श्री.पृथ्वीराज चव्हाण : अध्यक्ष महोदय, कदाचित माननीय मंत्री महोदयांना विसर पडला असेल म्हणून मी त्यांना आठवण करुन देतो. दिनांक 23 डिसेंबर,2015 रोजी याबाबत सरकारने उत्तर दिले होते. यावर माननीय मुख्यमंत्री महोदयांनी दीड तास उत्तर दिले होते. उत्तरामध्ये कोणत्याही प्रकारचा अडथळा आणण्याकरिता आम्ही सभागृहामध्ये उपस्थित नव्हतो. काही कारणास्तव आम्ही कामकाजावर बहिष्कार टाकून सभात्याग केला होता. विरोधकांनी सभागृहामध्ये शासनाला उत्तर देऊ दिले नाही, हे माननीय मंत्री यांचे विधान चुकीचे आहे. माननीय मंत्री हे कुठेतरी गफलत करीत आहेत. दिनांक 22.12.2015 रोजी ही चर्चा झाली. दिनांक 23.12.2015 रोजी शासनाने यावर उत्तर दिले होते. त्यावेळी काही कारणामुळे विरोधी पक्ष सभागृहात नव्हता. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी याबाबत सभागृहात उत्तर दिले होते. आम्ही सभागृहामध्ये नव्हतो त्यामुळे आम्हाला त्यावर पूरक प्रश्न विचारता आले नाहीत. उत्तराच्या भाषणामध्ये माननीय मुख्यमंत्री महोदयांनी काही विधाने केली होती. त्यांचे भाषण माझ्याकडे आहे. त्यामध्ये काही माहिती चुकीची होती. माननीय मुख्यमंत्री यांनी खोटी माहिती दिली, असे मला म्हणावयाचे नाही. त्यांना विभागीय अधिका-यांनी चुकीचे ब्रिफींग केले असावे, असे वाटत आहे. आपल्यासमोर त्याचे ब्रिफींग झाले असेल तर मला माहिती नाही.

अध्यक्ष महोदय, राज्यामध्ये जून ते ऑक्टोबर,2015 या कालखंडामध्ये शासनाने व्यापा-यांना साठेबाजी करण्याची खुली मुभा दिली होती. त्यापूर्वी जीवनावश्यक वस्तुंच्या किंमती वाढल्या होत्या.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डाळींचे साठे, त्यावरील छापे, छाप्यांतर्गत डाळ जप्त करणे वगैरे प्रकार त्यावेळी घडले होते. माननीय विरोधी पक्ष नेते, राष्ट्रवादी पक्षाचे गटनेते यांनी औषधसाठयाबाबत विस्तृत चर्चा केलेली आहे, मी त्यावर बोलणार नाही. ...9



श्री.पृथ्वीराज चव्हाण........

मी केवळ डाळींच्या विषयावर बोलणार आहे. डाळींच्या मुद्दयांवर सर्व निर्णय झाले होते. याबाबत जी प्रक्रिया झाली, ती शंकास्पद आहे, संशयास्पद आहे. त्याबाबत शासनामार्फत स्पष्टीकरण झाले पाहिजे. जे निर्णय माननीय मुख्यमंत्री व माननीय अन्न व नागरी पुरवठा मंत्री या दोघांनी घेतलेले आहेत,त्या निर्णयामुळे राज्यातील जनतेला किमान 4 हजार कोटी रुपयांचा फटका बसलेला आहे. ज्यावेळी आरोप केले होते, त्याला माननीय मुख्यमंत्री महोदयांनी आपल्या भाषणातून उत्तर का दिले नाही ?

ओओ-1/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. पृथ्वीराज चव्हाण.........

आणि कोणते 4 हजार कोटी रुपये असे सांगितले होते. मुंबई ग्राहक पंचायतीचे कॅलक्युलेशन आहे. ते निती आयोगाच्या प्रक्रियेप्रमाणे केलेले आहे. सन 2014 मध्ये डाळीच्या किंमती 84 ते 91 रुपये प्रति किलो अशा होत्या. केंद्र शासनाच्या वेबसाईटवर दररोज त्या किंमतीचे दर किती आहेत, ते समजण्यास मदत होणार आहे. सरकारने 23 एप्रिल, 2015 रोजी एक निर्णय घेतल्यामुळे डाळीच्या किंमती वाढल्या होत्या. हा निर्णय मंत्रिमंडळाने घेतलेला नाही. हा निर्णय अन्न व नागरी पुरवठा मंत्री आणि मुख्यमंत्री महोदयांच्या स्वाक्षरीने निर्णय निर्गमित झालेला होता. गेली 7 ते 8 वर्षे केंद्र शासनाच्या मान्यतेनंतर डाळींच्या साठा बंदीचा निर्णय घेण्यात आला होता. असा निर्णय एका वर्षापुरता घेता येतो. दरवर्षी त्या निर्णयाचे नूतनीकरण करावे लागते. 2007, 2008, 2009, 2010, 2011, 2012, 2013, 2014 अशा प्रकारे प्रत्येक वर्षी डाळीवर साठा बंदीचा निर्णय घेऊन त्यावर निर्बंध घालण्यात आले होते. आपल्या देशात डाळीचे पर्याप्त उत्पादन होत नसल्यामुळे ती इतर देशातून आयात करावी लागते. ज्या वस्तुचा तुटवडा असतो, अशाच वस्तुंची साठाखोरी होत असते. म्हणून केंद्र शासनाने वस्तु कायद्यांतर्गत निर्णय घेतला होता. केंद्र शासनाच्या मान्यतेनंतर राज्य शासन तशा प्रकारचा निर्णय दरवर्षी घेत असतो. सरकारने 23 एप्रिल, 2015 रोजी साठाबंदीचा निर्णय अचानक रद्द केला होता. याबाबत आम्ही शासनाकडे रद्द करण्याचे कारण काय आहे, ते विचारले होते. त्यावेळी मुख्यमंत्री महोदयांनी चुकीचे उत्तर दिले होते. आम्ही सभागृहात नव्हतो. ते नंतर वाचलेले आहे. महाराष्ट्र राज्यात 50 टक्के डाळ आयात केली जाते. कारण महाराष्ट्रात डाळ भरडण्याची व्यवस्था आहे. त्यामुळे मध्यप्रदेशमधून आणण्याची आवश्यकता नाही. तामिळनाडूमध्ये 12 ते 13 टक्के आणि गुजरातमध्ये 8 ते 9 टक्के डाळ आयात केली जाते. मुख्यमंत्री महोदयांनी महाराष्ट्रातील डाळीची साठाबंदी उठवली नसती तर सर्व डाळ तिकडे गेली असती. परिणामी महाराष्ट्र राज्यात डीळीचा तुटवडा झाला असता. मी या विषयाच्या संदर्भात आरटीआय अंतर्गत माहिती मिळविलेली आहे. ती आम्हाला मिळालेली आहे. गुजरात राज्यामध्ये 2007 पासून डाळीच्या साठा बंदी उठविण्याचा निर्णय होता. कोणी घेतला ? परंतु, 30 सप्टेंबर, 2013 रोजी गुजरातचे तत्कालीन मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या बैठकीत डाळीच्या साठा बंदीचा निर्णय होता. त्यावेळी गुजरात राज्याचे मुख्यमंत्री कोण होते हे सर्वांना माहीत आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

......2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. पृथ्वीराज चव्हाण.........

शेजारच्या राज्याने डाळीच्या साठा बंदीचा निर्णय घेतलेला आहे. त्यामुळे त्यावेळी आमच्या सरकारसमोर तशा प्रकारचा प्रस्ताव आलेला होता. परंतु, तो प्रस्ताव आम्ही स्वीकारला नव्हता. जवळ जवळ 10 ते 20 वेळेस व्यापारी संघटनेमधील लोकांनी डाळीची साठा बंदी उठवा म्हणून मागणी केली होती. त्यावेळी गुजरात राज्यात कोण मुख्यमंत्री होते, याची माहिती माननीय श्री. गिरीष बापट देतील. 30 सप्टेंबर, 2013 रोजी गुजरात राज्याच्या तत्कालीन मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या बैठकीत डाळीच्या साठा बंदीचा निर्णय होता. पण त्यावेळी डाळीच्या दरावर कोणताही अनिष्ठ परिणाम झालेला नव्हता. 2 सप्टेंबर, 2013 मध्ये रिटेलर असोसिएट ऑफ इंडियामधील पदाधिकाऱ्यांनी माझी भेट घेऊन खाजगी रिटेलर क्षेत्राच्या प्रगतीसाठी साठाबंदी उठविण्याची मागणी केली होती. त्यावेळी मुख्य सचिव आणि प्रधान सचिव उपस्थित होते. त्यानंतर त्या लोकांनी 9 सप्टेंबर, 2013 रोजी सचिवांना भेटले होते. त्यानंतर त्यांनी पुन्हा 10 सप्टेंबर, 2013 रोजी पत्राद्वारे साठाबंदी उठविण्याची मागणी केली होती. मुंबई ग्रेन डीलर्स असोसिएशन, महाराष्ट्र खाद्यतेल व्यापारी महासंघ यांनी वारंवार साठाबंदी उठवण्याची मागणी केली होती. आमच्या शासनाने त्यास मान्यता दिली नव्हती. आपले सरकार 21 नोव्हेंबर, 2014 रोजी स्थानापन्न झाले होते. आपले सरकार आल्यानंतर 15 दिवसांच्या आत त्या लोकांना वेळ दिली होती. त्यावेळी व्यापारी असोसिएशन, इंडियन वनस्पती प्रोड्युसर असोसिएशनने माननीय मुख्यमंत्री आणि सचिवांसमवेत चर्चा केली होती. खाद्यतेल आणि खाद्यतेल बियांवरील साठा बंदी उठविण्यास परवानगी मागितली होती. मी आरटीआयअंतर्गत 11 फेब्रुवारीची नस्ती मिळविली असून, त्याबद्दल माहिती देणार आहे. त्यामध्ये 6 पानांची नोट अन्न व नागरी पुरवठा विभागाने तयार केलेली आहे. सदर नोटवर मंत्री महोदयांची स्वाक्षरी आहे. सदर टिप्पणी सरकारी असल्यामुळे मी ती सभागृहाच्या पटलावर ठेवणार आहे. सदर टिप्पणीमध्ये खाजगी रिटेलर असोसिएशनचा आणि व्यापारी संघटनेंनी केलेल्या मागण्यांचा उल्लेख केलेला आहे. खाद्यतेल व खाद्यतेल बिया या दोहांवरील साठा बंदी उठविण्याबाबत जो निर्णय घेतला त्याबाबत ही 6 पानांची टिप्पणी आहे. ही नोट कक्ष अधिकाऱ्यानी तयार केलेली आहे. त्यावर अवर सचिवांनी, उप सचिवांनी आणि सचिवांनी एकाच दिवशी स्वाक्षरी केलेली आहे. त्यानंतर ती नस्ती अतिरिक्त मुख्य सचिव, पणन यांच्याकडे

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. पृथ्वीराज चव्हाण.........

पाठविण्यात आली. या 6 पानाच्या टिप्पणीमध्ये खाद्यतेल आणि खाद्यतेल बियावरील साठा बंदी उठवावी असा विषय होता. अचानक नस्ती अतिरिक्त मुख्य सचिव, पणन यांच्याकडे गेल्यानंतर डाळी हा विषय घुसविलेला आहे. 6 पानांच्या नोटमध्ये डाळीचा कोणताही उल्लेख केलेला नाही. खाद्यतेल आणि खाद्यतेल बियावरील साठा बंदी उठवण्याबाबत मागणी केली होती. पण अचानक नस्ती अतिरिक्त मुख्य सचिव, पणन यांच्याकडे गेल्यानंतर डाळीचा विषय घुसविण्यात आला होता. सदर नोटमध्ये डाळी, खाद्यतेल व खाद्यतेल बियांवर केंद्र शासनाने अनेबलिंग प्रोव्हिजन करुन स्टॉक लिमीट लावण्याचे अधिकार राज्यांना दिलेले आहेत. मी अतिरिक्त मुख्य सचिवांची नोट वाचत आहे. अख्खी डाळ व तेलबिया ग्राहक वापरत नसून त्यावर निर्बंध निरर्थक आहेत. डाळी व खाद्यतेल दोन्ही डोमॅस्टिक व इंटरनॅशनल मार्केटला मुबलक असून भाव खाली आलेले आहेत. जागतिक मंदी लक्षात घेता पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिपद्वारे प्रायव्हेट सेक्टर व कॉर्पोरेट सेक्टरद्वारे शेतकऱ्यांकडून डायरेक्ट पर्चेस केल्यास हमाली, एपीएमसी चार्जेस अडत लागत नाही. त्यात शेतकऱ्यांचे व ग्राहकांचे हित लक्षात घेता इतर राज्यांप्रमाणे निर्बंध डाळी, तेलबिया व खाद्यतेलावरील तत्काळ उठविणे आवश्यक आहे.

PP-1......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.पृथ्वीराज चव्हाण्...

कृपया प्रस्ताव सत्वर मान्य व्हावा, ही विनंती. अतिरिक्त मुख्य सचिव (पणन). सदरचा विषय हा अन्न व नागरी पुरवठा खात्याचा आहे, परंतु पणन खात्याच्या सचिवांनी यामध्ये दुरूस्ती केली. पहिल्यांदा डाळीवरील निर्बंध उठवावे असे नोटींग पणन सचिवांचे आलेले आहे. पणन सचिवांना कोणी सांगितले, हे कसे केले? या नोटवर मंत्री महोदय अन्न व नागरी पुरवठा यांनी सही केली म्हणजे सदरची नोट मान्य केल्यासारखे आहे. पणन सचिवानंतर मुख्य सचिवांकडे नोट पाठविली. मी हा कार्यभार हाताळलेला आहे. जेव्हा मूळ विभागाच्या सचिवांनी एका प्रस्तावा व्यतिरिक्त दुसरा कसलाही उल्लेख न करता दुसऱ्या सचिवांकडे नोट पाठविली, तेव्हा त्या सचिवांनी त्यामध्ये वेगळे काहीतरी लिहिलेले आहे. त्यानंतर मुख्य सचिवांकडे नस्ती गेली तेव्हा मुख्य सचिवांनी विसंगती बघून दोघांनाही बोलावून मूळ नोटमध्ये काय लिहिलेले आहे आणि पणन सचिवांनी काय लिहिले आहे, असा खुलासा न घेता त्याचदिवशी मुख्य सचिवांनी घाईघाईने सही केली. त्यानंतर अन्न व नागरी पुरवठा मंत्री यांनी सही केली. दोन दिवसानंतर मुख्यमंत्री महोदयांनी सही केली. त्यानंतर पुन्हा नस्ती मुख्य सचिवांकडे व त्यानंतर सदरची नस्ती पणन सचिवांकडे गेली. पणन सचिवांनी सांगितले की, ताबडतोब आदेश निर्गमित करावेत. डाळी व तेलबिया या दोन्हीची मान्यता मिळालेली आहे, असे पणन सचिव म्हणतात. परंतु अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या सचिवांच्या हातात नस्ती गेली तेव्हा त्यांना आश्चर्याचा धक्का बसला. माझ्या नस्तीमध्ये मी कोठेही डाळीचा उल्लेख केलेला नव्हता. या नोटवर पणन अतिरिक्त मुख्य सचिवांनी डाळ लिहिली आणि त्यावर अन्न व नागरी पुरवठा मंत्री महोदयांनी सही केली. त्यानंतर मुख्यमंत्री महोदयांची सही घेतली गेली. मुख्य सचिवांनी दोन वेळा सही केली. परंतु मूळ अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या सचिवांना याचा पत्ताही नव्हता. त्यांनी विचारले की, तपासा हे कसे काय घडले? अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या टिप्पणीमध्ये खाद्य तेल व तेलबिया, यांच्यावरील साठा निर्बंध रद्द करावा किंवा कसे, या अनुषंगाने नोट सादर केली होती. तथापि माननीय अप्पर मुख्य सचिव पणन यांनी डाळी, खाद्य तेल व तेलबिया या तिन्ही जीवनाश्यक वस्तूंवरील साठानिर्बंध उठवावे असे नमूद करून प्रस्ताव सादर केलेला आहे. केंद्र शासनास अभिप्रायासाठी राज्य सरकारने विनंती करणे आवश्यक होते, परंतु अजूनही पत्र गेलेले नाही. केंद्र सरकारकडे पत्र पाठविण्याचा मसुदा तयार केलेला

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.पृथ्वीराज चव्हाण्...

आहे. त्यातही बरेच वाद आहेत. अन्न व नागरी पुरवठा खात्याचे सचिव म्हणतात की, हा प्रस्ताव केंद्र सरकारच्या मंजुरीसाठी पाठविला पाहिजे. पणन सचिव म्हणतात की, याची काही गरज नाही. या दोघांचा वाद बराच चालतो. केंद्र सरकारला जेव्हा विचारले जाते तेव्हा केंद्र सरकारकडून सांगण्यात येते की, तुमचा निर्णय तुम्ही घ्यावा. हे सर्व सुरु असताना पणन सचिव काय म्हणतात, त्यांचा यात काय रोल आहे हे मला माहित नाही. "ज्याअर्थी माननीय मुख्यमंत्र्यांनी निर्बंध उठविण्याकरिता मान्यता दिलेली आहे त्याअर्थी केंद्र शासनाच्या संबंधित नियमातंर्गत राज्य शासनाने स्टॉक लिमीट लावण्याचे त्यांचे आदेश निर्गमित करण्याची गरज उरलेली नाही. सार्वजनिक खाजगी भागिदारीच्या बाबत माननीय मुख्यमंत्र्याच्या अध्यक्षतेखाली दिनांक 24 एप्रिल, 2015 रोजी एक अत्यंत महत्वाची सभा बोलाविलेली आहे त्यामुळे सदरील आदेश तत्पूर्वी काढण्यात आले. सदरील बाब खाजगी उद्योगांच्या प्रतिनिधिंसमोर राज्य शासनाने घेतलेला महत्वाचा निर्णय म्हणून सादर करता येईल, अतिरिक्त मुख्य सचिव पणन." दिनांक 24 एप्रिलच्या आत शासनाने शासन निर्णय काढला. खाजगी बैठकीमध्ये सांगितले असेल की, हा कोणाच्या हितासाठी निर्णय घेत आहात? जेव्हा एखादी वस्तू शॉट सप्लायमध्ये असते तेव्हा आपण साठानिर्बंध करतो. शॉट सप्लॉय असताना आपण साठाबंदी उठविली. परिणामी जुलै पासून डाळीच्या किंमती वाढायला लागल्या. सन 2014 मध्ये डाळीच्या किंमती 80 रूपये, 90 रुपये प्रति किलो होत्या, त्या नंतर गगनाला जाऊन भिडल्या. 150 रूपये प्रति किलो, 175 रूपये, 200 रुपये प्रति किलो, 230 रुपये प्रति किलोपर्यंत डाळीचा भाव गेला. मी मागील अधिवेशनात सांगितले होते की, मुंबई ग्राहक पंचायतीच्या अंदाजाप्रमाणे राज्यात दररोज 8 हजार टन डाळ वापरली जाते. हे आकडे आपल्या खात्याने दिलेले आहेत त्यामुळे हे कमी जास्त असेल तर आपल्या खात्याने ते दुरूस्त करावेत. तो आकडा आपण गृहित धरला तर किमान 100, 110 रूपये किलो डाळीच्या किंमती वाढल्या. प्रतिदिन आठ हजार टन डाळ वापरली जाते. आठ हजार टन गुणीला 100 रूपये, 110 रुपये याप्रमाणे जुलै ते नोव्हेंबर या कालावधीत राज्यातील ग्राहकांना जवळपास चार हजार कोटी

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

रूपयांचा फटका बसला. व्यापाऱ्यांचा चार हजार कोटी रूपयांचा फायदा झाला, हा आमचा आरोप आहे. मला आणखी बऱ्याच गोष्टी आपल्याला सांगावयाच्या आहेत. माझी मुख्य मागणी अशी

...3



श्री.पृथ्वीराज चव्हाण्...

आहे की, या नस्तीसंदर्भात कोठेतरी चौकशी केली पाहिजे. यात कोणी कोणावर दबाव टाकला? अतिरिक्त मुख्य सचिव पणन हे दीड महिन्यामध्ये सेवानवृत्त होणार होते म्हणून त्यांच्याकडे नस्ती पाठविली आणि त्यांच्याकडून तसे लिहून घेतले. अन्न व नागरी पुरवठा विभागाचे सचिव डाळीवरील साठानिर्बंध उठवा असे म्हणायला तयार नव्हते म्हणून त्यांनी प्रस्ताव ठेवला नाही. फक्त तेलबियांबाबत आपण निर्णय घ्यावा म्हणून नस्ती सादर केली होती. पणन सचिवांकडून डाळीवरील निर्बंध उठवा, असे लिहिले आणि ते आपण मान्य केले. यामध्ये दुसरी महत्वाची गोष्ट अशी आहे की, सदरची नस्ती मंत्रिमंडळाकडे गेली नाही. सदरहू विषयावर मुख्यमंत्र्यांनी डिसेंबर अधिवेशनात उत्तर दिले होते की, तुमच्या सरकारने तरी याबद्दलचे निर्णय मंत्रिमंडळात घेतले होते का? क्वॉलिटेटीव्ह डिफरन्स आपण लक्षात घ्यावा. साठाबंदी कायम ठेवण्याचा निर्णय मंत्रिमंडळाकडे गेला नाही तरी चालेल, कारण तो निर्णय ग्राहकांच्या हिताचा असतो. साठाबंदी उठवायची म्हणजे व्यापा-यांना भरमसाठ साठाबंदी करु द्यायचा निर्णय मंत्रिमंडळाकडे जायला हवा होता. तो निर्णय आपण दोघा मंत्री महोदयांनी घेतला. त्याचा परिणाम संबंध महाराष्ट्र राज्याने पाहिलेला आहे. जेव्हा डाळीच्या किंमती वाढायला लागल्या तेव्हा सरकारमध्ये पॅनिक निर्माण झाले. दिनांक 28 ऑगस्टला साठाबंदी लावण्याच्या हालचाली सुरु झाल्या. त्यामध्ये काही कालावधी जातो. पणन मंत्री यामध्ये येतात, त्यांचा रोल काय आहे, हे महत्वाचे आहे? कारण पणन सचिवांना कोण निदेश देत होते? एकतर मुख्यमंत्री देऊ शकतात, दुसऱ्या विभागाचे मंत्री देऊ शकतात काय, मला माहित नाही. जेव्हा शासनाने पुन्हा साठाबंदी लावण्याची चर्चा सुरु झाली तेव्हा पणन मंत्र्यांनी लिहिलेले आहे की, कोठलाही कोटा लावू नये. पणन सचिव सांगत होते तेच पणन मंत्री म्हणतात की कोटा लावू नका. साठा करायचा कुठलाही निर्बंध घालू नका. व्यापाऱ्यांना जेवढी डाळ विकत घ्यायची असेल तेवढी घेऊ द्या. अन्न नागरी पुरवठा मंत्री महोदयांचे मी अभिनंदन करीन की, त्यांनी त्यावर पुन्हा असे लिहिले की, असा निर्णय घेऊ नका,

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

आपण मंत्रिमंडळाकडे जा.  मंत्री महोदयांनी धाडसाने त्यावर लिहिले.  या मंत्रिमंडळामध्ये कोणाचे किती वजन आहे, कोण कोणाच्या किती जवळ आहे, यामध्ये मला जायचे नाही.  दस्तूरखुद्द पणन

...4



श्री.पृथ्वीराज चव्हाण्...

मंत्र्यांनी लिहिले की, बिलकूल साठा लावण्याची, कोटा लावण्याची गरज नाही.  तेव्हा आपण धाडसाने लिहिले की, तुम्ही येथे निर्णय घेऊ नका. जसा 23 एप्रिलला निर्णय घेतला तसा मंत्रिमंडळाकडे पाठवा.  स्वाभाविक आहे की, किंमती इतक्या  वाढल्या होत्या त्यामुळे मंत्रिमंडळाने निर्णय घेतला.  पुन्हा साठाबंदीचा निर्णय आपण घेतला.  चार महिने खिडकी खुली ठेंवली, का ठेवली?  मी पुन्हा आपल्याला आठवण करुन देतो की, माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, साठा बंदी उठविण्याचा निर्णय याकरिता घेतला की, शेजारच्या तामिळनाडू आणि गुजरात या दोन राज्यांनी साठाबंदी काढण्याचा निर्णय घेतला होता म्हणून घेतला.

यानंतर OO-1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. पृथ्वीराज चव्हाण ....

मी मघाशी सांगितले की, गुजरातने दिनांक 30 सप्टेंबर, 2013 रोजी साठाबंदी काढण्याचा निर्णय घेतला होता. परंतु त्यामुळे डाळीच्या किंमतीत काहीच फरक पडला नाही. गुजरातमध्ये फक्त 7 ते 8 टक्के आयात होते. मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले की, तामिळनाडूने साठाबंदी उठविण्याचा निर्णय घेतला म्हणून आम्ही घेतला. तामिळनाडू सरकारने कधीही साठाबंदी उठविण्याचा निर्णयच घेतलेला नाही. मुख्यमंत्री महोदयांनी सभागृहाला चुकीची माहिती दिली. त्यांना कोणी ब्रिफ केले माहीत नाही. आपल्या विभागाच्या अधिकाऱ्यांनी की, पणन विभागाच्या अधिकाऱ्यांनी त्यांना ब्रिफ केले हे माहीत नाही. मुख्यमंत्री महोदयांच्या त्या वक्तव्याबाबत सभागृहाला निदान स्पष्टीकरण करावे किंवा त्यात दुरुस्ती तरी करावी.

मुख्यमंत्री महोदयांनी त्यांच्या दिनांक 23 डिसेंबर, 2015 रोजीच्या भाषणात 23 एप्रिलला साठाबंदी उठविण्याचे जे कारण दिलेले आहे ते कारण चुकीचे होते. आपल्या निर्णयामुळे महाराष्ट्रातील जनतेला केवळ नोव्हेंबरपर्यंत 4 हजार कोटी रूपयांचा फटका बसला, तर कुठल्या तरी व्यापाऱ्यांचा तितकाच फायदा झाला. तो निर्णय कोणत्या कारणामुळे घेतला, गुजरातची यामध्ये काही लिंक आहे काय ? गुजरातच्या तत्कालीन मुख्यमंत्री महोदयांनी साठाबंदी उठविण्याचा निर्णय घेतला होता परंतु, त्यातून काहीच झाले नाही, किंमती वाढल्याच नाहीत. मग किंमती कशा वाढवायच्या ? किंमती महाराष्ट्राने साठाबंदीचा निर्णय उठविल्याशिवाय वाढणार नाहीत म्हणून महाराष्ट्राने निर्णय घेतला. मंत्रिमंडळाकडे न जाता हा निर्णय कसा काय घेतला, कोणी लिहिले ? याची चौकशी झाली पाहिजे.

मुख्य सचिवांचा रोल काय आहे, मुख्य सचिवांनी ती नस्ती दोनदा पाहिली. दोन्ही विभागात विभागात विसंगती आहे. ओरिजनेटिंग सचिवांनी लिहिलेल्या नोटमध्ये काहीच कुठे उल्लेख नाही आणि एकदम दुसऱ्या सचिवांनी त्यामध्ये लिहिले की, डाळीवरची साठाबंदी उठवून टाका आणि लगेच तुम्ही दोघांनी मान्य केले. पुढे मग सचिवांनी नोटवर खाली आभारी आहे असे लिहिले. ताबडतोब आदेश निर्गमित करा, याला कोण जबाबदार आहे, कोणाचे आभार मानले, याची चौकशी झाली पाहिजे. ही चौकशी कोण करणार, मुख्य सचिवांचाच रोल संशयास्पद आहे. कोणीतरी

...2/-

श्री. पृथ्वीराज चव्हाण ....

त्यांच्यावर दबाव टाकत होते काय आणि दबाव टाकल्यामुळे हा निर्णय घेतला गेला काय, डाळीच्या किंमती वाढविण्याचा निर्णय झाला होता काय, कोणाला तरी आयात करणाऱ्यांचा, साठा करणाऱ्यांचा फायदा करुन द्यायचा होता काय ? 4 हजार कोटी रुपयांचा फायदा झाला. आता हे आकडे आपणच सांगितले पाहिजेत. आम्हाला ही माहिती आहे की, महाराष्ट्रात दररोज 8 हजार टन तूरडाळ वापरली जाते. हा आकडा कमी जास्त असल्यास आपण तो दुरुस्त करावा. परंतु, तुमच्या निर्णयामुळे जे 100 ते 120 रुपये किलो असे दर वाढले याचा गुणाकार कोणालाही करता येईल. त्यामुळे 4280 रुपये की, अडीच-तीन हजार, की साडेचार-पाच हजार रुपये हे आपण सांगावे. आपण चौकशी केल्याशिवाय यामध्ये खरे बाहेर पडणार नाही, दोषी व्यक्ती जबाबदार धरता येणार नाही. आपल्यालाही मिसगाईड केलेले आहे. ती फाईल कोणी वाचली होती का ते मला माहीत नाही. परंतु, तुमच्या सचिवांनी सही केली, पणन सचिवांनी सही केली, मुख्य सचिवांनी सही केली, तुम्ही सही केली आणि तुम्ही सही केली म्हणून मुख्यमंत्री महोदयांनी सही केली. हे काय चाललेले आहे, सरकार कसे काय चालले आहे ? निर्णय का घेतला असे विचारल्यावर मुख्यमंत्री महोदयांनी चुकीचे उत्तर दिलेले आहे. मग आम्ही कोठे जायचे ? यामध्ये बऱ्याच गोष्टी आहेत. याबाबत निवृत्त न्यायाधिशांमार्फत चौकशी झाली पाहिजे. आपण ताबडतोब चौकशी समिती नेमावी. कोणत्यातरी अधिकाऱ्याकडे हे देऊन चालणार नाही. मुख्य सचिवांची ही जबाबदारी होती की, दोन सचिवांमध्ये जर विसंगत मत असेल तर को-ऑर्डिनेट केले पाहिजे, त्यातून काही तरी समन्वय घडविला पाहिजे. ते न करता लगेच एका दिवसात सह्या झाल्या. लगेच हा सर्व आदेश निर्गमित झाला, का झाला तर खाजगी उद्योजकांसमवेत मुख्यमंत्री महोदयांची बैठक आहे, त्या बैठकीत मुख्यमंत्री महोदयांना जाहीर करायचे आहे म्हणून तुम्ही लवकर सह्या करुन निर्णय घ्या.

अध्यक्ष महोदय, ही नस्ती आमच्यासमोर आल्यानंतर 1-1 गोष्टी कळल्या. मुख्यमंत्री महोदय यामध्ये अनेक गोष्टी करायच्या आहेत. एकतर संशयास्पद बाबी अशा आहेत की, आपण हा मुख्यमंत्र्याच्या अधिकारामध्ये हा निर्णय घेतलेला आहे, मंत्रिमंडळामध्ये केलेला नाही. सन 2014

...3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. पृथ्वीराज चव्हाण ....

मध्ये आपल्या केंद्र सरकारने साठाबंदी करण्याचे निर्बंध घालण्याचे अधिकार तुम्हाला दिले होते ते अधिकार वापरुन आपण दरवर्षी साठाबंदी निर्बंध घालत होतो ते तुम्ही उठविले आणि त्यामुळे ही भाववाढ झालेली आहे. राज्यातील जनतेला इतका मोठा फटका बसलेला आहे, त्याला कोण जबाबदार आहे, आपण कोणाला तरी जबाबदार धरणार आहात काय ? आपली स्वत:ची जबाबदारी असेल, मुख्यमंत्री महोदयांची जबाबदारी असेल तर आपण सभागृहात सांगितले पाहिजे. परंतु, अधिकाऱ्यांनी आपल्याला मिसगाईड केले असेल तर चौकशी झाली पाहिजे. आपण ती नस्ती वाचली नाही, त्यामध्ये आपल्या सचिवांनी काय लिहिले होते ते माहीत नाही किंबहुना आपल्या सचिवांनी आपले ऐकले नाही किंवा त्यांच्यावर ज्यांचा दबाव येत होता त्यामुळे त्यांनी ऐकले नाही, पणन सचिवांना कोणी सांगितले, पणन मंत्र्यांचा यामध्ये काय रोल आहे, याची चौकशी झाली पाहिजे आणि ही चौकशी हायकोर्टाच्या निवृत्त न्यायाधिशांच्या अध्यक्षतेखाली झाली पाहिजे.

अध्यक्ष महोदय, सन 1995 मध्ये डाळीचा घोटाळा झाला होता. त्यावेळेस श्रीमती शोभाताई फडणवीस या मंत्री होत्या. त्यांनी 2-3 रुपये जास्त किंमतीने डाळ विकत घेतली म्हणून न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधिशांच्या अध्यक्षतेखालील चौकशी समितीमार्फत चौकशी झाली होती. त्यानंतर श्रीमती शोभाताई फडणवीस यांना आपल्या पदाचा राजीनामा द्यावा लागला होता. त्यावेळेस किलोमागे केवळ 2 ते 3 रुपये इतक्या जास्त दराने डाळ विकत घेतली होती. आज आपल्याला आकडेवारी पाहिजे असल्यास मी आपल्याला हा कागद देतो. आपल्या राज्यात किती डाळ वापरली जाते, किती दरवाढ झाली व कशामुळे झाली, याची आपण चौकशी करावी ?

अध्यक्ष महोदय, माझी स्पष्ट मागणी आहे की, मुख्यमंत्री महोदयांनी मागच्या अधिवेशनात सभागृहाला चुकीची माहिती दिलेली आहे, त्याबद्दल स्पष्टीकरण झाले पाहिजे. त्यांनी सभागृहात असत्य म्हटले असे मी म्हणणार नाही. त्यांना कोणीतरी बहुतेक चुकीची माहिती दिली असेल. हे सचिव ज्यांनी अशाप्रकारचा निर्णय तुमच्या हातातून करवून घेतला, त्यांच्यावर कोणाचा दबाव होता, त्यांना कोणी तरी मंत्र्यांनी सांगितले होते काय ? कारण जे सचिव दीड महिन्यात रिटायर

...4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. पृथ्वीराज चव्हाण ....

होणार आहेत त्यांनी मूळ सचिवांच्या आदेशाच्या पुढे जाऊन आणि ही फोर्जरी आहे काय, त्यामध्ये कोठेच उल्लेख नसताना डाळीचा उल्लेख केलेला आहे, ही काय भानगड आहे ? त्यामुळे चौकशी झाली पाहिजे.

आमची स्पष्ट मागणी आहे की, या सभागृहाचे समाधान होणार नाही. आपण काही तरी उत्तर देऊ नका नाही तर आम्हाला पुढचे पाऊल म्हणजे सभागृहाला चुकीची माहिती दिली गेली म्हणून हक्कभंगाचा ठराव देखील आणावा लागेल. त्यामुळे खरी वस्तुस्थिती काय आहे ते आपण सांगावे, त्याने आमचे समाधान होईल. आपण निवृत्त न्यायाधिशांच्या अध्यक्षतेखाली एक चौकशी समिती नेमावी. काय खरे आहे, काय खोटे आहे, राज्यातील जनतेला जो फटका बसलेला आहे, व्यापाऱ्यांचा फायदा झालेला आहे, त्याला कोण जबाबदार आहे याची माहिती सभागृहासमोर आली पाहिजे.

अध्यक्ष महोदय, आपण मला बोलण्याकरिता वेळ दिल्याबद्दल धन्यवाद.

..........

...5/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. गिरीश बापट ( अन्न व नागरी पुरवठा मंत्री ) : अध्यक्ष महोदय, अंतिम आठवडा प्रस्तावावर अनेक सन्माननीय सदस्यांनी चर्चा केली आणि ती नेहमीच होत असते. माझ्या विभागाच्या संदर्भात फार उल्लेख कोणी केला नाही. परंतु, सन्माननीय सदस्य श्री. पृथ्वीराज चव्हाण यांचे अनेक दिवस असे चालले होते की, हे काढा, हे आले पाहिजे, हे गेले पाहिजे. परंतु, त्यांना दुर्दैवाने संधीच मिळत नाही. त्यामुळे त्यांनी आज हा विषय काढला मी त्यांचे स्वागत करतो. सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांचे अभ्यासू व्यक्तिमत्व आहे, मी त्यांच्याबद्दल आदराने बोलतो. त्यांनीही या विषयाचा उल्लेख केला. त्यांनी चांगल्या भावना व्यक्त केल्या. त्यांनी माझ्यावर विश्वास देखील दाखविला. या खात्याचे काम अधिक परिणामकारकरित्या सुधारले पाहिजे ही मागणी त्यांनी केली. त्यांच्या शुभेच्छा आहेत, ते देखील मंत्री होते. अनेकवेळेस राजकीय सीमारेषेच्या पलीकडे जाऊन आपण एकमेकांना सूचना करीत असतो, आदर्श लोकशाहीत हे असले पाहिजे. त्यामुळे निश्चित यात अजून काही सुधारणा करणे अत्यंत आवश्यक आहे. कारण 15-20 वर्षांच्या आपल्या सरकारमध्ये सन्माननीय सदस्य श्री. पृथ्वीराज चव्हाण आपण साधे रेशनकार्ड बदलू शकला नाहीत आणि आम्हाला तुम्ही राज्याची सगळी परिस्थिती बदलायला लावता. परंतु, आम्ही त्या संधीचा फायदा निश्चितपणे घेऊ.

RR-1/..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. गिरीष बापट.....

या ठिकाणी अनेक बाबी व तारखा वेगवेगळ्या पद्धतीने मांडण्यात आल्या. मी तारखांमध्ये जात नाही. परंतु आपला त्यातील आशय सांगतो. गरिबांना लागणाऱ्या जिवनावश्यक वस्तुंची विक्री त्याला परवडतील या दरानेच झाली पाहीजे, त्यामध्ये नफेखोरी होता कामा नये. अन्नधान्य कमी पडल्यास वेळ पडली तर ते परदेशातून आयात केले पाहीजे आणि सामान्य माणसाला दिले पाहीजे, हे सरकारचे काम आहे. आम्ही देखील ते मान्य करतो व आपणही ते मान्य केले होते. अनेक विषय आहेत. अनेक सन्माननीय सदस्य बोलले आहे. आज अधिवेशनाचा शेवटचा दिवस आहे.

अध्यक्ष महोदय, आपल्या देशाची अशी स्थिती झाली की, दुर्दैवाने बऱ्याचवेळा अवकाळी पाऊस पडला. अशा वेळेस या राज्यामध्ये गोरगरिबांना धान्य कमी पडले. जागतीक पातळीवर आपली इतरांपेक्षा उत्पादन क्षमता कमी आहे. आपली गेल्या 15, 20 वर्षात 75 हजार कोटी रुपये खर्च करुन केवळ एक टक्के सिंचनक्षमता वाढल्यामुळे आपल्याला सिंचनक्षमता वाढविण्याचा मोठा कार्यक्रम राबवावा लागणार आहे. कारण सिंचन क्षमता वाढली तर धान्याचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर होऊ शकेल. शेतकऱ्यांना साखर उत्पादनाकरिता आपण मदत करीत आहोत. परंतु डाळी सारखे पदार्थ किंवा दुधासारख्या पदार्थाबाबत काही प्रश्न निर्माण झाल्यास याबद्दल समाजामध्ये तातडीने प्रतिक्रिया उमटतात. त्यामुळे आपल्या राज्यात मागील काही महिन्यामध्ये डाळ महाग झाली, हे मी प्रामाणिकपणे मान्य करतो. परंतु डाळ महाग का झाली याचा विचार करण्याची देखील गरज आहे.

अध्यक्ष महोदय, डाळ हा जागतीक आहारातील पदार्थ नाही. ज्याप्रमाणात आपल्याकडे आहारात डाळीचा वापर होतो, त्या प्रमाणात जगतीक पातळीवर डाळीचा आहारात उपयोग होत नाही. विदर्भामध्ये तुरीचे उत्पादन जास्त होते. कोकणात व पश्चिम महाराष्ट्रात डाळीचे उत्पन्न येत नाही. डाळीचे उत्पन्न कमी, जास्त होत रहाते. 2011 मध्ये डाळीचे उत्पन्न 8 लाख मेट्रीक टन झाले होते. 2012 मध्ये डाळीचे उत्पन्न 10 लाख मेट्रीक टन झाले होते. 2013 मध्ये देखील डाळीचे उत्पन्न 10 लाख मेट्रीक टन झाले होते. आपण गेल्या चार, पाच वर्षापासून दुष्काळ सदृष्य परिस्थितीला तोंड देत आहोत. याच काळात म्हणजेच 2014 मध्ये केवळ 3 लाख 25 हजार मेट्रीक टन आणि 2015 मध्ये 5 लाख मेट्रीक टन डाळीचे उत्पन्न झाले. असे असतानाही डाळीचा वापर

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. गिरीष बापट.....

दररोज होत आहे. अशा परिस्थितीत केंद्र सरकार देखील यासंदर्भात विचार करीत असते आणि प्रांतांना वेगवेगळे आदेश देत असते. तसेच आयात निर्यातिच्या संदर्भातील धोरण देखील बदल करीत असते. त्यामुळे आपल्याकडे आज परदेशातून म्हणजेच ब्रम्हदेश, आफ्रिकन कंन्ट्रीज् येथून मोठ्या प्रमाणावर डाळ आयात होते. 50, 50 हजार मेट्रीक टन डाळीने भरलेली जहाजे आपल्या बंदरावर येतात. राज्यात डाळीचे उत्पन्न कमी असले तरी आवश्यक असलेली डाळ आयात करुन ती जनतेला दिली पाहीजे हे आपले कर्तव्यच आहे, या भावनेने आपण काम करीत होतो. उत्पादन जास्त झाले, परंतु मालाचे शॉर्टेज झाले तर भाव वाढतात. त्यामुळे बॅलेन्स ठेवणे गरजेचे असते. आयात, निर्यात करायची किंवा कसे, राज्याराज्यात बंदी घालायची किंवा कसे याबाबत केंद्र सरकार विचार करीत असते व आपणही विचार करीत असतो.

अध्यक्ष महोदय, आपण बऱ्याच बाबीसंदर्भात चर्चा केली. डाळीचे उत्पादन कमी असताना, डाळीचा साठा होऊ नये व भाव वाढू नये आणि मोठ्या प्रमाणावर आपल्या राज्यात आलेली डाळ इतर राज्यात जाऊन येथे तुटवडा निर्माण होऊ नये म्हणून काही निर्णय केंद्राने तर काही निर्णय राज्याने देखील घेतले. आपल्या येथे बीपीटी आहे. साधारणतः 50 नव्हेतर 60 ते 70 टक्के माल आपल्याकडे होतो, फार कमी माल तामिळनाडू व आंध्र प्रदेश या राज्यामध्ये होतो. प्रश्न हा आहे की, आपल्या राज्यात परदेशातून आलेली डाळ, म्हणजेच तूर वेगळी असते व तूर डाळ वेगळी असते, याची आपल्या कल्पना आहे. तुरीवर प्रक्रिया करावी लागते, पॉलीश करावी लागते, त्यानंतर डाळ तयार होते. ही तूर डाळ बाजारामध्ये येते. समजा 100 किलो तूर आयात केली व त्यावर प्रक्रिया केल्यास साधारणतः त्यातून 15, 20 किंवा 25 टक्क्यापर्यंत घट येते. म्हणजेच डाळीवर प्रक्रिया करताना तुकडे पडत असल्यामुळे तेवढी परसेंट डाळ घटते. माझ्या खात्याने परदेशातून किती डाळ आली, कोणी आणली, काय रेटने आणली, केंद्र सरकारकडून आणि बीपीटीकडून त्याचे बुकींग काय झाले, त्यासंदर्भात सर्व माहिती घेतली. त्यावेळी असे लक्षात आले की, यावेळी परदेशातून डाळ आयात करण्याचे प्रमाण कमी झालेले आहे. येथे येणारी डाळ जवळजवळ काही

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

महिने त्यांना भाव वाढून पाहीजे असल्यामुळे बंदरामध्ये पडून होती. किती जहाजांमध्ये किती डाळ आली, त्याची माहिती खात्याने जाऊन घेतली.

...3/-



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. गिरीष बापट...

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. पृथ्वीराज चव्हाण हे देखील केंद्रामध्ये पीएमओ ऑफीसमध्ये होते. कोणाला कळत नसेल तेवढी माहिती पीएमओ ऑफीसला असते, त्यावर मॉनिटरिंग करीत असतात. हे करीत असताना आपण तेथे मोठ्या पदावर काम करीत होतात. आपण मोठ्या ठिकाणी होतात, याचा आम्हाला निश्चितच आदर आहे. बाहेरुन येणारी तूर येथे उतरावयाची आणि प्रक्रिया भारतभर कुठेतरी करायची, अशी स्थिती नाही. सुदैवाने राज्यामध्ये तूर डाळीच्या मिल्स जास्त आहेत व येथे तुरीवर प्रक्रिया केली जाते. फिनीशड् माल आंध्र प्रदेश, गुजरात, मद्रास, गोवा, कर्नाटक आणि राज्याच्या कानाकोपऱ्यात जातो. केंद्राने निर्बंध घातले तेव्हा असे सांगण्यात आले होते की, परदेशातून आता कमी डाळ येऊ लागली आहे. ती डाळ येथे आल्यावर व येथून बाहेर पाठविल्यावर पुन्हा राज्यात बीकट परिस्थिती निर्माण होईल. मार्केटची परिस्थिती 10, 12, 15 दिवसातून सारखी बदलत असते. बदलत्या परिस्थितीचा विचार करुन राज्य सरकार किंवा केंद्र सरकारला निर्णय घ्यावे लागतात. हा निर्णय घेत असताना आम्ही पाहीले की, डाळ आली व केंद्राकडून साठ्याचा निर्बंध आला. त्यावेळी राज्यातील अनेक ठिकाणी धाडी घालण्यात आल्या. या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर येणारी तूर ठाणे, मुंबई विभागामध्ये 10,541 टन, कोकणामध्ये 4,126 टन होती. कारण कोकणामध्ये रायगड वगैरे भागामध्ये मिल्स आहेत. तसेच पुणे व औरंगाबाद येथे काहीच नव्हती, अमरावती 51 टन, नागपूर येथे 76 टन अशी एकूण 14,796 टन तूर होती. त्यातून तूर डाळ 3,844 टन होती. गोडाऊला सील लावले तेव्हा त्यामध्ये एकच तूर डाळ नव्हेतर वेगवेगळ्या प्रकारचे धान्य होते. त्यामुळे त्याच्यावर प्रक्रिया होत नव्हती. तो माल मार्केटमध्ये जाऊ शकत नव्हता. निर्बंध घातल्यामुळे जहाजामार्गे आलेली डाळ देखील बंदरातच राहिली होती. असेच राहिले असते तर कृत्रिम टंचाई निर्माण होणार होती. डाळ राज्यात आलेली आहे, त्याच्या प्रोसिसिंगला 8, 10 दिवस लागतील हा विचार करुन तसेच महागाई वाढू नये म्हणून केंद्र सरकारने यासंदर्भातील निर्बंध उठविले.

अध्यक्ष महोदय, यामध्ये गुजरातला वगैरे किती डाळ गेली, हा प्रकार कमी आहे. तेथे डाळ जातच असते. कारण चार, पाच राज्यात डाळ जाण्याची प्रक्रिया नियमितची बाब आहे. डाळ जप्त केल्यानंतर ती कुठल्या मार्गाने प्रोसेस करिता मील्समध्ये जायला पाहीजे, कुठली डाळ व्यापाऱ्यांकडे

...4/-

13-04-2016 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) RR-4

SEB/ AKN/ MMP/ 17:20

श्री. गिरीष बापट...

जायला पाहीजे व राज्यातील सर्व भागात जायला पाहीजे, याचा विचार करण्यात आला. आपण एकिकडे सर्व डाळ सील करुन ठेवायची व दुसरीकडे येणारी आयात बंद करायची. आपल्याकडे डाळीचे कन्झप्शन साधारणत: 2 लाख मेट्रीक टन होत असते. ही परिस्थिती अशीच राहिली असती तर कृत्रिम टंचाई निर्माण होऊन महागाई वाढली असती. असे होऊ नये म्हणून आहे त्या प्रोसेसमध्ये डाळ मार्केटमध्ये यायला पाहीजे, या एकाच हेतूने आपण ती आणली आणि ठेवली. डाळ गोडावूनमधून बाहेर आणत असताना आपण लॉ ॲण्ड ज्युडीसरीचा सल्ला घेतला. अशी डाळ जप्त करावी लागते किंवा तिचा लिलाव करावा लागतो. आता डाळ परदेशातून येणार नाही, डाळ मीलमध्ये जप्त करुन ठेवलेली आहे. डाळ जेवणामध्ये दररोज आवश्यक आहे. अशा वेळेला चीफ सेक्रेटरी, लॉ ॲण्ड ज्युडीसरी यांचा कायदेशीर सल्ला घेऊन ही डाळ मार्केटमध्ये आणली तर नागरिकांपर्यत पोहचेल हाच त्यामागे शुद्ध हेतू होता त्यामुळेच आपण ती घेतली. पणन विभाग त्यासंबंधितच आहे. बाजार भावाचे कंट्रोल करण्याची बाब त्यांच्याकडे असते.

...SS/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गिरीश बापट.......

तुरीचा भाव 120 रुपये किलो होता तो 230 रुपये किलोपर्यंत गेला याबाबतचा मुद्दा सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केला होता. संपूर्ण देशात आपल्या राज्यात तयार होणाऱ्या डाळीची क्वालिटी सुपर फाईन असून ती परदेशातील डाळी पेक्षा चांगली आहे. आपल्या देशात आफ्रिकन देशातून येणारी डाळ थोडीशी हार्ड असते, आपल्या डाळीपेक्षा तिची चव थोडी कमी असते. यासर्व बाबींचा विचार करुन कोणत्याही कायद्याचे उल्लंखन न करता केंद्र सरकारशी व राज्य सरकारमधील संबंधित विभागाशी चर्चा करुन स्वस्त दराने डाळ बाजारात उपलब्ध करुन दिली. सन्माननीय सदस्यांना यासंदर्भातील माहिती कोणी दिली मला माहिती नाही.

अध्यक्ष महोदय, माझी विनंती आहे की, सन्माननीय सदस्यांनी डाळीच्या संदर्भातील ए टू झेड माहिती मिळवावी व याप्रकरणी घ्यावयाच्या ॲक्शची माहिती मी त्यांना देतो. याप्रकरणी व्यापारी असोशिएशनने आम्हाला सांगितले की, आमचा माल जप्त होऊन पडून आहे, त्यावर प्रोसेस करण्यासाठी आम्हाला परवानगी देण्यात यावी, आम्ही ती करु. त्यावेळी ग्राहकपेठेपासून सर्व व्यापारी आम्हाला भेटले होते. राज्यात डाळीची अधिक कृत्रिम टंचाई निर्माण होऊ नये म्हणून लोकांच्या हितासाठी त्यावेळी डाळ बाजारात विकली. त्यावेळी आम्ही मिलला 8 दिवस लागणार असले तरी डाळीवरील प्रोसेस सुरु करण्यास सांगितले होते. कारण त्यांचाही माल बाजारामध्ये येणे आवश्यक होते. त्यावेळी त्यांना असेही सांगितले होते की, त्यांना त्यांचा काही प्रमाणात माल हा गुजरात, तामिळनाडू, आंध्र प्रदेश मधील ऑर्डर असतील तर तेथे पाठवावा परंतु आपल्या राज्यातील लोकांसाठी प्रायॉरिटी द्यावी. आमच्याकडे काही किरकोळ विक्रेते आले होते, त्यांनी आम्हाला सांगितले आमच्याकडे डाळीचा माल नसल्यामुळे आमचा व्यापार होत नाही. त्यावेळी झालेल्या बैठकीमध्ये मी व माननीय मुख्यमंत्री महोदय उपस्थित होतो. त्यावेळी आम्ही 100 रुपयांच्या आत डाळ विकण्याची अट घातली होती त्यानुसार त्यांनी ती डाळ कालावधी फार कमी असल्याने काही शहरामध्ये विकली. आता सदनामध्ये सन्माननीय सदस्य ॲड आशिष शेलार व श्री.अतुल भातखळकर उपस्थित आहेत. त्यावेळी आम्ही आवाहन केले होते की, समाजसेवी संस्थांनी सणासुदीचे दिवस येणार असल्याने सदर डाळ 100 रुपये दराने वाटप करावी. राज्यात त्यावेळी विक्री झालेल्या डाळीची किंमत 51 कोटी रुपये होती.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

13-04-2016 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) SS-2

GSS/ AKN/ MMP/ 17:30

श्री.गिरीश बापट.......

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी आरोप करण्यासाठी सदनामध्ये राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय शब्दांचे विश्लेषण केले. सदर डाळ अशा पध्दतीने न विकता तशा पध्दतीने विकली असती तर त्यावेळी तिचा भाव किती राहिला असता याचे कॅल्यूलेशन करण्यात आले. सदर कॅल्यूलेशन करीत असताना डाळीचा तिचा भाव 2,000 रुपयापासून 12 हजार रुपयापर्यंत काढला. 51 कोटी रुपयांच्या डाळीच्या विक्रीमधून 12 हजार कोटी रुपये गैरमार्गाने गेले व त्यातून व्यापाऱ्यांचा फायदा झाला असे सांगण्यात आले. याप्रकरणी माझ्या एका सहकाऱ्याने माझ्यावर आरोप केल्यामुळे मी त्यांच्यावर अब्रू नुकसानीचा दावा दाखल केला असून त्यासंदर्भात न्यायालयामध्ये दावा सुरु आहे. मी याप्रकरणी संबंधितास सोडणार नाही. याप्रकरणी आता काही जण सांगतात जे झाले ते झाले, राजकारण आहे. मी म्हटले नाही, असे चालणार नाही, याप्रकणाचा निर्णय आता न्यायालयातून लागेल. याप्रकरणी मला न्यायालयाने दोषी ठरवले तर राजकारणातच नव्हे तर या जगात मी माझे अस्तित्व ठेवणार नाही, हेही मी तुम्हाला सांगू इच्छितो. राजकीय दृष्टीने प्रेरीत होऊन, अर्धवट माहिती घेण्यात येते.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.पृथ्वीराज चव्हाण यांना सांगू इच्छितो की, त्यांचा आमच्यावर विश्वास नसेल परंतु विधि व न्याय विभागावर, मुख्य सचिव यांच्यावरही तुमचा विश्वास नाही म्हणून प्रॉब्लेम झाला.

श्री.पृथ्वीराज चव्हाण : अध्यक्ष महोदय, मी 23 एप्रिल रोजी सरकारने व्यापाऱ्यांना साठा करण्याची मोकळीक का दिली, यासंदर्भात मी प्रश्न विचारला होता.

श्री.गिरीश बापट : अध्यक्ष महोदय, होय, मी तेच सांगत आहे. साठा करण्यासाठी मोकळीक यासाठी दिली की, साठा करुन सर्व माल गोडाऊनमध्ये पडून होता त्यावर प्रोसेस करण्यासाठी 8 ते 10 दिवस लागतात. रोजचे कन्झम्शन चालू होते, परदेशातून आयात होणार नव्हती, मार्केटमधील डाळ शून्य होणार होती त्यामुळे सणासुदीच्या दिवसामध्ये लोकांना डाळ मिळणार नव्हती. त्यामुळे शासनाच्या विधि व न्याय विभागाकडून डाळ सोडण्यासंदर्भातील कायदेशीर

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

परवानगी घेऊन, सल्ला व मत घेऊन डाळ सोडण्यात आली होती. डाळीच्या संदर्भात जो व्यवहार करण्यात आला होता त्यामध्ये पारदर्शकता होती, याप्रकरणी एक पैशाचा भ्रष्टाचार झालेला नाही व

..3



श्री.गिरीश बापट.......

आम्ही होऊही देणार नाही. त्यावेळी जनतेला डाळ उपलब्ध करुन देण्याच्या हेतूने जी कार्यवाही केली होती त्यासंदर्भातील सर्व रेकॉर्ड उपलब्ध आहे. सन्माननीय सदस्यांनीही ते तपासावे, त्यांना ते हवे असल्यास त्यांनी घ्यावे, मी त्यांना ते उपलब्ध करुन देतो. ते पाहिल्या नंतर आपल्या लक्षात येईल की डाळीसंबंधीच्या कोणत्याही व्यवहारात भ्रष्टाचार झालेला नाही.

अध्यक्ष महोदय, सदरहू विषयी सदनामध्ये मुख्यमंत्री महोदयांनी भाषण केले होते त्यावेळी विरोधी पक्षाने सभात्याग केला होता. सन्माननीय सदस्य श्री.जयंतराव पाटील यांच्या सारखे ज्येष्ठ सन्माननीय सदस्य सदनामध्ये बसून प्रश्न विचारत असतात व तो त्यांचा अधिकार आहे. त्यावेळी विचारलेल्या माहितीसंबंधी माहिती मिळाल्यानंतर संपतो. परंतु राजकीयदृष्ट्या प्रेरीत होऊन डाळ महाग झाली असे राजकारण राज्यात करण्याकरिता वेगळ्या राजकीय पध्दतीचा अवलंब आपणास करावयाचा असेल तर तो तुमचा निर्णय आहे. आम्ही त्याबाबत काही म्हणार नाही.

अध्यक्ष महोदय, सदरहू विषयाबाबतचा प्रश्न उपस्थित केल्यानंतर तारखेनुसार सर्व ठिकाणी उपलब्ध स्टॉक, राज्यातील व देशातील परिस्थिती, केंद्र शासनाचे निर्णय, राज्य शासनाने घेतलेले निर्णय, माननीय मुख्यमंत्र्यांनी सभागृहासमोर ठेवले होते व ते सर्व पारदर्शक आहेत. याप्रकरणीच्या कोणत्याही निर्णयाचा कागद सन्माननीय सदस्यांना मिळू शकतो. तो त्यांना मिळत नसेल तर आम्ही तो उपलब्ध करुन देऊ आणि त्यानंतर आपण त्यामधून सिध्द करुन टाका. मला असे वाटले की, ज्यावेळी राजकीय जीवनामध्ये माणसे काही कारणाने अयशस्वी ठरतात, या विषयावर मी आता बोलणार नाही. कारण राजकारण हा वेगळा विषय आहे. राजकारणामध्ये पराजयाला सामोरे जावे लागते, अनेक अडचणींना सामोरे जावे लागते त्यामुळे एखादी राजकीय क्षेत्रातील भडक घोषणा करुन सनसनाटी बातमी सोडून देण्यात येते. सभागृहामध्ये ज्यावेळी डाळीच्या संदर्भातील आकडेवारी सांगितली जात होती, त्यावेळी मी हसत होतो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

अध्यक्ष महोदय, अनेक वेळा राजकीय स्पर्धा लागते त्यावरुन मला एक गोष्ट आठवते. या गोष्टीचा वेगळा अर्थ घेऊ नये, अशी माझी सन्माननीय सदस्य श्री.पृथ्वीराज चव्हाण यांना विनंती आहे. एकदा माकडांची बैठक भरली होती, त्यावेळी करवंदाची उसळ केली होती व त्यातून माकडांची स्पर्धा लागते. माकडे बैठकीस बसल्यानंतर एक करवंदाची बी माकडांच्या उंची पेक्षा

...4



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गिरीश बापट.......

जास्त वर उडाली. त्यामुळे एका माकडाचा स्वाभिमान जागा झाला. एक माकड म्हणाले मी माकड असून कोलांट्या उड्या मारण्यात एक्सपर्ट आहे, यात माझ्या पेक्षा कोण अधिक एक्सपर्ट आहे. त्यामुळे त्या माकडाने उसळ खाणे बाजूला ठेवून करवंदाची बी जेवढ्या उंच गेली होती त्यापेक्षा अधिक उंच कोलांटी उडी मारली. त्यावेळी भरलेल्या बैठकीत त्या माकडाच्या शेजारी त्याचे भाऊ बसलेले होते. त्या भावातील एकाला वाटले माझा भावाने एवढी मोठी कोलांटी उडी मारली. म्हणून त्याने त्याच्या पेक्षा अधिक उंच कोलांटी उडी मारली आणि त्यांच्या इतर भावांनी ते दुष्य पाहिल्याने त्यांच्यामध्ये कोलांटी उडी मारण्याची स्पर्धा सुरु झाली. 51 कोटी रुपयांच्या डाळीच्या विक्रीतून एकाच्या लक्षात आले की, 1 हजार कोटी रुपयांचा घोटाळा जाहीर करा, दुसऱ्याला वाटले हा माझ्यावर कडी करतोय म्हणून त्याने 2 हजार कोटी रुपयांचा घोटाळा जाहीर केला, अशा प्रकारे हा आकडा 12 हजार कोटी रुपयांपर्यंत गेला. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी मोठी मंत्री पदे भूषविली आहेत व सन्माननीय सदस्य श्री.पृथ्वीराज चव्हाण यांनी तर राज्याचे मुख्यमंत्री पद व केंद्र सरकारमध्ये मंत्री पद भूषविले आहे. मला त्यांच्याबद्दल आदर आहे. माझ्याबद्दल व्यक्तिगत प्रश्न उपस्थित केला म्हणून मी काही बोलणार नाही. परंतु प्रत्यक्षात काय स्थिती होती, काय घडले, राज्यातील सामान्य माणूस हा केंद्र बिंदू समजून वागत असताना त्याच्या जेवणामध्ये डाळीची वाटी जाणार नसेल तर ती डाळ त्याला उपलब्ध करुन देणे आपल्या दृष्टीने महत्वाचे आहे. त्याकरिता कायद्याचे पालन करुन, आवश्यक सर्व परवानग्या घेऊन सदरचे काम तातडीने केले. त्यावेळी 10 दिवस माझ्या विभागातील अधिकारी व कर्मचारी यांनी सर्व गोडाऊनला भेट दिली होती. त्यावेळी साठा केलेले धान्य बाहेर काढले, ते जप्त केले व त्यावर प्रक्रियेकरिता

पाठवून राज्यातील गरीब जनतेला आम्ही डाळ देऊ शकलो, याचा मला आनंद आहे. याप्रकरणीची कागदपत्रे आपण मला मागा मी ते देईन. या प्रकरणी काहीच गैरव्यवहार झालेला नाही.

अध्यक्ष महोदय, आमच्यातील काही सहकारी म्हणतात की, याप्रकरणी न्यायालयीन चौकशी करा. मला जर वाटले की एखाद्या न्यायाधिशाकडे जाऊन त्यांना पत्रके व माहिती दाखविली तर मला भिती वाटते की ते माझ्या अंगावर भिरकावून देतील व म्हणतील की याच्यामध्ये काहीही नाही,

...5

13-04-2016 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) SS-5

GSS/ AKN/ MMP/ 17:30

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गिरीश बापट.......

कसली न्यायालयीन चौकशी करावयाची आहे. सन्माननीय सदस्य श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्या सारख्यांनी ज्यावेळी न्यायालयीन चौकशी मागितली तेव्हा सन्माननीय सदस्य श्री.जयंतराव पाटील यांच्या पेक्षा अधिक आपले म्हणणे सरस असले पाहिजे. कारण आपण मुख्यमंत्री पदी राहिला आहात श्री.जयंतराव पाटील तर गृह मंत्री व अर्थ मंत्री पदी राहिले होते. माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विखे-पाटील यांच्यापेक्षा त्यांची बातमी आणखी वर आली पाहिजे या राजकीय खेळीने मागणी केली असेल तर मला आपल्याबद्दल काहीच म्हणावयाचे नाही. परंतु सन्माननीय सदस्य श्री.पृथ्वीराज चव्हाण यांनी वस्तुस्थितीचे दर्शन करावे. मी त्यांना वेळ देतो, ते म्हणतील तेथे भेटतो, संबंधित अधिकाऱ्यांनाही सोबत आणतो व एकेएका मुद्यावर चर्चा करण्याची माझी तयारी आहे. कारण काहीच नसताना मी चौकशीची मागणी केली तर लोक माझी चेष्टा करतील, हसतील, तुमची चेष्टा नाही करणार. यामध्ये काहीही तथ्य आहे असे मला दिसत नाही, राज्य शासनाने केलेली प्रत्येक कृती कायद्याने तपासून, केंद्र शासनाची परवानगी घेऊन केलेली कृती आहे. यातील एकही कृती नियमबाह्य नाही. सामान्य माणसाला त्याच्या जेवणामध्ये डाळ मिळाली पाहिजे या सदहेतूने केलेली कृती आहे. म्हणून ज्यांनी काही आरोप केले असतील तर ते मला मार्गदर्शकच आहेत, असे मी समजतो. त्याबद्दल मी रागावणार नाही, चिडणार नाही, मी त्यांचा आदर करतो. सन्माननीय सदस्य श्री.जयंतराव पाटील यांनी मला सांगितले आहे की, भविष्य काळामध्ये चांगले काम करा. आपल्या जिभेला दुध भाजले तर ताक देखील फुंकून प्यायला पाहिजे. त्याप्रमाणे सन्माननीय सदस्य श्री.जयंतराव पाटील यांचे दूध मी फुंकून पितो व सन्माननीय सदस्य

श्री.पृथ्वीराज चव्हाण यांचे ताकही फुंकून पिणार आहे. एवढेच मी या निमित्ताने सांगतो. या विषयावर फार काही चर्चा झाली नाही. या निमित्ताने या खात्याकडे मागील 15 वर्षामध्ये किती दुर्लक्ष झाले याचा मी पाढा मी वाचणार नाही.

यानंतर TT-1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. गिरीश बापट......

आम्ही आता बायोमॅट्रिकवर जातो आहे. आम्ही आता ट्रान्सपोर्टच्या संदर्भात जातो आहे. या राज्यात या खात्याकडे थोडेसे दुर्लक्ष झाले होते. मी थोडे अधिक लक्ष देण्याचा प्रयत्न केला. 10 ते 12 हजार कोटींची उलाढाल होणाऱ्या खात्यामध्ये आजही मोठ्या प्रमाणावर चोरी होते हे मला कबूल केले पाहिजे आणि ती रोखण्यासाठी वेगवेगळ्या मार्गांनी ही चोरी रोखून उरलेले धान्य बीपीएलला देतो, अंत्योदय योजनेला देतो, तसे एपीएलला देखील कसे देता येईल हा प्रयत्न माझे सरकार करते. आम्ही ते करणार आहोत. आपण फक्त निवडणुकीपुरते केले आहे. 5-6 महिने अन्न सुरक्षा कायद्यात परवानगी नसताना देखील निवडणूक डोळ्यापुढे आहे, आता डिस्कन्टीन्यू करु नका. 130 कोटी रुपये दर महिन्याला 1500, 1600 कोटी रुपये एपीएलची मान्यता नसलेल्या लोकांना रेशनवर धान्य स्वस्त दरात देण्याचे काम आपण केले. पण या महाराष्ट्रातील जनता एवढी हुशार आहे की, त्यांनी विचार केला की, आता आपल्याला संपता संपता काही तरी देऊ लागले आणि 15 वर्षे उपाशी ठेवले, त्यांचा तळतळाट आपल्याला भोगावा लागला आणि म्हणून आपल्याला पायउतार व्हावे लागले आहे. हे राज्य कोणाचेही असो, पण या अन्नधान्य वितरण व्यवस्थेच्या खात्यामधून येणाऱ्या भविष्यकाळामध्ये सर्वसामान्य जनतेला या देशात जे पिकते ते धान्य कमी पडले तर आयात करु, पण कोणालाही उपाशी राहू देणार नाही हा एक संकल्प करुन आम्ही सत्तेवर आलो आहोत. आपण मागून त्यावर दगड टाका किंवा पाणी उडवा, तुम्हाला काय करायचे ते करा, त्याबद्दल मी काही बोल नाही. सन्माननीय श्री. पृथ्वीराज चव्हाण साहेब मी तर आपल्या कारकिर्दीवर एवढा खूश आहे की, आपली ती 5 वर्षाची कारर्किद मी तेथे बसून बघत होतो. तेव्हा आपण असे फास्ट यायचे आणि असे वाटायचे की, काय दमाचा माणूस आहे. पण निर्णय बघितले तर शून्य असायचे. ज्याचे वर्णन माझ्यापेक्षा सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी चांगले केले आहे. आपण केलेल्या एकाही आरोपामध्ये तथ्य नाही. आपण केलेल्या एकाही मागणीमध्ये तथ्य नाही. जे केले ते नियमबाह्य केले असे आपण मला दाखवून द्या. सर्व नियमाने आणि अधिकाऱ्यांच्या परवानगीने केले आहे. कुठे तरी जाऊन गुपचूपमध्ये केलेले नाही, कुठे तरी जंगलात जाऊन केलेले नाही. सामान्यांच्या पत्रकार परिषदा घेऊन सांगितले आहे. व्यापाऱ्यांना बोलावून त्यावेळी आवाहन केले आहे, आणि तूर उपलब्ध नसताना देखील कमीत कमी दरामध्ये ती कशी विकली जाईल हा प्रयत्न

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

मी केला आहे. मला वाटते की, याच्यापेक्षा जास्त वेळ उत्तर देणे फारसे बरोबर होणार नाही.

2......



श्री. पृथ्वीराज चव्हाण : अध्यक्ष महोदय, पहिला मुद्दा असा आहे की, मी आपल्यावर भ्रष्टाचाराचे आरोप केलेले नाहीत.

श्री. गिरीश बापट : अध्यक्ष महोदय, मी म्हटले नाही की आपण आरोप केले आहेत.

श्री. पृथ्वीराज चव्हाण : आपल्या स्वतःच्या खात्याच्या सचिवांनी कुठेही डाळीचा उल्लेख केला नसताना आपण दुसऱ्या सचिवांकडून डाळ हा शब्द मध्ये घुसविला आहे. हा फोर्जरीचा प्रकार आहे काय, याचे मला उत्तर पाहिजे. मुख्य सचिवांनी त्यावर दोन वेळा सही केली, त्यावेळी या दोन सचिवांच्या मध्ये काही विसंगती आहे काय हेही स्पष्ट केले नाही. आता याची कोण चौकशी करणार आहे ? मी स्पष्ट आरोप करतो आहे. पणन विभागाचे सचिव दीड महिन्यामध्ये रिटायर्ड होणार होते. त्यांनी मध्येच डाळ कोठे घातली ? आपल्या सहा पानाच्या नोटमध्ये आपण ज्यावर सही करायच्या आधी आपल्या सचिवांनी जी नोट लिहिली आहे, त्यामध्ये डाळीचा उल्लेख होता का? डाळीचा उल्लेख नसताना दुसऱ्या विभागाच्या सचिवांनी डाळीचा साठा करण्याची परवानगी द्या, असे म्हटले आणि आपण सर्वांनी सह्या केल्या आहेत. आपल्याला कोणी मिसगाईड केले काय, असे मी विचारत आहे. भ्रष्टाचाराचे आरोप केलेले नाहीत. दुसरा मी प्रश्न विचारला होता त्यासंबंधी मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले की, आम्ही 23 एप्रिलला जो साठाबंदी उठवायचा आणि व्यापाऱ्यांना भरपूर साठा करायची परवानगी दिली, तो निर्णय तामिळनाडूने अशा प्रकारची साठाबंदी उठविली म्हणून घेतला ही माहिती चुकीची आहे. तामिळनाडूने आजही साठाबंदी उठविलेली नाही. मुख्यमंत्री महोदयांनी चुकीची माहिती सभागृहाला दिलेली आहे. याचे स्पष्टीकरण कोण करणार आहे. मुख्य सचिवांची आणि पणन सचिवांची चौकशी झाली पाहिजे. दोन सचिवांमध्ये विसंगती असेल तर, आणि आपल्या खात्याच्या सचिवांनी डाळीचा उल्लेख केलेला नसताना तुम्ही दुसऱ्या खात्याच्या सचिवांकडून डाळ हा शब्द घालता. तो तुम्ही सांगितला आहे असा मी आरोप केलेला नाही. पण आपण निर्णय घेतला 23 एप्रिलला म्हणून किंमती वाढल्या आहेत. आणि मग आपण तो निर्णय घाईगर्दीने फिरविला. पण चार महिन्यांकरिता आपण हा निर्णय कशाकरिता केला आहे. मी कुठे जप्तीबद्दल बोललो का, मी फक्त आपल्याला दोन-तीन प्रश्न विचारले आहेत. 23 एप्रिलला साठाबंदी उठवायचा आणि व्यापाऱ्यांना भरमसाठ साठा करु द्यायचा निर्णय घेतला तो का घेतला,

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

त्यामुळे किंमती वाढल्या का नाहीत ? त्यामुळे किंमती वाढल्या आहेत. याचे उत्तर कोण देणार ?

3......



श्री. गिरीश बापट : अध्यक्ष महोदय, आम्ही जो निर्णय घेतला त्याच्यामुळे किंमती कमी झाल्या आहेत. त्याचे कारण बाजारामध्ये माल नव्हता. साठा मोकळा केल्यानंतर तो माल मिलमध्ये गेला, त्याच्यावर प्रोसेस झाली, तो बाजारात येऊ लागला आणि म्हणून किंमती ज्या वाढत होत्या त्या परत खाली आल्या. 120-130 रुपयांपर्यंत या किंमती कमी आल्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री. पृथ्वीराज चव्हाण साहेब मी मघाशी आपल्याला सांगितले की, परदेशातून आयात कमी होऊ लागली. आपल्याकडील बाजारातील माल संपायला लागला. अशा वेळेला दर महिन्याला पणन सचिवांकडे एक बैठक होत असते. त्यामध्ये ज्यांच्या किंमती वाढतात त्यांचा आढावा घेतला जातो. या किंमती नेहमीच खाली वर होत असतात. बाकीच्या 4 वस्तूंप्रमाणेच डाळीची देखील किंमत कमी जास्त होते. म्हणून डाळीचा सर्वांशी बोलून त्यामध्ये समावेश करण्यात आला. धन्यवाद.

श्री. पृथ्वीराज चव्हाण : अध्यक्ष महोदय, यामध्ये स्पेसिफिक उत्तर आलेले नाही. आपण यासंबंधीची माहिती घ्यावी. मी आरोप करतो की, ही फोर्जरी आहे.

श्री. गिरीश बापट : ही फोर्जरी असेल तर आपण फोर्जरीचा गुन्हा दाखल करावा.

श्री. पृथ्वीराज चव्हाण : आपली काहीच जबाबदारी नाही काय ?

श्री. गिरीश बापट : जबाबदारी माझीच आहे. यामध्ये कोठेही फोर्जरी झालेली नाही. आपल्याला वाटत असेल तर.....

**अध्यक्ष :** यामध्ये एकच मुद्दा आहे की तामिळनाडू सरकारने बंदी उठविली नव्हती, ते कदाचित मुख्यमंत्र्यांकडून सांगितले गेले. तेवढा खुलासा कधी तरी माहिती घेऊन सांगावे.

श्री. गिरीश बापट : अध्यक्ष महोदय, नेहमी बंदी कधी होती यासंबंधी त्यावेळेला जी माहिती मिळाली होती ते खरे खोटे काय याची तपासणी करतो.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, आपण खुलासा केला त्याबद्दल हरकत नाही. आमचे जे काही प्रश्न अनुत्तरीत राहिले आहेत त्यांची स्पष्टपणे उत्तरे आपण देऊ शकला नाहीत. यासंबंधी माझे दोन प्रश्न आहेत. एक तर या सर्व प्रकाराची आपण निवृत्त न्यायाधिशाच्या मार्फत चौकशी करणार आहात काय, हा पहिला प्रश्न आणि दुसरा प्रश्न असा आहे की, आपण डाळीच्या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

संदर्भात किंमती कमी होण्याकरिता जो निर्णय घेतला त्यानंतर डाळीच्या किंमती किती कमी झाल्या आहेत त्याचा एकदा खुलासा होऊन जाऊ द्या. 4......

13-04-2016 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) TT-4

PPD/ MMP/ AKN/ 17:40

श्री. गिरीश बापट : अध्यक्ष महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी आता काही प्रश्न विचारले आहेत. त्याही वेळेला मी माननीय विरोधी पक्षनेत्यांना भेटून माहिती दिली होती. त्यांना दाखविले होते की, हा असा असा प्रकार आहे. त्यामुळे मला काही असे वाटत नाही की, विरोधी पक्षांना यामध्ये काही करावयाचे आहे. आता फक्त एकच प्रश्न आहे की, सन्माननीय श्री. पृथ्वीराज चव्हाण साहेबांनी भाषण केल्यानंतर त्याला जर मी सपोर्ट दिला नाही तर वरती मेसेज वेगळा जाईल, म्हणून आपण जे विचारले त्याबद्दल धन्यवाद.

5.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. दीपक सावंत (सार्वजनिक आरोग्य मंत्री) : अध्यक्ष महोदय, अंतिम आठवडा प्रस्तावामध्ये आरोग्य विषयावर बोलताना सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. राधाकृष्ण विखे-पाटील, सन्माननीय सदस्य डॉ. अनिल बोंडे, सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील, सन्माननीय सदस्य श्री. शंभुराजे देसाई या सदस्यांनी या चर्चेमध्ये भाग घेतला आहे. सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील साहेब मला आपल्या प्रश्नांची उत्तरे दिली पाहिजेत. कारण One way traffic is always dangerous.

अध्यक्ष महोदय, या राज्यामध्ये काही वर्षापूर्वी म्हणजे 1990 सालामध्ये आरोग्य विषयक धोरणाच्या बाबतीत लेंटीन आयोगाची स्थापना झाली होती. लेंटीन आयोगाच्या शिफारशीनुसार 1990 सालापासून सार्वजनिक आरोग्य विभाग आणि वैद्यकीय शिक्षण विभाग हे एकत्रित औषधी खरेदी करायचे. 1990 ते 2000 सालापर्यंत सर्व काही व्यवस्थित चालले होते. वैद्यकीय शिक्षण विभाग घ्यायचा, आरोग्य विभाग मान्यता द्यायचा, आदेशांचे एकत्रिकरण केले जायचे. एकत्रित आदेश निर्गमित केले जायचे आणि मग ही खरेदी व्हायची. 2000 ते 2011 पर्यंत वैद्यकीय शिक्षण विभागाचे शासन निर्णय आणि खरेदी धोरणाचे निर्णय एकत्रितपणे निर्णय झाला. दोन्ही विभागांची खरेदी देखील एकत्रित होत होती. नंतर काय झाले ते मला माहिती नाही. पण दोन मंत्र्यांचे भांडण होते की, राष्ट्रवादी कॉंग्रेस आणि कॉंग्रेसमधील भांडण होते ते माहिती नाही. 2011 मध्ये सार्वजनिक आरोग्य विभागाने आपल्या औषधांची वेगळी खरेदी केली. मग सचिव-2 यांच्या अध्यक्षतेखाली केंद्रीय खरेदी समितीची स्थापना केली.

UU-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.दीपक सावंत......

मात्र उपकरणे ही सर्व संख्या करारावर खरेदी करायचे सन 2011 मध्ये ठरले. संख्या करार आम्ही आणला नाही तर तो तुमच्या काळात होता. सर्व खरेदी ही ई-टेंडरद्वारे करायची. दिनांक 30 ऑक्टोबर, 2015 चा शासन निर्णय अस्तित्त्वात आला आणि उद्योग विभागाच्या शासन निर्णयाद्वारे कार्यालयीन पध्दतीची एक नियम पुस्तिका प्रसिध्द झाली आणि चार प्रकारे खरेदी सुरु झाली. दिनांक 30 ऑक्टोबर, 2015 च्या शासन निर्णयानुसार खुली स्पर्धात्मक निविदा, स्पॉट खरेदी, दर पत्रकाच्या आधारे खरेदी, मर्यादित निविदा, निर्बंधित निविदा, पॅनलमधील दर करार पुरवठादाराकडून खरेदी, एकल स्त्रोत खरेदी आणि स्वीस चॅलेंज पध्दती हे खरेदीचे प्रकार आहेत. त्याचवेळी सार्वजनिक आरोग्य विभागामध्ये जो शासन निर्णय झाला, त्यात ही खरेदी कुणाच्या अंडर व्हायची. हा शासन निर्णय आहे, मंत्री महोदयांच्या अंडर खरेदी व्हायची नाही. या शासन निर्णयामध्ये असे स्पष्ट म्हटलेले आहे. मी आपल्या परवानगीने शासन निर्णय वाचून दाखवितो. "शासन निर्णयाद्वारे सार्वजनिक आरोग्य विभागाच्या खरेदी संबंधी तरतूदी अधिक्रमित करण्यात येत आहेत. तसेच सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारितील सर्व रुग्णालयांची औषधे, उपकरणे, साधनसामुग्री, सध्याच्या प्रचलित खरेदीमध्ये सुधारणा करुन दिनांक 1 डिसेंबर, 2011 पासून नवीन खरेदी धोरण अंमलात आलेले आहे. औषधांची खरेदी स्वस्त दराने होण्याकरिता शक्यतो जेनेरिक औषधांचा वापर करावा, म्हणजेच केंद्रीय पध्दतीने औषधांची व साधनसामुग्रीची खरेदी करण्यात यावी. विभागास लागणारी औषधे व साधनसामुग्रीसाठी विभागाने खुल्या निविदा प्रक्रियेचा अवलंब करावा, म्हणजेच ई-टेंडरिंगला प्राधान्य द्यावे. सदर औषधे औषधी उत्पादकांकडून खरेदी करावी, औषधांच्या वेष्टनाबाबत स्पष्ट निर्देश असावेत. प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरापर्यंत पुरवठा करण्यास निविदेसाठी खाजगी वितरकांच्या सेवा घेण्यात याव्यात. माननीय विरोधी पक्ष नेते श्री.राधाकृष्ण विखे-पाटील आपल्या माहितीसाठी सांगतो. या शासन निर्णयामध्ये पुढे असे म्हटले आहे की, प्रत्येक स्तरावर विभागाची भंडारे जिल्हा स्तर आणि आरोग्य सेवा यांच्या औषधांची प्रयोग शाळेत म्हणजे एनएबीएच ॲक्रेडीएटेड लॅबोरेटरीत तपासणी करण्यात यावी. औषध प्राप्तीनंतरच देयकाची अदायगी व्हावी आणि औषध पुरवठा साखळीतील एका दक्षता अधिकाऱ्याची नेमणूक व्हावी. दोशी

.....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.दीपक सावंत......

औषध पुरवठादार आढळल्यास त्याला तीन वर्षासाठी काळ्या यादीत टाकावे." अशा प्रकाराचा हा शासन निर्णय आहे. केंद्रीय पध्दत कोणामार्फत होते तर सचिव-2, सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण विभाग अध्यक्ष्, सचिव, वैद्यकीय शिक्षण खाते, आयुक्त, कुटूंब कल्याण, सचिव, वित्त विभाग, विकास आयुक्त, संचालक, आरोग्य सेवा, संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, दक्षता अधिकारी, गृह मंत्रालयाकडून नियुक्त, दोन शल्य चिकित्सक रोटेशनवाईज, महाराष्ट्रातील नामांकित खाजगी रुग्णालयातील दोन संचालक, महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलचे दोन प्रतिनिधी, नामांकित रुग्णालयातील फॉर्माकेलॉजिस्ट, अन्य औषध प्रशासन विभागाचा अधिकारी एवढी माणसे औषधी खरेदी करतात. एकटा-दुकटा करीत नाही. त्यानंतर संचालकांच्या स्तरावर टेंडर काढले जाते, ई-निविदा काढल्या जातात आणि त्यानंतर ही खरेदी केली जाते. याचा मंत्र्यांशी कुठेही संबंध नाही. मी ज्यावेळेस सांगितले त्यावर आपण म्हणालात की, मंत्र्यांकडे कशी काय फाईल येत नाही ? मी सांगितले ही फाईल मंत्र्यांकडे अवलोकनार्थ देखील येत नाही. ही पध्दत माननीय तत्कालीन मंत्री श्री.सुरेश शेट्टी यांनी सुरु केली. हे का सुरु केले, कारण याबाबत लोकमतमध्ये 12 लेखांची मालिका आली होती. त्यानंतर आपल्या सरकारने घेतलेला निर्णय आहे आणि तो चांगला म्हणून आम्ही अवलंबिला. हा चांगला निर्णय होता. कारण मंत्र्यांवर खूप दबाव असतो. कोणीही सांगू शकते की माझा पुरवठादार घ्या, यात मंत्र्यांचीही उत्सुकता असू शकते. मी तत्कालीन मंत्री श्री.सुरेश शेट्टी यांचे अभिनंदन करतो की, त्यांनी चांगला निर्णय घेतला आणि तो आम्ही अवलंबिला. त्यामुळे मंत्र्यांचा याच्याशी कुठेही संबंध येत नाही.

आपण सर्वजण 297 कोटी रुपयांच्या अर्थसंकल्पावर बोललात. 297 कोटी रुपयांचा बजेट आहे, पण काय बजेट आहे. हे बजेट एनयुएचएमचे आहेत. नॅशनल अर्बन हेल्थ मिशन यामध्ये Programme Management, Training Capacity Building, Strengthening of Health, Human Resources, Infrastructure, untied grant, Procurement of Drugs आहे, किती रुपयांचे आहेत तर 43.18 करोड, म्हणजे 297 कोटीतील 43 कोटी रुपयांचे आहेत. हा कागद आहे. पाहिजे असल्यास आपणास देतो. त्यानंतर यामध्ये Community Process, Innovative Action and PIP, Monitoring and Evolution या बाबी आहेत.

........3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.दीपक सावंत......

सर्वांनी 297 कोटी रुपयांचा औषध घोटाळा आहे असे उचलून धरले, टीव्हीने बातम्या चालविल्या. पण 297 कोटी रुपये आले कुठून हे कधी कोणी विचारले नाही. फक्त 43 कोटी रुपयांची औषधे आहेत. त्यानंतर आपण पोव्हीडिन आयोडीनबाबत सांगितले, सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील आपल्याला माहिती असेल कारण आपण मेडीकल कॉलेज चालविता. आपल्या मेडिकल कॉलेजला हॉस्पिटल आहे. हे आयोडीन कशासाठी वापरले जाते. अंगावर लावायला वापरले जाते नाही तर इन्स्ट्रुमेंटस क्लीन करण्यासाठी वापरले जाते, डेस्क क्लीन करण्यासाठी वापरले जाते, ऑपरेशन टेबलवर माणसाला स्वॅब करतात आणि नंतर कट घेतात त्यासाठी पोव्हीडीन आयोडीन वापरले जाते. हे स्क्रब, ट्युबच्या रुपात आणि लिक्वीड स्वरुपात असते.

आपण सांगितले की, 700 ट्रक, 70 ट्रक उभे होते, टँकरमधून आणले जाते. आपल्याकडून असे बोलण्याची अपेक्षा नव्हती. टँकर भरुन आयोडिन, लोकांना पाण्याचे टँकर मिळत नाहीत. तुम्ही आयोडिनचे टँकर लोकांना पुरवायला लागलात. मी असे म्हणत नाही की, अनियमितता झाली नाही. अनियमितता झाली असेल आणि त्यासाठीच चौकशी लावलेली आहे. पण ही चौकशी करताना हा मेल आहे. हा कोणाचा मेल आहे तर मीरा-भाईंदर महापालिकेचा मेल आहे. यामध्ये त्यांच्या डिमांड आहेत, "Povidine Iodine solution topical medicine" किती 50 हजार. मी पुन्हा वाचून दाखवितो. मीरा-भाईंदर महानगरपालिका डिमांड, आम्ही किती दिले तर 10, 100, 40 आम्ही सप्लाय केलेत. त्यानंतर डिफरन्स 7 चा आला. त्यानंतर त्यांनी 5 लाखाची मागणी केली. आम्ही फक्त 70 हजार दिले. त्यानंतर भिवंडी-निजामपूरचा ई-मेल आहे, तो मी आपल्याला वाचून दाखवितो. "Respected Sir, this is to bring to your kind notice that there is a surplus medicine supply to the Bhiwandi Corporation. Sir demand was sent by junior by mistake in Excel Sheet. Sir, my sincere apologies for the inconvenience and assure you from next time, I will be more alert." यावर भिवंडी-निजामपूर महानगरपालिका हॉस्पिटलच्या डॉ.विद्या शेट्टी, एमओएच यांची सही आहे. असे आरोप करण्याच्या आधी थोडे बघितले असते की, खरेच मुळात काय आहे. हा आरोप झालेला होता, याची चौकशीही झालेली होती.

.........4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.दीपक सावंत......

माझ्याकडे एवढी माहिती आहे. आपण सांगितले की, व्हॅन्कोमायसीन, मेरोपेनम इंजेक्शन पण ही सर्व इंजेक्शनस टर्शरी केअरला वापरली जातात. आपणच सांगितले की टर्शरी केअरला ही इंजेक्शनस् वापरली जातात. मग पीपीएचच्या पेशंटला वापरली जात नाहीत काय, आपल्या हॉस्पिटलच्या डॉक्टरांना विचारा, सिव्हील हॉस्पिटलमध्ये सेप्टीसिमिया होऊ शकत नाही काय ? एवढी महागडी इंजेक्शनस् का वापरली असे आपण विचारले. ही सर्व इंजेक्शनस् ईएनटी सर्जन वापरतो, गायनॅकॉलॉजिस्ट वापरतो, फिजीशियन वापरतो, सर्जन वापरतो. आपण सिटाग्लिप्टीन गोळ्यांच्या बाबतीत सांगितले की, 37 रुपयांच्या गोळ्या घेतल्या. मेटॅमॉरफिन इंजेक्शन घेऊन.... सन्माननीय सदस्य डॉ. अनिल बोंडे यांनी वेगळ्या पध्दतीने हा प्रश्न उपस्थित केला होता. जसे आपण सांगितले की एका एक्सपर्ट डॉक्टरचे ओपिनियन घेतले.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

VV-1.........

डॉ.दीपक सावंत ...........
मी देखिल आपल्याला सांगतो की, हिंदुजा हॉस्पिटलच्या ओळखीच्या डॉक्टरचे ओपिनियन घेतले. त्यांचे मी नाव सांगू इच्छित नाही. हे औषध रेअरली वापरले जाते. त्याच्याशी मी ॲग्री आहे. आज महाराष्ट्रामध्ये एन.सी.डी. प्रोग्रॅममध्ये डायबिटीससाठी, ब्लडप्रेशरसाठीची औषधे फ्री देण्यासाठी सांगण्यात आलेले आहे.

**अध्यक्ष :** सभागृहाची वेळ कामकाज संपेपर्यंत वाढविण्यात येत आहे.

डॉ.दीपक सावंत : सन 2011- 2012 पासून आपण तपासणी केली. त्यामध्ये डायबिटीसचे पेशंट किती आढळले ? 2,55,297 पेशंट आढळले. या रुग्णांना एकच गोळी द्यायची का ? यांना एक महिन्याचे, पंधरा दिवसांचे औषध द्यायचे का ? दिवसाला एक गोळी किंवा दोन गोळया द्यायच्या का, दिवसाला एक गोळी द्यायची ? हे मला सांगावे, मग तुम्हीच प्रश्न उपस्थित करणार की, औषध पुरवठा वेळेवर होत नाही ? एवढया लोकांना औषधे देत आहोत. 2,22,297 रुग्ण महाराष्ट्र शासनाच्या डायबिटीसच्या मेटफॉर्मिन आणि सिटाग्लेप्टीनच्या ट्रीटमेंटमध्ये आहेत.

अध्यक्ष महोदय, पॅरॅसिटॅमोल सिरपच्या विषयी सभागृहात सांगण्यात आले. राज्य स्तरावरुन मॅब्रो कंपनीच्या दिनांक 30.10.2013 च्या आदेशान्वये, First line of treatment is Metamorphin, Second line of treatment.. complicated diabetis, when there is an Insulin resistance diabetis... or second line of treament is Sitagliptin. हया दोन लाख रुग्णांमध्ये किती गोळया घेतलेल्या आहेत, त्याची क्वान्टिटी बघा. साधारणपणे 59,67,580 पॅरॅसिटॉमोलच्या बॉटल्स् घेतल्या. त्याचा कलर बदली झाला. हे बरोबर आहे. ही सिव्हील सर्जनची चूक आहे. त्याने एफ.डी.ए. ला कळवायला पाहिजे होते. त्यांची चूक मान्य करतो. त्यानी डायरेक्ट गुडफेथमध्ये कॉन्ट्रॅक्ट केले. त्यांनी सांगितले की, चला माझ्या लेव्हलवर होते आहे, साठा बदलून मिळतो आहे, त्यामध्ये राज्य शासनाचे नुकसान होत नाही.

....2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.दीपक सावंत ...........

अध्यक्ष महोदय, दुसरी महत्वाची गोष्ट कॅल्शियम फॉस्फेट सिरप, हे आपल्या काळात झालेले आहे. ज्यावेळेला टेंडर काढले जाते त्यामध्ये प्रोव्हीजो टाकला आहे. टेंडरची मुदत सहा महिने असते, त्यानंतर त्या टेंडरच्या 200 टक्के वस्तु विकत घेता येतात. हे सर्व आपल्याच काळातले आहे. आमचे काही नाही. त्याच्या चान्स घेतात. म्हणून हे सर्व बदली करणे आवश्यक आहे. हे असे कसे केले सांगावे ? आमच्यावर बिले फाडता आहात. कॅल्शियम फॉस्फेट सिरप 200 टक्क्यांनी जास्त खरेदी केले आहे, ते मी मान्य केले आहे. त्याची किंमत जी आपण सांगता ती किंमत मार्केटमध्ये त्याच्यापेक्षा जास्त आहे ती प्रुव्ह करुन द्यावी. त्यानंतर सिटाग्लेप्टीनची 34/- रुपये किंमत सांगितली, ती बरोबर आहे. त्यानंतर ॲमॉक्सिसिलनच्या 6 व 4 गोळ्यांची स्ट्रिप बद्दल सांगितले. ॲमॉक्सिसिलनबाबत आपल्याला कदाचित माहिती नसेल, 6,25 मिलि ग्रॅम व्हिथ डिप्लोव्हेनिक ॲसिड ज्याला आपण ट्रेडनेममध्ये ऑगमॅन्टीन असे म्हणतो ते वापरतो. त्याची 12 ची स्ट्रीप येते. पूर्वी 6 ची स्ट्रीप यायची. आता 12 ची स्ट्रीप येते. त्याच्यापेक्षा कमी ॲन्टी बायोटीकची, जी स्ट्रीप आहे ती 325 मिली ग्रॅमची आहे, ती 10 ची स्ट्रीप येते. त्यामुळे काही 6 ची व 10 ची स्ट्रीप मागविली गेली. हे सर्व करीत असताना ॲमॉक्सिसेसिलन 500 मिली ग्रॅम आणि क्लोव्होनिक ॲसिड 125 मिली ग्रॅम हे सन्माननीय सदस्य श्री.पाटील साहेब यांनी आपल्या भाषणातून सांगितले आहे. कालचे आपले भाषण आणि वरच्या हाऊसचे माननीय विरोधी पक्ष नेते श्री.धनंजय मुंडे साहेबांचे भाषण पाहिले तर ते वर्ड टू वर्ड सेम होते. तुम्ही जेथे पॉज घेत होता तेथे ते सुध्दा पॉज घेत होते. एवढे टिपीटेशन कसे, एवढे इमिटेशन कसे.

अध्यक्ष महोदय, आम्ही आमची जबाबदारी झटकत नाही. तुम्ही विचारले की, दोन लोकांना ताबडतोब का सस्पेंड केले ? आम्ही नेहमी मागणी करायचो, चौकशी करा, सस्पेंड करुन चौकशी करा, तुम्ही कधी सस्पेंड करुन चौकशी केली नाही. तुम्ही त्यांना पदावर ठेवून चौकशी केली. म्हणून तुम्हाला रिझर्ल्ट मिळाले नाहीत. आम्ही तुमच्यापेक्षा वेगळे केले. तो माणूस तेथे पदावर जॉईंट डायरेक्टर लेव्हलचा असेल पदावर असेल, त्याची चूक असो वा नसो पण त्या चौकशीमध्ये

...3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.दीपक सावंत ...........

कुठल्याही दुसऱ्या प्रकारचा घोळ होऊ नये, कागदपत्रे नष्ट होऊ नयेत, कागदपत्रांचे टॅम्परींग होऊ नये, म्हणून त्यांना आम्ही सस्पेंड केले. खरी माहिती समोर आली पाहिजे. हा जनतेचा पैसा आहे. एनआरएचएमचा पैसा असेल, केंद्र शासनाचा पैसा असेल तरी तो जनतेचाच पैसा आहे. आमचे एकच ध्येय आहे की, सर्वदूर औषध जावे. ते लोकांना प्रॉपर डोसमध्ये मिळावे. प्रॉपर कंपन्यांचे मिळावे, याच्यामध्ये कुठल्याही प्रकारचा भ्रष्टाचार होऊ नये, यामध्ये माननीय मुख्यमंत्र्यांच्या आदेशावरुन डायरेक्टर महोदयांना सस्पेंड करुन टाकले. आम्हाला कोणाचेही टॅम्परींग नको आहे. आम्हाला ही निष्कलंक चौकशी पाहिजे आहे. ही चौकशी श्री.भगवान सहाय साहेब, सचिव यांच्या अध्यक्षतेखाली होईल. एवढे सभागृहाला सांगतो.

अध्यक्ष महोदय, आपण जे प्रश्न उपस्थित केले. त्याबाबत मला असे वाटत होते की, माननीय श्री.राधाकृष्ण विखे पाटील कदाचित आम्हाला किडनी ट्रान्सप्लान्ट विषयी विचाराल. कालचे जे किडनी ट्रान्सप्लान्टेशन झाले त्यामध्ये सार्वजनिक आरोग्य खात्याचा मोठा रोल आहे. लातूरमधल्या शेतकऱ्याच्या मुलाचे काल हार्ट ट्रान्सप्लॉट झाले, ती मोठी गोष्ट आहे. माननीय श्री.राधाकृष्ण विखे पाटील व सन्माननीय श्री.जयंत पाटील यांच्या मनातील सर्व किलमिशे आमच्या बद्दल, आमच्या खात्याबद्दल दूर झाली असतील असे मी मानतो कारण आपल्याला दोघांना मिळून चांगले काम करावयाचे आहे. पुन्हा एकदा आपण जे काही प्रश्न उपस्थित केले, व अगाध मार्गदर्शन जुन्या अनुभवावरुन केले. त्याबद्दल ध्यन्यवाद. हा सर्व सन 2014-15 पासून सुरु झालेला उपद्व्याप आहे. अशा तऱ्हेच्या ऑर्डस काही आमच्या काळात गेल्या आहेत काही त्या काळात गेल्या आहेत. माननीय अध्यक्ष महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिली, स्पष्टीकरणाची संधी दिली. व्हॅन्कोमायसीन आणि मेनोपेरम विषयी मी आपल्याला सांगितलेले आहे. कारण हे ड्रग्स जरी फोर्थ जनरेशनचे असले तरी देखील ते सिव्हील हॉस्पिटलला, आरएचला ठेवणे गरजेचे असते. कारण सेफ्टीसिमीयामध्ये कोणी पेशंट जाऊ शकतो. धन्यवाद.

........

WW-1.........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**अध्यक्ष** : जरी या प्रस्तावामध्ये 4-5 मंत्री महोदयांचा संबंध असला तरी आपण म्हटले होते की, 2 मंत्रीच उत्तर देतील.

श्रीमती पंकजा मुंडे : अध्यक्ष महोदय, माझा पॉईंट ऑफ इन्फर्मेशन आहे की, मंत्री महोदयांनी सांगितले की, यांचे भाषण व वरच्या विरोधी पक्ष नेत्यांचे भाषण एकसारखे असते. हा अनुभव मला का येत नाही. कारण सकाळी 9 वाजलेपासून मी तलवार घेऊन चारही बाजूने लढत आहे. मी विनंती करते की, तुम्ही त्यांना नोटस देत असाल तर माझ्या बाबतीत अशाच नोटस द्याव्यात, जशा यांच्या बाबतीत दिलेल्या आहेत.

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, माननीय मंत्री श्रीमती पंकजा मुंडे यांच्या प्रश्नाचे उत्तर त्यांनी दिलेले आहे. मला मदत केल्याबाबत मी माननीय मंत्री श्रीमती पंकजा मुंडे यांचे आभार मानतो. त्यांचा गैरसमज या निमित्ताने दूर झाला असेल असे मला वाटते.

अध्यक्ष महोदय, मी फार मोठे भाषण करणार नाही पण काही मुद्दे अनुत्तरीत आहेत तेवढेच मी सांगणार आहे. मला आपल्या क्षेत्रातील ज्ञान नाही, माझे अज्ञान असेल. पण मेटाफॉरमीन औषध आपण 70-80 टक्के वापरतो. मी माझ्या भाषणात असे म्हटले होते की, टर्शरी लाईन ऑफ ट्रीटमेंट, काही विशिष्ट ठिकाणी सिटाग्लेप्टीनसारखी औषधे आपण वापरतो. आपणही ही बाबत भाषणात मान्य केलेली आहे. पण आपण हेच औषध खरेदी केलेले आहे. सिटाग्लेप्टीनची खरेदी करताना मी ज्याचा उल्लेख केलेला आहे. हे औषध महाग आहे हा एक भाग आहे. पण त्याच बरोबर एमएसडी नावाची कंपनी म्हणजेच या एकाच उत्पादकाला टेंडर काढताना डोळयासमोर ठेवले गेले हा माझा मुद्दा होता. याबाबत आपल्या भाषणात स्पष्टीकरण आलेले नाही. दुसरा मुद्दा डिसप्रर्पोशनेट अलोकेशनचा आहे. ठाणे, मुंबई अशा ठिकाणी जेथे जास्त लोकसंख्या आहे तेथे 1000-2000 पुरवठयाचे आकडे दिले आहे व अकोल्यासारख्या ठिकाणी 10000-20000 असे पुरवठयाचे आकडे दिसत आहेत. हे औषध कशासाठी वापरतात याची आपण माहिती दिली आहे. पण ही क्वांटीटी डिसप्रर्पोशनेट आहे. ज्या भागात लोकसंख्या जास्त आहे तेथे औषधाची जास्त गरज असण्याची आवश्यकता आहे. पण आकडेवारी फारच विरोधी दिसत आहे. मिरा भाईंदर हे शहर यामध्ये जास्त ॲक्टीव आहे. अशी आकडेवारी जास्त असलेली शहरे आहेत. याचे क्वॉंटींटी डिस्ट्रीब्युशनचे स्पष्टीकरण मंत्री महोदयांनी द्यावे असे मला वाटते.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील .....

अध्यक्ष महोदय, काही कंपन्यांना आपण उलाढालीची म्हणजे टर्नओव्हरची अट घालतो. परंतु या निविदेमध्ये टर्न ओव्हर ऐवजी आपण सिटाग्लेप्टीन या औषधाच्या बाबतीत स्पर्धा मर्यादीत करण्यासाठी या औषधाच्या निर्मितीची अट घातली. (अडथळा)

अध्यक्ष महोदय, मैं सन्माननीय सदस्य श्री.राज पुरोहित जी को बताना चाहता हूं कि मैं भाषण नहीं कर रहा हूं. मैं टू दि पॉईंट पूछ रहा हूं. मुझे मालूम है कि आप सभी को जाने की जल्दी है और हमें भी जाना है.

अध्यक्ष महोदय, माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्री डॉ.दीपक सावंत यांच्यावर काही किल्मीश राहू नये म्हणून हा आमचा प्रयत्न आहे. सिटाग्लेप्टीनच्या बाबतीत त्या औषधाचा अनुभव असला पाहिजे अशी अट घातल्यामुळे बाकीचे सर्व त्यातून बाहेर गेले.

अध्यक्ष महोदय, मी काल 6 गोळयांच्या पाकीटाचे उदाहरण दिले आहे. टेंडर काढताना आपण उल्लेख केला आहे की, सहा गोळयांचे पाकीट असले पाहिजे. टेंडरमध्ये सहा गोळयांच्या पाकीटाचा उल्लेख असताना तुम्ही ऑर्डर दिल्यानंतर डिलीव्हरी घेताना, पुरवठयाचा आदेश देताना ही अट सोयीस्कररित्या का वगळली ? याचे स्पष्टीकरण आम्हाला मिळाले नाही. तसेच कॅल्शीयम फॉस्फेट सिरपचाही विषय आहे. आपण भाषण करीत असताना मी माझ्याकडील मुद्दयांना मार्क करीत होतो. राहिलेले मुद्दे मी विचारत आहे हे लक्षात घेऊन आपण उत्तर द्यावे. कॅल्शीयम फॉस्फेट सीरप या औषधाच्या बाबतीत दोन कंपन्या निविदा प्रक्रियेमध्ये तांत्रिकदृष्टया पात्र ठरल्या. या निविदा पात्र ठरल्यावर हिंदुस्थान लॅबोरेटरीज व गल्फा लॅबोरेटरीज या दोन्ही कंपन्यांचे फायनान्शियल बिड उघडले पाहिजे होते. तुम्ही फक्त गल्फा लॅबोरेटरीज या एकाच कंपनीचे फायनान्शियल बिड का ओपन केले ? याचे उत्तर आपल्या भाषणात आलेले नाही.

अध्यक्ष महोदय, आमच्या काही प्रश्नांची उत्तरे मिळालेली नाहीत. काही नगरपालिकांनी आपल्या औषधांचा साठा रिफयुज का केला याचा उल्लेख आपण केला नाही. आपल्या ई-मेलचा मी उल्लेख केला आहे. दारामध्ये औषधाचे ट्रक उभे आहेत त्याबाबत आपण सायलेंट राहिलेले आहात.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

आपण जेथे सप्लाय केलेला आहे तेथे त्या औषधांच्या स्टोअरेजची अपूर्ण व्यवस्था असताना, 20-25 डिग्री खालच्या तापमानात स्टोअर करण्याबाबत त्यावर इस्ट्रक्शन असताना तेथे औषधांची ठेवण्याची

......3



श्री.जयंत पाटील .....

व्यवस्था नसताना अशा प्रकारची औषधे पाठवून तेथे साठा करण्याचा प्रयत्न आपल्या विभागाने का केला ? याचे स्पष्टीकरण आपल्या भाषणातून झालेले नाही. मंत्री महोदयांनी क्वाँटीटीबाबत सांगितले आहे. यामधील सिटाग्लीप्टीन गोळीबाबतही सांगितले आहे. पुण्याला 2093 गोळया गेल्या. नागपूर, मुंबई व भिवंडीला शुन्य गोळया गेल्या आहेत. अकोला येथे मात्र 10670 गोळया गेल्या. खरेदी करण्याचा छंद असलेल्या मिरा भाईंदरमध्ये या केसमध्ये शुन्य गोळया गेल्या.

अध्यक्ष महोदय, व्यंकोमायसीन इंजेक्शन हे पुण्याला शुन्य, नागपूर 50, मुंबई 300, भिवंडी शुन्य, मिरा भाईंदरला शुन्य, अकोल्याला मात्र 1590 दिले आहे.

डॉ.दीपक सावंत : सन्माननीय सदस्यांनी राईट ऑफ रिप्लायमध्ये प्रश्न विचारल्याऐवजी पुन्हा भाषण सुरु केलेले आहे.

**अध्यक्ष** : त्यांच्या काही प्रश्नांची उत्तरे राहिली आहेत असे त्यांचे मत आहे.

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, आपली इच्छा असेल तर मी लगेच बसतो. मी तुम्हाला त्रास देण्याच्या उद्देशाने उभा राहिलेलो नाही. आपणास मुख्यमंत्री महोदय क्लिन देणार नाहीत. त्यामुळे ती त्यांच्याकडून क्लिन चीट जनरेट करण्याचा प्रयत्न करतो आहे. मंत्री महोदयांच्या लक्षात आले की नाही हे माहिती नाही कारण ते अजून फार भोळे आहेत. मुख्यमंत्री महोदय म्हणाले की, यांच्याकडे फाईल आलेलीच नाही.

**अध्यक्ष** : तुमच्या राहिलेल्या प्रश्नांचे उत्तर लवकर घ्या.

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, मी क्लिनचीटबाबत आता काही बोलत नाही. माझा क्वाँटीटी डिस्ट्रीब्युशनचा मुद्दा आहे. प्रश्नांची उत्तरे तर आली पाहिजेत. त्यांना मी टू द पॉईंट प्रश्न विचारीत आहे. आम्हाला अपेक्षीत असलेल्या प्रश्नांची उत्तरे मंत्री महोदयांनी द्यावीत. मी फार लांब भाषण करीत नाही. आम्हाला या क्वाँटीटीचे डिस्ट्रीब्युशन ॲबनॉर्मल वाटत आहे याचे स्पष्टीकरण द्यावे. माननीय अन्न व नागरी पुरवठा मंत्री श्री.गिरीष बापट यांनींही सन्माननीय सदस्य श्री.पृथ्वीराज चव्हाण यांनी विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर दिलेले नाही असे माझे मत आहे. जोरात व

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

रेटून भाषण केले त्यामुळे मुद्दयांचे उत्तर आले नाही, पण जाऊ द्या. मी त्या प्रश्नाला स्पर्श करीत नाही कारण मी त्याचा फार अभ्यास केलेला नाही. पण माझ्या प्रश्नांची आपण उत्तरे द्यावीत.

.....4



श्री.राधाकृष्ण विखे पाटील : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी होमवर्क केलेले आहे तरी मला विचारले तर तुम्ही नापास झाले आहात असे मी सांगेल. औषधांचा आपण तांत्रिक भाषेत उल्लेख केलेला आहे. पण या औषधांची मात्रा लागू पडली नाही.

यानंतर X X-1

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील....

माननीय मंत्रीमहोदयांनी याबाबतचा त्यांच्या विभागाने केलेला पत्रव्यवहार तपासून पाहावा,एवढीच आमची या निमित्ताने अपेक्षा आहे. यावर मंत्री महोदयांनी केलेला खुलासा कुठेतरी सुसंगत आहे, असे दिसत नाही. उप संचालक व आयुक्त यांनी वेळोवेळी केलला पत्रव्यवहार तपासणे गरजेचे आहे. त्यातूनही आपले समाधान झाले नाही तर इतर अधिकारी यांच्या स्तरावर याबाबतचा पत्रव्यवहार तपासणे गरजेचे आहे. आरोग्य विभागाचे आपण मंत्री महोदय म्हणून प्रमुख आहात. जे सन 2012-2013 मध्ये आदेश निघाले, ती बाब वेगळी आहे. याबाबत विभाग प्रमुख म्हणून सभागृहात उत्तर द्यावयचे आहे. आपली या संदर्भातील जबाबदारी प्रत्यक्षपणे महत्त्वाची आहे. भविष्यकाळात आपण याबाबत "माझा संबंध नाही." असे म्हणू नका. आपण जो खुलासा केलेला आहे, तो विसंगत आहे. ज्या पत्रव्यवहाराचा मी उल्लेख केला होता की, मिरा-भाईंदर महानगरपालिकेतील परिमंडळाच्या उप संचालकांनी औषधांचा ट्रक उभा आहे, असा पत्रव्यवहारात प्रत्यक्ष उल्लेख केलेला आहे. पत्रव्यवहार आणि आपल्या स्पष्टीकरणामध्ये तफावत आहे. पारदर्शीपणे चौकशी करण्याकरिता माननीय मंत्री महोदयांनी अधिका-यांना निलंबित केलेले आहे. गैरव्यवहार झाला नाही, असे जर आपले म्हणणे आहे तर मग संचालक व उप संचालक यांना निलंबित का केले गेले ? यामध्ये कुठेतरी विसंगती असल्याचे वाटत आहे. याबाबत आपण जे स्पष्टीकरण केलेले आहे, त्यामध्ये विसंगती आहे. विभागाचा कारभार सुधारण्याकरिता माननीय मंत्रीमहोदय प्रयत्न करीत आहेत. वेगवेगळया स्तरावर आरोग्य सेवा सुधारण्याकरिता शासन प्रयत्न करीत आहे. परंतु येथे विभागाचे अंतर्गत आरोग्य बिघडलेले आहे,त्याकडे विशेष लक्ष देण्याची आवश्यकता आहे. पुन्हा पुन्हा असे आरोप होणे योग्य नाही. अधिक पारदर्शकता आणण्यकरिता माननीय मुख्यमंत्री यांनी क्लिन चीट दिलेली आहे. माननीय मुख्यमंत्री स्तरावर क्लिन चीट देण्याची एक खिडकी योजना तयार झालेली आहे. शासनाने केलेल्या कारभारावर लोकांनी क्लिन चीट दिली पाहिजे, ही अपेक्षा आहे.

डॉ.दिपक सावंत : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी याबाबत काही प्रश्न उपस्थित केलेले आहेत. त्याबाबत माझ्याकडे ऑर्डरची कॉपी आहे. ती मी आपल्याकडे अवलोकनार्थ देतो. ॲमॉक्सिसिलिनची खरेदी दोन प्रकारे केली गेलेली आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.दिपक सावंत....

250एमजी पॉवर असलेली स्ट्रीप ही दहा गोळयांची असते. 500 एमजी पॉवर असलेली स्ट्रीप ही सहा गोळयांची असते. असे दोन प्रकार यामध्ये आहेत. या दोन वेगवेगळया गोष्टी आहेत. तसा हा प्रकार झालेला आहे. सिताग्लिप्टीन 100 एमजी, मेटामफिर्मिन, ग्निनरीफ्राईड, ग्लेबेन्झामाईड या गोळया राज्य शासन स्तरावर खरेदी केली जातात. मुंबई महानगरपालिकेने तशी मागणी केली होती. इतर महानगरपालिकांनीही तशी मागणी केली होती. आमच्याकडे रेझिस्टन्स डायबिटीसचे पेशंट जास्त आहेत. ज्यांच्यावर पेडामार्फिन काम करीत नाही, त्याकरिता ही औषधे पहिल्यांदा घेतलेली आहेत. टर्नओव्हर ॲण्ड प्रॉडक्शन कॅपॅसिटीबाबत सन्माननीय सदस्य बोलले होते. टर्नओव्हर हा एक मुद्दा योग्य आहे. परंतु त्याची प्रॉडक्शन कॅपॅसिटी नसेल किंवा तयार करण्याची यंत्रणा सक्षम नसेल तर ते सप्लाय करु शकत नाहीत. हे सर्व जेनरिक मेडिसिन्स आहेत. सिप्लासारख्या कंपन्या जेनरिक औषध निर्मिती करतात तरीही त्या या शासन औषध खरेदीच्या निविदा प्रक्रियेमध्ये सहभागी होत नाहीत, हे दुर्दैव आहे. त्यांनी " They dont want to come in government services" असे स्पष्टपणे लिहून पाठविलेले आहे. कॅल्शियम फॉस्फेट विषयीच्या वितरणामध्ये अनियमितता आहे, पूर्वी सांगितले की, याबाबत चौकशी समिती नेमलेली आहे. ही अनियमितता का झाली ? 10 ची गरज असताना 100 का पाठविण्यात आले ? मिरा-भाईंदर व भिवंडी नगरपालिकेसंबंधीचा ई-मेल मी वाचून दाखविलेला आहे. यावरुन स्पष्ट होत आहे की, महानगरपालिकेच्या लोकांनी कॅल्क्यूलेशन्स करताना त्यामध्ये चूक झालेली आहे. त्याबाबत त्यांनी रिग्रेट जाहीर केलेले आहे. अकोला परिमंडळ विषयासंदर्भात बोलायचे झाले तर यामध्ये वाशिम व बुलढाणा पर्यंतचे जिल्हेही येतात. या परिमंडळामध्येही शासनाला मेडिसिन्स द्यावे लागतात. तरीही त्याची वेगळी चौकशी प्रस्तावित केली गेलेली आहे. कुठेही अनियमितता असू नये ज्याला जे औषध पाहिजे जितक्या प्रमाणात पुरविले गेले पाहिजे. याची चौकशी लावली ? असाही प्रश्न विचारला गेला. चौकशीचे कारण सांगितले की, अशा प्रकारे कोणताही अनियमितता शासन चालू देणार नाही. आपल्या प्रश्नाला उत्तर देण्यासाठी माननीय मुख्यमंत्री महोदंयाबरोबर यासंदर्भात चर्चा झाली की, औषधे खरेदी महामंडळ तयार करण्यात येणार आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.दिपक सावंत.....

आपल्या काळात हा औषधखरेदी महामंडळ स्थापन करण्यासंदर्भातल प्रस्ताव होता. सन्माननीय सदस्य श्री.पृथ्वीराज चव्हाण यांना हे माहिती असेल. परंतु आपल्या शासनाच्या काळात हा प्रस्ताव मटेरियलाईज झाला नाही. तुमच्यामध्ये त्यावेळी कोणी औषधी खरेदी करावी, याबाबत समन्वय नव्हता. निश्चितपणे आमच्यामध्ये तसा समन्वय आहे. निश्चितपणे हे औषध खरेदी महामंडळ लवकरच अस्तित्त्वात येईल.

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, माननीय मंत्री महोदयांनी उत्तराच्या भाषणात सस्पेंड केलेल्या अधिका-यांचा उल्लेख केलेला आहे. जर कोणा अधिका-याला सस्पेंड करावयाचे असेल तर त्याची चौकशी व्यवस्थित करणे आवश्यक आहे. सस्पेंड करण्यापूर्वी चौकशीच्या अंतिम निष्कर्षाप्रत येणे आवश्यक आहे. कर्मचारी-अधिकारी यांना सस्पेंड करुन माननीय मंत्री महोदय हे या प्रकरणापासून लांब जात आहेत, असा गैरसमज होऊ नये म्हणून मी हे सांगत आहे.

-------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या मिळकतींच्या अधिकार अभिलेखात वक्फ संस्थेच्या नावाची नोंद घेणे व इतर हक्क सदरी वक्फ प्रतिबंधित सत्ता प्रकार अशी नोंद घेणे.

**मु.शी.:** महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या मिळकतींच्या अधिकार अभिलेखात वक्फ संस्थेच्या नावाची नोंद घेणे व इतर हक्क सदरी वक्फ प्रतिबंधित सत्ता प्रकार अशी नोंद घेणे यासंबंधी माननीय महसूल मंत्र्यांचे निवेदन

श्री.एकनाथराव खडसे ( महसूल मंत्री ) : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने नियम 47 अन्वये पुढील निवेदन करतो :-

निवेदन

( प्रेस: येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

----

YY-1........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. एकनाथराव खडसे.........

अध्यक्ष महोदय, राज्यातील वक्फची मालमत्ता इतरांकडे हस्तांतरित झाल्याचे लक्षात आलेले आहे. काही शैक्षणिक व खाजगी लोकांनी या जमिनी विकत घेतल्याचे दाखविले आहे. त्या ठिकाणी शाळा, इंजिनिअरींग महाविद्यालये आणि शैक्षणिक संस्था उभारण्यात आलेल्या आहेत. वक्फच्या मालकी हक्काच्या जमिनी किंवा भाडेकराराने किंवा अन्य प्रकारे देण्यात आलेल्या आहेत, अशा सर्व वक्फच्या मालमत्तेवर कायद्यानुसार "वक्फ" असे नाव घालण्यात येईल आणि ज्या ठिकाणी उत्तलिकच्या नावे प्रॉपर्टी करण्यात आलेली आहे, त्या नावाऐवजी वक्फ प्रॉपर्टी करण्यात यावी. या पुढे वक्फची प्रॉपर्टी कोणालाही हस्तांतरित करता येणार नाही. याबाबत वक्फच्या जमिनीवर वक्फ प्रतिबंधित सत्ताप्रकार अशी नोंद करण्याच्या सूचना सर्व जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आलेल्या आहेत.

अध्यक्ष महोदय, मी दुसरे निवेदन करणार आहे. सर्व जमिनी नियमबाह्या पध्दतीने हस्तांतरित झालेल्या आहेत. त्या वक्फ कायद्याच्या अनुसार हस्तांतरित झालेल्या आहेत. हे सर्व तपासून या कायद्याच्या चौकटीत बसविण्यात येतील. यापुढे जेवढ्या जमिनी आहेत, त्या विकता येणार नाही, भाडेतत्वावर घेता येणार नाही, वक्फ बोर्डाच्या संमतीशिवाय विकता येणार नाहीत. तसेच यामध्ये कोणताही फेरफार करता येणार नाही. या पुढे वक्फ सत्ता प्रतिबंधक प्रकार..(अडथळा)...आज शिक्काच लाऊन टाकणार आहे.

अध्यक्ष महोदय, मी दुसरे निवेदन करणार आहे.

**अध्यक्ष** : निवेदनावर प्रश्नोत्तरे होत नाहीत.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, माननीय महसूल मंत्र्यांनी निर्णय घेतलेला असून, ती चांगली गोष्ट आहे. माझ्या मतदारसंघात एक टिपिकल केस घडलेली असून, त्याबाबतची माहिती मी माननीय महसूल मंत्र्यांना देणार आहे. माझ्या मतदारसंघात झाडब्रद्रुक नावाचे एक गाव आहे. त्या ठिकाणी अदनमदन बाबाचे एक मंदीर आहे. गावातील लोक त्या ठिकाणी जाऊन पुजा करीत असतात. गावातील स्थानिक मुस्लिम समाजातील मुलांनी जमिनीबाबत वक्फ बोर्ड ट्रस्टकडे मागणी केलेली आहे. अशा प्रकारे जतन केलेल्या दर्ग्याच्या जमिनीबाबत त्या ठिकाणी विनाकारण तणाव निर्माण झालेला आहे. अशा प्रकारच्या केसमध्ये माननीय महसूल मंत्र्यांनी निर्णय घेण्याची आवश्यकता आहे.

.......2.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. एकनाथराव खडसे : अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी जो विषय उपस्थित केलेला आहे, त्यासंदर्भात मी क्लेरिफिकेशन देणार आहे. सर्व जिल्हाधिकारी, क्षेत्रीय महसूल प्रातअधिकारी तसेच जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेखामधील अधिकारी सदर निर्देशाची अंमलबजावणी करीत असताना भोगवटादार वर्ग-2 या धारणाधिकारासह किंवा भाडेपट्टयावर शासनाकडून देण्यात आलेल्या मूळ शासकीय जमिनी वक्फ करण्याचे आढळून आल्यास अशा प्रकरणी शासनाचे मार्गदर्शन घेण्यात यावे, असे म्हटलेले आहे. यापुढे या प्रॉपर्टी ट्रान्सफर करता येणार नाही, विकता येणार नाही किंवा देता येणार नाही. त्यामध्ये बेकायदेशीर नावे असतील तर ती तत्काळ कमी करण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांना विषय काय आहे, तो समजलेला आहे. त्यामुळे त्यामध्ये काय आहे ते सर्व लक्षात येण्यास मदत होणार आहे.

-------------

.....3....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**शेतकरी चेतना अभियानाबाबत**

श्री. एकनाथराव खडसे ( महसूल मंत्री ) : अध्यक्ष महोदय, शेतकरी आत्महत्येच्या संदर्भात यवतमाळ जिल्ह्यात "शेतकरी चेतना अभियान" लागू झाल्यापासून शासनाने आतापर्यंत त्या ठिकाणी 32 कोटी रुपये खर्च केले आहेत. राज्यातील शेतकऱ्यांनी आत्महत्या करु नयेत यासाठी वेगवेगळ्या योजना राबविल्या जात आहेत. यवतमाळ जिल्ह्यात आत्महत्या होऊ नये याकरिता त्या ठिकाणी वेगवेगळ्या योजना राबविण्यात आलेल्या आहेत. शासनाने विशेषकरुन यवतमाळ जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या कमी व्हाव्यात म्हणून प्रत्येक शेतकरी कुटुंबाकडे लक्ष देण्यासाठी "शेतकरी चेतना अभियान" 3 महिन्यापूर्वी प्रायोगिक तत्वावर घेण्यात आले होते. त्यानंतर असे लक्षात आले. टाईम्स ऑफ इंडियाने देखील सर्व्हे केलेला होता. त्यांची देखील बातमी आहे.

अध्यक्ष महोदय, नागपूर येथून प्रकाशित होत असलेल्या दिनांक 13 एप्रिल, 2016 रोजी टाईम्स ऑफ इंडियाच्या आवृत्तीमध्ये आणि आम्ही स्वत: जिल्हाधिकारी यांच्याकडून माहिती घेतल्यानुसार यवतमाळ जिल्ह्यामध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण गतवर्षीच्या तुलनेत यावर्षीच्या पहिल्या तीन महिन्यात निम्म्याने कमी झालेले आहे. अशा शीर्षकाखाली बातमी प्रसिध्द झाली होती. जिल्हाधिकारी नागपूर यांनी त्यासंदर्भातील हवाला देऊन पुढे असे म्हटले आहे की, आत्महत्या कमी होण्याचे प्रमाण यापुढेही अर्थात आगामी 9 महिन्यात असे सुरु राहिले तर यवतमाळ आणि उस्मानाबाद जिल्हा शेतकरी आत्महत्या मुक्त करू असे माननीय मुख्यमंत्र्यांचे आश्वासन निश्चितच फलद्रुप होईल, असा विश्वास आहे. अशा प्रकारे उपलब्ध असलेल्या आकडेवारीनुसार गतवर्षी पहिल्या तीन महिन्याच्या काळात या जिल्ह्यातील 96 शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. या वर्षीच्या पहिल्या तीन महिन्यात 48 इतका खाली आलेला आहे. म्हणजे या तीन महिन्यात शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण 50 टक्के कमी झालेले आहे. गेल्या वर्षी जानेवारी महिन्यात यवतमाळ जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. यावर्षी जानेवारी महिन्यात हा आकडा फक्त 20 एवढा झालेला आहे. गतवर्षी फेब्रुवारी महिन्यात 38 शेतकऱ्यांनी आपले जीवन संपविले आहे. यावर्षी फेब्रुवारी महिन्यात हा आकडा 14 इतका खाली आलेला आहे. गतवर्षी मार्च महिन्यात 28 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या होत्या. यावर्षी मार्च महिन्यात हा आकडा 14 इतका खाली आलेला

.......4.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. एकनाथराव खडसे........

आहे. राज्य शासनाने गतवर्षी 24 जुलै, 2015 रोजी यवतमाळ जिल्ह्यात शेतकऱ्यांनी आत्महत्या करु नयेत यासाठी बळीराजा चेतना अभियान सुरु केले. माननीय मुख्यमंत्र्यांनी यासंदर्भात स्वत:हून आवश्यक निर्णय घेण्यासाठी...(अडथळा)........

श्री. जयंत पाटील ( बसून ) : अध्यक्ष महोदय, आम्हाला निवेदनाच्या प्रती मिळालेल्या नाहीत.

श्री. एकनाथराव खडसे : अध्यक्ष महोदय, निवेदनाच्या प्रती वितरित केलेल्या आहेत. माननीय मुख्यमंत्र्यांनी सदर अभियानासाठी 32 कोटी रूपयांचे विशेष अनुदान मंजूर केलेले आहे. निवेदनाच्या प्रती पिजन होलमध्ये टाकलेल्या आहेत.

**अध्यक्ष** : मी माननीय महसूल मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, सदर निवेदनातील फक्त 20 हा जो शब्दप्रयोग केलेला असून, "फक्त" हा शब्द काढून टाकण्यात यावा, अशी माझी विनंती आहे. माननीय महसूल मंत्र्यांनी सदरहू निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवावे, अशी माझी त्यांना विनंती आहे.

श्री. एकनाथराव खडसे : अध्यक्ष महोदय, ठीक आहे. सदर निवेदन मी सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

----

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

.......5....

**पृ. शी.** : मुंबई, पवई तुंगा गावातील दिनांक 6 मार्च, 2006 पासून बेपत्ता असलेल्या तीन वर्षीय बालिकेवर बलात्कार करुन तिची हत्या करणे

**मु. शी.** : मुंबई, पवई तुंगा गावातील दिनांक 6 मार्च, 2006 पासून बेपत्ता असलेल्या तीन वर्षीय बालिकेवर बलात्कार करुन तिची हत्या करणे या विषयावर श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांनी दिलेली स्थगन प्रस्तावाची सूचना.

डॉ. रणजित पाटील ( गृह राज्यमंत्री ) : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांनी मुंबई पवई तुंगा गावातील दिनांक 6 मार्च, 2006 पासून बेपत्ता असलेल्या तीन वर्षीय बालिकेवर बलात्कार करुन तिची हत्या करणे या विषयावर जी स्थगन प्रस्तावाची सूचना दिली होती, त्या सूचनेला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे, मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या आहेत. म्हणून मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**अध्यक्ष** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे )

-------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ. शी.** : मानखुर्द (मुंबई) येथील रेल्वे स्थानक परिसरात एका चार वर्षाच्या मुलीचे अपहरण करुन तिच्यावर केलेला बलात्कार

**मु. शी.** : मानखुर्द (मुंबई) येथील रेल्वे स्थानक परिसरात एका चार वर्षाच्या मुलीचे अपहरण करुन तिच्यावर केलेला बलात्कार या विषयावर श्री. अमीन पटेल, वि.स.स. यांनी दिलेली स्थगन प्रस्तावाची सूचना.

डॉ. रणजित पाटील ( गृह राज्यमंत्री ) : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अमीन पटेल यांनी मानखुर्द (मुंबई) येथील रेल्वे स्थानक परिसरात एका चार वर्षाच्या मुलीचे अपहरण करुन तिच्यावर केलेला बलात्कार या विषयावर जी स्थगन प्रस्तावाची सूचना दिली होती, त्या सूचनेला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे, मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या आहेत. म्हणून मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**अध्यक्ष** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे )

-------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ. शी.** : नागपूर जिल्ह्यातील जलालखेडा परिसरातील थुगावदेव येथील सुरेश पांडव या तरुण शेतकऱ्याने नापिकी आणि कर्जबाराजीपणामुळे केलेली आत्महत्या

**मु. शी.** : नागपूर जिल्ह्यातील जलालखेडा परिसरातील थुगावदेव येथील सुरेश पांडव या तरुण शेतकऱ्याने नापिकी आणि कर्जबाराजीपणामुळे केलेली आत्महत्या या विषयावर श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांनी दिलेली स्थगन प्रस्तावाची सूचना.

श्री. दिलीप कांबळे ( मदत व पुनर्वसन राज्यमंत्री ) : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांनी नागपूर जिल्ह्यातील जलालखेडा परिसरातील थुगावदेव येथील सुरेश पांडव या तरुण शेतकऱ्याने नापिकी आणि कर्जबाराजीपणामुळे केलेली आत्महत्या या विषयावर जी स्थगन प्रस्तावाची सूचना दिली होती, त्या सूचनेला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे, मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या आहेत. म्हणून मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**अध्यक्ष** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे )

-------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ. शी.** : दारिद्र्यरेषेच्या यादीत नसल्याने घरकुलाचा लाभ न मिळाल्यामुळे सुरेश जाणक्या निकळे यांनी केलेली आत्महत्या

**मु. शी.** : दारिद्र्यरेषेच्या यादीत नसल्याने घरकुलाचा लाभ न मिळाल्यामुळे सुरेश जाणक्या निकळे यांनी केलेली आत्महत्या या विषयावर सर्वश्री. सुभाष पाटील, धैर्यशील पाटील, वि.स.स. यांनी दिलेली स्थगन प्रस्तावाची सूचना.

श्रीमती पंकजा मुंडे ( ग्रामविकासमंत्री ) : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री. सुभाष पाटील, धैर्यशील पाटील, वि.स.स. यांनी दारिद्र्यरेषेच्या यादीत नसल्याने घरकुलाचा लाभ न मिळाल्यामुळे सुरेश जाणक्या निकळे यांनी केलेली आत्महत्या या विषयावर जी स्थगन प्रस्तावाची सूचना दिली होती, त्या सूचनेला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे, मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या आहेत. म्हणून मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**अध्यक्ष** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे )

-------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ. शी.** : मुंबईतील मालाड परिसरातील श्री ट्युटोरियलस नावाच्या कोचिंग क्लासमध्ये इयत्ता पाचवी आणि सहावीच्या विद्यार्थ्यांनी गृहपाठ केला नाही म्हणून त्यांना नग्न करुन वर्गाबाहेर राहण्याची केलेली शिक्षा

**मु. शी.** : मुंबईतील मालाड परिसरातील श्री ट्युटोरियलस नावाच्या कोचिंग क्लासमध्ये इयत्ता पाचवी आणि सहावीच्या विद्यार्थ्यांनी गृहपाठ केला नाही म्हणून त्यांना नग्न करुन वर्गाबाहेर राहण्याची केलेली शिक्षा या विषयावर सर्वश्री. विजय वडेट्टीवार, राधाकृष्ण विखे-पाटील, अमीन पटेल, वि.स.स. यांनी दिलेली स्थगन प्रस्तावाची सूचना.

श्री. विजय शिवतारे ( जलसंपदा राज्यमंत्री ) : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री. विजय वडेट्टीवार, राधाकृष्ण विखे-पाटील, अमीन पटेल, वि.स.स. यांनी मुंबईतील मालाड परिसरातील श्री ट्युटोरियलस नावाच्या कोचिंग क्लासमध्ये इयत्ता पाचवी आणि सहावीच्या विद्यार्थ्यांनी गृहपाठ केला नाही म्हणून त्यांना नग्न करुन वर्गाबाहेर राहण्याची केलेली शिक्षा या विषयावर जी स्थगन प्रस्तावाची सूचना दिली होती, त्या सूचनेला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे, मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या आहेत. म्हणून मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**अध्यक्ष** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे )

-------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**हरकतीच्या मुद्याबाबत**

श्री. जयंत पाटील ( बसून ) : अध्यक्ष महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. माननीय जलसंपदा मंत्री हे कागदावर लिहून आणलेले निवेदन सभागृहात वाचून दाखवित आहेत.

**अध्यक्ष** : माननीय जलसंपदा मंत्री यांनी कागदावर लिहून आणलेले निवेदन सभागृहात वाचून दाखवित आहेत, अशी सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांची हरकत आहे.

श्री. जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, माननीय जलसंपदा मंत्र्याच्या हातात निवेदन नाही. असे असले तरी त्यांनी सदर निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवावे. विरोधी पक्षातील एकाही सन्माननीय सदस्यांना निवेदने मिळालेली नाहीत. माननीय जलसंपदा मंत्री चिठ्ठीच्या माध्यमातून निवेदन सभागृहात वाचून दाखवित आहेत.

**अध्यक्ष** : काय मांडायचे आहे, तेवढे फक्त मंत्री महोदयांनी कागदावर लिहले असून, ते सभागृहात वाचून दाखवित आहेत.

श्री. जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांकडे तसेच माननीय जलसंपदा मंत्र्यांकडे निवेदने नाहीत.

**अध्यक्ष** : आता मी सभागृहाच्या कामकाजाचा आढावा घेत आहे. तेराव्या विधानसभेचे बुधवार दिनांक 9 मार्च, 2016 रोजी....

श्री. विष्णू सवरा : अध्यक्ष महोदय, मला निवेदन करावयाचे आहे.

**अध्यक्ष** : मी मंत्री महोदयांना विचारु इच्छितो की, सदरचे निवेदन कधीचे आहे. आपण सकाळी निवेदन का केले नाही ?

श्री. विष्णु सवरा : अध्यक्ष महोदय, आपल्या अनुमतीने मी खालील निवेदन करीत आहे. विधानसभा तारांकित प्रश्न क्रमांक 48716...(अडथळा)...

.

.....11.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. पृथ्वीराज चव्हाण : अध्यक्ष महोदय, आता एवढ्या उशीराने एवढी सर्व निवेदने काही माननीय मंत्र्यांकडून सभागृहात केली जात आहेत. एक दिवस अगोदर निवेदन केली असती किंवा आज सकाळी केली असती तर खूप चांगले झाले असते. आता प्रत्येक सन्माननीय सदस्य त्यांच्या मतदारसंघात जाण्यासाठी आतुर झालेला आहे. विरोधी पक्षातील कोणत्याही सन्माननीय सदस्यांकडे निवेदन नाही. निवेदनाच्या कॉपीज दिलेल्या नाहीत. अशा पध्दतीने कामकाज करणार असेल तर ते बरोबर नाही. निवेदनावर चर्चा होऊ नये अशी शासनाची इच्छा आहे काय ?

**अध्यक्ष** : माझी सर्व माननीय मंत्री आणि माननीय राज्यमंत्र्यांना सूचना आहे की, यापुढे असे होता कामा नये. निवेदन योग्य वेळी सभागृहात करण्यात यावी.

श्री. विष्णु सवरा : अध्यक्ष महोदय, होय.

----

ZZ-1......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.:** शासकीय आश्रमशाळांमध्ये दोन वर्षामध्ये मृत्युमुखी पडलेल्या मुलांच्या कुटुंबीयाना आर्थिक भरपाई देणे

**मु.शी.:** शासकीय आश्रमशाळांमध्ये दोन वर्षामध्ये मृत्युमुखी पडलेल्या मुलांच्या कुटुंबीयाना आर्थिक भरपाई देणे यासंबंधी आदिवासी मंत्र्यांचे निवेदन

श्री.विष्णू सवरा (आदिवासी विकास मंत्री) : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने नियम 47 अन्वये पुढील निवेदन करतो :-

( प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

----------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.:** मुंबईतील अनेक पॅथॉलॉजी लेबोरेटरीमध्ये पॅथॉलॉजिस्टची नियुक्ती करणे बंधनकारक असताना त्याचे पालन न होणे

**मु.शी.:** मुंबईतील अनेक पॅथॉलॉजी लेबोरेटरीमध्ये पॅथॉलॉजिस्टची नियुक्ती करणे बंधनकारक असताना त्याचे पालन न होणे यासंबंधी माननीय सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्र्यांचे निवेदन

श्री.विजय शिवतारे (सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री) : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने नियम 47 अन्वये पुढील निवेदन करतो.

( प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

--------

...3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महाराज, मुख्यमंत्री महोदय सभागृहात उपस्थित आहेत. मंत्री महोदयांनी दहा दिवसापूर्वी, पंधरा दिवसापूर्वी निवेदन करणे आवश्यक होते. अधिवेशन संपण्याच्या आधी एक दिवस, दोन दिवस अगोदर निवेदन वितरित करायला पाहिजे होते. शेवटच्या दिवशी अधिवेशन संपण्यापूर्वी एक तास अगोदर निवेदन वितरित करण्याचा आपण निर्णयच घेऊन टाकावा. अधिवेशन संपण्याच्या शेवटच्या क्षणी निवेदन पटलावर ठेवली जातात, अध्यक्ष महाराज, आपल्या वतीने जे निदेश दिले जातात त्याला काही अर्थच राहणार नाही. मागील काळात काय झाले हे आपण कृपया सांगू नका. वेळेत निवेदन आली तर मंत्री महोदयांची अडचण होते. कोणता कागद हातात घ्यावा हे त्यांना कळत नाही.

श्री.एकनाथराव खडसे : अध्यक्ष महाराज, यापुढे काळजी घेऊ. अधिवेशन संपण्याच्या आत निवेदन करण्यात येईल. अजून अधिवेशन संपायला वेळ आहे. पुढील वेळेस सरकार याची काळजी घेईल.

...4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सत्रकाळातील कामकाजाचा आढावा**

**अध्यक्ष** : आता मी सभागृहाच्या कामकाजाचा आढावा घेत आहे. 13 व्या विधानसभेचे बुधवार, दिनांक 09 मार्च, 2016 पासून सुरु झालेले अर्थसंकल्पीय अधिवेशन आज बुधवार, दिनांक 13 एप्रिल, 2016 रोजी संस्थगित होत आहे.

या सभागृहाच्या बैठकांची एकूण संख्या 23 असून प्रत्यक्षात 176 तास 46 मिनिटे कामकाज झालेले आहे. मंत्री उपस्थित नसल्यामुळे 30 मिनिटे व अन्य कारणामुळे 13 तास 08 मिनिटे असा कामकाज होऊ न शकलेला एकूण कालावधी 13 तास 38 मिनिटे आहे. सभागृहाचे रोजचे सरासरी कामकाज 7 तास 40 मिनिटे झालेले आहे.

एकूण प्राप्त झालेल्या तारांकित प्रश्नांची संख्या 13730 असून स्वीकृत झालेल्या तारांकित प्रश्नांची संख्या 1327 असून सभागृहात 98 प्रश्नांची तोंडी उत्तरे देण्यात आली. एकूण प्राप्त झालेल्या अल्पसूचना प्रश्नांची संख्या 17 असून स्वीकृत झालेल्या अल्पसूचना प्रश्नांची संख्या 2 आहे.

एकूण प्राप्त झालेल्या लक्षवेधी सूचनांची संख्या 3123 असून स्वीकृत लक्षवेधी सूचना 135 इतक्या आहेत. तर चर्चा झालेल्या लक्षवेधी सूचना 62 आहेत.

या अधिवेशनात विधानसभेने एकूण 20 विधेयके संमत केली व दोन्ही सभागृहांनी एकूण 14 विधेयके (विधानसभेची 13 व विधान परिषदेचे 1 संमत केली.

अर्धा तास चर्चेच्या एकूण 326 सूचना प्राप्त झाल्या त्यापैकी 76 स्वीकृत करण्यात आल्या आणि सभागृहात 14 अर्धा तास चर्चेच्या सूचनांवर चर्चा झाली.

नियम 293 अन्वये 08 प्रस्तावांवर चर्चा करण्यात आली.

अंतिम आठवडा प्रस्तावावर चर्चा झाली.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

संपूर्ण अधिवेशन कालावधीत सभागृहात माननीय सदस्यांची एकूण सरासरी उपस्थिती 82.59 टक्के होती. त्यात जास्तीत जास्त उपस्थिती 93.51 टक्के तर कमीत कमी उपस्थिती 72.51 टक्के एवढी होती.

या अधिवेशनाचा समारोप करताना मी माननीय मुख्यमंत्री, माननीय संसदीय कार्यमंत्री,

...5



**अध्यक्ष......**

सर्व मंत्री महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते, सर्व माननीय तालिका सभाध्यक्ष, सर्व सन्माननीय गट नेते, सर्व सन्माननीय सदस्य, प्रसिध्दी माध्यमांचे प्रतिनिधी, विधिमंडळाचे अधिकारी व सर्व कर्मचारी, सर्व सुरक्षा अधिकारी व कर्मचारी या सर्वांचे मी मनापासून आभार मानतो. मंत्रालयीन अधिकारी व कर्मचा-यांचे देखील मी या ठिकाणी आवर्जून आभार मानतो.

आता मी पुढील अधिवेशनासंबंधी घोषणा व हे अधिवेशन संस्थगित करण्याबाबत माननीय राज्यपालांकडून जो संदेश आलेला आहे तो वाचून दाखवितो.

...6

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.:** पुढील अधिवेशनासंबंधी घोषणा

**अध्यक्ष** : मी जाहीर करतो की, महाराष्ट्र विधानसभेचे पुढील अधिवेशन, सोमवार, दिनांक 18 जुलै, 2016 रोजी विधान भवन, मुंबई येथे घेण्यात यावे, अशी शिफारस राज्यपालांकडे करण्याचे ठरले आहे.

------------

**पृ.शी./मु.शी.:** सत्र समाप्तीसंबंधी घोषणा

**अध्यक्ष** : सभागृहापुढील कामकाज संपले आहे. आता मी सत्र-समाप्तीसंबंधीचा राज्यपालांचा आदेश वाचून दाखवितो.

"मी सी.विद्यासागर राव, महाराष्ट्राचा राज्यपाल, याद्वारे भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 174, खंड (2) उपखंड (क) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन याद्वारे बुधवार, दिनांक 13 एप्रिल, 2016 रोजी होणाऱ्या बैठकीच्या समाप्तीबरोबर महाराष्ट्र विधानसभेचे सत्र संस्थगित करीत आहे."

आता राष्ट्रगीत गाईले जाईल व त्यानंतर सत्र संस्थगित होईल, असे मी घोषित करतो.

( यानंतर राष्ट्रगीत झाले.)

( सायंकाळी 6 वाजून 46 वाजता सत्र संस्थगित झाले.)

------------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION